# संगीता जोशी

# ग़ज़लायन

# गझलायन

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# गझलायन

संगीता जोशी

ई साहित्य प्रतिष्ठान

गझलायन (गझलचर्चा)

संगीता जोशी

A-1, भूषण अपार्टमेंट,

11/2, कर्वेनगर, कमिन्स कॉलेजजवळ, पुणे 411052

Phone : 9665095653, 7722006363

sanjoshi729@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : ८ मे २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# संगीता जोशी



ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े प्रसिद्ध होणारे संगीता जोशी यांचे हे सातवे पुस्तक.


सांप्रत मराठी कविता आणि विशेषतः मराठी गझलच्या रसिकांना संगीता जोशी यांची नव्याने ओळख करून द्यायची गरज नाही. मराठीतील त्या पहिल्या मराठी गझलकार. २००४ सालच्या अमरावती येथील मराठी गझल संमेलनाच्या त्या अध्यक्षा होत्या. त्यांची आजवर प्रसिद्ध झालेली म्युझिका, वेदना संवेदना, चांदणे उन्हातले, मराठी गझल, नजराणा शायरीचा भाग १ व २, ती भेटते नव्याने अशी अनेक पुस्तके रसिकांच्या मनात स्थान करून आहेत. अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आले आहे. अनेक सभा, मैफ़ली व संमेलनांतून त्यांनी आपले काव्य सादर केले आहे. टिव्ही मालिका, ध्वनीमुद्रिका यांतून त्यांची गीते प्रसिद्ध झाली आहेत. गेली पन्नास वर्षांहून अधिक काळ त्या लिहीत आहेत.


या सर्व सन्मानांमध्ये गुंतून न रहाता त्यांचा लेखनप्रवास सुरूच आहे. आणि त्यासाठी त्या नवनवीन माध्यमांचा मागोवा घेत असतात. या पुस्तकात तीन प्रकारच्या लेखांचे संकलन आहे.


१- संगीताजींनी लिहीलेल्या गझलांवर मान्यवरांच्या प्रतिक्रिया, प्रस्तावना वगैरे
२- गझल या विषयावर संगीताजींनी लेहीलेले काही प्रासंगिक लेख
३- नवोन्मेषशाली गझलकारांच्या संग्रहांवर किंवा गझलांवर संगीताजींच्या प्रतिक्रिया किंवा प्रस्तावना.

हे पुस्तक मराठी गझल या विषयावर एक महत्त्वाचा दस्तावेज ठरेल व अभ्यासकांना उपयोगी पडेल याची खात्री आहे.

ई साहित्यतर्फ़े प्रकाशित झालेले संगीता जोशी यांचे साहित्य














http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ye_chamanajar_sangeeta_joshi.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/urdu_shayari_sangeeta_joshi.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/urdu_shayari_2_sangeeta_joshi.pdf


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ney_kuthehi_vadala_sangeeta_joshi.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mddb_dattopant_deshpande.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/bsbb_sangeeta_joshi.pdf

# चिंतन

---संगीता जोशी.



गझलसंबंधी लिहायचं? काय लिहायचं? ती कुठे भेटली, कधी भेटली हे लिहायचं? का अमुक गझल केव्हा लिहिली, त्यावेळी मनःस्थिती नेमकी कशी होती, त्यातला 'तो' शेर कसा सुचला?...इत्यादि प्रश्न समोर आले की उत्तरं सुचतंच नाहीत. वाहत्या पाण्यात आपण पाय ठेवून उभे राहिलो असतांनाच एक पाय क्षणभर वर उचलून पुन्हा त्याच जागी परत ठेवला तरी पाणी तेच असतं का? 'ते' पाणी कधीच वाहून गेलेलं असतं. त्याची जागा नवीन पाण्यानं घेतलेली असते! आयुष्यातला कोणताही क्षण कोणालाही पुन्हा पकडता येत नाही. कितीही हवा असला तरीही! मग मी काय उत्तर देणार? पण तरीही काही लिहिणार आहे. कारण गझल माझी सखी आहे. जिवाभावाची सखी!

हया सखीची आणि माझी पहिली ओळख झाली तेव्हा तिचं नावही मला माहित नव्हतं. मला गाता येत होतं म्हणून मी गुणगुणत कसल्यातरी तालावर कविता लिहीत होते. जे लिहिलं गेलं ते लयबध्द असल्यामुळे छान वाटलं. आणखी अशाच काही कवितालयीत लिहित गेले. पुढे काही वर्षांनी कळलं की हया रचनेला गझल म्हणतात. बेगम अख्तर कालवश झाल्या तेव्हा मी जी कविता लिहिली ती त्यावेळचे राजकवी यशवंत यांनी वाचली तेव्हा 'ही गझल आहे' असे ते म्हणाले. तेव्हा मला हा फॉर्म सापडला हे मला कळले.तेव्हा सुरेश भट हे नावही मी ऐकले

नव्हते व त्यांच्या संपर्कात असणेहीशक्य नव्हते. मात्र त्यावेळच्या माझ्या गझला पूर्णपणे निर्दोष नव्हत्या. काफिया जमत होता ,पण अलामत माहीत नव्हती. पुढे काही वर्षांनी सुरेश भटांचा पुण्यातला पहिला कार्यक्रम बेलवलकर यांच्या टेरेसवर झाला, त्यात मला भटांसमोर गझल वाचण्याची संधी मिळाली. त्यांनी खूप कौतुक तर केलेच, व अलामत समजावून सांगितली. मला आठवतंय, तेव्हा कवी अनिल कांबळे प्रथमच सुरेश भट यांना माझ्या घरी घेऊन आले! मी धन्य धन्य झाले होते! मग काय, त्या बैठकी, चर्चा, मग त्यांचा पत्रव्यवहार..हा सिलसिला सुरू झाला. त्यांनी खूप प्रोत्साहन दिले. मेनका मसिकात ते गझलचे सदर चालवत होते, त्यातही माझ्या काही गझला छापून आल्या. मला आनंद झाला. तशा कविता आधीपासूनच विविध ठिकाणी प्रसिध्द होत होत्या. भटांमुळे गझलांची समज पक्की झाली. एकदा मेनका साठी मी दिलेल्या गझलेत त्यांनी इतके बदल (इस्लाह) केले की माझे शेर मला माझे वाटेनासे झाले. त्यानंतर मी मेनकासाठी गझल पाठविली नाही. भटांशी स्पष्ट बोलणेही झाले. 'तुम्ही तर उत्कृष्टच लिहिता, पण माझी गझल ही माझी असली पाहिजे. एखाद दुसऱ्या शब्दाचा इस्लाह ठीक आहे पण शेरातील संपूर्ण विचारच बदलून गेला तर ती तुमची गझल होईल, माझी कशी राहील?' असे माझे म्हणणे होते. ते त्यांनी नंतर मान्य केले. पुढे माझ्या बाबतीत त्यांनी क्वचितच दखल घेतली. सांगण्याचा हेतू हा की माझ्या गझला हया पूर्णपणे माझ्याच राहिल्या. सुरवातीच्याही आणि नंतरच्याही!

गझल हा फॉर्म मी का निवडला? खरं तर हे ठरवून काहीच घडत नाही. एखादी ओळ मनात स्फुरते ती गझलची असते म्हणून गझल तयार होते. पण हे नेहमीच घडते असे नाही. मी आजही इतर कविताही लिहित आहे. पूर्वी ही लिहितच होते. शिरीष पै म्हणतात ती गझलवृत्ती माझीही असावी! उदा. समाजात दिसणाऱ्या अन्यायाबद्दल मनात चीड, दुःखातही सुखाचा शोध, पराभवाचाही उपभोग,....असे बरेच काही!

आणखी एक खासियत मला गझल कडे आकर्षित करते. दोन ओळीत एक विचार सामावण्याची तिची क्षमता. आपल्या मनात विचार तरंग उठतात, ते खरोखर लाटांसारखेच असतात. एका विचारातून आपण दुसऱ्या विचाराकडे कसे वळतो हे आपल्याला कळतही नाही. एक लाट फुटते, मागून दुसरी येते, पहिलीशी तिचा काही संबंध नसतो. साखळी चालूच रहाते. गझल रचनेशी हे सुसंगतच आहे. आजची जीवनशैलीही वेगवान झाली आहे. संघर्ष वाढला आहे.

जीवन सुसह्य होण्यासाठी झगडावे लागते. त्यात छंद, कलेचा आस्वाद यासाठी फुरसतही नसते. क्रिकेट आता टेस्ट मॅच वरून वन-डे, त्यावरून फिफ्टी नंतर ट्वेण्टी वर आली. कदाचित दहा ओव्हर्स वरही येईल! ह्या माहौल मध्ये गझलचा-एका शेराचा-- संक्षिप्तपणा वरदानच आहे म्हणायचं. शेर चटकन लक्षात येतो, लक्षात रहातो. दादही घेऊन जातो.

गझल ही प्रतीकांची भाषा आहे, ही तिची खूप मोठी ताकद आहे. त्यामुळे तिचे शब्द शब्दामागचेही अर्थ सांगून जातात. श्रोत्याला/वाचकाला स्वतःच्या अनुभवाचे अर्थ शब्दांना देता येतात आणि ती गझल श्रोत्यांची होऊन जाते!

म्हणून वाचकाला ती इतर कवितेपेक्षा अधिक जवळची वाटत असावी.

हे सर्व ठीक आहे, पण गझलच्या बाबतीत असंही घडतं की दुसऱ्या एखाद्या कवीच्या गझलेतील आवडलेल्या कल्पना घेऊन थोड्याफार फरकाने नवकवी आपला शेर रचतो. काफिये समान येणे एरव्हीही अपरिहार्यच असते. काही वेळा उर्दू शेरांतून उचलेगिरी होते. मात्र आजच्या या भ्रष्टाचाराच्या युगात या गोष्टीचे आश्चर्य वाटायला नको!

कविता असो वा गझल-त्यातील शेर- मनात कसा तयार होत असावा याविषयी माझी एक कल्पना आहे. शिंपला हा एक मृदुकाय प्राणी असतो. शिंपला हे त्याचे कवच असते. बाहेरून येणारा एखादा कण त्याला टोचू लागला की तो त्या कणाभोवती शरीरातून एकप्रकारचा स्त्राव सोडतो व घोळून घोळून त्याचाच मोती तयार होतो. आपल्या मनाला असाच एखादा अस्वस्थ करणारा अनुभव आला तर त्यावर शब्दांची पुटे चढत जातात आणि कविता तयार होते! मी सांगितलेली ही सुंदर निर्मितीप्रक्रिया एका लेखकांनी आपलीच असल्याप्रमाणे वापरली. नाव राहू द्या, पण हे आपण ऐकले आहे वा वाचले आहे असाही उल्लेख करण्याचा उदारपणा दाखविला नाही. (ही कल्पना माझी स्वतःची आहे, मी ती कुठेही ऐकली वा वाचली नव्हती हे मी सत्याला स्मरून सांगू शकते.)

हल्ली मंचीय गझल हा प्रवाह गझलेत मोठ्या प्रमाणात दिसतो. कारण मंचावर दाद मिळावी. यालाही हरकत नाही,पण अतिरेक होऊ नये इतकेच!

हल्ली गझल हा प्रकार लोकप्रिय झाला आहे. भीमराव पांचाळे, माधव भागवत, राजेश उमाळे, मदन काजळे, दत्तप्रसाद रानडे इत्यादि गायकांचाही त्यात सिंहाचा वाटा आहे. त्यांच्यामुळे गझल लोकांपर्यंत पोहोचली.

एकदा मला विचारलं गेलं, की कवितेत व्यक्त झालेले अनुभव हे तुमचेच असतात का? या प्रश्नाला माझं उत्तर हो असेच आहे. असे पाहा, की वर्तमानपत्रात एखादी विशेष बातमी वाचली, तर आपण बेचैन होतो. त्यात आपण इतके गुंतून जातो, की तो अनुभव आपलाच होतो.(स्त्रीवर झालेल्या बलात्काराबद्दल शेर लिहिण्यासाठी प्रत्यक्ष अनुभवाची गरज नाही.)आपण त्यावर लिहितो, मग ते गद्य असो वा पद्य! याचा अर्थच असा की आपण त्या अनुभवाशी एकरूप झालो होतो. प्रत्येक अनुभव स्वतः-शब्दशः- घ्यायचा म्हटला तर एक आयुष्यही पुरणार नाही. आणि तशी जरूरही नसते. माणसाचं मन त्यासाठीच तर संवेदनशील बनवलेलं असतं. दुसऱ्याचं दुःखही आपण आपलं मानू शकू तर आपण माणूस! आणि ते जर शब्दात बांधून सौंदर्य निर्मिती करू शकलो तरच आपण कवी!!


# म्युझिकाविषयी

प्रस्तावना-म्युझिका

संगीता जोशी यांचा पहिला कवितासंग्रह मार्च 1986 मध्ये आला. साहित्य संस्कृतीचे अनुदान त्याला मिळाले होते. सुगावा प्रकाशनाच्या मा. उषा वाघ व डॉ.विलास वाघ यांनी तो महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व पु.ल. देशपांडे यांना पाठविला. तेव्हा त्यांनी वाघ यांना पाठविलेले हे पत्र---

दि 19.9.1996 रूपाली/777

शिवाजीनगर पुणे-411004



प्रिय विलास, उषा,

कालच मी तुम्हाला पत्र पाठविले आहे. आज 'म्युझिका' हा तुम्ही प्रकाशित केलेला कवितासंग्रह वाचला. संगीता जोशी यांच्या कविता मला आवडल्या. मुख्यतः त्यांनी गझला लिहिल्या आहेत. ह्या काव्यप्रकारात कविप्रतिभेच्या स्पर्शाने दुःख देखणे होऊन येते.

गझलची ही नस संगीता जोशी यांना सापडली आहे. सहज संवाद साधण्याची क्षमता हेही गझलेचं नहत्त्वाचं लक्षण आहे. संगीताबाईंच्या रचनेत सुंदर सहजता आहे. मला मुख्यतः कौतुक वाटते ते त्यांच्या निर्दोष रचनेचे. हल्ली गझलांचे जे संग्रह पाहण्यात आले, त्यापैकी पुष्कळ रचनेत ओळीओळीत वृत्ताच्या मक्षिकापाताचा अनुभव येतो. वृत्ताचा अचूकपणा ही तर गझलची पहिली अट आहे. किंबहुना, एकदा कुठल्याही वृत्तात कविता करायची म्हटल्यावर वृत्ताचे नियम मोडून चालत नाही. संगीता जोशींनी वृत्ताच्या बाबतीतला कटाक्ष पुष्कळ बाळगलेला आहे. प्रासांच्या किंवा यमकांच्या जुळवाजुळवीचा कुठे आटापिटा नाही. त्यामुळे आशय व अभिव्यक्ती एकरूप होऊन आली आहे. एका चांगल्या प्रकाशनाबद्दल तुमचे अभिनंदन आणि चांगल्या कवितांच्या निर्मितीबद्दल संगीता जोशी यांना धन्यवाद.

तुमचा

भाई.

म्युझिका च्या पुष्कळ आधी कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांना कवितांची वही वाचायला माझ्या वडिलांनी (रसिकाग्रणी दत्तोपंत देशपांडे यांनी) वाचायला नाशिकला नेऊन दिली होती.त्यावर त्यांनी दिलेला अभिप्राय—



सप्रेम नमस्कार,

आपल्या कविता वाचल्या. आवडल्याही. काही कविता खूपच चांगल्या, आशयआविष्काराची सुरेख संगती साधणाऱ्या आहेत.

'गजल' प्रकारात आपली विशेष गती आहे. हा प्रकार आपल्याला चांगला साधला आहे. बहुतेक गजलगीते रचनेच्या दृष्टीने निर्दोष, ठसठशीत शैलीत लिहिलेली आणि वाचकाच्या मनाशी सहज संवाद साधणारी आहेत.

वेदना, विफलता, उद्वेग हे या कवितेचे स्थायी भाव आहेत. त्यातील तीव्रता, उत्कटता वाचकाच्या मनपर्यंत नक्कीच पोहोचते.

या क्षेत्रात आपल्याला सुयश इच्छितो.

आपला,

वि. वा. शिरवाडकर

***

‘म्युझिका’ या संग्रहास प्रसिद्ध लेखक व. पु. काळे यांनी लिहिलेली प्रस्तावना---

दोन शब्द—



साहित्यनिर्मितीचं नातं लेखकाच्या वैयक्तिक आयुष्याशी किती टक्के असावं, याचा शोध मानवी प्रयत्नांच्या पल्याड आहे. ‘आत्मचरित्र’ हा एकच वाङ्मय प्रकार, आत्ता इथं हे विधान करतांना गृहीत धरलेला नाही, कारण प्रयोजनच नाही. नाटक, कादंबरी, काव्य, कथा इतक्याच आविष्कारांच्या संदर्भात हा प्रश्न पडतो.

हा प्रश्न प्रत्येक संवेदनशील वाचकाला पडतो. काहीतरी झपाटून टाकणारं. सुखद बेचैनी लावणारं, हवंहवंसं काहूर माजवणारं एखादं पुस्तक गवसावं, ह्यासाठी एक वाचक म्हणून मीही प्रतीक्षा करत असतो.अपेक्षा पूर्ण करणारं पुस्तक हातावेगळं झालं की, त्याच्या निर्मात्याला भेटावंसं वाटतं. लेखनामागची त्यांची प्रेरणा, प्रतिभा, अनुभव आणि अनुभूती यांचा शोध घ्यावासा वाटतो.हा शोध घेतांना माझ्यातला लेखक पूर्णतः नाहीसा झालेला असतो. ‘सुचणं’ ही प्रक्रिया केव्हा आणि कशी घडते, हे ही सांगता येणार नाही. काहीशा संमोहनानस्थेतच सुचण्याचा चमत्कार घडतो.तो साक्षात्काराचाच क्षण असतो.काही क्षण भांबावून जातं मन. मनातल्या मनात हात जुळतात, ते त्या अदृश्य शक्तीसमोर. भांबावून जाण्याचा क्षण मग तुडुंब आनंदात विरून जातो. मन एका समृद्ध अवस्थेत वावरू लागतं. भोवतालच्या सगळया माणसांपेक्षा आपल्याजवळ काहीतरी वेगळं अलौकिक असं आहे, याचा अव्यक्त आनंद आपला गाभारा सोसंगून टाकतो. कळीची चाहूल लागलेला मोगरा आपला सगळयात जवळचा सखा होतो. मग जेवणखाण, स्नानादि हालचाली किंवा व्यावहारिक जगातला एकूणच वावर चैतन्यहीन असतो, निव्वळ सवयीनं पार पडतो. विजेचा सर्व पुरवठा एका वेगळया रोषणाईकडे वळवला जातो.

या सगळया सोहळयानंतर थोडं भानावर यावंच लागतं. कारण मग रोषणाईतला प्रत्येक दिवा तपासायचा असतो.कोणत्याही लेखकानं कितीही नाकारलं, तरीही एक रचना

करायची असते. विद्वान जमातीचा शब्द वापरायचा झाला, तर 'आकृतिबंध' असं कायसंसं म्हणावं लागेल. ठणठणीत कबुलीजबाब द्यायचा झाला तर चक्क 'तंत्र'म्हणावं तीच 'स्टाईल'.

'स्टाईल् इज ए मॅन्' असं साहेब म्हणाला आहे.कोणता ते माहीत नाही.आपलं तेही वाचन आजतागायत नाही.

तंत्राचा भाग आहेच; पण तरीही त्याच्यावर मंत्राचाच अंमल असतो. प्रत्येक कलाकृती स्वतःची आकृती ठरवूनच सामोरी येते. वस्त्रालंकारांचाच स्वतंत्र्य असलं तर ते आपलं, या स्वातंत्र्यातच अनुभव व अनुभूती यांचं भ्रमण सुरू होत असावं. मन तळापासून ढवळून निघालेलं असतं. विचारलहरींच्या आवर्तात मग अनुभव व अनुभूती यांची कधी देवाणघेवाण होते, तर चक्क कधी गल्लत. लेखणीच्या टोकाशी सुप्तपणे कोण पुढं येऊन थांबलेलं असेल, हे वर्तवणं अशक्य.

आणि म्हणूनच वाचकांच्या एका ठरलेल्या आणि कंटाळवाण्या प्रश्नाचं उत्तर देणं अशक्य असतं.

*'तुम्ही जे लिहिलत ते प्रत्यक्ष घडलेलं आहे की....'*

म्हणूनच या तपशिलात न जाणं चांगलं.

सुखदुःखाच्य, अपेक्षाउपेक्षांच्या, सन्मान-अपमानाच्या आणि हार-प्रहाराच्या घटना सातत्यानं घडतच असतात; सुखदुःखाची एकूण संख्या मोजायचं ठरवलं, तर मतदारांच्या संख्येइतकी, मोजण्याच्या पलीकडे ती मुळीच जाणार नाही. पंचेंद्रियांच्या आधाराचर सगुणसाकाराची साडेतीन हात उंचीची मर्यादा घेऊन आलेल्या माणसाचा 'टोटल्' सुखदुःखाचा आकडाकितीसा असणार? – त्या मापानं मोजण्यात काही अर्थच नाही.

नित्य नवं , अमर्याद शक्ती असलेलं, निराकार निर्गुण मन महत्त्वाचं. तेच तेच अनुभव वेगवेगळ्या स्तरांवर भोगणारं-उपभोगणारं मन महत्त्वाचं. कळीची चाहूल लागलेलं मोगऱ्याचं एवढंसं झाड मग कुंडीत मावणारं रोप राहत नाही. गगनापर्यंतचा अवकाश मग त्याच मोगऱ्याचा, तेच अनुभवानं संपन्न होणाऱ्या मनाचं.

संगीता जोशींच्या कविता वाचतांना तरीही हे सगळे विचार अस्वस्थ करून गेले.या लेखनाला गजला म्हणायच्या की कविता की रुबाया, हे मला सांगता येणार नाही. त्या स्वतः त्याला गजला म्हणतात. तसं असेल, तर या संग्रहाला मी हे गालबोट लावणं म्हणजे चक्क अगोचरपणाच आहे. काव्याच्या प्रांतात प्रवेश करतांना अस्मादिकांना पासपोर्ट काढावा लागेल.

त्यात गजलप्रांतात म्हटलं की, पसपोर्टबरुबर व्हिसा हवा. त्यात प्रांताचे एकमेव शहेनशहा सुरेश भट यांनाच तो व्हिसा देण्याचे रास्त अधिकार आहेत. त्यासाठी अस्मादिकांजवळ 'मल्मली तारुण्य' तर नाहीच; पण 'आयुष्याच्या मशाली' पेटवण्याचे सामर्थ्यही नाही. पासपोर्ट व्हिसाकी बात तो छोडोच, ते तर माझं डोमिसाइल सर्टिफिकेटही जप्त करतील. त्यांचा हा अधिकार त्यांना कुर्निसात करून 'गुस्ताखी माफ' म्हणत मान्य करूनही मी चोरवाटेनं प्रवेश का करतोय? तर, प्रत्येक गडाला घोरपड लावता येणार नाही, असा एक चौकीपहारे नसलेला बुरुज असतो. त्यानुसार गजलांच्या राज्यात सह्याद्रीप्रमाणे ठाकलेल्या ह्या भटांनी मला एक वाट आपण होऊन दाखविली. त्यांनी स्वतः मला त्यांचा 'एल्गार' संग्रह माझ्या 'मनी' असतांना; पण 'ध्यानी' नसतांना पोस्टानं पाठवला. मी लगेच त्यांना माझ्या एका संग्रहावर

*गर्दीत चाहत्यांच्या दिसलो कसा तुम्हांसी*

*बागेत मोगऱ्याच्या बाभूळ गौरवीसी...*

असं लिहून पाठवला. ज्या प्रेमापोटी त्यांनी मला 'एल्गार' पाठवला त्याचाच मी आयडेंटिटी कार्डासारखा उपयोग करून या संग्रहाची पहिली पानं अडवत आहे. मुख्य चित्रपट पाहायचा असला की 'डॉक्युमेंट्री' चा छळ सोसावा लागतो, त्याप्रमाणे काव्यप्रेमी रसिक हा छळ सोसतील, हा माझा 'काव्य' आणि 'प्रेमी' या दोन्हींवरचा विश्वास.

निराशेची एकतारी वाजवणाऱ्या ह्या काव्यपंक्तीतून मध्येच संतुरिच्या अनेक तारा झणकारून जातात, त्याचाही मला मोह झाला.

तू भेटशी नव्याने

बाकी जुनेच आहे...

या ओळींनी पुनरुक्तीनं भरलेल्या माझ्या भूतकाळातला बराचसा काळ मी विसरलो. 'बाहुलीच्या लग्नात मला बाहुल्याचं' स्थान देऊ पाहणारे काही चेहरे नजरेसमोर आले आणि 'नियतीनं मला बाहुला' केल्याचं शल्य मी विसरलो. इतकेच नव्हे, तर वैफल्याने अनेक घाट पार करतांनाही आपल्याही 'कथेच्या पानांआड बहराची फुलं' कशी आली हे कोडं सोडवता आलं नाही.

लेखणी कुणाची होती

अज्ञात कुणाचे हात...

या ओळींनी माझ्या मनातली एकतारीही झणकारली आणि ‘राखेच्या ढिगाऱ्याला एका ठिणगीची’ ऊब पुरेशी झाली.

राखेच्या ढिगाऱ्याची व्याप्ती किती, हेच विसरणं महत्त्वाचं. मग एवढ्याशा ठिणगीला ज्वालामुखीही होता येतं किंवा सुगंधाचीच लयलूट करणाऱ्या उदबत्तीचा मुकुटही होता येतं. तसं झालं की,

‘हिमालया ,

तुझ्यासारखा उत्तुंग तूच

पण आश्चर्य सांगू?

आज तू माझ्या मनात सामावलास.

हे तुझं सूक्ष्म रूप

की माझ्या मनाची भव्यता?’

असं टवटवीत ब्रह्मकमळ उगवतं. कळ्यांना पत्ता लागला नाही तरी बहार येत राहते. दारी लावलेल्या रोपाचा वेल गगनावर जातो, त्याचंच बोट धरून कविमन झालरी लावलेल्या मेघाच्या मांडवात नातं जोडून जातं. त्याच मांडवात विश्वशांती स्थापणारा पारवा भेटतो.

जत्रेतल्या प्रत्येक माणसानं स्वतःच्या कलाकृती रक्ताची शिंपण करून प्राणाची, श्वासाची आरास केलेली असते; पण तरीही माझी पावलं थबकली, चाल मंद झाली, पुढं जाऊन मागं वळून पाहावंसं वाटलं, ती ही ‘आरास’.

वैफल्य, निराशा, उपेक्षायांची रास आपण पार करतो, ती अशी आरास अधून मधून थांबायला लावते म्हणूनच. ह्या वाटचालीवर ‘त्याच्या पावलांचे ठसे’ दिसतात, हा आधार. ‘नेमका अश्रू कडेला’ उभा असला, तरी ‘बाहुल्यांना पोरकं करावंसं’ वाटत नाही, ते त्याच ठशांसाठी. ‘जळण्याचा सोहळा सोसतांना आषाढ साजरा’ करण्याची ताकद उगीचयेते का? ‘त्याच्याच मस्तीत मग’ फेडण्याची मागणी न करता, व्याजाची अपेक्षा न करता,

‘प्रेम जमेला ठेवून घे’ असं सांगता येतं. ‘गंध दान करून फुलाला कोमेजण्याचं बळ येतं.’

अज्ञातातून कोसळणाऱ्या उल्का झेलण्यासाठी मग देहाची ओंजळ होते.इतकंच काय 'तारकांच्या हालचालीवर लक्ष ठेव' असा आकाशाला दम देण्याचीही हिंमत अंगी येते.

ही सगळी हिंमत उदबत्तीचा मुकुट झाल्यावर; पण ज्वालामुखीचाच उद्रेक झाला तर?

मग आजच्या वाटेवर कालच्याच ठेचा लागतात. वाळवंटातून जाणाऱ्या या वाटेवर जाईच्या फुलाला जपतांना जीव कासावीस होतो. कुणालाही जवळचं मानू नये हा धडा जिविभावाचे मित्रच शिकवतात. आयुष्याच्या बाजारातले सौदे जमवतांना स्वप्नं विकावी लागतात. ती स्वप्नं विकतांना म्हणावं लागतं...

कधीतरी अशी कुठे चुकून भेट व्हायची,

अशीच एक सांज आसवातही भिजायची

मनातल्या मनात शब्द रोखुनी धरायचे

'कसे नि काय'... 'ठीक' फक्त चौकशी करायची

अशाच प्रवासात मग कावळयांचेच जास्त प्रमाणात होणारे सत्कार बघावे लागतात. कृष्णाचा पराभव होऊन कंस अजिंक्य ठरतो. जाब विचारावा तर ते मौन पाळतात. ऐतखाऊ माणसं चंद्रही विकायला काढतात.

अर्थात, उदाहरणांची ही यादी लांबवण्यात गंमत नाही. ज्वालामुखीत काहीच वाचवता येत नाही; पण मनाची आहुती ज्वालामुखीनं प्रथम मागितली, तरी कविता मागे उरते. तसं झालं की, राखेतली ठिणगी मुकुट झाली किंवा ज्वालामुखी झाली, तरी खेद उरत नाही.

म्हणूणच शाईऐवजी रक्तानं लिहिलेला ग्रंथ 'साधी रुबाई' ठरत नाही. कवितेचं दान झोळीत टाकतांना नियती, ते दान 'सत्पात्री' होतंय् याची खात्री पटवून घेऊनच, व्यक्तीची निवड करते.

म्हणूनच, शाईऐवजी रक्त वापरायची जिगर ज्या कवयित्रीकडे आहे, तिनं नियतीला

तुझ्याजवळ नव्हती का,

दुसरी एखादी सौम्य सजा?

की माझ्या हृदयात ओतलीस ही कविता?

हा प्रश्न विचारू नये. नियती तुम्हाआम्हाला फसवते; पण स्वतः फसत नाही.

'चार शब्द' प्रस्तावनेदाखल लिहिणाऱ्यानं 'दोन शब्द' सुनवायचे असतात.ह्या संकेतानुसार (त्याशिवाय स्वतः ग्रेट ठरत नाही) मी कवयित्रीच्याच दोन ओळी शेवटी लिहितो....

भाव येती दाटुनी अन् भावतो पाऊस हा

जीवनाला अर्थ आहे सांगतो पाऊस हा....

---------व. पु. काळे

***

‘म्युझिका’ या माझ्या पहिल्या संग्रहाच्या पहिल्या आवृत्तीनिमित्त लिहिलेले स्वगत—

‘म्युझिका’ चं निमित्त साधून मी माझ्या कवितेविषयी काही लिहावं असा मुळीच विचार नाही. ‘आपल्याला आनंद देणारी कविता इतरांनाही आनंद देईल’ या वि.वा. शिरवाडकारांच्या (कुसुमाग्रज) प्रोत्साहनामुळे मी हा संग्रह छापण्याचं धाडस करते आहे. या कविता-संग्रहात गझलांचाही समावेश आहे, एवढेच फक्त नमूद करते.

माझ्या कवितेच्या मागे अनेकांच्या प्रेरणा व अनेकांची ॠणं आहेत; ती काही ‘आभार’ या एका पोकळ शब्दानं फिटण्यासारखी नाहीत. म्हणून तो प्रपंच टाळणेच श्रेयस्कर! काही भावनांना शब्द सापडतात, त्यांची कविता होते, तर काहींना शब्द नकोच असतात.

श्री. वपुंच्या भरगच्च कार्यक्रमातून माझ्यासाठी त्यांनी मुद्दाम वेळ काढला व प्रस्तावना लिहून दिली. मी दिलेला त्रास त्यांनी केवळ प्रेमापोटीच सहन केलाय, याची मला जाणीव आहे.

आणखी, माझ्यावरच नव्हे तर माझ्या सर्व कुटुंबियांवर आपलेपणाने माया करणारे कविश्रेष्ठ सुरेश भट, यांचे आशीर्वाद हे या संग्रहाचं मोठं पाठबळ आहे.

----संगीता जोशी

'म्युझिका' ची प्रथमावृत्ती 1986 मध्ये प्रकाशित झाली. त्यानंतर जवळजवळ सतरा वर्षांनी या दुसऱ्या आवृत्तीचा योग येत आहे.दरम्यान, 1996 मध्ये माझा दुसरा कविता-संग्रह 'वेदना-संवेदना' प्रकाशित झाला.त्याचेही रसिकांनी भरघोस स्वागत केले. मात्र 'म्युझिका' बद्दल सतत विचारणा होत राहिली. हेच दुसरी आवृत्ती काढण्याचे प्रयोजन.

ज्या दिग्गजांचे आशीर्वाद 'म्युझिका'ला लाभले, ते कुसुमाग्रज, सुरेश भट आणि व.पु.काळे आज आपल्यात नाहीत याचे दुःख मनात आहे....

सुगावा प्रकाशनाचे प्रा. विलास वाघ व सौ. उषा वाघ यांनी 'म्युझिका' ची एक प्रत मा. पु.ल. देशपांडे यांना पाठविली होती. (हे मला माहीतही नव्हते.) त्यातील कविता आवडल्याचे पत्र पुलंनी वाघ यांना आवर्जून पाठविले होते. त्या पत्राचे मोल माझ्या दृष्टीने मोजण्यापलीकडील आहे. त्यांचे हे पत्र या आवृत्तीस मुद्दाम जोडले आहे. आज आपले सर्वांचे आवडते पु.ल. देखील काळाच्या पडद्याआड गेले आहेत....

माझ्या सर्व कविता मुखोद्गत असणारे रसिकोत्तम शशी मेहता हेही अचानक जगातून निघून गेले...!! आज या सर्वांच्या आठवणी मनात दाटून येत आहेत.

'म्युझिका' तील कविता, गझला अनेक मान्यवर संगीतकारांनी व गायकांनी स्वरबद्ध करून स्वतः गायल्या व इतरांकडूण गाऊन घेतल्या. कॅसेट्स् ही निघाल्या. मा. यशवंत देव, श्रीधर फडके यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करते. शब्दांना स्वरांचे पंख लाभतात, तेव्हा ते रसिकांच्या मनात सहजतेने उतरतात. त्यातून 'देव-स्वर' लाभलेल्या शब्दांचे भाग्य काय सांगावे? त्यांनी त्यांच्या मैफलीतून मला अनेक रसिकांपर्यंत पोहोचविले....

आणखी एक महत्त्वाचे नाव. गजलनवाज भीमराव पांचाळे. भीमरावांच्या गजलगायनाला खरोखर तोड नाही. मराठी गझल-गायनात हे नाव अग्रक्रमानेच घ्यावे लागेल.भीमरावांनी माझी गझल महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचविली. मराठी गझल-गायनाची ते कार्यशाळा घेतात; त्यात गायकाने कविता कशी समजावून घ्यावी याचे प्रात्यक्षिक करतांना ते 'आयुष्य तेच आहे' ही माझी गझल उदाहरणादाखल घेतात. तिचे विश्लेषण व रसग्रहण एकदा मी जेव्हा ऐकले, तेव्हा तो एक डोळयात अश्रू उभे करणारा उत्कट अनुभव होता! एवढेच सांगितले म्हणजे पुरे! कवीचे शब्द थेट रसिकांच्या काळजाला नेऊन भिडविण्याचे कसब

त्यांच्याकडे आहे. त्यांच्या स्वरातच प्रथम माझ्या रचना कॅसेट व सीडीबद्ध होण्याचा भाग्ययोग आला. 'म्युझिका' ची ही दुसरी आवृत्ती भीमरावांना अर्पण करण्यात मला विशेष आनंद होत आहे.

माझ्या कवितांवर जिवापाड प्रेम करणाऱ्या जावडेकर कुटुंबियांना मी विसरूच शकत नाही. साहित्यिक व माजी प्रचार्य डॉ.मुरलीधर जावडेकर व त्यांच्या पत्नी ललिता जावडेकर (जवळीकीने उषा बापट) यामच्याशी तर मित्रत्वाचे अतूट नाते आहे.त्यांनी माझ्या कवितेला प्रेम द्यावे हे स्वभाविकच आहे; पण त्यांची मुले डॉ.योगेंद्र, श्री.हिमांशु श्री कुमार(दोघे इंजिनियर) व डॉ. अश्विन, सून डॉ. सविता हे सर्वजण माझ्या अनेक कवितांना सुंदर चाली लावूण इतरांना ऐकवतात. सगळे बदलापूर, यूएस., यूके. ठाणे येथे आपापल्या व्यवसायात मग्न असूनही त्यांचे माझ्या कवितांचे गायन चालू असते. आता तर त्यांची मुलेही माझ्या कविता चाली लावून गातात! नव्या तरुण पिढीतील हे रसिक माझ्या कवितेला लाभावेत, ही पूर्वपुण्याईच आहे....

माझे पती श्री. विश्वनाथ, मुले राजेंद्र (अभिजित),व उपेंद्र हे अनुक्रमे पॉलिमर इंजिनियर व सॉलिसिटर आहेत. सुना सौ.विनया व सौ. मृणाल यांना माझ्या लेखनाचे अपार कौतुक आहे.या सर्वांचे प्रोत्साहन व सहकार्य यामुळैच मी इथपर्यंत वाटचाल करू शकले.....

हे मनोगत लिहून झाल्यावर मी नजर टाकली तर लक्षात आले की प्रत्येक परिच्छेद संपतांना मी अजाणताच टिंबे दिली आहेत. मनात खूप काही लिहायचे शिल्लक आसे, याचीच ती सूचक असावीत; पण सगळेच कुठे कागदावर उतरविता येते?

एखाद्या पुस्तकाची दुसरी किंवा पुढच्याही आवृत्त्या निघतात याचे श्रेय मा. सर्वस्वी रसिकांचे, वाचकांचे असते. ते तुमचे तुम्हाला देऊन थांबते.

---संगीता जोशी

‘वेदना-संवेदना’ या कवितासंग्रहाची प्रस्तावना....प्रा. शंकर वैद्य



संगीता जोशी यांचा ‘म्युझिका’ (1986) या काव्यसंग्रहानंतरचा हा दुसरा काव्यसंग्रह आता प्रसिद्ध होतो आहे. ‘म्युझिका’ या काव्यसंग्रहाने त्यांच्या काव्यगुणांचा आणि गझललेखनासाठी असणाऱ्या तयारीचा रसिक वाचकांना परिचय करून दिलेला होतो.मधल्या काळात त्यांच्या अनेक गझलरचना सांगितिक मैफलीत गायिल्या गेल्यामुळे आणि श्रोत्यांना त्या आवडल्यामुळे ‘संगीता जोशी’ हे नाव ठळकपणे त्यांच्या लक्षात राहून त्यांच्या लेखनाविषयी नवे कुतूहलही निर्ण झाले. त्यांच्या ‘वेदना-संवेदना’ या नव्या काव्यसंग्रहामुळे रसिकांच्या मनातील कुतुहल तर शमेलच, परन्तु त्याचबरोबर जोशी यांच्या काव्यविशेषांचा परिचयही त्यांना चांगल्या रीतीने होईल असा विश्वास वाटतो.

या काव्यसंग्रहासंबंधी लिहितांना प्रारंभी एक-दोन बाबी स्पष्ट करावयास हव्यातः संगीता जोशी यांनी गझललेखन केले असले आणि त्यांची प्रसिद्धी त्या क्षेत्रात झालेली असली तरी त्यांनी केवळ त्या प्रकारचीच कविता लिहिली आहे असे मात्र नाही.गझलांहून वेगळी अशी त्यांची बरीच भावकविता आहे. ती विविध छंदात लिहिलेली आहे. त्यातल्या काही रचना मुक्तछंदातही आहेत. त्यांच्या आजवरच्या कविता न्याहाळता असे दिसते की, जीवनातल्या विवध क्षेत्रातिल अनुभूतींचे आविष्करण त्यांच्या कवितांत आहे. ती कविता एकाच एक विषयाशी बांधून पडलेली नाही.तथापि असे असूनही त्यांच्या वेदना-संवेदना या नव्या काव्यसंग्रहात मात्र प्रेम, निसर्ग, आणि विश्वचैतन्यातून जाणवणारी एक शक्ती या विषयांच्या संबंधातअनुभूती प्रकट करणाऱ्याकविता प्राधान्याने आल्या आहेत. या सर्व कविता वाचल्या की कवयित्रीचे भावविश्व, तिची कलादृष्टी, तिचे व्यक्तिमत्त्व यांचा परिचय आपणांस होत जातो.मनाचि पकड घेऊन त्यातल्या अनेक कविता आपल्या स्मृतीत रेंगाळतही राहतात.

यातल्या प्रेमकविता या प्रेमभावनेच्या विविध छटांनी फुललेल्या आहेत. त्यात प्रेमाची उत्कट ओढ व्यक्त झालेली असून, त्यात 'भेटायचे आहे पण भेटू कसे काय?' अशा पेचाची काचणारी धार आहे; 'पाऊस असा आला की अद्याप थांबला नाही' अशी संततधार प्रेमवृष्टीत न्हाऊन निघणारी अवस्था आहे; 'कालचा तुझ्यासवे प्रवास चांदणे । एकटे तुझ्याविना उदास चांदणे ।। असे सहवासाचे सुखआणि त्यावबरोबर विरहाची नाजुकतेने प्रकटणारी भावना आहे. प्रेमाच्या विरहातून निर्माण होणारी विरहवेदना,वंचनेतून उद्भवणारे दारुण दुःख, त्यातून निर्माण होणारे आक्रंदन, त्यातूनच पुढे सहजपणे प्रकट होणारी चीड,पश्चात्ताप आणि जिवाला वेढून राहणारा हताशपणा अशा अनेकविध भावांचे दर्शन वेगवेगळ्या कवितांतून घडत राहते. 'अशी कशी हारले कळेना । न खेळताही जुगार तेव्हा।। या ओळी वाचल्या आणि लगोलग त्यांच्याचबरोबर, 'आज उद्ध्वस्त पाहिले जे तू । त्या घराचीचभिंत मी होते ।। या ओळींवर नजर टाकली की प्रेमवंचित उद्ध्वस्त जीवनाची दशा त्यातील कारुण्यासह आपल्या मनाला कळते. अशा अनुभवातून गेल्यानंतर साहाजिकपणेच जगाचा आणि जगण्याचा तिटकारा कवयित्रीला वाटत राहिल्यास नवल नाही,. या परिस्थितीत

माणसांचे रान येथे राहणे आता नको
सर्व काटेरीच वाटा, चालणे आता नको....
वाळवंटी शोधीली मी का सुखाची सावली
व्यर्थ अंगारांवरूनी धावणे आता नको....

अशी जगासंबंधी दहशत घेणारी कडवट प्रतिक्रिया तिच्या कवितेतून व्यक्त झालेली आपणांस दिसते.असे असले तरी 'नवा डाव मांडू नवे आण फासे । नको कालच्या हारण्याचे खुलासे।।पुन्हा रिक्त प्याल्यात चैतन्य ओतू । कधीचेच तेही उदासीन प्यासे ।। अशी प्रेमाच्या खेळात पुन्हा रमण्यावी समंजस वृत्तीही एखाद्या कवितेत दिसून जाते.एकूणप्रेमजीवनातील अशा विविध अनुभूतींनी आणि त्यांच्याशी निगडित असणाऱ्या भावनांनी या संग्रहातील कविता संपन्न आहे.प्रेम, त्यातील धुंदी,अडथळे, विरहातील बेचैनी, वंचनेने होणारी तडफड, नाते तुटतांनाचे जीवघेणे दुःख, पुनर्मीलनाचा आनंद, या प्रेमानुभवातील पायऱ्या ठराविक स्वरूपाच्या आणि क्रमप्राप्त असल्या तरी त्या अनुभवांचे कवयित्रीला होणारे आकलन, तिच्या संवेदनशील आणि कल्पक मनाला जाणवणारी अनुभवाची सूक्ष्म वळणे आणि त्या त्या वस्थांचा कवयित्रीने घेतलेला अनुभव यामुळे कवयित्रीचे भावविश्व स्वतंत्रपणे आणि ताजेपणाने जाणवत राहावे अशा स्वरूपात येथे प्रकटलेले आहे. प्रेमकवितांच्या परिसरातून बाहेर पडून या संग्रहातल्या प्रभात. पाऊस,

दिवेलागण, दुपार, अंधार अशा निसर्गातल्या अवस्थाशी संबद्ध अशलेल्या कवितांकडे वळले की, मनाची प्रसन्नता, उल्हास, आनंदअशा भावनांचा दरवळ आपणांस तेथे अनुभवण्यास मिळतो. या कवरतेतून निसर्गसौंदर्याबरोबर अनेक भावावस्था ही सूचकपणे प्रकट झालेल्या दिसतात. आजच्या जीवनात प्रदूषणाने निसर्गजोनावर जो आघात झालेला आहे, त्यासंबंधीचे दुःखही 'बालकवींना' या कवितेत प्रकटले आहे.

कवयित्रीच्या मनाला विश्वचैतन्याचा स्पर्श 'वरदान', 'यज्ञ', 'भेट', 'वंदन' आदि कवितांतून प्रकटलेला आहे. 'तू जलस्थल व्यापसी, सर्वत्र तू । टेकवी माथा तिथे पतउल तुझे'।। (वरदान-40) 'जरी मनात दाटले कितिक मेघ काजळी । भरून तेज सांडती तुझ्या उदार ओंजळी ।।(यज्ञ) असा त्या चैतन्याच्या अस्तित्वाचा अनुभव आणि त्याचबरोबर सहजपणे येणारी भक्तिभावना या कवितांतून व्यक्त झालेली आहे. 'भेट' या कवितेत कवयित्री म्हणते, 'तू नि मी अजून भेटलेलोच नाही. पण जेव्हा भेटू तेव्हा

फक्त तोच असेल

माझ्या जीनातला

सर्वात मंगल क्षण

आपल्या पहिल्या

आणि अखेरच्या भेटीचा!

म्हणजे 'त्या भेटीत माझी मी उरणार नाही. मी तुझ्यातच विलीन झालेली असेन!' संपूर्ण समर्पणाची भावनाच या ओळीतून सूचकपणे व्यक्त झालेली आहे, असे दिसते. 'वंदन' कवितेत कवयित्रीने म्हटले आहे की,

'मी जेव्हा एखाद्या पाषाणमूर्तीसमोर नतमस्तक होते,

तेव्हा हृदयस्थ ईश्वराच्या अधिक जवळ जाते

पण—

तुला पाषाणमूर्तीमध्ये शोधणाऱ्या मला

तू कधीही क्षमा करू नकोस, हृदयेश्वरा!

असेही ती म्हणते. जडाचे महत्त्व ओळखणारी पण जडातून चैतन्याकडे जाऊ पाहणारी उन्नत अशी भावनाया कवितेतून व्यक्त झालेली आहे.या कवितांचे नाते प्रेमकवितेशीही जोडता येईल; पण प्रेम आणि भक्तिभावाचं हृद्य एकरूज्ञत्व यातून दिसून येते आणि ते कवयित्रीच्या भावविश्वाला समृद्ध करणारे आहे हे खरे. या कवितांशिवाय बालपणीच्या आठवणी व्यक्त करणारी कविता, कवितेसंबंधीच्या कविता, एखादी सामाजिक जाणिवेची कविता या स्वरूपाच्या कविताही या काव्यसंग्रहात आहेत; त्यांचा नुसता उल्लेख येथे करून ठेवतो; तपशिलात शिरत नाही.--- प्रेमकवितांपासून प्रारंभ करून एकेका विषयांवरील कवितांवर नजर टाकली की कवयित्रीचे मन वेगवेगळया भावावस्थेतून जाणतेपणाने प्रवास करत आले आहे हे जाणवते.यातून व्यक्त झालेले आणि जीवनानुभवाविषयी विचार करणारे, कवयित्रीचे मन पाहिले, अनुभवासंबंधीच्या तिच्या प्रतिक्रिया पाहिल्या की तिच्या सुजाण व्यक्तिमत्त्वाची ओळखही पटते.

कवयित्रीचे व्यक्तिमत्त्व भावशील आहे, त्याचबरोबर स्वतःची भावस्थिती जाणण्याची सुजाणता आणि कल्पकताही तिच्या ठिकाणी आहे. या कल्पकतेमुळैच विविध प्रतिमा सुचून त्याद्वारे त्या त्या भावस्थितीचा बोध तिला होतो आणि चांगली सौंदर्यदृष्टी असल्यामुळे शब्दातून एखाद्या अनुभवाचा घाट त्याच्या लयीसह कसा उभा करावा याचे भानही तिला येते. एका उदाहरणाने हा मुद्दा स्पष्ट करता येईल. ‘शिवणकामा’च्या भाषेत व्यक्त झालेली ‘शिवण’ ही कविता यासाठी पाहावी. आपल्या आयुष्याची दशा तिला ‘घडी घालणे’, ‘बेतणे’, ‘कापणे’, ‘आखणे’, ‘दुमडणे’, ‘उसवणे’ या शब्दातून स्पष्ट होत गेली आणि ‘शिवण’ ही कविता आकारत गेली. वरील शब्द योजतांना कवयित्रीने त्यांना अशी ‘मुरड’ घातली की ‘गळा कापणे’, ‘चिमटा घेणे’ , ‘पोट पाठीला जोडणे’ या शब्दप्रयोगातून आयुष्यासंबंधीची व्यथाही निरनिराळया तऱ्हांनी प्रकट व्हावी आणि आयुष्यात परिस्थितीशी तडजोड करीत कसे जगावे लागतेयाचे करुण चित्रही डोळयांसमोर उभे राहावे. –त्या कवितेतल्या—

गळा घेतला कापून
हात वाढीव ठेवले
थोडा चिमटा घेऊन
पोट पाठीला जोडले
काही नव्हते ठेवाया
खिसा बेतलाच नाही

या एवढ्या ओळी वाचल्या तरीएका कवितेचा घाट कसा घडत जातो याची कल्पना येईल आणि त्याचबरोबरकवयित्रीची कल्पनाशक्ती, शब्दातून सूचक अर्थ यक्तविण्याचे तिचे कौशल्य, आणि अनुभवाची लय सांभाळली जाईल अशा छंदात तो व्यक्त करण्याची तिची जाण या गोष्टीही समजून येतील. यालाच जोडून 'पाऊस' या कवितेचाही विचार करता येईल. या कवितेतला अनुभव प्रेमाचा , मीलनाचा आहे. एरव्हीच्या प्रेमानुभवापेक्षा त्यात काहीतरी वेगळेपण आहे, अनावरपण आहे, चिंब भिजवून टाकण्याची शक्ती आहे. यातूनच पावसाची प्रतिमा कवयित्रीला सुचते आणि तिला 'आभाळ', 'मेघ' अशा अन्य सहचारी प्रतिमांची जोड मिळून ती कविता आकार घेऊ लागते.त्या प्रेमाच्या नात्यातील ओढ, स्पर्शातील सजीव हळुवारपणा, त्यातील ऊब आणि धगही व्यक्त करीत, अनेक अर्थवलये निर्माण करीत, तो अनुभव फुलत जातो. आणि शेवटी---

पाऊस असा आला की

अद्याप थांबला नाही

ह्या अशा पावसासाठी

सोसला उन्हाळा होता...

या ओळीत त्याचा उत्कर्ष साधला जातो.यातल्या पहिल्या दोन ओळीतमनात नवल निर्माण करणारी त्या प्रेमाची संतत धार आहे आणि ती लाभावी म्हणूनपूर्वी जे सोसले, सहन केले त्याची आठवण आहे. त्यातून त्या एकूण अनुभवाला उंची प्राप्त करवून दिली जाते. पावसासाठी 'उन्हाळा सोसला होता' या शब्तरचनेतला विरोध त्या ओळीच्या अर्थाला अधिक हृद्य करतो.

संगीता जोशी यांच्या एकूण कवितांतच सूचक अर्थाचा खेळ नाना तऱ्हांनी चालू असतो. त्यामुळेत्यांचे शब्द वाच्यार्थापेक्षा खूप काही बोलत राहतात आणि त्यांच्या ओळींची शक्ती आणि सौंदर्य वाढवीत राहतात. उदा.

अता हे हुंदके, ही आसवे

जिवाचे सोबती अन् सोयरे..

असे म्हणून त्या थांबतात; पण 'हुंदके हे सोबती आणि आसवे हे सोयरे' यांचा अर्थ ध्यानात घ्यावा तसतसा खोल बनत जातो आणि कारुण्यही तसेच सखोल बनते.

आज उद्ध्वस्त पाहिले जे तू

त्या घराचीच भिंत होते

या ओळींतून उद्ध्वस्त जीवनाची सूचना मिळतेच, परन्तु त्यातली ‘ती’ ही त्या घराच्या आधाराची भिंत होती आनि तीच ‘ती’ आता त्या उद्ध्वस्ततेचाच एक भाग झालेली आहे हे जाणवून मनाला हादरवून टाकणाऱ्या वाताहतीची कल्पना येत ते दुःख आकारत जाते.

रोज मी माझा बळी देते तमाला

रोजची माझी चिता पेटे प्रभाती...

या ओळी स्त्रीजीवनाच्या संबंधात मनास पीळ पाडतात आणि त्यातल्या दाहकतेने भाजून काढतात. असा कितीतरी ओळी आणि त्यांनी समृद्ध झालेल्या कविताया संग्रहात आहेत. या अशा लेखनात विरोध साधून अर्थाला सुंदरता प्राप्त करवून देणे किंवा कलाटणी तत्त्वाची योजना करून अर्थ आकर्षक, वेधक करणे या गोष्टी मोठ्या कुशलतेने साधलेल्या आहेत असे दिसते. हा रचनाविशेष केवळ दोन दोन ओळींच्या ‘शेरात’ आणि त्यांच्या गुंफणीतून सिद्ध होणाऱ्या गझलामतच दिसून येतो असे नाही, तर तो त्यांच्या अनेक कवितांचा एक अविभाज्य घटक बनलेला आहे. या घटकामुळे त्यांची कविता वेधक आणि परिणामकारक झालेली आहे.थोडक्यात बरेच काही सुचविणारी झालेली आहे.

या त्यांच्या कवितात काही गझल आहेत. (एकूण 85 पैकी 56 गझल आहेत.) त्यातही दोन प्रकार आढळतात. वेगवेगळ्या विषयांवरील, कदाचित भिन्न,भिन्न विषयांवरील शेरांच्या गुंफणीतून सिद्ध झालेले गझल असा एक प्रकार आहे. ऽखुमारी, शिक्षा. सावल्या’ हे गझल या प्रकारात मोडतात. दुसरा प्रकार असा की, रचना गझळ थाटाचीच आहे परंतु त्यात एक विषय किंवा एक अनुभव बऱ्याच अंशी सलगतेने उलगडत जातो असे त्याचे स्वरूप आहे. ‘रोज, चांदणे, पिंजरे, दान’ हे गझल दुसऱ्या प्रकारचे आहेत. यात गझल रचनेची धाटणी सांभाळूनही त्याबरोबरच सलग रचनाही साधली जाते.सुटा शेर हीच पूर्ण कविता असे धरून काफिया आणि रदीफ—म्हणजेच यमक आणि अंत्ययमक यांच.या आधारे भिन्न विषयांवरील (वा अनुभवांवरील) शेरांचा घोस तयार करण्यात जो रचनाबंध विषयदृष्ट्या मिश्र स्वरूपाचा बनतो त्याच्यापेक्षा भावकवितेला बऱ्याच अंशी जवळचा असणारा जो घाट संगीता जोशी यांनी स्वीकारला आहे, तो अनेक भावछटांचा एक अनुभवमनावर ठसविण्याच्या दृष्टीने चांगला आहे असे वाटते. तथापि

विषम विषयांवरील शेरांच्या बांधणीची रचना बाद व्हावी असे माझे मत नाही. ज्या कवीस जे इष्ट व सोयीचे वाटते ते त्याने अंगिकारावे. या संग्रहात ते दोन्ही थाट आहेतच.

संगीता जोशी यांच्या कवितांतील भावविश्वासंबंधी या प्रस्तावनेच्या प्रारंभीच्या भागात विवेचन केलेच आहे. तसेच त्यांच्या व्यक्तिमत्वासंबंधी थोडे विवेचन या लेखनाच्या ओघात तुरळकपणे आलेलेच आहे. त्यात थोडी भर घालायला हवी. कवयित्रीचे मन 'चंद्रवेडे' आहेच, पण सत्याला भिडण्याची,वास्तवता जाणण्याची दृष्टीही त्यांच्याजवळ आहे. 'तळहातीच्या रेघेचं, होतं असंही वळण' असं म्हणत आयुष्य स्वीकारण्याचा समंजसपणाही त्या दाखवतात.वेदनेची खुमारी त्या जाणतात.

पुन्हा विटा पुन्हा माती ।पुन्हा बांधायचे घर

पुन्हा काळ्या बाहुलीस । टांगायचे आढ्यावर...

आणि घर बांधून त्याला 'साफल्य' नाव द्यायचे असे त्यांनी म्हटले असले तरी (साफल्य)

पुन्हा केले उभे मी या घराला

कुणी जाऊन सांगा वादळाला...

ही धमकही त्या दाखवतात. स्वतःस समजावण्याचा सूर त्यांच्या अनेक कवितांमध्ये आलेला आहे. (उदा. व्यर्थ जावो तरी । चालु दे अर्चना।। झीज होते तसा । गंध ये चंदना।। )

कवितेत स्वगत बोलणं आलं, स्वतःच स्वतःशी बोलणं आलं की त्यात आपोआप विचार करणं हेही येतं असा विचाराचा स्पर्श जोशी यांच्या कवितांना झालेला असल्याने त्यांच्या भावविश्वाला एक आधार प्राप्त झालेला आहे. त्या विचारांमुळेच कवितांचं नातंजीवनाशी जुळण्यासाठी एक दुवाही निर्माण झालेला आहे.

या संग्रहातल्या काही कविता फसलेल्याही वाटतात याचाही येथे उल्लेख करायला हवा. 'तेव्हा' या कवितेत करार, प्रकार, जुगार, उतार, उदार हे काफिये सुखदायक वाटत नाहीत. ओळीतील उपान्त्य शब्दांचे यमकात्मक नाते जुळविण्यासाठी उतार, उदार हे शब्द येऊन त्यांच्याखातर बाकीची ओळ जुळवली गेली असे वाटत राहाते.रचना कृत्रिम बनते. 'शिक्षा' ही कविता शेरांस शेर जोडतांना मोठ्या कष्टाने पुढे सरकतांना दिसते. 'मी', 'साकडे', व 'घेराव' या कविताही अशाच प्रकारच्या वाटतात.चंद्र, चांदणे, संगीत, तारा, मैफल यांच्याशी शंबद्ध असलेल्या कल्पना कवितेत अनेकदा येतात आणि काही कवितेतल्या ओळी सांकेतिक बनतात. सुदैवाने अशा उदाहरणामची संख्या अत्यल्प आहेया कवितासंग्रहाची गुणवत्ता बाधित व्हावी असे

त्यांचे स्वरूप नाही. पण हा संग्रह वाचतांना कित्येक कविता मनाशी सलगीचे नाते निर.माण करतात, मनात घोळत राहतात, त्यातल्या अनेक ओळी पुन्हा पुन्हा ओठांवर येतात, नवनव्या अर्थछटांनी फुलत राहतात, या प्रक्रियेतूनच कवयित्रीच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय आपणांस होऊ लागतो.हेसारे घडते ते या कवितांच्या गुणवत्तेमुळेच!

1997. ----शंकर वैद्य

''चांदणे उन्हातले''--- अभिप्राय—

लेखक, समीक्षक प्रा.मुरलीधर जावडेकर

संगीता जोशी यांच्या लयबद्ध कवितेने आम्हा सर्व रसिकांना नादावून, भारावून टाकले आहे. काळातील वयातील अंतर, अभिरुचीतील अंतर, वातावरणातील अंतर....सर्व पार करीत संगीता जोशींची कविता येते तीच मुळी गात गात. गाणारे शब्द जन्मतात ते ताल. सूर लय घेऊनच. कित्येक कविता त्यामुळे वाचतावाचताच रागदारीतून प्रकटतात.

खरे म्हणजे कोणतीही कला असामान्यच, स्तिमित करणारीच, विस्मयजनकच आणि तरीही जवळीक साधणारी, मनात ठाण मांडून बसणारी, लहान मुलासारखी पुनःपुन्हा गळयात पडणारी अशीच पाहिजे, नाही का? आणि काव्यकला तर गेयच पाहिजे. तिचा ताल आपल्या हृदयाच्या तालाशी जुळला पाहिजे.संगीता जोशींच्या काव्यामुळे हा सगळा विचार सुचतो, रुचतो आणि रुजतो. कला म्हणजे वळणावळणांचा घाट.पुढले प्रत्येक वळण अधिक आश्चर्यजनक. ही वाट पुनः न संपणारी! तेच आश्चर्य वाटते की संगीता जोशींची अशी ही कविता दुःखाने भारलेली आणि तरीही सुंदरच असणारी, सुंदर वाटणारी! मानवी जीवनातील हेच नवल आहे की वेदनेचे बोलणे जितके सुंदर वाटते तितके सुखाचे बोलणे वाटत नाही. पण याला एक अट आहे; वेदनेची संवेदना व्यक्त करणारे ते व्यक्तिमत्त्व अंतर्बाह्य सुंदर पाहिजे—संगीता जोशींसारखेच सुंदर, संपन्न. एखाद्या अतिश्रीमंताने आपला खजिना खुला करावा तसे हे व्यक्तिमत्त्व नवनवी नवलाईची कला प्रकट करीत राहाते.आणि असे हे दुःख तरी का असते? स्वर्गीय सुखाची स्वप्ने पाहणाऱ्या सुंदर मनाला जेव्हा वास्तव दगडाची ठेच लागून चुरा व्हावे लागते तेव्हा ते सौंदर्य प्रकटते आणि पसरते.

मानव हा उत्क्रांतीशील प्राणी आहे. म्हणजेच उत्क्रांतीची स्वप्ने पाहणाराही. उत्क्रांतीची दिव्य स्वप्ने दाखविणारे ते कवी! त्या कवयित्री! माणसाला दिव्य स्वप्ने दाखविणारे दिव्य अंतःचक्षू नकोत का? दिव्य भास पाहून सृष्टीचा स्वर्ग करू पाहणारे कवी केशवसुत म्हणूनच कवींना मानवजातीचे 'नेत्रकर्ण' म्हणतात. आमच्या पोटात भीतीचा गोळा उठतो; आनंदाचा उठतो का? वर्डस्वर्थची इंद्रधुष्याची कविता आठवा. मानवाची ही दिव्यानंदाची शक्ती गमवायची नसेल, कमवायची असेल, उत्क्रांत होऊन अधिकाधिकमहामानवाचे महानंद भोगायचे असतील तर संगीता जोशींच्या कविता वाचा, गा आणि ऐका!

(जावडेकर कुटुंबियांनी संगीता जोशींच्या कविता-गझला संगीतबद्ध करून गाण्याचा 'चांदणे उन्हातले' हा खास कार्यक्रम बांद्रा, मुंबई येथे सादर केला; त्यावेळी केलेल्या भाषणातून उद्धृत)

अभिप्राय---

समीक्षक गं.ना. जोगळेकर

कार्यवाह, महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे

संगीता जोशी हे नाव मराठी काव्यप्रांतात स्थिरावलेलं आहे. ‘म्युझिका’ या त्यांच्या पहिल्या कवितासंग्रहामुळे त्यांना रसिकमान्यता मिळाली.विविध छंदांमध्ये निर्दोष रचना करण्याचा आजकाल दुर्मिळ झालेला गुण संगीता जोशी यांच्या कवितेत आढळतो. पण केवळ रचनासौंदर्य एवढंच त्यांच्या कवितेचं वैशिष्ट्य नाही त्यांच्या कवितांमधून प्रकट होणारा आशयही तितकाच महत्त्वाचा आहे. कोणत्याही चांगल्या कवीचं संवेदनशील असतंच. ही संवेदना वेदनेचं रूप घेऊन प्रकट होण्यातच संगीता जोशी यांच्या कवितेचा सहजधर्म आहे असं हा संग्रह वाचतांना सतत जाणवतं. ‘वेदना-संवेदना’ हे संग्रहाचं नाव त्यामुळेच समर्पक वाटतं. संग्रहातल्या सगळ्या कविता म्हणजे कवयित्रीचं एक अखंड स्वगतच वाटतं. मात्र आत्ममग्नता असूनही कुठंही खाजगीपणा आहे असं म्हणता येत नाही.कुणाही संवेदनशील स्त्रीला हे आपलंच मनोगत आहे असं वाटल्याशिवाय राहणार नाही.

‘गझल’ रचनेवर संगीता जोशी यांचं चांगलं प्रभुत्व आहे.

मागणे बरे नव्हे कुणास चांदणे

यापुढे म्हणायचे उन्हास चांदणे...

ही ‘चांदणे शीर्षकाची गझल काय, किंवा---

ये पुन्हा तू घाव घालाया जिव्हारी

तू दिलेल्या वेदनेलाही खुमारी....

जन्म रेतीसारखा सांडून गेला

काय मी देऊ कुणाला, मी भिकारी...

या ‘खुमारी’ मधल्या पंक्ती काय, संगीता जोशी यांच्या गझला नेमक्या शब्दयोजनेमुळे लक्षात राहतात.

प्रेयसी आणि गृहिणी ही स्त्रीची दोन रूपं संगीता जोशी यांच्या बहुतेक कवितांमधून दिसतात.

आधी बसविली घडी

मग आयुष्य बेतले

या ओळींनी सुरू होणारी पहिली कविता, किंवा

जरूर तेव्हा तुला ओठही शिवता यावे

जरूर तेव्हा त्या ओठांना हसता यावे....

ही 'जरूर तेव्हा' या शीर्षकाची कविता, यातलं दुःख अतिशय सूचक म्हणूनच अधिक बोलकं झालं आहे.

पुन्हा विटा पुन्हा माती । पुन्हा बांधायचे घर ।

पुन्हा काळया बाहुलीस। टांगायचे आढ्यावर।।..

ही 'साफल्य कविता त्यातील खोचक भाष्यामुळे लक्षात राहते. तर---

भेटू या, पण भेटीनंतर

डोळे ओले झाले तर?...

या 'भेट' कवितेतील रचनेची अभिनव रीत वेधक आहेच, पण त्यातली आर्तता अस्वस्थ करणारी आहे. या संग्रहातल्या अशा बहुतेक कविता काव्यप्रेमींना पुन्हा पुन्हा वाचाव्याशा वाटतील.

उत्कट संवेदनशीलता, स्त्रीमनाचा सहजसुंदर आविष्कार, रचनेवरील असामान्य प्रभुत्व आणि सखोल सामाजिक भान यांमुळे संगीता जोशी यांची कविता काव्यरसिकाला अपूर्व आनंद देत राहते.

(वेदना-संवेदना या संग्रहाची समीक्षा , आकाशवाणी,पुणे केंद्रावरून जोगळेकर यांनी स्वतः सादर केली, त्यातून उद्धृत)

***

# मला उमजलेली गजलः संगीता जोशींची

------ डॉ. राम पंडित

उर्दू गजल साहित्याच्या प्रारंभिक युगात मख्फी, बेगम, जाफरी, जिया, असीर अशा तीस-चाळीस गजलकार महिलांची नावे नमूद केलेली दिसतात.आधुनिक गजलयुगातही अदा जाफरीसह पंच्याहत्तरच्या वर ही संख्या जात असली तरी ज्यांची गजल लक्षणीय म्हणता येईल अशा स्त्री-गजलकारांची संख्या फारशी नाही. जोहरा निगाह, परवीन फना सय्यद, फहमिदा रियाज, किश्वर नाहिद, फातेमा हसन, शाहिदा हसन, इश्रत आफरीन, बिल्किस जफर-उल-हसन, रफिया शबनम, परवीन शाकिर, साजिदा जैदी, जाहिदा जैदी अशी मोजकीच नावं स्त्रीगजलकारांत दिसतात.

मराठी गजलच्या वयाचा तुलनात्मक विचार करता मराठीत त्यामानाने महिला गजलकारांची संख्या बऱ्यापैकी आहे असे म्हणता येईल.मराठी गजलकारात पंचवीसच्या जवळपास महिला गजलकार आहेत. यातील काहींनी गजललेखन थांबवले तर काहींनी सातत्याने सुरू ठेवले आहे. ज्यांचे गजललेखन आजही सुरू आहे यात संगीता जोशी, शोभा तेलंग, आशा पांडे, ज्योती बालिगा, फातिमा मुजावर, वंदना पाटील ही नावे महत्त्वपूर्ण आहेत.

सौ. संगीता जोशी यांना 1959 पासूनच गजलचे आकर्षण होते, असे दिसून येते. या साली 27 मे रोजी त्यांनी 'व्यथा' या शीर्षकाने जी रचना केली ती गजलमय होती. त्यात रदीफ नव्हती पण काफिया बऱ्यापैकी निभावला होता. गजल ही कष्टसाध्य ,तंत्रानुगामी विधा असल्याने प्रारंभिक काळात प्रत्येक गजलकाराच्या रचना सदोष असणं स्वाभाविक आहे. संगीताताईंच्या काफियातदेखील तेव्हा दोष होता पण 'एका शेरात परिपूर्ण अशी कविता' ही अट मात्र ही रचना पूर्ण करते. म्हणून संगीता जोशींची

दुःख माझ्या अंतरीचे काय सांगू साजणी

आठवूनी नीर दाटे माझिया गे लोचनी...

ही देवप्रियातील गजलसादृष रचनाच म्हणावी लागेल. 'म्युझिका' )1986(. वेदना-संवेदना(1997) या दोन्ही काव्यसंग्रहात गजलेचे प्राधान्य दिसून येते.कवीमध्ये गजलप्रवृत्ती असेल तरच तो गजल लिहू शकतो. म्हणजे असे की त्यास एका शेरात एक परिपूर्ण विचार देण्याची क्षमता हवी. सारे शेर एकाच वृत्तात रदीफ-काफियासह रचण्याचे कसब हवे.ते झाले बाह्य निकष.

अन् अंती आंतरिक निकष म्हणजे फक्त प्रासादिकता नव्हे तर ती रचना ज्या शैलीगुणांमुळे कविता व गीतांहून विलग अस्तित्व दाखवून देते ते गुण, ती शैली होय. उदाहरणार्थ संगीताताईंचा शेर पाहा,

आयुष्य तेच आहे

अन् हाच पेच आहे...

'गागर में सागर' सामावण्याची अद्‌भुत क्षमता या शेरात आहे.कॅलिडोस्कोपिक अर्थच्छटांचा हा शेर गीत अथवा कवितेचा होऊच शकत नाही.याचा संपूर्ण बाज हा गजलचाच आहे.

संगीता जोशींचा हा तिसरा संग्रह फक्त 73 गजलांचा 'दीवान' आहे. 'चांदणे उन्हातले' हे शीर्षकदेखील प्रातिनिधिक आहे तसेच प्रतीकात्मकदेखील आहे. विद्यमान विज्ञानयुगातील विसंगतींना उन्ह मानलं तर त्यातही चांदणे शोधता येते. नाही, शोधायलाच हवे. हा आहे नकारात्मक परिस्थितीत सकारात्मक क्षितिजाचा मागोवा.

का ज्योत जीवनाची जळते अजूनही

आशेत कोणत्या मी जगते अजूनही...

पानापरी अळूच्या निःसंग जन्म जावा

असुनी जगात साऱ्या नसण्यात मौज आहे...

एक प्रकारचा त्रयस्थपणा किंवा 'अलूफनेस' हवा, असेच इथे अभिप्रेत आहे.मग प्रतीक्षा करण्यात, चंदनाप्रमाणे झिजण्यात, गुलमोहराप्रमाणे फुलण्यात मौज आहे, हे जाणवतं. पण या त्रयस्थवृत्ती कधी कधी संन्यस्तवृत्तींकडेही धाव घेतात. अन्

अता नको येरझार तुमची, प्रवेश नाही अता कुणाला

मलाच मी कोंडुनी मनाचे ,तळातले दार बंद केले...

असे समष्टीचे प्रतिनिधित्व करणारे शेर अलगदपणे संगीताताईंच्या लेखणीतून साकारतात. पण ही वैराग्यशीलता फार काळ तग धरत नाही अन् ज्या व्यथा, जखमांमुळे हे नैराश्य येतं त्याचा समाचार घेतांना त्या म्हणतात,

कितीक जखमा दिल्यात तुम्ही, कधी कधी जाळलेहि होते

तशात मीही जगावयाचे पुन्हा इरादे बुलंद केले...

संगीता जोशींच्या गजलांचे मतले फार दिलकश आहेत. एखाद्या शांडिल्य अथवा नारदाचार्यांच्या सूत्रात भक्तीचे सार अंतर्भूत असते, तसा मतला हवा असतो.मतल्यातच गजलेच्या स्तराची परीक्षा होते. संगीता जोशींचे असे प्रभावी मतले बघा—

जीवनाशीच खेळले होते

नेहमी मीच हारले होते...

जीवनाशी लढतांना, खेळतांना हारच बहुधा पदरी पडते.

हे असेही घडायचे होते

रक्त परकेच व्हायचे होते...

या शेरातील गूढ स्त्रियांना सहज उमजेल.

जे तेव्हा केले ते आज करावे कैसे

फूलपाखरामागे आज पळावे कैसे....

वयपरत्वे, इच्छा असूनही मनासारखे वागता येत नाही.

काहीच चांदण्या रडल्या काहीच फुले हळहळली (तरही गजल)

इतरांच्या गावी नव्हते की पौर्णिमाच काजळली

हा प्रतिकात्मक शेर अनेक संदर्भात उपादेय ठरतो.

जन्मलेले सुखासवे होते

दुःख माझे कुठे नवे होते?...

हा एक दैनंदिन सर्वानुभव किती सहज सोप्या भाषेत साकारला आहे पहा. इतका आतून आलेला मिसरा एक सार्वभौम सूत्र जेव्हा सांगतो तेव्हा त्या गजलेच्या स्तराची चुणूक तो दाखवत असतो.तरल कल्पनांची पखरण हा संगीताताईंच्या गजलांचा एक महत्त्वाचा पैलू आहे.

पाने देती आडोसा कोवळ्या कळीला

पूर्ण फुलाने पानांआड दडावे कैसे..?

किती नाजुक भाव या शेरात ओवले आहेत!

ना कुणा बोलायचे वा ना कुणा सांगायचे

हे मनीचे हुंदके सारे मनी कोंडायचे...

असा मनाच्या कुचंबणेचा शेर एक स्त्रीच लिहू शकते अन् अनुभवू शकते.

दूरचे आभाळ हाती लागले होते सहज

चांदणे वाटेवरी तू फेकले होते सहज....

निघून गेली ती क्षणबाळे जरी

वाजती वाळे तयांचे रुणुझुणू...

अशा अनेक अलवार कल्पना जेव्हा छंदांची पैंजणे बांधून गजलेत पदन्यास करतात तेव्हा वाचक, श्रोते यांची स्पंदने देखील त्या लयीत धडकतात हा अनुभव आहे.

संगीताताईंनी भारतीय मिथकाचा आपल्या गजलात सुरेख विनिमय केला आहे. कृष्ण, मीरा, कर्ण, रावण, यम, महाभारत, यज्ञवेदी, स्वयंवर, वनवास, कुंती हे शब्द शेरात ओवतांना त्यामागील पार्श्वभूमी ज्ञात असलेल्यांना त्या शेरातील गहन सहजपणे जाणवते. 'यदायदाहि धर्मस्य...' या गीतेतील कृष्णवचनाचा उद्बोधक वापर पाहा—

दुष्टांना निर्दाळुनिया रक्षाया साधुजनांना

तू येशिल मानवरूपे आशा ही मनि दरवळली...

ही आशा फक्त संगीता जोशींच्याच नव्हे तर लाखो मनात परिमळत आहे.याचप्रमाणे...

जगी रहाणे कसे असावे?

अनंत ठेविल तसे असावे...

हा 'ठेविले अनंते तैसेचि रहावे' या वचनाचा अनुवाद आहे. एकप्रकारे ही तरही गजल म्हणता येईल.

उर्दूत असगर गोंडवी, जिगर मुरादाबादी यांची गजल सूफी रंगाने रंगून जाते. मराठीत संगीता जोशींचे काही शेर—

रे शिवा आता पुन्हा हे द्वैत का?

व्यर्थ तू केली जिवा , हाराकिरी...

हे अद्वैताचे मंडन आहे. इश्किया रंगात सूफियाना गजल द्वैताकडून अद्वैताकडेच जाते. वयपरत्वे प्रायेक गजलकाराचे चिंतन अधिकाधिक परिपक्क होत जाते. व त्याच्या शेरातून जीवनविषयक सूत्रे बाहेर पडतात ती अशी—

जीवन एक जुगार असा

हरती मी मी म्हणणारे...

शब्द आहे शस्त्र म्हणुनी जपुन असणे चांगले

बोलणे टाळीत जाउन मूक बसणे चांगले...

संगीता जोशींच्या गजलेत जे दुःख लपले आहे ते व्यक्तिगत नसून समष्टीगत आहे. त्यामुळेच त्यात देशप्रेमही आहे.

करायचे तर हेच करू या देशासाठी

तळहातावर शीर धरू या देशासाठी....

असा उपदेशक भावही त्यात साकारतो तसाच प्रयत्नवादही दिसून येतो.

लुळे पांगळे पंख होते तरीही

मनाला खुणावे नभाचे निमंत्रण...

अशा दुर्दम्य इच्छाशक्ती असतांनाच प्रयत्नवादाची जोड असेल तर---

वर्तमानासवे जायचे तू पुढे

मागचा काळ तू आठवूही नको...

असा निर्धार मनात ठाम होतो.

संगीता जोशींच्या गजलांचे एक वैशिष्ट्य मला जाणवले ते असे की ,स्त्री-गजलकार असूनही त्यांच्या गजला निव्वळ स्त्री-भूमिकेतून उतरत नाहीत.किंवा त्या अट्टाहासाने पुरुष भूमिकेतून लिहिल्या गेल्या आहेत असेही जाणवत नाही, त्यातून रेखाटण्यात आलेल्या सुखदुःखाच्या भावनांचा कॅनव्हास अत्यंत व्यापक आहे. या कॅनव्हासवरील चित्रे, दृष्ये,व्यक्तिपरत्वे आससा बनतात त्याने धारण केलेली कलाकृती सर्वथा आकलनीय आहे. प्रतीकं, रूपकं, उपमा रसिक वाचक व श्रोत्यांना ज्ञात आहेत. त्यामुळे संगीता जोशींना जे भाव अभिप्रेत आहेत ते संप्रेषित होण्यास प्रत्यवाय नाही. शेर सहजगत्त्या संप्रेषित होऊन भाव या हृदयीचे त्या हृदयी विसावणे हेच उत्तम शेराचे लक्षण गणले जाते. अन् संगीता जोशींच्या गजलांमध्ये असे शेर वारंवार भेटतात हे विशेष होय.

तिसऱ्या गजलसंमेलनाच्या अध्यक्षाची निवड करतांना गजलसागर प्रतिष्ठानने ज्येष्ठता व स्तरीय गजल लेखनाचे सातत्य हा निकष लावला होता. या निकषांवर संगीताताईंची निवड ही सर्वार्थाने सुयोग्य होती, याबाबत दुमत होण्याची शक्यताच नाही. आपल्या अध्यक्षीय भाषणातही त्यांनी गजलच्या संदर्भात सकारात्मकभूमिकाच मांडली.मराठी गजल-साहित्याचा इतिहास लिहितांना प्रथम महिला गजलकार म्हणूनही कदाचित सर्वार्थाने संगीता जोशींचेच नाव घ्यावे लागेल. त्यांच्या गजलांचा स्तर व ज्येष्ठता लक्षात घेता आता यापुढे ‘दीवान’ म्हणजे निव्वळ गजलसंग्रह न काढता ‘कुल्लियाते संगीता जोशी’ म्हणजे समग्र गजलांचा संग्रह निघणे गरजेचे आहे असे सांगावेसे वाटते.

----डॉ. राम पंडित

)‘चांदणे उन्हातले’ या संग्रहाच्या प्रकाशनाचे वेळी डॉ. पंडित यांनी लिहून पाठवलेले भाषण. ते मंचावर वाचून दाखविण्यात आले.)

अभिप्राय---ज्येष्ठ कवयित्री शिरीष पै

संगीता जोशी या गेली पंचवीस वर्षांहून अधिक वर्षे काव्यरचना करित आहेत. त्यांची भावकविता विविध वृत्तातली असली तरी त्यांची काव्यशक्ती त्यांच्या गझलरचनेतून दिसून येते. गेल्या शतकात गझल हा काव्यप्रकार महाराष्ट्रात विशेष लोकप्रिय झाला. त्यात मोलाची भर टाकणाऱ्या कवींमध्ये संगीता जोशी ह्या एक प्रमुख कवयित्री आहेत. गझल या वृत्तावर त्यांचे प्रभुत्व तर आहेच, पण गझल या प्रकाराला भावभावनांची जी कमालीची उत्कटता लागते ती त्यांच्या गझल रचनेत आहे. गझलरचनेत जगण्याची तीव्र ओढ प्रकट होते.

उतरून आज यावा तो चंद्र पौर्णिमेचा

अण् चांदण्यात माझेपण विर्घळून जावे...

गझलकाराच्या जीवनाबद्दलच्या असीम आकर्षणावर समाजाचे कठोर आघात पडतात.

कुणी गुन्हेहि लादले मलाच मी सजा दिली

तशात रक्त शिंपडून फुलविले तुरुंग मी....

कवयित्रीची शब्दकळा, रचनाकौशल्य आणि भावसौंदर्य प्रशंसनीय आहे. गझल हा काव्यप्रकार महाराष्ट्रात असाच पुढे जाणार असेल तर त्यात कवयित्रीकडून अधिक मौल्यवान भर पडेल ह्याची खात्री वाटते.

6.4.2011 ------- शिरीष पै

प्रवीण दवणे
ब/303,राजहंस,
लुईसवाडी, ठाणे (प),400604

प्रिय मा. संगीताताई जोशी, स.न.

प्रत्यक्षभेटीत आपण दिलेले तीनही संग्रह मी कवितेची वेळ साधून निवांत वाचले.आपल्या कविता नेहमीच मनाला एक सृजनशिल आनंद देतात. विशेषतः गझल प्रकारातलं आपलं प्रभुत्व खास नोंद घ्यावं असंच आहे. डॉ. राम पंडितांची प्रस्तावना असलेलं आपल्या निवडक गझलांचं पुस्तक प्रस्तावनेमुळे व नंतर सोबतच्या गझलांमुळे प्रत्येक गझल-अभ्यासकासाठी महत्त्वाचे आहे.

'मी कशी ऋतूस ह्या...' ,'कुठल्यातरी क्षणाला....' , 'जरूर तेव्हा...' ह्या व अशा अनेक गझला पुढील वर्षी (शैक्षणिक –जूननंतर) विद्यार्थ्यांना मी निश्चितच वाचून दाखवीन. 'चांदणे उन्हातले...' मधील गझलवेगळयाच आर्त धुंदीच्या आहेत. 'कधीतरी हे मेघ जमावे...' , 'मी उन्हातुन चालतांना..' , 'जगायचे कसे हाप्रश्न ज्याला..' या गह्लांनी अंतर्मुख केले. जीवनाचे समग्र चिंता आपल्या अशा प्रकारच्या गझलांमध्ये आहे.

'वेदना-संवेदना' ची प्रा. शंकर वैद्यसरांची प्रस्तावना आदर्श- अभ्यासपूर्ण व समतोल! प्रस्तावनेचा वस्तुपाठच! आपल्या कवितेतील 'सूचक अर्थांचा खेळ' त्यांनी वेधला आहे; त्यामुळे वाचकाला रसग्रहणाची एक मार्गदर्शक पाऊलवाट मिळते. प्रस्तुत संग्रहातील 'दिवसाचे ऊनपक्षी..' (अंधार) , 'दुरावलेला वसंत आहे' (मित्रा).'दूर आभाळ'....)सापळा), या कविता मलाअधिक आवडल्या.

क्षणांना अर्थपूर्ण करणारे असे संग्रह मला भेट देऊन पुन्हा काही सायंकाळी 'म्युझिका' केल्यात याबद्दल धन्यवाद!

शब्दस्नेह फुलता राहो!

चैत्रप्रतिपदेच्या नवपल्लवित शुभेच्छा!

आपला,

प्रवीण दवणे

Article—Loksatta- Suresh Bhat

**चंदन आणि चांदणेही....**

---संगीता जोशी

काळाच्या पहाडावर ज्यांनी आपली नावं कोरलेली आहेत त्यापैकी हे एक चिरंतन नाव- कवि श्रेष्ठ सुरेश भट! समीक्षक डॉ. द.भि. कुलकर्णी यांनी केशवसुत, तांबे व मर्ढेकर यांचे बरोबरच सुरेश भट यांना 'युगप्रवर्तक कवी' अशा विशेषणानं गौरविलेलं आहे; आणि ते सार्थच आहे. मुक्तछंदाच्या सपाट रस्त्यावरून जाणाऱ्या त्या काळातील (विशेषतः 60 चे दशक) कवितेला कविश्रेष्ठ सुरेश भटांनी नवे वळण देऊन पुन्हा एकदा वृत्तबद्धतेकडे नेऊन राजरस्त्यावर आणून सोडले. पुढील काळात मराठी गझल क्षेत्राचे ते अनभिषिक्त सम्राट झाले, याबद्दल कोणाचेही दुमत होणार नाही. इथून पुढच्या विवेचनात मी प्रत्येकवेळी 'कविश्रेष्ठ' ही उपाधी वापरलेली नाही; ती तिथे आहेच, हे वाचकांनी समजून घ्यावे.

गझल हा कवितेचा एक प्रकार आहे; एकाच वृत्तातले अनेक शेर काफियाच्या धाग्यात गुंफून गझल बांधली जाते व प्रत्येक शेर अर्थदृष्ट्या स्वयंपूर्ण असतो. एका गझलमध्ये विविध विषयाचे शेर गुंफण्याचे स्वातंत्र्य कवीला असते, ही प्राथमिक माहिती आता सर्व रसिकांना आहेच. ही पुन्हा सांगण्याचे कारण इतकेच की भट यांच्या गझलांमधून स्त्रीविषयक चिंतनाचे प्राकट्य असलेले शेर विखुरलेल्या स्वरूपात मिळतात. त्यांच्या काही स्त्रीप्रधान कविता आहेतच, मात्र त्या गझला नाहीत.

सुरेश भट यांच्या कवितांमधील स्त्री ही त्यांची प्रेयसी आहे; कधी कविता ही त्याची सखी आहे; तर कधी मराठी भाषेला त्यांनी आई या रूपात पाहिलं आहे.

गीत तुझे मी आई, गाइन )'रूपगंधा'-1961(

शब्दोशब्दी अमृत ओतुन...

भावफुलांना पायी उधळुन

मम प्रतिभेचे झिजवुनि चंदन

आयुष्याचा कापुर जाळुन

तुझे सारखे करीन पूजन...

अशा तऱ्हेचा आदरयुक्त भाव व्यक्त करीतकवीने मराठी भाषेला आईचे स्थान देऊन गौरविले आहे.त्यांच्या मनातील स्त्रीला प्रथम ते आईच्या रूपात पाहतात. तिचे पांग फेडण्यासाठी 'प्रतिभेचे चंदन उगाळणे', आयुष्याचा कापूर जाळणे व पूजन करणे, हे संकल्प त्यांच्या मनातील आई या नात्याबद्दलची उदात्तभावना स्पष्ट करून जातात. वैयक्तिक जीवनातही भट आपल्या आईशीअधिक संलग्न होते. त्यांना कवितेचा वारसाही आपल्या आईकडून लाभला होता.

वरील भाव 'मायबोली' या कवितेत व्यक्त झाला आहे.

लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी

जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी

धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी

एवढ्या जगात माय मानतो मराठी....

1961 नंतर मधल्या दीर्घ कालावधीनंतर 1974 मध्ये 'रंग माझा वेगळा' हा दुसरा संग्रह प्रसिद्ध झाला त्यातही हेच नातं सांगणारी कविता वाचायला मिळते. देशाला आईच्या रूपात पाहणे(मातृभूमी)हा सर्वांवर संस्कार असतोच.

गे मायभू तुझे मी फेडीन पांग सारे । आणीन आरतीला हे सूर्य, चंद्र, तारे....

आई, तुझ्यापुढे मी । आहे अजून तान्हा

शब्दात सोड माझ्या । आता हळूच पान्हा

आई, तुझी अशी मी गाईन रोज गाणी । माझी तुझ्या दुधाने गेली भिजून वाणी....

आईच्या वत्सलतेची ओढ या कवितांमधून दिसून येते. 'भीमवंदना'ही 'एल्गार' या तिसऱ्या संग्रहातील(1983) कवितेतही कवीने 'भीमरायां'कडून याच वत्सलतेची हक्काने मागणी केलेली आहे.

एक आम्ही जाणतो, आमुची तू माउली

एवढे आहे खरे की, आमुची तू सावली

घे अम्ही त्यांना दिलेल्या उत्तरांची वंदना....

भीमराया, घे तुझ्या या लेकरांची वंदना.....

आपल्या श्रद्धास्थानाला आपण आईच मानून जवळीक साधतो (उदा. ज्ञानेश्वर माउली); यावरून आई हेच कवीच्या मनातील पूज्य असे स्थान आहे, हे अधोरेखित होते. या चार ओळीतील 'ते' म्हणजे प्रस्थापित वर्ग. ज्यांची सुखे ही दुसऱ्यांच्या (पीडित-शोषितांच्या) दुःखांवर आधारलेली असतात, तो हा वर्ग! सुरेश भटांनीच ही व्याख्या एके ठिकाणी केली आहे.

सुरेश भट यांचे श्रीकृष्णाशीही एक वेगळं नातं आहे. पुढील कवितेत त्यांनी आईच्या- यशोदेच्या- वत्सल भूमिकेतून श्रीकृष्णाला जागविणारी भूपाळी म्हटली आहे.

चल ऊठ रे मुकुंदा, झाली पहाट झाली

बाहेर चांदण्याला हलकेच जाग आली...

मंदावला कधीचा

गगनात शुक्रतारा

अन् चोरपावलांनी

आला पहाट वारा

गालांवरी उषेच्या आली हळूच लाली....

चांदण्यालाहलकेच जाग येणे, ही भट यांची शब्दयोजना एक हळुवारपणाचा भाव वाचकाच्या मनात जागा करून जाते. शुक्रतारा मंद होतो, पहाटवाराही चोरपावलांनी येतो! यशोदेच्या लाडक्या मुकुंदालाही तिला 'हलकेच' जागवायचे आहे. (उगीच 'मम्मा' बनून धसमुसळेपणाने 'ऊठ लवकर; रिक्षा येऊन उभी राहील' अशा प्रकारच्या दटावणीने तिला आपल्या कन्हैयाला जागं करायचं नाहीए.)

आणखी एक सौंदर्यस्थळ मला या कडव्यात दिसतं आहे. पहाटवारा चोरपावलांनी का यावा बरं? आणि पावलं वाजलीच नाहीत, तर तो आल्याचं उषेला कळलं तरी कसं? तिच्या गालांवर लाली उगीच तर नाही ना येणार? त्यानं हळूच बिलगून तिचं चुंबन घेतलं असणार! हो ना?

यशोदा मुकुंदाला पुढे आणखी सांगते, ऊठ आता; ‘तुज शोधण्यास वेडी राधा पुन्हा निघाली’! राधेची मधुरा भक्तीआणि मुकुंदाचं प्रेमयाची तिला जाण होती. तिला माहीत होतं की राधेचं नाव ऐकलं की हा तत्क्षणी उठेल! या उत्कट बिंदूशी कविता संपते पण त्यापूर्वी आपल्या मनःश्चक्षूंसमोर हे गोड चित्र उभं करण्यात भट पूर्ण यशस्वी झालेले असतात.

सुरेश भट देव वगैरे मानत नसत, पण श्रीकृष्ण हे त्यांचं आवडतं व्यक्तिमत्त्व होतं. श्रीकृष्ण व राधा यांच्या गूढ प्रेमाबद्दल त्यांना एक वेगळंच आकर्षण असावं. ‘आज गोकुळात रंग खेळतो हरी, राधिके,जरा जपून जा तुझ्या घरी’ आणि‘वाजवि मुरली देवकिनंदन’ या दोन कवितांतही, ‘अनंगरंगरास’ खेळण्यात दंग होणारी राधा आपल्याला सापडते;आणि मुरली ऐकतांनाराधेचे सरलेले मीपण पाहून प्रेमाच्या उच्च पातळीची जाणीव होते. स्त्री-प्रेमाच्या उत्कट रूपाचे दर्शन राधेच्या माध्यमातून सुरेश भट आपल्याला करून देतात. कृष्णप्रेमात समर्पित झालेली राधा, द्वैत सरून कृष्णाशी एकरूप झालेली राधा, हिच्यात कवीला आपल्या चिंतनातील आदर्श स्त्री दृगोचर होत असावी! हेआध्यात्मिक पातळीवरील प्रेम कवीच्या ‘कृष्ण-कवितां’मध्ये प्रकट झालं आहे.

कृष्ण दीप! राधा ज्योती। कृष्ण शिंप! राधा मोती

कृष्ण तीर! राधा धारा।कृष्ण व्योम! राधा वारा...

कृष्ण-राधेचं अतूट नातं वर्णन करतांना त्यांनी या जोड्या मार्मिकतेने निवडल्या आहेत; नाही का?

‘सप्तरंग’ हा 2002 साली प्रकाशित भट यांचा पाचवा संग्रह. त्यापूर्वी निवडक कवितांचा संग्रह, नुकत्याच दिवंगत झालेल्या कवयित्री शिरीष पै यांनी संपादित केला होता.त्यामुळे सप्तरंगातील कविता त्यात सापडत नाहीत. या संग्रहात एका लावणीचा समावेश आहे. तिला त्यांनी ‘कोल्हापुरी लावणी’ असंम्हटलेलं आहे. विशेष असे की यामधील ‘नायक’ देखील मनमोहन कृष्णच आहे! नायिका विचारतेय्....

पाहिला का कोणी माझ्या मनमोहनाला?

पाहिले का सांगा कोणी माझ्या पावण्याला?....

दिसला का कोण्या घरी

भेटला का वाऱ्यावरी

पाहिले का कोणी माझ्या सजणसख्याला?....

सपनात रात आली

सपनात भेट झाली

सपनात हातामंदी एक हात आला!....

लावणीहा काव्यप्रकार सादर करणाऱ्या स्त्रीनेही कृष्णाला 'सखा' मानले आहे व त्याच्या विरहात ती कावरीबावरी झालेली दिसत आहे! नेहमीच्या पद्धतीची ही उत्तान शृंगारिक लावणी नाही.

या नृत्यांगनेप्रमाणेच विरह जेव्हा नायकाला सहन करावा लागतो तेव्हा असा शेर उतरतो....

कुठे होतीस तू जेव्हा दिशा झंकारल्या होत्या?

कुठे गेलीस तू जेव्हा ऋतू गंधाळुनी गेले?.....

किंवा....

नुसतीच तुझ्या स्मरणांची एकांती रिमझिम झाली

नुसतेच तुझे हृदयाशी मी भास कवळले होते....

शेवटी कवी हताशपणे पण विश्वासपूर्वक म्हणतो,

कोठेही जा दूर दूर तू माझ्यापासून

माझे गीत तुला तेथेही काढील शोधून!....

थोड्या विरहानंतर, ती जेव्हा समोर येते तेव्हा तिच्या अनुपम दर्शनाने कवी विस्मयचकित होऊन म्हणत आहे,

कोवळी काया तुझी लावण्य सामावेल का?

लाजता तू, घाबऱ्या माझ्या मनाला वाटले.....

इथे तिच्या लावण्याचं ओसंडून जाणं कवीनं फार सुंदर व्यक्त केलं आहे. हे अपरिमित लावण्य तिच्या कायेत तरी मावेल का? असा प्रश्न करून भाषेला जणू नवा अलंकार दिला आहे! उर्दू सारखीच 'नजाकत' या मराठी शेरात भट आणू शकले आहेत. एक शेर आठवतो,

अल्ला रे जिस्मे-यारकी खूबी कि खुद-ब-खुद

रंगीनियों में डूब गया पैराहन तमाम...

कवि म्हणतोय कीतिच्या देहसौंदर्याचाच हा परिणाम, की तिचा पोशाख आपोआपच रंगित झालाय्. इथे भट म्हणत आहेत, की तुझं हे कायेत न मावणारं लावण्य तुझ्या लाजण्याबरोबर इतकं काही वाढलंय् की ते उसळून सांडेल की काय,अशी मला भीती वाटतेय्! केवळ लाजबाब!!

अशी ही अभिसारिका जेव्हा प्रियाला भेटते तेव्हा अपेक्षित तेच घडते...

लाख धारांनी मधाच्या माखला एकांत गोरा

ओठ थोडे हालले....अन् चाखत्या मौनात न्हाले...

लागली तृप्तीमधे ओल्या निखाऱ्यांना समाधी

आंधळया शब्दांस स्पर्शाचे नवे डोळे मिळाले....

चेतले पूजेतनंदादीप माझ्या वासनांचे

क्षुद्र हे अस्तित्व माझे कापरावाणी उडाले.....

लौकिक पातळीवर,समाज व स्त्री, कुटुंब व स्त्री किंवाआजची मुक्त स्त्री इत्यादि विषयांच्या झरोक्यातून भटांनी स्त्रीकडे पाहिलेलं नाही. पण जिवाभावाची सखी, प्रेयसी,प्रणयिनी, सहचरी अशा किंचित्भिन्न भिन्न स्वरूपात तीकवितेतून आपल्याला भेटते.

वात्सल्य व शृंगार हे दोन महत्त्वाचेरस भटांच्या रचनांमध्ये प्रकर्षाने दिसतात. या दोन्ही भावांतउत्कटतेची दोन टोके रसिक अनुभवतात.

त्यांच्या रूपगंधा (1961) या पहिल्याच काव्यसंग्रहात‘रूपगंधा’ याच शीर्षकाची पहिलीच रचना वाचायला मिळते व रसिक स्तिमित होऊन जातो!कवयित्री शिरीष पै यांनी ही रचना

‘भावगीत’या सदरात टाकली आहे. पण प्रत्येक शेर स्वतंत्र या निकषावरही ‘मुसलसल गझल’ (क्रमबद्ध गझल) म्हणण्यास, माझ्या मते, काही प्रत्यवाय नाही.

मल्मली तारुण्य माझे तू पहाटे पांघरावे

मोकळ्या केसात माझ्या तू जिवाला गुंतवावे....

लागुनी थंडी गुलाबी शिर्शिरी यावी अशी, की

राजसा, माझ्यात तू अन् मी तुझ्यामाजी भिनावे...

रे! तुला बाहूत माझ्या रूपगंधा जाग यावी

मी तुला जागे करावे तू मला बिल्गून जावे....

शृंगार हा या गझलेचा विषय आहे, हे स्पष्ट आहे. सुरेश भट यांच्या शृंगारिक रचनांचे वैशिष्ट्य थोडे वेगळे आहे. त्यात दुय्यम भूमिका स्वीकारणारी संकोची स्त्री नाही. त्यांनी रंगवलेली प्रेयसी ही लाजरी-बुजरीहीनाही.ती आपल्या प्रियकराकडूनप्रणयाची निःसंकोच मागणी करते. शारीर पातळीवर तिच्या अपेक्षा ती त्याला सांगते.

दुसऱ्या दोन गझलांतील प्रेयसीही धीट व पुढाकार घेणारी अशी पाहायला मिळते.‘रंग माझा वेगळा’या संग्रहात या गझला आहेत.

मालवूनटाकदीप चेतवूनअंगअंग

राजसा, किती दिसात लाभला निवांत संग...

गार गार या हवेत घेउनी मला कवेत

मोकळे करून टाक एकवार अंतरंग....

काय हा तुझाच श्वास दर्वळे इथे सुवास

बोल रे हळू उठेल चांदण्यावरी तरंग....

दुसऱ्या गझलेचे शेर---

तरुण आहे रात्र अजुनी राजसा, निजलास का रे?

एवढ्यातच त्या कुशीवर तू असा वळलास का रे?.....

सांग या कोजागिरीच्या चांदण्याला काय सांगू?

उमलते अंगांग माझे...आणि तू मिटलास का रे?....

अजुनही विझल्यान गगनी ताराकांच्या दीपमाला

अजुन मी विझले कुठे रे? हाय! तू विझलास का रे?....

‘चांदण्यावर उठणारा तरंग’ रेकॉर्डिंग’ झाल्यानंतरही लता मंगेशकरांच्या मनात दीर्घकाळ रेंगाळत राहिला होता! रात्र तरुण आहे; अशावेळीक्लांत झालेल्या झालेल्या प्रियकराला प्रणयिनी जागवते आहे व तिच्या उमललेल्या अंगांगाचा दाह शमविण्याचा आग्रह धरते आहे! आशा भोसलेंनी या रचनेला आपले मधाळ सूर दिले आहेत.वरील गझला स्त्रीभूमिकेतून लिहिलेल्या आहेत

पुढील गझलेतील शेर पुरुष भूमिकेतून लिहिलेले आहेत.मात्र आशाजींनी गायले आहेत.

केव्हातरी पहाटे उलटून रात्र गेली

मिटले चुकून डोळे हरवून रात्र गेली....

अजुनी सुगंध येई दुलईस मोगऱ्याचा

गजरा कसा फुलांचा विसरून रात्र गेली...

कळले मला न केव्हा सुटली मिठी जराशी

कळले मला न केव्हा निसटून रात्र गेली....

‘रात्र’ निघून गेल्याचे ही गझल सांगत आहे. प्रत्यक्षात ‘रात्र’ या प्रतिमेतून कवी आपल्या प्रणयिनीबद्दलच सांगत आहे. गजऱ्याच्या सुगंधाद्वारे ती रात्रीच्या गोड आठवणी ठेवून गेली आहे. जराशा सुटलेल्या मिठीतून पहाटे ‘ती निसटून’गेलीय्, यावरून हा चोरटा प्रणय असावा हे सूचित होत आहे! दुलईला येणारा मोगऱ्याचा सुगंध त्या रात्रीचं अप्रत्यक्ष वर्णन करत आहे.

प्रणयाच्या विविध छटा कवीच्या लेखणीतून उतरलेल्याआपल्याला दिसतात.रूपगंधा मधील माहेरवाशीण अशीच एक छटा आहे. या माहेरवाशिणीचं मन मेंदीच्या पानांवर अजून झुलत आहे. तिचे अंग अंग हळदीने पिवळे आहे. यावरून ही नवपरिणित स्त्री आहे.ती पहिली शृंगार-रात्र अनुभवून रीतीप्रमाणे प्रथमच माहेरी आलेली आहे. तिला अनुभवाने ‘मोठेपण’ तर दिलं आहे;(लग्नानंतर ‘मुली’ ची ‘बाई’ होते! ) पण ते अद्याप कोवळेच आहे.रात्रीच्या त्या आठवणी या क्षणी तिला ‘भलत्याच’ वाटतआहेत व ती स्वतःशीच लाजत आहे.

झुळझुळतो अंगणात तोच गार वारा,

हुळहुळतो तुळशीचा अजुन देह सारा.....

हुळहुळणाऱ्या स्पर्शाच्या आठवणी या गीतात मेंदीच्या पानांआडून डोकावत आहेत.

'गौळण' हीकवितास्वप्न-शृंगाराचाच सुंदर आविष्कार आहे.

सखि, मी मज हरपुन बसले ऽ ग

आज पहाटे श्रीरंगाने मजला पुरते लुटले ऽ ग

साखरझोपेमध्येच अलगद प्राजक्तासम टिपले ऽ ग

त्या श्वासांनी दीपकळीगत पळभर मी थरथरले ऽ ग

त्या स्पर्शाच्या हिंदोळयावरलाजत उमलत झुलले ऽ ग

त्या घनश्यामल मिठीत नकळत बिजलीसम लखलखले ऽ ग

दिसला मग तो देवकीनंदन अन् मी डोळे मिटले ऽ ग.....

गोकुळात असतांना कान्हा लहान होता;गोपी त्याच्याशी मधुरा भक्तीने एवढ्या जोडल्या गेल्या होत्या त्या कृष्णाला आपल्या प्रियकराच्या रूपातही पाहात होत्या. कृष्णही गोपींसाठी कोणत्याही वयाचे रूप धारण करत असे, असा भागवतात उल्लेख आहे. कृष्णाने स्वप्नात येऊन गोपी बरोबर जो शृंगार केला त्याचे वर्णन ती सखीला सांगत आहे! साखरझोप आणि पहाट यांच्याशीसंलग्न असा प्राजक्ताचा उल्लेख येणे स्वाभाविकच आहे. प्राजक्तासम 'टिपले', यातीलगर्भितार्थरसिकांनी समजून घ्यायचा आहे. म्हणून तर श्वसांनी थरथरणे स्पष्ट होत आहे. स्पर्शाने आत्मसाक्षात्काराचा जीवनातीत अनुभव (विजेचे लखलखणे) गोपीला दिल्यानंतर (ती राधाही असू शकेल ) कान्हा पुन्हा आपल्या मूळ बालक-रूपात तिला स्वप्नात दिसला. म्हणून तर इथे कवीने 'देवकीनंदन' हे नाव वापरले आहे. आता त्यास्वप्नानुभवाचा पुनःप्रत्यय घेण्यासाठीच तिनं डोळे मिटले आहेत! अशी ही 'गौळण' आपल्याला शृंगाराकडून भक्ती याप्रीतीच्याचरम अवस्थेकडे घेऊन जाते.

अशा किती रचनांचा आस्वाद इथे घ्यायचा? ही एक न संपणारी सुगंध-यात्रा आहे!कवितेच्या करपाशी धुंद होऊन कवी जगाला विसरत आहे. कधीवीज लखलखावी तशी त्याची ‘ती’ भेटते; केव्हा पूर्णिमेचे चांदणे वेणीत माळून, अधिऱ्या आठवांची आरती हृदयात घेऊन ती येते, तर कधी मराठमोळ्या रूपात गीतगंगेच्या तटावर घागर घेऊन येते! कुठल्याही रूपात येवो, कवी तिची उत्कंठेने वाट पाहत आहे! ती आली तेव्हा काय झालं?

प्रत्यक्ष भेटीत मात्र काहीवेळा कवी गोंधळून का जातो, हे एक कोडे आहे!

तू भेटलीस तेव्हा मी बोललोच नाही

तू भेटतेस तेव्हा माझे असेच होते!.....

कधीतरी ती नुसतीच हवेच्या झोतासारखी अंगावरून निघून जाते...भट लिहितात,

कोण जाणे कोण हे जवळून गेले

चांदणे रक्तामध्ये मिसळून गेले....

‘ती’ च होती ती. पण मग भेटली का नाही? मला टाळत तर नाही ना?

तुजपाशी मज टाळायाचे लाख बहाणे होते

मजपाशी पण तुझियासाठी केवळ गाणे होते....!

सुरेश भट हे जितके दुःखाचे कवी आहेत तितकेच ते प्रेमकवीही आहेत. प्रेमकविता व प्रेमाला अर्पित शेर तुलनेने कमी असेनात का, पण ते अत्यंत उत्कट आहेत.त्या कवितांमधील प्रेमरस रसिक वाचकाच्या ओठांवर मधाप्रमाणे रेंगाळत राहतो. त्यांमधील ‘फुलराणी’ रूपाचीस्त्री जवळीक साधून वाचकाच्या मनात मोहर फुलवीत राहते.

## अशी असावी गझल—

संगीता जोशी

एकाच वृत्तातील, ठराविक लयखंडात, समउच्चारी शब्दांचे यमक (काफिया) व अन्त्ययमक (रदीफ) असलेल्या, दोन-दोन ओळींच्या किमान पाच किंवा त्याहून अधिक कवितांची (शेरांची) बांधणी म्हणजे गझल.

आवश्यक लक्षणे—

1. वेगवेगळया स्वतंत्रव सार्वभौम द्विपदींची (शेरांची) माळ म्हणजे गझल.कोणताही शेर वेगळा काढून वाचला तरी तो अर्थपूर्ण असला पाहिजे. अर्थासाठी तो मागच्या अथवा पुढच्या शेरावर अवलंबून असता कामा नये. असे शेर हेच गझलेचे मुख्य लक्षण आहे.
2. मतल्यात दोन्ही ओळीत काफिया, व पुढील प्रत्येक शेरातील दुसऱ्या ओळीत काफिया असलाच पाहिजे. काफियाशिवाय गझल होऊच शकत नाही.
3. काफियानंतर रदीफ येते.मतल्याच्या शेरात दोन्ही ओळीत व पुढील प्रत्येक शेराच्या दुसऱ्या ओळीत रदीफ असते. पण रदीफ असलीच पाहिजे असे बंधन नाही. रदीफशिवायही गझल असू शकते. तिला 'गैरमुरद्दफ' गझल म्हणतात.
4. गझलेचे सर्व शेर एकाच वृत्तात असले पाहिजेत. शेराच्या प्रत्येक ओळीत लय साधलेली असली पाहिजे.
5. गझलेच्या शेवटच्या शेरात काही कवी आपले उपनाव (तखल्लुस) गुंफतात. अशा शेराला मक्ता म्हणतात. मक्ता लिहावा किंवा नाही, ही बाब ऐच्छिक आहे.
6. कवीची प्रतिभा व काव्यमर्मज्ञता,उत्कट भाव, कल्पनेची नवता ( newness नव्हे;नवता म्हणजे originality), कल्पनेची प्रभावी अभिव्यक्ती, प्रतीके-अलंकार लय, संकेत इत्यादींच्या साहाय्याने सौंदर्यनिर्मिती व कलाविष्कार क्वचित अध्यात्माची झलक इ. गझलेचे ठळक गुण आहेत.
7. संकेताने भावना ध्वनित करणे हा गझलचा आत्मा आहे. त्या संकेतानुसार सौंदर्याचा शोध घेणे ही गझलची वृत्ती आहे.यालाच तगज्जुल म्हणतात. सोप्या शब्दात प्रभावशाली व रमणीय अभिव्यक्ती म्हणजे तगज्जुल अशी थोडक्यात व्याख्या डॉ. श्रीरंग संगोराम यांनी केली आहे. ( म.सा.पत्रिका, दिवाळी अंक,1986.)

*****

**गझलेची भाषा—**

1. गझलेची भाषा साधी तरीही इतर काव्यप्रकारांच्या तुलनेत प्रभावी व परिणामकारक असली पाहिजे.
2. भाषा प्रतीकात्मक व अलंकारिक असावी; मात्र योग्य व उचित उपयोग असावा.

त्यात पांडित्य-प्रदर्शनाचा हेतू नसावा.

3. प्रतीकात्मता हे गझलचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळेच शब्दार्थाबरोबरच रसिक लक्ष्यार्थ व व्यंग्यार्थांचा आनंद घेऊ शकतात.
4. आशय, भावोत्कटता हा गझलचा मुख्य गुण आहे. रचना-तंत्र व नियम हे गझलेचे केवळ शरीर आहे. पण उत्कट अभिव्यक्ती व आशयघनता हीच तिची खरी ओळख.
5. मराठी गझलेत फुले-काटे, चेहरे-मुखवटे, चेहरा-आरसा,...इ. संकेत तयार झाले आहेत.उर्दूच्या पारंपारिक गझलेतील निष्ठुर प्रेमिका, प्रियकराची विवशता,याखेरीज साकी-शराब-मयखाना, वाइज-नासेह इ. विषय मराठी गझलेने उचलले नाहीत. आता सुधारणावादी उर्दू गझलेतही सामाजिक,राजकीय इ. विषय हाताळले जातात. हे विषय सुरेश भट यांच्या गझलेत व नंतरच्याही गझलेत विपुलतेने आढळतात. तसेच प्रेम व संयत शृंगार ही मराठी गझलेची गुणवैशिष्ट्ये आहेत.

**कवीची गझल-वृत्ती—**

निवडक सुरेश भट या ग्रंथाच्या प्रस्तावनेत कवयित्री शिरीष पै यांनी कवीजवळ गझल-वृत्ती असेल तर तो अधिक चांगली गझल लिहू शकेल असे म्हटले आहे.त्यांनी पुढील वैशिष्ट्ये कवीजवळ असावीत असे नमूद केले आहे.

1. प्रभावी व्यक्तिमत्त्व. याखेरीज प्रभावी गझल लिहिता येत नाही.
2. अनेक आशा-आकांक्षांनी भरलेले मन; त्याचबरोबर स्वप्नभंगाचा विदारक अनुभव.
3. आत्यंतिक कृतार्थता व आत्यांतिक नैराश्य यांचा टोकाचा अनुभव.
4. कुठलाही अनुभव उत्कटतेने घेण्याचा स्वभाव.
5. आपल्याच धुंदीत असणारी पण सभोवताल बाबत अत्यंत संवेदनशील, हळुवार व दयार्द्र वृत्ती.

6.काहीशी बेफिकिरी, कलंदरपणा, बंडखोरपणा.

7.प्रांजळपणा,मोकळेपणा,उपरोधिकता असा व्यामिश्र स्वभाव.

8.प्रेमभंग,स्वप्नभंग पचविणारी,प्रेमात झोकून देणारी वृत्ती.

9.स्वतःच्या चुकांचे परिणाम भोगण्याची सिद्धता असणारी प्रामाणिक वृत्ती.

10.आयुष्य वाऱ्यावर उधळून देण्याचे साहस असणारी वृत्ती.

11.दुःखाला हसत सामोरे जाणारी किंबहुना दुःखाबद्दल सुप्त व गूढ आकर्षण असणारी वृत्ती

12. स्वतःचा पराभवही उत्कटतेने उपभोगणारी व पराभवाचाही उत्सव साजरा करणारी दिलदार वृत्ती.

******

**शेर (द्विपदी) कसा असावा—**

1. प्रत्येक शेर अर्थाच्या व आशयाच्या दृष्टीने परिपूर्ण असावा.
2. शेराच्या दोन ओळी एकाच वृत्तात असाव्यात.
3. गझलेसाठी सांगितलेले गुण म्हणजेच शेराचे गुण.
4. प्रत्येक शेरात स्वतंत्र भावचित्र सामावलेले असावे. शेर हे गझलचे एकक(unit) आहे. गझलेचे सौंदर्य शेराच्या सौंदर्यावरच अवलंबून असते.
5. शेरात योग्य व अचूक शब्द वापरावेत; कारण दोन ओळीत एक पूर्ण विचार ताकदीने, आशयघनतेसह प्रभावीपणे मांडायचा असतो. हा, तो,..इ. शब्द मात्रापूर्ती साठी वापरणे शक्यतो टाळावे.
6. शेराच्या दोन्ही ओळीत काळ समान असावा. एका ओळीत भूतकाळ तर दुसऱ्या ओळीत दुसराच (वर्तमान/भविष्य) असे नसावे.
7. शब्दांचा क्रम विचारपूर्वक घ्यावा; कारण अर्थबदलाचा धोका असतो.
   उदा.कट गये हैं बेगुनाहों के हजारों सर
   यूं चलाये हैं कई हथियार मजहब ने ।।
   बेगुनाह व्यक्तीला हजार डोकी असतात, असा अर्थ निघतो.
   योग्य क्रम---
   कट गये हैं सर हजारों बेगुनाहों के
   यूं चलाए हैं कई हथियार मजहब ने ।।
8. शेराच्या दोन ओळीत संबंध ( रब्त) असावा,
   उदा. मृत्यु जामीन होउनी यावा । जीवनाचा तुरुंगवास नको ।।
9. ज्यांना 'विसाव्या शतकातील गालिब' असे म्हटले जाते, ते उर्दू शायर फिराक गोरखपुरी म्हणतात, शेरात करुणा, प्रेम समर्पण हे भाव प्रामुख्याने येतात.
10. शेराच्या पहिल्या ओळीत प्रस्तावना असते व दुसऱ्या ओळीत त्याचा समर्पक समारोप असतो.
   उदा. वेदनांची तारही तुटली अचानक । छेडतांना तारही तुटली अचानक ।।

11. शेरात विरोधाभास असेल किंवा कलाटणी असेल, अनपेक्षित भाव किंवा चमत्कृती असेल तर शेराचे सौंदर्य वाढते.

उदा. अखेरी बिचारा पुढारी निघाला । मला वाटले की पुजारी वगैरे ।।

कलाटणी वा चमत्कृतीहा गुण वरचेवर आढळणारा गुण नाही. महान कवीच्या सुद्धा सर्व शेरात हा गुण दिसणे अशक्य आहे; गालिब-फिराकच्याही व सुरेश भटांच्याही.

12. वरील गुण असणेही शेराची अट नाही. साधे शेरही अर्थसुंदर व उत्तम असू शकतात.
उदा. तू भेटलीस तेव्हा मी बोललोच नाही । तू भेटतेस तेव्हा माझे असेच होते ।।

13. विचारांची /कल्पनांची नवता (originality)असावी.
उदा. 1. सागराचा होत नाही बालही बाका अशाने
झंजले सारे जरी ह्या क्षुब्ध लाटांशी किनारे....
2. जे कुणी झाले हुतात्मे स्तंभही त्यांचा न कोठे
अन् कसाबाचे जगाला पाठ झाले नाव आहे...

**शेर कसा नसावा---**

1. शेराच्या एका ओळीत एका व्यक्तीला उद्देशून 'तू' व दुसऱ्या ओळीत 'तुम्ही' असा उल्लेख नसावा.
2. शेराचा अर्थ स्पष्ट करून सांगावा लागेल असा शेर नसावा.
   उदा. मगस को बाग में जाने न देना ।
   कि नाहक खून परवाने का होगा ।।
   मधमाशीला बागेत जाऊ देऊ नका; नाहीतर पतंगाचा नाहक खून होईल. असा अर्थ आहे. पण तो स्पष्ट होत नाही.मधल्या रिक्त जागा भराव्या लागतील; त्या याप्रमाणे--- मधमाशी बागेत गेली तर मध गोळा करेल; ती पोळे बांधेल. व्यापारी त्यातील मध काढून घेऊन पोळयाचे मेण वेगळे करेल; त्याची मेणबत्ती तयार केली जाईल. ती पेटवल्यावर पतंग ज्योतीवर झडप घालेल आणि मरेल....!!!
3. शेराच्या दोन ओळी वेगळ्या करता येतील/पडतील असा शेर नसावा.
   उदा. मेघांनी नभ आक्रमिले । अविरत हा पाऊस पडे ।।हा शेर नाही.
   लढवत बसावे लागेल.
4. शेरातील विषय असा नसावा की तो स्वीकारतांना वाचकाला संकोच होईल.
   उदा. चले गये होंगे गर शायद । वस्त्र उतारे बैठे होंगे ।।
5. दोन असंबद्ध गोष्टी एकत्र नसाव्यात.
6. अशिष्ट शब्द नसावेत.

उदा.   मी किती तोंडास हाणू भुंकणाऱ्या ।
       शेपट्या घालून ते होती फरारी ।।

7. कुणाच्या श्रद्धा वा भावना दुखावल्या जातील असा शेर नसावा.
   उदा.   संत हो, आम्ही जरी हे जन्मण्याचे पाप केले ।
          लागली नाही अम्हाला लूत रोगी ईश्वराची ।।

8. मात्रापूर्ती साठी शब्द संक्षिप्तही करू नयेत.
   उदा. सांस तो और चलती मगर । राह में उम्र थक रह गई ।।
   'थककर' ऐवजी मात्रांसाठी 'थक' असे केले आहे. ते चूक आहे.

# ‘सप्तरंग’—सुरेश भट

## (प्रकाशनाच्या प्रसंगी केलेले भाषण)

आज विद्वज्जनांच्या सभेत, मसापच्या माधवराव पटवर्धनांच्या सभागृहात कविश्रेष्ठ सुरेश भटांच्या ‘सप्तरंग’ या नव्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन, मसापचे कार्याध्यक्ष मा. गं. ना. जोगळेकर यांचे हस्ते होत आहे ही सर्व चाहत्यांच्या दृष्टीने आनंदची गोष्ट आहे. याबाबत मा. भट यांनी स्वतःच मला पुस्तकाबद्दल रसग्रहणात्मक बोलण्यास सांगितले व ती संधी संयोजकांनी मला दिली याबद्दल मी भटसाहेबांचे व संयोजकांचे आभार मानते.

पृथ्वीकडून मातीचा सुगंध, पाण्याकडून प्रवाहाचे ओघवतेपण, अग्नीकडून धग व लखलखीतपणा, वाऱ्याकडून सर्वस्पर्शित्व आणि आकाशाकडून विशालता हे सर्व गुण एकत्रित केले तर त्यातून काय साकार होईल? नक्कीच सुरेश भटांची गझल! ‘जीवन’ लाभलेल्या सर्व गोष्टी या पंचतत्त्वांतूनच साकार होत असतात. याच अर्थाने भटांची जिवंत अन् चैतन्यपूर्ण गझल पंचतत्त्वांतून विविध गुण घेऊनच संपन्न झालेली दिसते. त्यांची गझल पूर्णपणै स्वयंभू आहे. कुणाही पूर्वसुरींची प्रेरणा तिच्यामागे नाही किंवा कुणाचा वारसाही ती सांगत नाही.

तू न बाहेर भेटतेस मला
जाणवे आत हालचाल मला...

गझलेची अशी हालचाल भटांना त्यांच्या अंतरंगाच्या गाभ्यात सतत जाणवत असली पाहिजे. अशा या असामान्य पैलू असलेल्या लोलकासारख्या अंतरंगातूनच हे ‘सप्तरंग’ परावर्तित होत आहेत.

‘सप्तरंग’ बद्दल बोलायचे तर सुरेश भटांच्या एकूण गझलेबद्दल बोलायचे हे क्रमप्राप्तच आहे. कारण आज मराठी गझल म्हणजे सुरेश भट व सुरेश भट म्हणजे मराठी गझल हे समीकरण प्रस्थापित झालेले आहे हे सत्य आहे. त्यांची गझलवृत्ती प्रत्येक गझलेतून व प्रत्येक शेरातून प्रकट होते. टोकदार अशी संवेदनशीलता,पराकोटीची उत्कटता व अस्वस्थ करणारी स्मृतिव्याकुळताहे गुण भटांच्या गझलेत ओतप्रोत भरलेले आहेत. ते त्यांच्या सर्व संग्रहात आपल्याला दिसून आलेले आहेतच. इतर काव्यसंग्रहाप्रमाणेच सप्तरंग मध्येही दिसून येणारे वैशिष्ट्य म्हणजे भाषेची कमालीची सहजता. शब्द त्यांच्यावर प्रसन्न आहेत; पण त्यांचा वापर ते अनादराने करत नाहीत. ते शब्दांची ‘इज्जत’ करतात. सोपे लिहिणे हेच खूप अवघड असते असे त्यांनीच अनेकदा म्हटले आहे. त्यांचे लेखन त्या दृष्टीने प्रासादिक असते.

मज सांगावेसे वाटे साऱ्यांना सारे काही

पण सारे सांगायाला आयुष्यच उरले कोठे?...(पृ.108)

हे त्यांनी सहज, सोप्या व ओघवत्या शब्दात सांगितले आहे.

तोतया श्वासांवरी या आयुष्य कसे मी तोलू?

शब्दही माझे, न माझे, मी तुझ्याशी काय बोलू?....

असे म्हणत ते थेट वाचकांच्या हृदयाशी बोलतात. आयुष्यातील अनुभवांचा प्रत्यय आपल्याला देतात.

कोणत्याही अनुभवाला उत्कटतेने सामोरे जाणे,स्वप्न असो वा स्वप्नभंग, कृतार्थता-आनंद असो वा नैराश्य, जिंकणे असो वा पराभव... या सर्वांच्या टोकाला जाऊन तो अनुभव 'भोगणे' व शब्तबद्ध करणे हा त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव आहे; वतो त्यांच्या लेखनातून व्यक्त होतो. कवीचे जीवन व लेखन वेगळे असूच शकत नाही असे त्यांनीच म्हटले आहे व ते त्यांच्याबाबतीत संपूर्ण खरे आहे. त्यांचा मोकळेपणा, दिलखुलास सच्चेपणा त्यांच्या शब्दांतून व्यक्त होत असतो.

तू जपून बोलतेस...वागतेस

मी निरभ्र, आरपार नेहमीच...(पृ.100)

त्यांचा हा पारदर्शीपणा, कलंदरवृत्तीआण आपल्याच मस्तीत जगत असतांनाही दुःखित व पीडितांच्या दुःखाने अस्वस्थ होणारी दयार्द्र मनोवृत्ती हे सर्व गुण गझलेला पोषक असेच आहेत.

गझल हा आत्मनिष्ठ असा काव्यप्रकार आहे. 'स्व' चे भान असणे हा त्याचा अविभाज्य भाग आहे. ही आत्मनिष्ठा भटांच्या गझलेत प्रकर्षाने दिसते. पण आत्मकेंद्रीपणाचा दोष लागू नये इतका त्यांच्या गझलेतील 'मी' हा व्यापक-विश्वव्यापी आहे. शेर पाहा—

दिसती जिथे जिथे ही जखमीच माणसे

मी माझियाचसाठी विव्हळायचे किती?...(पृ. 101)

हा 'मी' जेव्हा स्वतःचे दुःख गोंजारत असतो, तोपर्यंत तो आत्मकेंद्री भासतो पण ते कवच फोडून जेव्हा तो शोषितांची दुःखं पाहतो तेव्हा त्याच्या मनाच्या कक्षा रुंदावतात. तो विश्वव्यापी बनतो. सुरेश भटांच्या मनाची विशालता व मोठेपण अशा शेरांमधून दिसते.

त्यांच्या दुसऱ्या एका पुस्तकातील एक शेर सांगण्याचा मोह मला होत आहे,

पाहिले दुःख मी तुझे जेव्हा

दुःख माझे लहानसे झाले!..

उपेक्षित समाजाबद्दल असलेली कणव या दोन शेरांतून दिसते.पाऊस या त्यांच्या कवितेत ते म्हणतात,

अशी कशी पावसाने । सुरू केली मोगलाई

त्त झोपड्या गाडून । केली जिवाची मुंबई

कसा नको त्याच वेळी । पाऊसही बरसला

जीव लोकांचा तरीही । पाण्यासाठी तरसला ।। (पृ. 86)

भटांच्या कवितेचा विशेष म्हणजे आशयघनता. तो त्यांच्या ओळींचा प्राण असतो.पाऊस बरसला...झोपड्या जमीनदोस्त झाल्या..पण माणसे मात्र पाण्यासाठी तरसत आहेत...या दोन-चार ओळीतून उपेक्षितांच्या सामाजिक स्थितीचे किती विदारक वित्र त्यांनी उभं केलंय्. इथे आठवतात ते आश्वासनांची खैरात करणारे ढोंगी राजकारणी.त्यांचे वाभाडे काढायला भटांचे शब्द जराही अडखळत नाहीत...कचरत नाहीत.

सारेच जातवादी अन् सारेच महात्मे चालू

साऱ्याच परोगाम्यांचा शेवटी पुढारी 'लालू'... (पृ.85(

एकेक हरामी बनला देशाचा भाग्यविधाता

ह्या स्वातंत्र्याचा मुडदा मागतो भडाग्नी आता...(पृ.85)

किंवा –

भेटती सारे पुढारी पाच वर्षांनी

जाहली वेश्या कुमारी पाच वर्षांनी...

घाबरा झाल बिचारा जीव प्राण्यांचा

तेच हे आले शिकारी पाच वर्षांनी...(पृ. 66)

बांधिलकी, प्रामाणिकपणा, सदाचार, सद्विचार इ. आदर्श मूल्यांची पायमल्ली आजकाल सर्रास होतांना दिसते. भटांच्या संवेदनशील मनाला हे अजिबात सहन होत नाही. मूल्यामवर त्यांची श्रद्धा आहे. म्हणूनच ढोंगी राजकारणी किंवा समाजकारणी त्यांच्या शाब्दिक फटकाऱ्यातून सुटत नाहीत. प्रस्थापितांचा वर्गही भटांच्या शेरांचा विषय होतो. प्रस्थापित म्हणजे कोण? तर ज्यांचे सुख दुसऱ्यांच्या दुःखांवर अवलंबून आहे; किंवा जे स्वतःचे मोठेपण सिद्ध करण्यासाठी दुसऱ्यांना खुजे ठरविण्याचा नीचपणा करतात, त्यांना म्हणायचे प्रस्थापित. ही भट यांची व्याख्या आहे.

आजन्म राहिलो मी जळत्या चितेप्रमाणे

हे लोक मानभावी म्हणतात 'हाय' आता... (पृ. 98)

भटांच्या अशा 'खास शैलीतील' शेरआपल्याला 'सप्तरंग' मध्ये वाचायला मिळतात.

बोलता झालो जसा मी, उत्तरे झाली मुकी

जो नकोणाला रुचे, मी त्या सवालासारखा...(पृ.43)

तसेच---

मी अजून उमलणार! बहरणार!!

दुनिये तू कर माझा छळ अजून...(पृ.103)

भटांच्या लेखनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे चपखल प्रतीकांचा वापर. त्यांच्या सगळयाच संग्रहातून ते आपल्याला दिसतं. प्रतिकांच्या वापरामुळे शेरांचं सौंदर्य वाढतंच; प्रतिकांमुळे एका शेरातून विविध अर्थ निघू शकतात, हेच ते सौंदर्य.

मिळेल तेव्हा मिळेल तो सूर्य चोरलेला

निदान ही पेटतीच ठेवू मशाल आम्ही...(पृ.82)

किंवा--- मी कुठे ठेवू निखारे? कय याठ्यांचे करू

जिंदगी माही फुलांचा ताटवा आहे कुठे?...(पृ.42)

चोरलेला सूर्य म्हणजे लोकशाही किंवा चोरलेला सूर्य म्हणजे ज्या गोष्टी पासून समाज वंचित झाला आहे अशी कुठलीही गोष्ट...तिची जपणूक म्हणजे पेटती मशाल...

उदाहरणादाखल आणखी एकच सुंदर शेर पाहा...

गाजती चोहीकडे दुःखे बिलोरी

हुंदका ऐके न कोणी खापराचा...

दुःखाला बिलोरी हे विशेषण वापरूनश्रीमंतांच्या लडिवाळ व मामुली दुःखांकडे भट निर्देश करतात; तर खापरांचा हुंदका हे गरिबीचं दारुण दुर्लक्षित दुःखाकडे भट निर्देश करतात.

निखारे, फुले-काटे, सूर्य-अंधार, चेहरे-मुखवटे, चेहरा-आरसा,ही भटांनी वापरलेलीप्रतीकेआज संकेतरूपाने रूढ होत आहेत.

एकूणच भटसाहेबांच्या गझला म्हणजे रसिकांशी साधलेला दिलखुलास संवाद असतो; तसा तो या संग्रहातही जाणवेल.त्यातील उत्कटता, दिलखुलासपणा, सच्चेपणा यामुळे रसिकांना त्या वाचतांना ‘अरे! मला हेच म्हणायचं होतं’ असं वाटून जातं आपल्याच जीवनाचं प्रतिबिंब त्यांच्या लेखनात वाचकाला दिसतं व वाचक त्या गझलांमधे absorb होऊन जातो. त्यांच्या गझलेतील दुःखाची तीव्रता व व्यथा यामुळे त्यांची गझल आपल्याला जवळची वाटते. कारण आजकाल जीवनाच्या संघर्षात प्रत्येकजणच व्यथित आहे. तरीही त्यांच्या लेखनात नवी पिढी हे आशास्थान असल्याचं आपल्याला दिसतं.

भय यांच्या गीतांबद्दल आपल्याला काय वाटतं, त्यातली नजाकत कशी भावते हे सांगणारं, श्रीमती आशा भोसले यांचं निवेदनही वाचकाला भावेल असंच आहे.

‘आकाशगंगा’ या शीर्षकाचा विभाग पुस्तकात शेवटी जोसलेला आहे. हे सुरेभट यांचं संकल्पित दीर्घकाव्य आहे. मात्र याला एक अशी कथावस्तू नाही. एकाच वृत्तातली 25 कडवी असा एक स्पंद व असो आठ स्पंद त्यांच्या मनात आहेत. त्यातील दोन स्पंद यात समाविष्ट आहेत.

याशिवाय ‘सप्तरंगात’ गझलेबरोबरच लावणी, शाहीरगीत, कूचगीत (Maching song) , हम्द (परमेश्वराची आळवणी),नाअत (प्रेषिताची स्तुती), एक बालगीत व मुक्तछंद हे विविध काव्यप्रकारही समाविष्ट आहेत. या विविधतेमुळे या संग्रहाचं ‘सप्तरंग’ हे नावही समर्पक ठरलं आहे.या सगळयाच कवितांमध्ये त्यांच्या लेखनाची वैशिष्टये आपल्याला आढळतात.

या विविधतेप्रमाणेच, भट यांनी गझलेसाठी जी वृत्ते वापरली आहेत त्यातही विविधता आढळते. यात देवप्रिया, मंजुघोषा,आनंदकंद, व्योमगंगा ही अधिकवेळा आलेली आहेत. साशंक, मेनका, मृगाक्षी, मंदाकिनी ही चार वृत्ते एकेकदा आली आहेत. याशिवाय अनलज्वाला, अरुणप्रभा, चंद्रकांत व 18 मात्रांचं नगराज ही वृत्तेही वापरलेली आढळतात.

शेवटचा मुद्दा सांगतांना मला जे वाटलं, जाणवलं ते मांडते. एल्गार व झंझावात या आधीच्या संग्रहांपेक्षा हा संग्रह मला थोडा वेगळा वाटला. त्या दोन्ही संग्रहात भट यांच्या लेखनात जी आक्रमकता, संघर्षवृत्ती स्पष्ट दिसते, तिचा आवेग व आवेश थोडा निवून भटांची कविता अधिक अंतर्मुखझ्झालेली आढळते. नेहमीच्या आजारामुळै व वयामुळे संघर्षाऐवजी स्वीकार करण्याची तयारी या लेखनात जाणवते. जीवन व लेखन यांचं परस्पर नातं मघाशी म्हटल्याप्रमाणे लेखनात डोकावत आहे. 'खूप काही वाटतंय्,...खूप काही म्हणायचं आहे,...करायचं आहे, पण प्रकृतीमुळे आता ते शक्य नाही...जीवन कवीला मनासारखे लिहूही देत नाही असं ते म्हणतात.

वाटते व्हावे असेही, वाटते व्हावे तसेही

माझियापाशी न काही, एकही वक्षात ज्वाला...

किंवा – मी मोजत आहे माझे, अंदाज जुने चुकलेले

मी पाहत आहे माझे, एकेक स्वप्न थकलेले...

असे शेर वाचून आठवण होते ती शिरवाडकरांच्या 'नटसम्राटाची'.ते एक थकलेलं वादळ होतं. त्य गणपतराव बेलवलकरांप्रमाणे हा गझलसम्राटही शांत झालेल्या झंझावाताप्रमाणे वाटताहेत. नुकतेच ते एका मोठ्या आजारातून सावरले आहेत. त्यांना त्यांच्या मनाप्रमाणे लेखन करण्यासाठी प्रकृतीची साथ मिळो ही आपली सर्वांचीच इच्छा मी प्रकट करते व देवाला तशी प्रार्थना करते.

मला वाटते, भटसाहेब देवाला नसतील पण कुठल्यातरी शक्तीला मानत असावेतच. ज्याअर्थी त्यांनी हम्त, नाअत, किंवा पुनरागमन ही येशूची कविता लिहिली त्यावरून मला ते वाटत आहे. एक शेर सांगते,

तू समुद्र निर्विकार नेहमीच । मी तरंग मी तुषार नेहमीच!!

आध्यात्मिक भावाकडे वळणारा हा शेर, व असे आणखीही शेर या पुस्तकात आहेत, ते वाचून मला वाटतं की त्यांच्या पुढच्या संग्रहात आपल्याला सूफी पद्धतीची गझल नक्की वाचायला मिळेल!

मराठी कवितेच्या लेण्यांमध्ये ज्यांची नावं खोदली जाऊन चिरंतन राहतील त्यात 'सुरेश भट' हे नाव ठळकपणे झळकेल यात शंका नाही. येणाऱ्या पिढ्या , ज्यांना त्यांनी 'सप्तरंग' हा संग्रह अर्पण केला आहे त्यांच्या नक्कीच ऋणी राहतील.

यानंतर या संग्रहातील माझी आवडती एक गझल तरन्नुममधे सादर करून मी माझे रसग्रहण संपवते. (दे मजला जगण्याचे बळ अजून)

# अध्यक्षीय भाषण

(2004 साली अमरावती येथे अखिल भारतीय गझल-संमेलन पार पडले. त्याप्रसंगी केलेले अध्यक्षीय भाषण.)

सर्व रसिकांना...गझलप्रेमींना मनःपूर्वक अभिवादन. तुम्हा सर्वांच्या सदिच्छेने व प्रेमामुळेच मी या तिसऱ्या गझल-संमेलनाच्या अध्यक्षपदापर्यंत पोहोचले आहे.गझलसागर प्रतिष्ठान चे विश्वस्त श्री. भीमराव पांचाळे व इतर पदाधिकारी, संमेलनाचे निमंत्रक अमरावतीचे श्री. नाना लोडम यांचे मी प्रथमाच मनःपूर्वक आभार मानते. त्यांच्या प्रेमामुळेच मला आज माझे विचार इथे मांडण्याची संधी मिळाली; हा अध्यक्षपदाचा मान मिळाला.आपण आज या रंगमंदिरात एकत्र आलो आहोत ते आपण सर्व गझलप्रेम या एकाच धाग्याने बाभधले गेलेलो आहोत म्हणूनच. ज्यांनी गझलचे हे अमृताचे रोपटे रुजविले, ते कविश्रेष्ठ सुरेश भट यांच्या जन्मगावी हे तिसरे गझलसंमेलन भरत आहे हे औचित्यही विशेष म्हणावे लागेल.

मागील वर्षीच्या दुसऱ्या संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी प्रकृती-अस्वास्थ्यामुळे येऊ शकले नाहीत; त्यामुळे मी पुणे येथे त्यांना भेटून,अभिवादन करून त्यांच्याकडून शुभेच्छा घेऊन आले आहे व त्यांनी अध्यक्षपदाची सूत्रे माझ्याकडे सोपविली आहेत. ती जबाबदारी स्वीकारून मी माझे विचार आपल्यापुढे मांडत आहे.

वास्तविक गझल हा काव्याचाच एक प्रकार आणि काव्य हा साहित्याचा एक प्रकार. साहित्यसंमेलने होतात..अखिल भारतीय स्तरावर होतात तशी विभागीयही होतात.. विशिष्ट समाजाची साहित्य संमेलनेही होतात. समाजाच्या वेगवेगळया घटकांचीही वेगळी संमेलने होतात.पण साहित्याच्या ‘काव्य’ या प्रकारापैकीएका विधेचे –उपप्रकाराचे- म्हणजेच गझलेचे संमेलन मोठ्या प्रमाणावर व स्वतंत्रपणै भरविले जात आहे, हे या संमेलनाचे खास वैशिष्ट्य आहे. यावरूनच गझल या काव्यप्रकाराची व्यापकता व महत्ता लक्षात येते.

हे गझल-संमेलन आहे; गझल हा काव्याचाच एक प्रकार आहे. मुळात गझल ही कविता आहे. एक वेगळं रचनातंत्र असलेली कविता, इतकेच. त्यामुळे वेगळे असे गझल-संमेलन भरविणे यात गझलेला कवितेपासून वेगळे मानण्याचा वा तसे ठसविण्याचा उद्देश दूरान्वयानेही नाही. पण जेव्हा एखाद्या वाङ्मयप्रकाराबद्दल बोलण्यासारखे, चर्चा करण्यासारखे, समजावून घेण्यासारखे बरेच काही असते तेव्हा त्यासाठी स्वतंत्र व्यासपीठाची गरज भासते. त्याद्वारे त्या विधेवर लक्ष केंद्रित होण्यासव चर्चेद्वारे होणाऱ्या देवाणघेवाणीतून तिचा विकास होण्यास मदत होते. म्हणून अशी संमेलने उपयुक्त ठरतात.

गझल हा काव्यप्रकार फार्सी भाषेतून उर्दूत व पुढे उर्दूतून पंजाबी, गुजराथी व मराठी सारख्या इतर भाषांमध्ये आला हे सर्वज्ञातच आहे.त्यामुळे मराठी गझलेचा उगमव इतिहास इ. चा ऊहापोह मी इथे करणार नाही. मराठी गझलेचा प्रवास कवी अमृतराय यांचे पासून सुरू झाला असे जरी मानले तरी त्यातील पहिला महत्त्वाचा टप्पा म्हणजे कविवर्य माधव ज्यूलियन यांची गझल व त्यासंबंधीचे कार्य. त्यांचा काळ 1894ते 1939. उर्दू व फार्सी च्या प्रेमामुळे त्या भाषांतील गझल हा प्रकार अत्यंत भावल्यामुळे त्यांनी गझल मराठीत आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनीच लिहून ठेवल्याप्रमाणे, मराठी कवींना छंदांची ओळख व्हावी या उद्देशाने त्यांनी विविध छंदात रचना केल्या. त्यात पुरेशी तंत्रशुद्धता नसली तरी माधव ज्यूलियन यांनी केलेले पायाभूत कार्य अत्यंत मोलाचे आहे, हे निर्विवाद आहे. त्यांच्या बहुमोल योगदानाची तुलना मला जुना अणुशास्त्रज्ञ डाल्टन याच्याशी करावीशी वाटते. नील्स बोर, रुदरफोर्ड किंवा आईनस्टाईन यांच्या पुढील संशोधनाचा मार्ग डाल्टनने आधिच निर्देशित केला होता. त्याचप्रमाणे आधुनिक मराठी गझलेची पावले माधव ज्यूलियन यांच्या रचनांमध्ये उमटलेली आपल्याला दिसतात. त्या काळात छंदांची बंधने झुगारून, जरा जास्तच 'मुक्त' होत चाललेल्या कवितेला त्यांनी पुन्हा छंदातील सुबद्ध पदन्यास शिकविला, हे त्यांचे ऋण विसरण्यासारखे नाही. आज मान्य करण्यात आलेल्या निकषांवर माधव ज्यूलियन यांची गझल पूर्णत्वाने उतरत नसेलही; पण त्यांचे मराठी गझलेमधील योगदान मोठे व महत्त्वपूर्ण आहे यात शंकाच नाही. त्यांचे दोन शेर इथे मुद्दाम उद्धृत करते—

पुरे पूर्वजांच्या जयाची बढाई

पहा आज हीभोवतीची लढाई...

तुम्ही मेंढरेमूक होतां म्हणूनी

बने भ्याड हा काळ कट्टा कसाई...

यानंतरचा दुसरा टप्पा म्हणजे कविश्रेष्ठ सुरेश भटांची गझल. खर्या अर्थाने तंत्रशुद्ध गझल. आशयघनतेत कुठेही उणीव नसलेली परिणामकारक गझल. वाचकाच्या हृदयात कळ उठविण्याची तसेच विद्वान व अविद्वान या दोघांनाही हलवून टाकण्याची ताकद असणारी गझल. अशी ती सुरेश भटांची गझल. प्रेम, शृंगार इ. विषयांपासून अध्यात्मापर्यंत व विविध सामाजिक,राजकीय वास्तवावर त्यांची गझल भाष्य करते. कमालीची संवेदनशीलता, पराकोटीची उत्कटता व अस्वस्थ करणारी स्मृतिव्याकुळता हे भटांच्या गझलेचे विशिष आहेत. शब्दांवर त्यांची हुकूमत आहे. सहजता व सोपेपणा हे गुण त्यांच्या लेखनात दिसतात. साध्या बोलीभाषेच्या प्रयोगामुळे ती रसिकांच्या काळजाला जाऊन भिडते. याप्रकारे साधलेल्या काव्यगुणालाच 'तगज्जुल' अथवा 'गजलियत' म्हणतात.

सुरेश भटांचे काही शेर पाहा—

1. तू भेटलीस तेव्हा मी बोललोच नाही

   तू भेटतेस तेव्हा माझे असेच होते...

2.हे माझे केवळ काही तरंग

   तू कोठे पाहिलास तळ अजून...

3. वृत्तपत्रांचे रकाने वायद्यांनी भरत होते

   अन् किड्यामुंग्यांप्रमाणे लोक साधे मरत होते...

सुरेश भटांची गझल हा काव्यसागरातील जणू मार्गदर्शक दीपस्तंभच होय. नवकवितेच्यामुक्त उसळत्या लाटांमधून कवितेचे तारू योग्य दिशेला नेण्याचे काम त्यांची गझल करते. मराठी काव्याला नवे वेगळे वळण लावण्याचे सामर्थ्य भट यांच्या लेखणीत दिसून येते. मराठी कवितेच्या लेण्यांमध्ये जी नावे खोदली जाऊन चिरंतन राहतील त्यात सुरेश भट हे नाव ठळकपणे दिसेल.

आज ते आपल्यात नाहीत याची खंत वाटत आहे. ते आणखी काही वर्षे तरी आपल्याला हवे होते; मराठी गझलेला हवे होते. त्यांनी लावलेले गझलेचे हे अमृताचे रोपटे वाढविण्याची, त्याच्या निगराणीची जबाबदारी आपल्यावर व येणाऱ्यापुढच्या गझलकार पिढीवर आहे. ते म्हणतात,

जाणते ही बाग माझ्या सोसण्याच्या सार्थकाला

मी इथे हे अमृताचे रोपटे रुजवून गेलो...

'सुरेश भटांबरोबर गझल मेली' असे जर कोणी म्हणत असेल, तर त्यांना सांगावेसे वाटते की, 'या; आणि हे गझल-संमेलन अनुभवा. अमरावतीत जन्मलेली गझल आजही अमरच आहे.'गझल मरेल कशी? तो एक साहित्यप्रकार आहे; आणि साहित्य हे प्रवाही असते. कारण साहित्य हे समाजाचे, त्याच्या संस्कृतीचे आणि काळाचे प्रतिबिंब असते. समाज कधीच स्थितिक (स्टॅगनंट) नसतो. काळाप्रमाणेच साहित्याला ओघ असतो. ते पुढे जातच असते. माधव ज्यूलियन झालेच ना? तसा या विकासात नवीव टप्पाही येईलच. हेच काळाचे वरदान असते. त्याला कुठल्याही अध्यक्षीय भाषणाच्या पुष्टीची गरज नाही.

आता गझलेच्या आक्षेपांबद्दल. गझल कृत्रिम आहे; त्यात रचनातंत्रामुळे, काफिया-रदीफ (यमक व अंत्ययमक) यांच्या बंधनामुळे अभिव्यक्तीत अडथळा येऊन कृत्रिमता येते असा प्रमुख

आरोप केला जातो. हा आरोप आता कायमचाच निकालात काढावाअसे माझे मत आहे. गझल हा वृत्तबद्ध काव्यप्रकार आहे. त्याला एक अंगभूत लय आहे. गेयता आहे. लयीशी समरस होऊ शकणाऱ्या कोणाही कवीला, गुणगुणत सहज गझल लिहिता येते. मात्र, छंद आणि लय आत्मसात करून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी 'गझलेची बाराखडी' व विविध छंदांचा अभ्यास कवीने केला पाहिजे. (पण छंद माहीत नसले तरी गझल लिहिणे शक्य असते.) यालाच 'रियाझ' म्हणता येईल. कवीचे शब्दभांडारही समृद्ध असायला हवे. मुख्य म्हणजे तो कवी मुळात उत्तम कवी असला पाहिजे; तरच तो उत्तम गझलकार होऊ शकेल. सरावाने वृत्तबद्ध रचना करणे सुलभ होऊन जाते हे सत्य आहे. मग शब्दांच्या 'ठाकठोकीची' कुठलीही गरज राहत नाही. वृत्तबद्ध किंवा छंदबद्ध कविता म्हणजे शब्दांची ठाकठोक असा आरोप कोणी केला तर जुन्या संत व पंत कवींना, अगदीज्ञानेश्वर- तुकारामांपर्यंत सर्वांना दोष लागायचा!

गझलेच्या कार्यशाळेबाबतही कुठेकुठे टीका ऐकू येते. अशी की कार्यशाळेत कोठे कवी तयार होतात का? पण याला उत्तर असे की, कार्यशाळेत फक्त गझल लेखनाचे तंत्र सांगदतले जाते. कार्यशाळेत प्रतिभा मिळत नसते. ती उपजतच असावी लागते. प्रतिभेवा आविष्कार कवीने तंत्र सांभाळून आपला आपणच करायचा असतो. त्यातून गझलेमध्ये 'गझलियत' येऊ शकते. आशयाविना तंत्रशुद्ध रचना म्हणजे केवळ सांगाडाच.

मराठी गझल म्हणजे 'पाहुण्या' उर्दूतील उचल असाही एक आक्षेप आहे. पण त्यात तथ्य नाही. मुळात उर्दू ही पाहुणी भाषा नव्हे. ती आपल् भारतीय भाषा आहे. एखादा आर्कतीबंध एका भाषेतून दुसऱ्या भाषेत येणे ही सांस्कृतिक देवाणघेवाण असते. इंग्रजीतून आलेले 'सुनीत' , जपानी भाषेतून आलेले हायकू ही आणखीही काही उदाहरणे आहेत. गझलेचा उगम उर्दूच्याही आधी फार्सीतून झालेला आहे, जेव्हा उर्दू अस्तित्वातही नव्हती.मराठी गझळ ही अस्सल मराठमोळी आहे. जिज्ञासूंनी सुरेश भटांचे संग्रह वाचावेत व मगच साधार आरोप करावेत, असे सुचवावेसे वाटते.

गझलियत(तगज्जुल) म्हणजे कोणता गुण हे वती आलेच आहे. वेगळया शब्दात सांगायचे तर , सहज,साध्या, सोप्या रचनेतून हृदयापर्यंत घुसण्याची व भिडण्याची शब्दांची ताकद म्हणजे गझलियत. मुद्दाम नमूद करावेसे हा मोहविणारा गुण कवीच्या प्रत्येक गझलेत किंवा गझलेतील प्रत्येक शेरात असेलच असे नाही; किंबहुना नसतोच. अगदी उर्दूतीलमीर, गालिब,किंवा आपल्या सुरेश भटांपर्यंत कोणीही याला अपवाद नाही.

याचबरोबर गझलियत हा गुणधर्म (गझलेमध्ये तो प्रकर्षाने आढळतो म्हणूण हे नाव पडले असले तरीही--) गझल नसलेल्या एखाद्या उत्तम कवितेतही असू शकतो! कविवर्य गदिमा, बोरकर,

कुसुमाग्रज, आरतीप्रभू इतकेच काय, ज्येष्ठ कवयित्री बहिणाबाई चौधरी अशा दिग्गज कवींच्या कवितांमध्येही गझलियत आढळते. नुकतेच आपल्या कानांवर पडलेले गदिमांचे गीत—

भारतीय नागरिकाचा घास रोज अडतो ओठी

सैनिकहो, तुमच्यासाठी..

एकेक शिपायासाठी जळतात अंतरे कोटी

सैनिकहो, तुमच्यासाठी..

या ओळी आपल्या हृदयाला भिडत नाहीत काय? गझल आत्मसात होण्यासाठी कवीमध्ये ‘गझलवृत्ती’ असणेही आवश्यक आहे.गझल हा आत्मनिष्ठ असा काव्यप्रकार आहे. त्यात ‘स्व’ शी संवाद घडत असतो. ‘स्व’शी संघर्षही असतो. इतरांशीही संघर्ष असू शकतो. इतर म्हणजे समाज, मित्र, आप्त-स्वकीय,प्रियकर वा प्रेयसी, किंवा दुसरे मनसुद्धा! कवीच्या मनात सर्वांबद्दल भरलेले प्रेम, भक्ती, सदाचार, सौंदर्यपूजन, सर्वप्रकारच्या ‘सत्’ वृती याबद्दल जिव्हाळा असेल; मूल्यांची पायमल्ली वा घसरण त्याला अस्वस्थ करत असेल; स्वार्थ, दांभिकता यासारख्या अवगुणांची त्याला चीड येत असेल तर हीच एकंदरीत गझलवृत्ती मानली जाते. असा कवी नक्की चांगली गझल लिहू शकेल. कमालीची संवेदनशीलता अर्थात हवीच. कोणताही अनुभव उत्कटतेने घेण्याची क्षमता व तितक्याच प्रभावीपणे शब्दात प्रकट करण्याचे कसब हेही कवीजवळ हवे. ही देखील एक वेगळी साधनाच आहे.

गझल छंदोबद्ध,लयबद्ध व म्हणूणच गेय असा काव्यप्रकार आहे. गझलगायनाचा मुद्दाही त्यामुळे ओघानेच येतो. गझलगायकी ही शब्दप्रधान गायकी आहे.मग शब्द व सूर यापैकी कोण दुसऱ्याला खुलवते? एका उदाहरणाने हे स्पष्ट होईल. एखाद्या फुलास आकर्षक रंग व मोहक सुगंध प्राप्त झाला आहे, असे समजू. दोन्हीही गुण आपापल्या जागी फुलाची सौंदर्यवृद्धी करीत असतातच. पण सुगंध हा दूरवर पोहोचणारा आहे. वाऱ्याबरोबर त्याचा दरवळ दूरवरच्या रसिकापर्यंत पोहोचेल व आनंद देईल. पण रंगाचे दृष्टिसुख व आस्वाद मात्र प्रत्यक्ष फुलापर्यंत पोहोचल्याशिवाय रसिक घेऊ शकणार नाही. सूर हे फुलाच्या गंधाप्रमाणे आहेत. ते कवितेला रसिकापर्यंत घेऊन जातात, त्यांच्यातील अंतर कमी करतात व रसिकाला शब्दांपर्यंत खेचून आणतात. आमचे सुरेश भटांच्या बाबतीत असेच घडले होते. ‘मेंदीच्या पानांवर...’ हे गीत लताबाईंच्या स्वरात ऐकले आणि वाटले कोण हे कवी? मग प्रथम नाव समजले. नंतर त्यांचा कवितासंग्रह आहे का? कोठे मिळेल? इ. जिज्ञासा जागृत झाली व आम्ही कवीपर्यंत पोहोचलो. स्वरांची ही ताकद लक्षात घेऊन त्यांचे श्रेय त्यांना-स्वरांना-द्यायलाच हवे. अनेक जुन्या कविता आजही आपल्या लक्षात राहिलेल्या आहेत कारण त्यांची ‘गाणी’ झाली आहेत. चाफा बोलेना,

चाफा चालेना...(या गीताचे कवी बी) किंवा 'गंगा-यमुना डोळयात उभ्या का' हे गीत ( कवी पी. सावळाराम ) कळा ज्या लागल्या जीवा (कवी भा.रा. तांबे)या कविताही स्वरसाजामुळे आपल्यास्मरणात राहिल्या आहेत. मात्र त्यामुळेच ते कवी मोठे, असे होत नाही. शब्द जर आशयपूर्ण नसतील तर गझल व तराणा यात फरकच राहणार नाही.

गेयता हा गझलचा गुण असला तरीही प्रत्येक गझलेला स्वरसाज शोभून दिसेल असे मात्र नाही. एकूणच, कविता-गझला त्यात आल्याच- चार प्रकारात मोडतात असे माझे मत आहे.

(1)वाचनीयः एकट्याने पुस्तक घेऊन वाचाव्यात, चिंतन करावे अशा कविता.
(2)श्राव्यः कवीकडून ऐकून स्वाद घ्यावा अशा कविता.
(3)मंचीयः रंगमंचावरून नाट्यमय अंगाने सादर करून कवी दाद मिळवितो अशा कविता.
(4)गेयः गझलगायकाने गाऊन सादर कराव्यात अशा कविता.

हे चार प्रकार म्हणजे हवाबंद कप्पे नव्हेत. एखाद्या गझलेत हे चारही गुण एकाच वेळी असू शकतील. किंवा कुठल्या गुणाचा प्रकर्ष असेल हे कवीच्या वकूबावर अवलंबून आहे. कोणती रचना गेय व स्वरबद्ध होऊन चांगले सादरीकरण करता येईल हे ठरविण्याचे स्वातंत्र्य संगीतकारालाच द्यायला हवे.

एखाद्या गझलेला संगीत देतांना कोणता वेगळा विचार करावा लागतो, त्या गझलेच्या अर्थाचे पापुद्रे काढून त्यानुसार शेराची चाल कशी बांधावी लागते याविषयी आपले गझलनवाज भीमराव पांचाळे त्यांच्या सत्रात अधिक चांगल्याप्रकारे सांगू शकतील.ते एक निष्णात गझल-संगीतकार आहेत.

अगदी थोडक्यात माझा गझलप्रवास सांगणे येथे अप्रस्तुत होणार नाही.हा प्रवासही उर्दू काव्यापासूनच सुरू झाला.उर्दू काव्याची लज्जत प्रथम चाखता आली ती मात्र हिंदी चित्रपटसंगीतामुळे. त्याआधी पाठ्यपुस्तकातील कविता शालेय जीवनापासूनच आवडू लागल्या होत्या.वडिलामच्या संगीतप्रेमामुळे घरात संगीतमय वातावरण होतं. लहानपणापासून शास्त्रीय संगीताची तालीमही मिळाली त्यामुळे लय आणि शब्द यांचा मिलाफ नकळतच झाला. शब्द जुळू लागले होते. 1957 सालापासूनच्या कविता डायऱ्यांमध्ये अजून सापडतील. त्यात गझलेसारख्या रचनाही आहेत. अगदी तंत्रशुद्ध नाहीत, पण प्रत्येक शेर स्वतंत्र सापडतात.पण जाणीवपूर्वक गझललेखन 1975 नंतर केले. त्यापैकी काही रचना राजकवी यशवंत ऊर्फ य.दि.पेंढरकर यांनी वाखाणल्याचे स्मरते. 1978 मे 'रंग माझा वेगळा' हाती आले; पण सुरेश भटांचा परिचय 1980 साली झाला. दरम्यानच्या काळात डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी यांनी वाडिया कॉलेजमध्ये होणाऱ्या अनेक द्विभाषिक मुशायऱ्यांमध्ये भाग घेण्याची संधी दिली.त्यातून गझलेची समज अधिकाधिक

पक्की होत गेली. मा. सुरेश भट यांनी मला अलामत समजावून दिली, हे मी कधीही विसरणार नाही. अनिल कांबळे सुरुवातीपासून बरोबर होते. नंतर इलाही जमादार, रमण रणदिवे, दीपक करंदीकर, प्रदीप निफाडकर असे अनेक कवी सहभागी होत गेले. आज हे सर्वजण चांगले गझलकार म्हणून प्रसिद्ध आहेत. सर्वांचे गझलसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. सर्वांना भट यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

आज नवीन गझलकारही पुढे येत आहेत. ए.के. शेख, वा.न. सरदेसाई, दिलीप पांढरपट्टे, राम पंडित, घनःशाम धेंडे, मुबारक शेख, डी.एन. गांगण, प्रमोद खराडे, समीर चव्हाण, गौरवकुमार आठवले, अभिमन्यू आळतेकर,.....कती नावे घ्यावीत?....अनेक गझलकार पुढे येत आहेत...साहित्यातील गझलेचे दालन समृद्ध होत आहे...अमृताचे रोपटे फोफावत आहे. गझलेची व्यापकता व लोकप्रियता वाढावी यासाठी गझलनवाज भीमराव पांचाळे सतत कार्यरत आहेत. त्यांची आस्था व तळमळ यांचेच मूर्तरूप म्हणजे हे व आधीची दोन संमेलने.

अमरावतीमध्ये, सुरेश भट यांच्या जन्मगावी नवीन गझलकार गझलेला खतपाणी घालत आहेत. त्यांची गझल चांगली फुलत आहे. शेर पाहा—

1. अर्धाच भाव आला घामातल्या पिकांना

दिसला तरी मला तो शेतात राबतांना...गिरीश खारकर

2.कोणतीही योजना आखा तुम्ही

ह्या फुलाला गंध आला पाहिजे....अरुण सांगोळे

3. जिंकलो तरी हरतो आहे । कणाकणाने सरतो आहे।।

परत मला तू केल्यावरती । तुझ्याकडे मी उरतो आहे ।।...नितिन भट

4. हातचा जातोच मोका ऐनवेळी

माणसे देतात धोका ऐनवेळी....गंगाधर पुसतकर

याशिवाय बबन सराडकर, विष्णु सोळंके, मनीष काळे हेही चांगली गझल लिहीत आहेत.या संमेलनात गझलवर बरीच चर्चा परिसंवादातून होणार आहेच त्यामुळे 'गझलमधील प्रतीके', 'वृत्तांची विविधता' , 'गझलेत हाताळले जाणारे विषय' , 'गझलेपुढील आव्हाने' इ. अनेक विषयांचा इथे केवळ उल्लेख करते.

या संमेलनाला अनेक राजकीय मान्यवर यांची उपस्थिती, तसेच सिनेदिग्दर्शक,कलावंत यांचीही उपस्थिती लाभणार आहे, यावरून या सर्वांचे गझलप्रेम स्पष्ट होत आहे.हा प्रेमाचा धागा आपल्या सर्वांना बांधून ठेवो व पुनःपुन्हा आपल्याला एकत्र येण्याची संधी मिळो,अशी इच्छा व्यक्त करून आणि सर्वांचे पुन्हा एकदा आभार मानून मी इथे पूर्णविराम देते.

( मंत्री महोदय ऐनवेळी येऊ शकले नाहीत. पण त्यामुळे मा. समाजसेवक डॉ. प्रकाश आमटे व डॉ. सौ. मंदा आमटे यांच्या उपस्थितीने समारंभास व रंगमंचास उंची लाभली. ते आणि मी एकाच मंचावर आलो हे माझे भाग्य, असे मी समजते.)

दि. 7 व 8 फेब्रुवारी 2004. --संगीता जोशी

अध्यक्ष, तिसरे अखिल भारतीय मराठी गझल संमेलन

*****

मराठी गझल आत्मनिष्ठेतून समाजनिष्ठतेकडे...

(एका गझल-संमेलनाप्रसंगी केलेले भाषण)

मराठी गझल यासंबंधी प्राथमिक ओळख करून देण्याची गरज नाही; कारण आपण सर्व तिला नुसतेच ओळखत नाही तर तिच्या प्रेमात पडलेलो आहोत.म्हणूनच तर आपण वेळात वेळ काढून इथे जमलेलो आहोत.

दिलेल्या विषयातील शब्दांकडे मी प्रथम तुमचे लक्ष वेधते. आत्मनिष्ठता म्हणजे काय? त्याची काही व्याख्या करता येईल काय?त्याचा नेमका अर्थ काय? आत्मलक्षी या चा आधी अर्थ पाहू. कवीचे स्वतःचे विचार,कवीची कल्पना, त्याची काव्यदृष्टी

त्याची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी, हे जेव्हा त्याच्या काव्यातून डोकावतेतेव्ह त्या काव्याला आत्मलक्षी म्हणायचे. थोडक्यात कवी स्व मध्ये रमलेला अर्थात आत्ममग्न असतो. ( स्वमग्नता यापेक्षा भिन्न आहे, हे लक्षात ठेवा;स्वमग्नता हा एक मानसिक आजात आहे.) आत्मलक्षी व आत्मनिष्ठ हे शब्द समानार्थी मानायला हरकत नाही. पण त्यात एक सूक्ष्म रेघ आहे. आत्मलक्षी साहित्याची स्वतःशी अत्यंत प्रामाणिक राहून अत्यंत आत्मविश्वासाने केलेली अभिव्यक्ती म्हणजे आत्मनिष्ठा.

मराठी काव्याच्या इतिहासाकडे एक नजर टाकणे यावेळी जरूर आहे. मराठी कविता आत्मलक्षी करण्याचे श्रेय केशवसुतांकडे जाते. त्यापूर्वीची शाहिरांची कविता आणि त्यापूर्वीची वामन पंडित, रघुनाथ पंडित, मोरोपंत यांची कविता भक्तिरसात बुडलेली होती.पंतकवींच्या पूर्वीची संत-कविता ही देखील ईश्वराच्या भक्तीत रमलेली होती. परमार्थ, मोक्ष,अध्यात्म,या मर्यादित विषयांतच ती गुरफटलेली होती. पुढे शाहिरांच्या काळात काव्याला थोडे नवे वळण मिळाले. त्यांचेकाव्य पंडितकवींपेक्षा अधिक आर्द्र व हृदयंगम झाले. तरीही भावनाविष्काराची क्षेत्रे मर्यादितच होती. त्यात वैयक्तिक अनुभूतीचा आविष्कार एकंदरीत कमीच आढळतो. भक्तिरस व करुणरस हा संत कवींचा विशेष तर शृंगार व वीर रस हा शाहिरी कवींचा काव्यविषय. येथेच संतांकडून अभंग, ओवी वृत्तात भक्तिग्रंथ निर्मिती झाली.उदा. गाथा, दासबोध इ. शाहिरांनी पोवाडे व लावणी यांची निर्मिती केली.वर म्हटल्याप्रमाणे त्यात आत्मनुभूतीला वावच नव्हता.एका समीक्षकाने लिहिले आहे की ‘संतकवीच्या काव्यातून विठ्ठल वजा केला तर

बाकी शून्य राहील.' फक्त काव्याच्या विश्लेषणाबाबत वरील विधान समीक्षक ना.के. बेहेरे यांनी 1938 साली केले आहे.

पंत,संत व शाहीर यांच्यापाशी प्राचीन काळ संपतो. यानंतर आणि केशवसुतांपूर्वी अनेक मराठी कवी होऊन गेले ज्यांनी स्फुट कविता लिहिल्या पण त्यातील बरीचशी इंग्रजी छापाची व थोडीशी संस्कृत वळणाची, थोडीशी प्राचीन मराठी काव्याची अर्वाचीन नक्कल अशा स्वरूपाची होती.केशवसुतांनी कवितेत आत्मानुभूतीला मह8व दिलेले दिसते.पंडित कवींची कृत्रिमता, बहिर्मुखता यामुळे रसहानी व भावहानी होते; व तसे होणे केशवसुतांनामान्य नव्हते. कृत्रिक काव्य म्हणजे लाकडी फळ असे ते म्हणत.

भावसौंदर्य हेच कवितेचे खरेखुरे सौंदर्य होय, असे ते सांगत. बहिर्मुख दृष्टीने चित्रण करायचे सोडून कवी जेव्हा आत्मनिष्ठ दृष्टीने चित्रण करायका उत्सुक होतो , तेव्हा आपल्या अंतःकरणात भावनांची असंख्य तरल व तेजस्वी विश्वे आहेत याची त्याला जाणीव होते.सामान्य व्यक्तीची सुखदुःखे ही देखील उत्कट आहेत, ही श्रद्धा त्याच्या मनात निर्माण होते. ओसाड माळावर उमललेले फूल पाहून त्याचे मन आनंदित होते तर रस्त्यावरील दरिद्री भिकारीण पाहून त्याचे मन करुणेने भरून जाते. या सर्व स्वतःच्या भावना कवितेत उतरविणे म्हणजे आत्मलक्षी अथवा आत्मनिष्ठ कविता. अशा विचारांनी व सहृदयतेने कविता प्रथम लिहिली ती केशवसुतांनी! म्हणूनच त्यांना 'अर्वाचीन काव्याचे जनक' म्हटले जाते. प्राचीन कवितेच्या प्रवाहाला वेगळे वळण देण्याची ताकद त्या आत्मनिष्ठ कवितेत होती.

तसे आणि त्या अर्थाने हा आत्मनिष्ठ काव्यप्रकार आहे. येथे एक महत्त्वाचा मुद्दा नमूद करावा लागेल. कविता किंवा गझलच कशाला बहुतांश साहित्य हे आत्मलक्षीच असते. ज्यात स्वतःची मते मांडलेली असतील ते सर्व साहित्य आत्मलक्षी /आत्मनिष्ठ च म्हणावे लागेल. कथा-कादंबरीत वर्णन केलेली पात्रे ही लेखकाच्या चिंतनातून व कल्पनेतूनचनिर्माण होतात. इतर गद्यलेखनातही लेखक स्वतःचे विचार,स्वतःचे भाव स्वतःच्या कल्पना व स्वतःच्या प्रतिक्रियाच व्यक्त करीत असतो. निबंध, नाट्यछटा, नाटक इ. प्रकारआत्निष्ठच म्हणावे लागतील. अपवाद फक्त चरित्र-ग्रंथ, प्रवासवर्णन, इतिहास-आधारित लेखन इ. प्रकारांचा होईल.

गझल ही आत्मनिष्ठ असते, असे आपण मान्य केल्यानंतर आता समाजनिष्ठ या शब्दाकडे वळू. 'समाजनिष्ठता' याचा मी लावलेला अर्थ असा—समाजाच्या सर्वांगीण (भौतिक व आध्यात्मिक इ.) उत्कर्षाची चिंता वाहणारी, समाजाचे भले चिंतणारी, समाजाकडून आदर्शत्वाची इच्छाधरणारी व समाजाला आदर्शत्वाकडे जाण्याची दिशा दाखवणारी कविता

(किंवा इतर साहित्यप्रकार) म्हणजे समाजनिष्ठ कविता. त्याचबरोबर दुसरीही बाजू आहे. जेव्हा कवी आदर्श समाजाची स्वप्ने पाहतोतेव्हा वास्तव समाजात त्याच्या स्वप्नांना तडे जातांना त्याला दिसतात.मग तो अस्वस्थ होतो.समाजात त्याला जी विसंगती आढलते त्यामुळे त्याचे मन ढवळून निघते. अशावेळी तो समाजाला आपल्या लेखणीद्वारे फटकारतो ; समाजाला जागृत करण्याचा त्याच्या पातळीवर अगदी छोटासा प्रयत्न करतो, ही देखील समाजनिष्ठताच आहे. तसे शेर/कविता लिहिणे हे समाजनिष्ठतेचेच द्योतक आहे. असे शेर गझलेमध्ये जागोजागी आढळतात. हा गझलेचा गुणच आहे. मुसलसल सामाजिक गझलाही कमी नाहीत.

हे शेर पाहा---

अंधारी या सत्य आजचे रडते आहे

खोटे आता कळसावर झगमगते आहे!...

जागे व्हा देवांनो तुमचा स्वर्ग वाचवा

नीती आता पृथ्वीवरती जळते आहे... राजा मिसर

समाजातील सत्य-असत्याला मिळणाऱ्या विसंगत प्रतिष्ठेवर कवीने प्रभावी भाष्य केले आहे. समाजातील नीतीमूल्यांची झालेली घसरण यामुळे कवीच्या मनात निर्माण झालेली चिंता दुसऱ्या शेरात उमटली आहे. कवीच्या गझलवृत्तीचेच हे लक्षण आहे.

देश स्वतंत्र झाला तेव्हा सामान्य माणसाला अत्यानंद झाला व वाटले की ब्रिटिश गेले;आता आपलेच राज्य. त्यामुळे आपण सुखी होणार.समृद्धी येणार. चिंता दूर होणार....पण

ओठी जरी कधीचे स्वातंत्र्यगान आहे

माझ्या महान देशा, मी बंदिवान आहे....

होतो तिथेच आम्ही आहोत थांबलेलो

तूर्तास चालण्याची चर्चाच छान आहे...म. भा. चव्हाण

आता हे सुरेश भट यांचे शेर----

हा समाजाचा तमाशा! खेळ जातींचा

खेळती सारे मदारी पाच वर्षांनी...

भाकरीचा प्रश्न आता राहिला नाही

लोक हो, घेऊ न्यहारी पाच वर्षांनी.....सुरेश भट

समाजातील विषमता व विसंगतीमुळे आलेली कवीची अस्वस्थताच यातून स्पष्ट होत नाही काय?

पूर्वीचे राज्य-कवी य.दि. पेंढरकर ऊर्फ कवि यशवंत लिहितात,

या मुलांनो, कन्यकांनो, विक्रमा क्रीडांगणी

झोपडी प्रासद ही...या कुंपणे ओलांडुनी....

दुसऱ्या एका ठिकाणी ते लिहितात,

जगीं या द्वेष-दंभाचा तमाशा माजला सारा

मुलामा मान्यता पावे गुणाला लाभते कारा...यशवंत

समाजातील ढोंगी प्रवृत्ती व जातीय तफावत यावर झौपडी व प्रासाद ही प्रतीके वापरून यशवंत यांनी बोट ठेवले आहे. वरवर दिसणाऱ्या झकपकीला (मुलामा) समाज मान्यता देतो पण गुणवंताची उपेक्षा होते ही खंत त्यांनी व्यक्त केली आहे.

समाजात दिसणारी विषमता ही आर्थिक, शैक्षणिक असेल किंवा कुठलीही असेल; विषमता ही समाजाचे स्वास्थ.य बिघडवून टाकते. पण सर्वात वाईट कोणती असेल तर ती जातीय विषमता! या विषमतेमुळे प्रसंगी देशाचे अस्तित्वही धोक्यात येऊ शकते. ही विषमता कवीच्या काळजाला घरे पाडते. जुने-नवे सर्वच कवी यामुळे व्यथित झालेले दिसतात.

शेवटी वेदमंत्रांनी अन्याय एवढा केला

मशहूर ज्ञानिया झाला..गोठ्यातच मेला हेला...सुरेश भट

पुढील मुक्तकही त्याचबद्दल बोलत आहे---

ज्ञानदेवाला कसे हे ज्ञात नाही

कोणताही वेद रेडा गात नाही

जानवे घालू नका हो विठ्ठलाला

त्या बिचाऱ्याला स्वतःची जात नाही.....म.भा. चव्हाण

धार्मिक विषमता हाही <u>मनुष्यजातीला</u> झालेला महारोग आहे. मानव ही एकच जात व प्रेम हा एकच धर्म असे एकीकरण झाले तर? तो सोन्याचा दिवस उगवावा असे प्रत्येक कवीला अंतर्मनात वाटत असते; असे मला तरी वाटते. हे कवी तोच भाव कसा व्यक्त करतात पाहा—

निराळे असे आज काही घडावे

दुपारी नको, ऊन रात्री पडावे!....

सुशोभीत क्रूसावरी शंख तारा

असे शिल्प कोठेतरी सापडावे....घनःश्याम धेंडे

समाजातील अंधार एकतेच्या स्वच्छ प्रकाशाने उजळून जावा. हा अंधार कशाचा?तर धार्मिक तेढ, भेदाभेद यांचा! एका क्रूसावरच शंख, चॉंदताऱ्यातील तारा असे कोरलेले शिल्प सापडले तर तिन्ही धर्मांचा समाज एक होऊन जाईल असा आशावाद कवीच्या मनात आहे! निदान पूर्वी ही एकता अस्तित्वात होती एवढं तरी माणसाला कळेल व तो विचारप्रवृत्त तरी होईल.

विषमतेतवरच्या स्थानावर आहे ती म्हणजे स्त्री-पुरुष विषमता. धर्म-जात कुठलीही असो, ह्या विषमतेचं वर्चस्व सगळीकडे आहे. एकीकडे स्त्रीला मातृदेवता,देवी, संस्कृती-संरक्षक वगैरे म्हणायचं व समाजात तिला दुय्यम स्थानावर ठेवायचं हे चित्र सगळीकडेच दिसतं. याहूनही वाईट म्हणजे स्त्रीला उपभोग्य वस्तू मानायचं हा तर पुरुषप्रधाम समाजाच्या अधोगतीचा कळसच म्हणावा लागेल. (येथेही विरोध-उपरोध साधला आहे.)

स्त्रीची ही व्यथा व्यक्त करणारे शेर पाहा—

स्त्री-जन्माची नवी कहाणी जुना परन्तू साचा

एका बाजुस असे बोहले, दुसऱ्या बाजुस खाई...

उसंत नाही कुरवाळाया पाठीवरचे वळही

कच्ची-बच्ची तुझी भुकेली, आता सावर बाई!...

हे आणखी शेर पाहा---

शीड-सुकाणू नसलेले मी गलबत बाई

जीवन म्हणजे तारेवरची कसरत बाई....

असले कसले जगणे अमुचे समजत नाही

जळायचे अन. राख व्हायचे धुमसत बाई....इलाही जमादार

विषमतेने दुभंगलेल्या समाजापुढे असलेले हे पहाडासारखे प्रश्न तर शेरांमध्ये अधोरेखित केलेले दिसतातच ; पण नवनव्या परिस्थितीत ऐरणीवर येणाऱ्या नव्या प्रश्नांची दखलही गझलेने घेतलेली दिसते.

गळी शैशवाचा भुकेचेच ओझे

झुके ते अकाली, कुणा काय त्याचे!

या शेरात बालमजूरांकडे निर्देश केला आहे.पुढील शेरात वृद्धांच्या कंटाळवाण्या व उपेक्षित जगण्याच्या प्रश्नावर तोडगा सुचविला आहे.

जगणाऱ्यांना हक्क हवा इच्छामरणाचा

सुरू करा ही नवीन चळवळ, माझ्यानंतर...घनःश्याम धेंडे

राजकारण हा एक स्वतंत्र विषय आहे ; आणि राजकारणी लोक ही एक ‘वेगळी जमात’ आहे. सामान्य माणसांच्या (म्हणून कवींच्याही) तो टीकेचा विषय आहे. काही राजकारणी सन्माननीय अपवाद असतीलही. पण राजकारण व नेते यांच्यावर भाष्य करणारे भरपूर शेर आढळतात.

त्यांची महान तत्त्वे, होती क्षणात खोटी

स्वर्थासमोर साध्या चळतात लोक येथे...अविनाश ओगले

मागे कुणी न त्याच्या, तो ओरडे तरीही

माझाच योग्य रस्ता! माझाच योग्य रस्ता!!....व्यंकट देशमुख

चंद्र आम्ही, सूर्य आम्ही!
काजवे करतात दावे...किशोर बळी

कोणती खांद्यावरी घेऊ पताका
आजही अंदाज नाही माणसांचा!....सुलभा कामत

नशीब त्यांचे बलवत्तर केले खुर्चीने
तुझेच देशा, भाग्य कुठे वणवणते आहे?...राजा मिसर

राजकारण्यांचे अनुभव उद्विग्न करणारे असले तरी सामान्य माणसांचे आपापसातील येणारे अनुभवही सुखद नाहीतच. सर्वांनाच बरेचदा कटु अनुभवातून जावे लागते.त्याचे पडसादही शेरामध्ये उमटतात.

प्रत्येक भेटलेला माणूस संत नसतो
कळते मला तरीही मी नेहमीच फसतो...डॉ. इक्बाल शेख मिन्ने

सुरेश भट यांचे अनेक शेर असे आहेत की जे प्रथमपुरुषी आहेत (ज्यांच्यात ‘मी’ येतो, असे शेर ) पण तरीही त्यांचा आशय सामाजिक आहे.

सभ्य वस्तीत या पाप झाले जिणे
बोलता मी खरे लोक कटले कसे?

पाहिले दुःख मी तुझे जेव्हा
दुःख माझे लहानसे झाले...

मी रंग पाहिला त्या मुर्दाड मैफलीचा

कुठल्याच काळजाचा ठोका जिवंत नाही...

गझलेमधील 'मी' हा व्यक्तिपर नसतो ;तो सर्वव्यापी असतो असे भट यांनी म्हणून ठेवले आहे.

आपण पुन्हा मूळ विषयाकडे येऊ. 'मराठी गझल आत्मनिष्ठतेकडून समाजनिष्ठतेकडे.....' एवढाच वाक्यांश विषय म्हणून दिला आहे.त्यापुढे टिंबे मी दिलेल आहेत. ती छापणै राहूनगेले असावे. आता, हा वाक्यांश प्रत्येकजण आपापल्या इच्छेने किंवा सोयीने पूर्ण करेल. उदा....जाते आहे ;.....जायला पाहिजे ;.......गेलीच आहे ; किंवा......जाऊ शकेल की नाही? ;.......जाणे अशक्य आहे ;इ. आणखीही पर्याय असू शकतील. पण याची अधिक चिकित्सा न करताआणि कीस न पाडता मी असे म्हणेन की, मराठी गझल आत्मनिष्ठेमधून समाजनिष्ठतेकडे निर्देश करत आहे. मी जुन्या कवींपासून आजच्या कवींपर्यंतच्या कवींचे शेर उद्धृत केले आहेत, त्यावरून हे स्पष्ट होते की गझल समाजनिष्ठही आहेच. सामाजिक आशय काहीवेळा प्रत्यक्ष असेल, काहीवेळाअप्रत्यक्ष. तुमचे लेखन जितके अधिकाधिक व्यक्तिगत होत जाईल तितके ते जास्तीतजास्त सर्वव्यापी होत जाते. म्हणून गझल ही आत्मनिष्ठतर आहेच पण समाजनिष्ठही आहेच.

उर्दूमधून येतांना तिचे 'प्रेम-स्वरूप' आपल्याला त्यावेळी अधिक भावले असेल; पण 'प्रेम हा माणसाच्या मनाचा एक पैलू झाला. मन कितीही सूक्ष्म मानले तरी त्याला अनेक पैलू आहेत. अनेक भावनांचे तरंग त्यात उठत असतात ; आणि काव्य हा 'भावनांचा उद्रेक' – 'overflow of emotions'- असे म्हटले जाते. त्याचमुळै माणसाच्या मनाच्या कुठल्याही भावलहरी गझलेत-शेरात सामावू शकतात. शेवटी व्यक्ती व समष्टी एकमेकांमुळेच आहेत. त्यामुळे आत्मविष्ठता ही समाजनिष्ठतेपासून वेगळी काढताच येत नाही. व्यक्ती जे अनुभवते ते समाजानेच दिलेले अनुभव असतात, ना? साहिर ने म्हटले आहे,

दुनिया ने तजुर्बात-ओ-हवादिस की शक्ल में

जो कुछ मुझे दिया वही लौटा रहा हूं मैं....

समाज हा काळानुसार बदलत जातो, त्याचा परिणाम व्यक्तिवर होतो तसाच त्याच्या अभिव्यक्तीवरही होतोच. हिंदी कवी व गझलकार नंदलाल पाठक यांनी एका शेरात म्हटले आहे,

अनसुनी कैसे गजल करती जमाने की पुकार

चोट है डंके की अब, पहले थी शहनाई गजल....

पूर्वी गझल ही शहनाई प्रमाणे 'मंजूळ स्वर'च काघत असेल पण आज ती नगाऱ्यावर मारलेल्या काठीच्या आवाजाप्रमाणे आहे. 'मेहबूबा से या मेहबूबा के बारेमें बात करना' एवढेच नाजूक साजूक विषयात आता गझल अडकून पडलेली नाही ; तर समाजाचं दुःख, समस्या, दोष ती आता जाहीरपणे (दवंडी पिटवावी तशा पद्धतीने-डंके की चोट) ठासून सांगत आहे. कारण गझल ही आपले पहिले गुण सांभाळूनही समाजाचाच आवाज आहे. मा. सुरेश भट म्हणतात,

राहिलो मी कुठे कवी आता?

ही जगाचीच वैखरी आहे!

शेवटी एक मुद्दा स्पष्ट करावासा वाटतो. गझल समाजनिष्ठ आहे; ती समाजाला फटकारण्याचे काम करेल; विषमता व विसंगतीबर बोट ठेवेल; पण समाज सुधारण्याची, परिवर्तन वा क्रांती घडविण्याची जबाबदारी तिची नाही. ते काम समाजाने विचारमंथनातूनच करायचे आहे. गझल उद्युक्त करू शकते ; कृती समाजाकडूनच व्हायला हवी.

समाजनिष्ठ शेर लिहिण्याकडे हल्ली कवींचा कल वाढत आहे; मंचावरून सादरीकरणात असे शेर उचलून धरले जातात. ते चांगलेच आहे. मात्र गझलची तरलता हरवत तर नाही ना, याविषयी कवीने सावध रहायला हवे.

शेवटी आयोजकांचे आभार मानून मी माझे जरा लांबलेले भाषण संपवते.

संगीता जोशी

(पाचवे गझल संमेलन )

# मराठी गझल—एक चिंतन

मराठी गझल!..ती कशी आली, कुठूनआली, केव्हा आली, ती लाट होऊन आली का? ; मग त्यानंतर ओसरली का? असे एक ना अनेक प्रश्न विचारून झाले आणि त्यांची उत्तरेही शोधली गेली..नव्हे, शोधण्याचा प्रयत्न झाला, असे म्हणू या. काहींनी तिच्यावर राग धरला, काहींनी अनास्था दाखविली; पण त्यापेक्षा अनेकपटीत असलेल्या 'काहींनी' -रसिकांनी- तिचं स्वागतच केलं. इतकंच काय, तिच्यावर मोहित होऊन प्रेम केलं. ती आली तिनं जिंकलं हे खुल्या दिलानं त्यांनी मान्य केलं. रसिकांच्या अशा उत्स्फूर्त मान्यतेमुळे वैचारिक व्यासपीठांनाही तिची दखल घ्यावी लागली आणि गझल 'ती किंवा 'तो' असल्या क्षुल्लक वादापलीकडे होऊन तिचाविचार करण्यावाचून पर्याय उरला नाही.मग 'गझल' या विषयावर तज्ज्ञांच्या उपस्थितीत सभा झाली. फर्ग्युसन कॉलेजमधील 'आविष्कार' या कार्यक्रमात. यावेळी पुण्यातील सर्व कॉलेजेस मधील मराठीचे विभागप्रमुख हजर होते. मी स्वतः, दीपक करंदीकर, अनिल कांबळे, प्रदीप निफाडकर असे आम्ही गझलकार येणाऱ्या प्रश्नांना उत्तरे देत होतो. ही सभा बोलावणारे निमंत्रक होते मसाप चे त्यावेळचे कार्याध्यक्ष मा. गं.ना. जोगळेकर. यात उलट-सुलट विचार मांडले गेले; नंतर गझलांचे विशेषांक निघाले; प्रतिष्ठित व्यासपीठावर 'गझल कवितेवर आक्रमण करीत आहे का?' अशा विषयांवर परिसंवादही घडविले गेले. या सर्व गोष्टींमधून एकच सिद्ध झालं की मराठी गझल ही दुर्लक्षिण्याजोगी बाब नव्हती; तिची दखल घेणं अत्यावश्यक होतं! हे साहित्यक्षेत्राला कळलं होतं.

आज मराठी गझलेनं साहित्यक्षेत्रात नक्कीच एक पक्कं स्था मिळविलं आहे. आज त्याबद्दल संशोधन होऊन त्याचे शोध-निबंध प्रकाशित झाले आहेत व इतरही विपुल साहित्य उपलब्ध आहे. प्रकाशित सलेलं सर्वच साहित्य परिपूर्ण आहे असं म्हणता येणार नाही. त्यातही त्रुटी आढळतात.पण त्या यानंतरच्या काळात लिहिल्या जाणाऱ्या लेखनात दूर होऊ शकतात. असं वाटण्यामागे महत्त्वाचं कारण म्हणजे मराठी गझल ही आत्ता कोठे रुजते आहे. अजून ती वाढायची आहे, फोफावायची आहे. तिचं 'Making' आ8 कोठे सुरू झालं आहे.

कविवर्य माधव ज्यूलियनांनी गझल हा प्रकार मराठीत आणला हे आपण जाणतोच. आणखीही मागे जाऊन पाहिलं पाहिजे असं काहींचं मत आहे. ते असो. पण आजची मराठी तंत्रशुद्ध व आशयघन गझल हे कविवर्य सुरेश भट यांचं श्रेय आहे, हे निर्विवाद. त्यांच्या गझलांना मिळालेली अफाट लोकप्रियता पाहिल्यावर गझलेची ताकद कळू शकते. जिवंतपणा, चैतन्य, उत्कटता आणि सगळयात महत्त्वाची सहजता हे त्यांच्या गझलांचे विशेष आहेत.

या गुणांनी आकर्षीले गेल्यामुळे, व भटांच्या गझलेच्या प्रेमात पडल्यामुळे अनेक कवींनी हा प्रकार हाताळून पाहण्याचा प्रयत्न केला; आणि तेथूनच 'लाटे' ला ससुरुवात झाली. मनावर जेव्हा एखाद्या गोष्टीचा खोलवर ठसा उमटतो तेव्हा स्वतःच्या अभिव्यक्तीतही त्याच्या खुणा थोड्याफार उमटतात. यात फारसं आक्षेपार्ह असं काही नाही. कवीच्या 'घडण्यामधील' ती एक पायरी असते. कविवर्य पाडगावकरांच्या सुरवातीच्या काळात त्यांच्या कवितेवर माननीय कुसुमाग्रजांची छाप होती असं वा.ल. कुलकर्णी यांनी यांनी त्यावेळी लिहिलं होतं. त्यातूनच पुढे पाडगावकरांना स्वतःची अभिव्यक्ती साध्य झाली. ( संदर्भ-प्रस्तावना-'जिप्सी'(. भट यांच्या गझलेचं अनुकरण करणाऱ्यांपैकी ज्यांच्यामध्ये खरं काव्यबीज होतं तेवढेच आज टिकून आहेत; बाकीचे नामशेष झाले. गझलेची 'लाट' त्याअर्थानं ओसरली असं आज म्हणता येईल. त्या लाटेनं पाला-पाचोळा आणि हलकं-सलकं सारं किनाऱ्यावर लोटून दिलं. झालं ते चांगलंच झालं.आज गझलेचास्वच्छ प्रवाह विकसित होत आहे, रुंदावत आहे.

उर्दू गझल म्हटली की तिचे प्रेम-विरह, मीलन, स्त्री-सौदर्य इ. विषय डोळयांसमोर येतात.मराठी गझलेतही हे विषय येऊ शकतात, आले आहेत. सुरेश भटांचा एक शेर मीलन कसे सूचित करतो पाहू या—

तुझ्या तारुण्यवर्खाची अशी काही मजा आली

विडाही रंगला होता दिवाही लाजला होता..

त्यांचा आणखी एक शेर—

आता उजाडतांना माझा निरोप घे तू

सांगू नये फुलांना भलतेच या दवांनी..

सौंदर्य हा विषय एका आगळया ढंगानं मांडणारा त्यांचा हा अप्रतिम शेर पाहा—

ही कहाणी तुझ्याच नाण्याची

तापलेल्या अधीर पाण्याची..

ही उदाहरणे बोलकी आहेत व मराठी गझलेची भूषणे आहेत!

गझलेला कुठलेही विषय वर्ज्य नाहीत. दुःख, वेदना, व्यथा हे जरी मराठी गझलेचे स्थायीभाव असले तरी राजकारण, समाजकारण, सद्यःस्थिती, जीवनातील विसंगती, मानवी स्वभावाचे पैलू इ. अनेक विषय त्यात येऊ शकतात.व आलेले आहेत. सुरेश भट यांच्या व्यतिरिक्त इतर काही ज्येष्ठ कवींनीही क्वचित गझल लिहिलेल्या आढळतात. अशी ही काही उदाहरणे—

'तू आत्मसंतुष्ट राहून संकुचित राहिलास तर संपशील' अशा सुंदर अर्थाचा हा शेर—

नेम ना लागेल केव्हा तुष्टतेची वाळवी

वाळण्या ती या जगाचे दुःख तू लावून घे..बा.भ. बोरकर

जगाचे दुःख आपलेसे केल्याशिवाय आपल्याला जगता येणारच नाही; नव्हे तसे करणे हा गुन्हाच आहे. स्वतःच्या दुःखाबद्दल सांगतांना कवी संजीव लिहितात—

दुःखास सुखाची संज्ञा देवुनिया मीही फसलो

तात्पर्य समजले आता सौख्यातच धोका आहे..संजीव

मनातील उत्कट भावाशय थोडक्यात परन्तु प्रभावीपणे व्यक्त करण्यासाठी द्विपदीची रचना कवींना सोयीची वायत असावी. म्हणूनच खंत व्यक्त करतांना किंवाविसंवादाची बोच प्रकट करतांना आपोआपच शेर लिहिला जात असावा.

चालतो मी सारखा, ह्या चालण्याला अंत नाही

चाललो कोठे, कशाला हीहि आता खंत नाही..कुसुमाग्रज

आलो इथे कशाला माझे मला कळेना

या बेगडी जगाशी हा सूरही जुळेना.. मंगेश पाडगावकर

त्यांचाच आखखी एक शेर—

ते म्हणाले चेहरे चुकवीत होतो

मी खरे तर आसवे लपवीत होतो..मंगेश पाडगावकर

असे शेर ऐकल्यावर कोणता रसिक 'वाऽ' म्हणणार नाही?

गझलेचं सामर्थ्य हे शेराच्या उत्कटपणात आणि कमीत कमी शब्दात अधिकाधिक अर्थ सामावण्याच्या स्वभावात आहे. अर्थात् कवीच्या ताकदीवरच ते अवलंबून आहे. दोन ओळीतच काय तो परिणाम साधायचा आहे; पाल्हाळाला अजिबात वाव नाही. त्यामुळेच गझल श्रोत्यांमध्ये लोकप्रिय होत असावी. लांबलचक कवितेच्या ओळी ऐकून शेवटी परमोच्च बिंदू (क्लायमॅक्स) येणार, एवढा धीर श्रोत्यांना नसतो. आजकाल जीवनालाच एक वेग प्राप्त झाला आहे.पाच दिवसांच्या टेस्ट-मॅच ऐवजी हल्ली 'वन-डे' क्रिकेट जास्त लोकप्रिय आहे. फास्ट-मूड,फास्ट-फूड चा जमाना आला आहे.तेही एक थोडंसं सपक कारण गझलेच्या लोकप्रियतेमागे असं शकतं. असेलच, असं मी म्हणणार नाही.

आत्मभान आलेल्या स्त्रीच्या आजच्या सामाजिक बंडखोरीच्या स्थितीचं वर्णन करणारा हा शेर—

एकटी स्त्री आजला रस्त्यात आली

कांकणे केलीत काळाच्या हवाली..

तसेच स्त्रीवर होणाऱ्या अत्याचारासंबंधित असलेला हा शेर—

हे नवे फूल पुन्हा का देता

रक्तबंबाळ ऋतूच्या हाती?..

अशा तऱ्हेने विषयांचं वैविध्य गझलेतून दृगोचर होत आहे. पुन्हा सुरेश भट यांचेच काही शेर पाहू..

वृत्तपत्रांचे रकाने वायद्यांनी भरत होते

अन् किड्यामुंग्यांप्रमाणे लोक साधे मरत होते..

भंगलेल्या दैवतांनाघालता माळा कशाला?

हाय, घोटाळयात आता ब्रम्हघोटाळा कशाला?

राजकारणाचं वास्तव चित्रण करून दाद मिळविणारी त्यांची लेखणी जनतेला संयमाचं आवाहनही एका शेरातूनच करते.

भविष्य त्यांना धरून तेव्हा करील इन्साफ या गुन्ह्यांचा

अजून थोडी करू प्रतीक्षा! अजून दाबू उरी निखारे..

आज गझल लोकप्रिय आहे ती तिच्या गुणांमुळे. ती शब्दांचं सामर्थ्य जाणते. शब्दरूपी देहात आशयाचा आत्मा घेऊन येते. असे न झाल्यास तिला 'फसलेली गझल' म्हणायला हरकत नाही. प्रत्येक कवीनं-गझलकारानं-लिहिलेली प्रत्येक गझल अस्सल उतरेलच असे नसते. जे इतर कवितांबाबत, तेच गझलेबाबत. कारण गझल ही प्रथम एक कविता आहे.

गझल ही वृत्तबद्ध, लयबद्ध असते त्यामुळे तिच्यावर कृत्रिमपणाचा आरोप होतो. पण तो तितकासा गंभीरपणे विचार करण्याजोगा नाहीत्र अन्यथा ज्ञानेश्वर-तुकारामांसह सर्व संत कवी व मोरोपंतांपासून ग्रेस पर्यंत सर्व कवींना कृत्रिमतेचा दोष लागायचा! आज मुक्त-स्वातंत्र्याचा पुरस्कार केला जातो. मुक्तछंत लिहिणं एका अर्थानं सोपं असलं तरी मुक्तछंदालाही एक 'छंद' असतो हे किती कवितांमध्ये खऱ्या अर्थाने दिसतं? कमी-जास्त लांबीच्या ओळी पाठोपाठ लिहिल्या तर एखाद्या अग्रलेखाला कविता म्हणता येईल का? म्हणूनच वृत्तात कविता लिहिणं हे काही मागासलेपणाचं लक्षण म्हणता येणार नाही. ज्या कवींना वृत्तात लिहिणं जमत नाही, असेच कवी वृत्तबद्ध कवितांना नाके मुरडतात.

शब्दांची 'ठाकठोक' करून शेर लिहिण्याची खटपट करावी लागते असाही आरोप केला जातो. पण 'खऱ्या' गझलकाराच्या बाबतीत हे 'खरं' नाही. कदाचित् लेखनाच्या सुरवातीच्या काळात असा प्रयास पडत असेलही. पण वृत्त व लय अंगवळणी पडल्यावर तसे होत नाही. आरोप करणाऱ्यांना हे पटेल का? पटवून घ्यावं लागेल.

कुठलेच फूल आता मजला पसंत नाही

कळते मला अरे हा माझा वसंत नाही..

या ओळींच्या पाठोपाठ 'कुठल्याच काळजाचा ठोका जिवंत नाही' अशी ओळ अगदी सहजही सुचू शकते. भट यांना ती सुचली आहे!!

मराठी गझलेत, उर्दू गझलेप्रमाणे रूढ संकेत आहेत काय? असले तर कुठले? असाही प्रश्न केला जातो; जसे उर्दूत शमा-परवाना, बुलबुल-सय्याद, बुलबुल-चमन, साकी-मयखाना..इ. संकेत रूढ आहेत.

संकेत म्हणजे त्याच त्याच प्रतिमा वर्षानुवर्षे वेगवेगळ्या कवींच्या काव्यातून गुंफल्या जाणं! मात्र संकेतांना 'तोचतोचपणा' म्हणता येणार नाही. कारण तीच प्रतिमा तीच प्रतिमा एखादा कवी इतरांपेक्षा कशी वेगळेपणानं मांडत आहे, यावरच त्या प्रतिमेचं सौंदर्य ठरेल.

फूल व काटे या प्रतिमा वापरून केलेला एक कतआ व काही कवींचे मराठी शेर पाहा—

गुलचीं ने तो कोशिश कर डाली(फुले तोडणारा)

सूनी हो चमन की हर डाली

कांटों ने मुबारक काम किया

फूलों की हिफाजत कर बैठे..

माझ्याविना फुलांची दिंडी निघून गेली

काटाच प्यार आता जो मोहरून गेला..

गाव ज्याचे वसे कंटकांच्या वनी

वाट त्याने फुलांना विचारू नये..

पाहतो जेथे तिथे काटेच काटे

राहिली आता कुठे वस्ती फुलांची?..

ऊन-सावली, उन्हे-चंद्र, आरसा-चेहरा हे व असे आणकी काही संकेत गझलेत रूढ होत आहेत, असे म्हणावयास हरकत नाही. साकी-मयखाना प्रकारचे संकेत मराठी येण्याची फारशी शक्यता नाही

कारण ही गझल अस्सल मराठी मातीचा सुगंध असलेली गझल आहे. ती उर्दू-पर्शीयन मधून आलेली असली तरी मराठी संस्कृतीत वाढत आहे.

सुरेश भट लिहितात,

कुण्याही चंद्रभागेचा किनारा प्यार आम्हाला

तिथे नाचे विठू झेंडा जिथे हा रोवतो आम्ही..

माधव ज्यूलियनांनी लिहिले आहे---

भासे सुरई जरी इराणी

आहे पण ही इरा मराठी..(इरा-पेय)

मराठी गझलेचा विचार करतांना आणखी एक शेवटचा व महत्त्वाचा मुद्दा मांडावासा वाटतो. गझल हा आत्मलक्षी काव्यप्रकार आहे याचा अर्थ असा नव्हे की प्रत्येक शेरात 'मी' आला पाहिजे.सं म्हणू या की अनुभवांचा जो एक 'धक्का' (इम्पॅक्ट) कवी अनुभवतो, तो शेरात अशा रीतीनं व्यक्त व्हावा की वाचणाऱ्याला तो स्वतःचा अनुभव वाटला पाहिजे; जवळचा वाटला पाहिजे. इंग्रजीत म्हटलं जातं की, 'When you write more and more personal, it becomes more and more universal.'

यापुढे जाऊन म्हणता येईल कध जे 'पर्सनल' म्हणून व्यक्त होतं तेही बेमालूमपणे 'इमपर्सनल' असलं पाहिजे. असं असेल तर तो शेर उत्तम शेर ठरेल. भट यांच्या गझलेत जागोजागी असे शेर सापडतात. उदाहरणार्थ—

गेलेल्या दिवसांची याद नको

तो फसव्या स्वप्नांचा नाद नको..

किंवा—

दिशा गातात गीते श्रावणाची

कुणाला याद तान्हेल्या तृणाची..

अरे मी जाळले तारुण्य माझे

अता ही कौतुके साधेपणाची..

याउलट,

कसे खोटे निघाले आपलेही

शिव्या आता कुणाला हासडू मी?

भट यांचेच शेर जे उत्कृष्ट आत्तापर्यंत या लेखात तुम्ही वाचलेत त्या शेरांची उची हा शेर गाठूच शकत नाही. हा शेर गझलचा नव्हे , तर हझल मध्ये शोभेल.

जिची परंपरा आजही टिकून आहे अशा उर्दू गझलेला चारशेपेक्षा जास्त वर्षे होऊन गेली आहेत. मराठी गझलचा विचार पुनर्विचार तर गेल्या पंचवीस-तीस वर्षांपासून अधिक सुरू झाला आहे. या काळात अनेक कवींनी गझल हा प्रकार ‘हाताळून’ पाहिला. त्यातले सर्वच कवी टिकून राहणं शक्यच नव्हतं. पण जे कोणी ‘चांगली गझल’ लिहीत आहेत, त्यांच्यामुळेच म्हणावंसं वाटतं की मराठी गझल समृद्धतेकडे वाटचाल करीत आहे. ‘ऐन तारुण्यात’असलेल्या मराठी गझलेचा भविष्यकाल उज्वल आहे, हे निःसंशय!

--- संगीता जोशी

(अवनी 1998 दिवाळी अंकासाठी)

# स्त्री-गझलकारांचे भावविश्व....

------- संगीता जोशी

गझल ही एक अशी काव्यविधा आहे की जी इतर कवितांच्या मानाने उजवी ठरते.याचे एक कारण तिच्या अंगी असलेली गेयता व लय.गझलेत प्रत्येक शेर एक स्वतंत्र कविता असल्यामुळे,कवीवर जास्त जबाबदारी पडते.केवळ दोन ओळीत एक परिपूर्ण विचार मांडण्यासाठी लागणारे तांत्रिक ज्ञान,जसे शब्दसामर्थ्य,वृत्तांची जाण लयीचं भान ह्याखेरीज, अंगभूत असलेली उत्स्फूर्तता, प्रतिभेची कुवत, अनुभव टिपण्याची संवेदनशीलता, विचार व चिंतन हे गुणही कवीजवळ असावे लागतात. याशिवाय काही स्वभाव-वैशिष्ट्येही महत्त्वाची आहेत. उदा.अन्याय-अत्त्याचाराविरुध्द मनात असलेली चीड;समाजात होत असलेली नीतिमूल्यांची घसरण पाहून, वाटणारी चिंता; समाजातील उपेक्षितांबद्दल आस्था; प्रामाणिकपणा, गुणांची कदर, सत्-प्रवृत्ती, इतरांच्या दुःखाबद्दलची सहवेदना; स्वतःच्या पराभवाचाही उत्सव (बर्बादियोंका जश्न) करण्याची मनाची जिद्द, इ. सत्-गुणांचा वास त्या कवीच्या ठायी असला पाहिजे. मनाची अशी वृत्ती-हीच गझल वृत्ती- असेल तर ती व्यक्ती म्हणजे तो कवी गझल सहज लिहू शकेल. गझलकडे मनाचा स्वाभाविक कल असायला पाहिजे. ओढून ताणून हे लिखाण जमत नाही.

जे कवी गझल लिहितात, जे यशस्वी गझलकार आहेत; त्यांच्या अंगी यातील बऱ्याच गुणांचा समुच्चय असतो, म्हणूनच ते गझल लिहू शकतात; मग ती स्त्री असो वा पुरुष!यामुळेच ज्या कवयित्रींच्या अंगी वरीलपैकी अधिकांश क्षमता असतात,त्या प्रभावी गझल लिहितील यात काहीच शंका नाही. आज स्त्री-गझलकारांची संख्या, पुरुष-गझलकारांच्या मानाने कमी असली तरी, लक्षणीय आहे, ती त्यांच्या क्षमतांमुळेच. आज स्त्रियांच्या क्षमतांच्या कक्षा रुंदावत आहेत त्याचेच हे द्योतक आहे. त्यांच्या भावविश्वात थोडे डोकावू या. ( जास्त शेरांमधूनच ते उलगडेल.)

पूर्वी स्त्रीचे विश्व हे उंबरठ्याच्या मर्यादेपर्यंतच होते. एकत्र कुटुंब, नवरा,चूल-मूल इतकेच! जसजसे स्त्रियांना शिक्षण मिळू लागले,तसतसे त्यांचे निद्रिस्त (dormant) मन जागृत होऊ लागले.आजूबाजूच्या जगाचा अनुभव घेऊ लागले. याचे श्रेय अर्थात् सावित्रीबाई व महात्मा फुले, म.गो.रानडे, महर्षि कर्वे इत्यादि समाजधुरिणांकडे जाते. मात्र,आपल्या अनुभवांची अभिव्यक्ती स्त्रियांनी करावी यासाठी मधे बराच काळ जावा लागला.प्रथम गद्य-लेखिका, नंतर कवयित्री असा

प्रवास झाला.संत जनाबाई.... बहिणाबाई चौधरी...मनोरमाबाई रानडे, (रविकिरण मंडळाची सभा यांच्या घरी भरत असे ) पुढे संजीवनी मराठे,...पद्मा.. इंदिरा संत... असा बराच प्रवास आहे. यात फारसे खोलात जाण्याइतका वेळ नाही. यांचा उल्लेख अशासाठी की, सर्व काळात कवयित्रींची संख्या कवींच्या तुलनेत कमीच होती. आजही तेच चित्र आहे. मी आकडेवारीवरून सांगत आहे की आज स्त्री-गझलकार पुरुषांच्या केवळ 15.5 टक्के आहेत! मुशायऱ्यात मंच्यावरही आपल्याला हे दिसून येतेच.पण ही स्थिती सुधारतांना दिसत आहे, ही सुखद गोष्ट आहे. आज कवयित्रींच्या भावविश्वात डोकावून पाहिलं, तर खूप आशादायक चित्र पाहायला मिळतं.अर्थात् स्त्रीसुलभ भावना ,प्रेम व स्त्रीवादी विचारांचं प्रतिबिंब त्यांच्या गझलांमधून दिसतंच आणि ते स्वाभाविकच आहे. कारण काळ पुढे गेला तरी समाजाची मानसिकता फार काही बदललेली नाही. काही शेर वाचून आपण पुढे जाऊ.

**गळा दोर काळा, मणी सोनियाचे ।**

**मला नाचवाया, उभे हे मदारी ।।**

----प्राजक्ता (प्राजू)पटवर्धन

तरुण कवयित्री प्राजू हे लिहीत आहे.अशा आजच्या तरुणीही कौटुंबिक ताण-तणावाला सामोऱ्या जात आहेत. तिचाच आणखी हा शेर पाहा,

**सांत्वनाही नको, चुचकारही नको ।**

**जा, चढव ना मना तू सुखाचा झगा ।।**

अशा प्रकारे तिला दुःख झग्याआड लपवावे लागते.

आशा पांडे यांचा हा शेर—

**सजवून देह माझा, सौभाग्यदान झाले ।**

**तोही बळीप्रथेचा, उपचार एक होता ।।**

सौभाग्य मिळणं, लग्न होणं हे जणू बळी जाण्यासारखं स्त्रियांना वाटत आहे.पुढचा शेर पाहा,

**तऱ्हा काय वर्णू तुझ्या बोलण्याची ।**

**सुरी दोन धारी रुते काळजाला ।।.....ललिता बंठिया**

अगदी अलीकडच्या एक गझलकार लिहितात,

**तुला रुचेल तेच मी करायला हवे ।**

**मला वजा करून शून्य व्हायला हवे ।। क्रांति साडेकर**

प्राजू, क्रांती ह्या अलीकडच्या,ललिता बाठिया मधल्या काळातल्या तर आशा पांडे त्याहून मागच्या अशा या तीन कवयित्री भिन्न काळातील आहेत. पण त्यांनी केलेलं स्त्री-चित्रण कुठेतरी सारखं आहे. त्यांचं दुःख सारखं आहे. **याचा विचार खरंतर समाजानं करायचा आहे**. पुरुषांनी करायचा आहे. गझल हे सामाजिक कार्यच पार पाडते आहे असे मला वाटते.

येथे एक खुलासा आवश्यक वाटतो, की कवीने व्यक्त केलेले अनुभव हे वैयक्तिक त्यानेच भोगलेले असतात, **असे नसते.** आजूबाजूच्या समाजातून येणारे अनुभव हेही अनुभव त्याचेच होऊन गेलेले असतात; कारण तो तेवढा संवेदनशील असतो. म्हणून, केवळ कवीच्या कवितांवरून त्याच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल अंदाज बांधणे चूक ठरेल.

पुढे जाऊ या.

मूलतः स्त्री व पुरुष यांच्या स्वभावात नैसर्गिक फरक असतो, हे मान्य असायलाच हवं. प्रेम करणं, तेही समर्पणासह, हे तिचं वैशिष्ट्य. असे काही शेर पाहा---

**आज पावेतो, कशाचा, रंग नाही लागला ।**

**एक भेटीने, तुझ्या या, रंगले रंगात मी ।।--**शोभा तेलंग

प्रेमामध्ये जोडीदाराशी एकरूप होणं हे समर्पणच नाही का? त्यांचाच तुसरा शेर पाहा—

**येवो दुःखे, आपण दोघे, सहजपणे झेलू ।**

**दुःखाने या, मात्र कधी मी, चळणारी नाही ।।--**शोभा तेलंग

सुखदुःखात साथ देण्याचं वचन ही ती मनापासून देते. आपल्या प्रियकराबरोबरचे सुखद क्षणही तिला मोहरून टाकतात, तेही ती शब्दबध्द करते. हे ललिता बाठियांचे दोन शेर...

**नको नको ते, घडतच गेले । नको तिथे मन, जडतच गेले ।।**

**तुझी धिटाई, बघतांना मी । तुला लाजुनी, दडतच गेले ।।**

प्रणयातला स्त्रीसुलभ लज्जा-विभ्रमही या शेरात व्यक्त झाला आहे. स्त्री च्या ‘नाही’ चा अर्थ, खरंच ‘हो’ असा असतो असं या शेरावरून दिसतंय्.

तरुण कवयित्री सुप्रिया जाधव केवळ प्रेमाच्या विचारांनीच खूप सुखावते आहे, ती लिहिते,

**तारुण्य,चुंबन वा मिठी, यातील काहीही नको ।**

**नुसत्या विचारांनी तुझ्या, आरक्त व्हावी शायरी ।।**

अशाच प्रकारचा शेर ललिता बांठियाही लिहितात,

**चुंबने आलिंगने, काही नको प्रेमास ह्या ।**

**नजरभेटीने तुझ्या, होते कधी आरक्त मी ।।**

दोघींनी एकच काफिया वापरला आहे. पण हा केवळ ‘टकराव’ आहे याची मला खात्री आहे.

ममता सिंधुताई सपकाळला तर नजरभेटीचीही आवश्यकता वाटत नाही; नुसती फुलं पाहूनही प्रियकराचा भास होतो, ती लिहिते,

**फुलाफुलात राजसा,तुझेच रूप भासते ।**

**कधी गुलाब केशरी, कधी तळयातले कमळ।।---**ममता

स्त्रीला प्रेम हवं; तेही शाश्वत! कसं ते पाहा---सुप्रिया जाधव म्हणते,

**घडीभराची नकोच संगत,करार व्हावा युगांतरीचा ।**

**तुझ्याच श्वासात श्वास माझा,अता विरावा जराजरासा ।।**

प्रेमाच्या सुखात डुंबलेले शेर कमीच; पण विरह, उपेक्षा अशा प्रेमाने दिलेल्या दानाचं चित्रण खूप शेरात आढळलं. ( पुरुषांनी जरा दखल घ्यावी,...)

प्रेमाचे शेर आणखी लिहिले जावेत, असं वाटतं. कारण तो गझलेचा स्थायीभाव आहे आणि प्रेम ही जगाला बांधून ठेवणारी ऊर्जा आहे.

मी वाचलेल्या कवयित्रींमध्ये प्रेमाच्या इतर पैलूंवर मात्र मला शेर फारसे आढळले नाहीत. उदा. वात्सल्य, ममता, देशप्रेम इ. क्वचित्‌आढळलेले शेर,

**यौवना तू घे भरारी, वेळ आली ।**

**भारताच्या लौकिकाला साधण्याची ।।** --शोभा तेलंग

आपल्या तरुण मुलाला आई परदेशी जाण्यास व तिथे देशाचा लौकिक वाढविण्याचा संदेश देत आहे.

पुढील शेर आणखी उंची लाभलेला असा आहे...प्रेमाचा हा अनोखा पैलू दाखवत आहेत, सुनंदा वैद्य.

**कशीही असो माय माझी धरित्री ।**

**तिची धूळ माझ्या कपाळास आहे ।।.....**सुनंदा वैद्य

स्त्रियांना राजकारणात व समाजकारणात रस नसतो असा सर्वसाधारण समज आता सोडून द्यायला हवा. स्त्री-गझलकारांचे हे शेर पाहा---निदान याचा अर्थ डायग्नोसिस, हे लक्षात घेऊन ऐका,

**निदान जाहले 'मुली', की गर्भपात जाहले ।**

**कळ्या फुलायच्या अधीच कुस्करून टाकले ।।--**सुप्रिया जाधव

मुलींचा गर्भ असताच त्याची वाट लावली जाते, हा सध्याचा ज्वलंत सामाजिक प्रश्न आहे, त्याचं हे प्रतिबिंब.

शेरात मात्रांची थोडी ओढाताण इथे दुर्लक्षित करू या.

हीच कवयित्री म्हणते,

**संस्कारांच्या पारंब्या, छाटून जाळता ।**

**जून घराचे, पोकळ वासे, पडते झाले ।।...**सुप्रिया जाधव

**शुभं करोती,पाढे कोणी, घोकत नाही ।**

**देवघरातिल, दिवे अता, मिणमिणते झाले ।।** ---सुप्रिया जाधव

या शरांमध्ये संस्कारांची घसरण व त्याबद्दलची खंत सुप्रियाने शब्दबध्द केली आहे. संस्कार,नीतीमूल्ये हे सारं लोप पावून माणूस आता फक्त एकाच गोष्टीमागे धावतोय्---

समाजात पैशाला आलेल्या अवास्तव महत्त्वाबद्दल व माणसाला काहीच किंमत उरली नाही याबद्दल शोभा तेलंग असा खेद व्यक्त करतात,---

**माणसाच्या जीवनाला मोल नाही ।**

**नित्य घाई फक्त पैसे मोजण्याची ।।**

सामाजिक भान दाखवणारा हा शेर पाहा. फातिमा मुजावरांचा आहे---

**माया, दया, जिव्हाळा, आनंद प्रेम वाटू ।**

**होणार 'फातिमा' ती, तेव्हा खरी दिवाळी ।।** फातिमा मुजावर

या कवयित्रीला समाजाची नस खरी कळली आहे असे म्हणावेसे वाटते;म्हणूनच तिने रोगावर उपचार सुचवला आहे. प्रेम, करुणा,दया ह्या भावना जगभर वाटता, पसरवता आल्या, तरच जगाचं भलं होणार आहे.

आज मुलगी-गर्भाची जी संभावना केली जाते, तशीच काहीशी स्त्रीचीही केली जाते. दिवसेंदिवस यात वाढ होतेय् ही चिंतेची बाब आहे. शेर बघा----

**साऱ्याच ओळखीच्या दिसतात रोज नजरा ।**

**देहावरी तरी ह्या उरतात रोज नजरा ।।......**प्राजू

**मूर्तीस मंदिराच्या, वसने अनेक उंची ।**

**नारीस नागवे या करतात रोज नजरा ।।.......**प्राजू

अशा अधाशी नजरांचा सामना स्त्रीला सतत करावा लागतो. आणि याहीपेक्षा पुढच्या संकटात जेव्हा स्त्री सापडते, तेव्हा काय घडते हे आपण दिल्लीच्या घटनेच्या वेळी पाहिलेच आहे! त्यावर एक शेर बघा,

**जगी हे, मर्द पण, मर्दानगी, नाहीच कोठे ।**

**बघोनी, एकट्या स्त्रीला, छळाया चार झाले ।।** शोभा तेलंग

शोभा तेलंग यांचा हा शेर (हा शेर ह्या मांडवातल्या पुरुषांना उद्देशून नाही! ) त्या घटनेला चपखल लागू पडतो.

स्त्री वरची ही संकटे दूर होतील, जेव्हा समाज सुजाण,सुसंस्कृत होईल. ते लवकर घडेल असा विश्वास फातिमा मुजावर यांना वाटतो. निदान कौटुंबिक संकटं तरी संपावीत! त्या लिहितात,

**संकटांचा, आज सरला, प्रहर बाई ।**

**भोगलेले, सोसलेले, विसर बाई ।।--**<u>फातिमा मुजावर</u>

**ठेव बाजूला मनातिल न्यूनगंडा ।**

**तू मनापासून आता बहर बाई ।।---**

मग कुटुंबातील दोघांचे नाते कसे असावे? क्रांती साडेकर म्हणते,

**तो माझे, मी त्याचे तारण व्हावे ।**

**मी-तू-पण, त्यागावे, 'आपण' व्हावे ।।....**<u>क्रांती साडेकर</u>

दोघांचाही मी-पणा म्हणजे अहंकार संपला, त्यागला, तरच ते एकमेकांचा सांभाळ करू शकतील. अहंकार असेल तर ते घर 'घर' रहातच नाही. शेर पाहा---

**खिडकीमधली चिमणी उडता उडता म्हणते ।**

**'नुसता इमला म्हणजे घरटे नसते हल्ली ।।** --<u>क्रांती</u>

घराला घर म्हणता येईल, जेव्हा प्रेमाची ऊब दोघांनाही मिळेल तेव्हाच!

शेवटी पुरुष व स्त्री यांनी एकमेकांना पूरक असायला नको का? पुरुषप्रधान समाजात स्त्रीलाच पडते घ्यावे लागते. साधे माणूसकीचे वागणे मिळण्यासाठीहीविनवणी करावी लागते. आशा पांडे लिहितात...

**कळते कुठे तयांना, माणूस मीहि आहे ।**

**छाटून पंख माझे पिंजरा तयार केला ।।.....<u>आशा पांडे</u>**

आजच्या पिढीतील क्रांतीही असेच लिहिते,

**स्वतःस घातली असंख्य कुंपणे।**

**म्हणे रडून, राहिले उडायचे ।।...**<u>**क्रांती साडेकर**</u>

मनीषा नाईक ही गझलकार म्हणते,

**बोलून झाले, काल सगळ्या, बातम्यांवर।**

**बोलू जरासे, आज माझ्या यातनांवर** ।।<u>मनीषा नाईक</u>

तो तिची दखल घेतच नाही; मीडियातल्या बातम्या ऐकतो; पण तिच्या मनाचा आवाज?पण ----

नाती वाचविण्यासाठी स्त्रीला अशी कुंपणे घालून घ्यावी लागत असतील तर तो समाज आरोग्यपूर्ण, स्वस्थ आहे असे मानता येईल का? स्त्रीला माणूस म्हणून समाज केव्हा जगू देणार? आशा पांडे काय सांगतात, पाहा---

**मागेपुढे का असावेस तू रे, ।**

**अस्तित्त्व माझे कळू दे मलाही ।।**

**का झेप घेशी सदा एकट्याने,**

**आकाश माझे मिळू दे मलाही ।।---**आशा पांडे

कसंही जीवन वाट्याला आलं तरी स्त्री तिचा समंजस पणा सोडत नाही कारण तो स्त्रीचा एक अंगभूत गुण आहे. क्रांती म्हणते,

**किनार फाटली, घडी चिरून चालली।**

**जिणे पुन्हा रफू करून घ्यायला हवे** ।।....<u>क्रांती साडेकर</u>

स्त्रीच टाके घालून नाती जोडते.

स्त्री-गझलकार पुराणे, कथा इ. चा यथायोग्य वापर करतांना दिसतात.

**पत्नीस हारती जे कैफात पौरुषाच्या।**

**त्या पाच पांडवांना अधिकार फार झाले ।।....**<u>आशा पांडे</u>

**भ्रष्ट सीता जाहली,ती एक रेषा लांघता ।**

**जानकी मी ह्या युगाची, दशदिशांना रेष आहे ।।---**<u>ललिता बांठिया</u>

ममता ने म्हटले आहे,

**उंब-यावर पेरले काटे घराने ।**

**मोगरा आडून हसतो कुंपणाच्या ।। <u>ममता सिंधुताई</u>**

तिला रेषेच्या आतच राहावं लागतं. एकटीलाच नव्हे, सगळयाच स्त्रियांना.

**ही व्यथा माझी-तुझी नसते कधीही ।**

**ह्या व्यथा लाखो-करोडो काळजाच्या** ।।---<u>ममता</u>

अनेक वेगवेगळी वृत्ते स्त्री–गझलकारांनी वापरली आहेत;जास्त करून ती मात्रावृत्ते आहेत. त्याबाबत आणखी अभ्यास आवश्यक आहे असे मला वाटते.

काही वेगळया विषयांवरील शेर सांगून भाषणाचा समारोप करते.

**हार, फुले अन् पूजा-अर्चा यांची का ही सक्ती ।**

**वरवरच्या या देखाव्याची खरी असे का भक्ती?** ।।--<u>सुनंदा वैद्य</u>

**हातातल्या, रेषेवरी, आयुष्य ठरवावे कसे? ।**

**मृत्यू अचानक गाठतो, भाकीत चुकल्यासारखा** ।। <u>सुप्रिया जाधव</u>

**किती कोळसे पेटले, राख झाले ।**

**चमकत्या हिऱ्यांचेच शिरपेच झाले** ।। सुप्रिया

ज्यांचे तेज खरे असते त्यांनाच लोक डोक्यावर घेतात; इतर कित्येकजण (मत्सरभावाने)'जळले' तरी, त्यातून काहीसा प्रकाश पडला तरी, त्यांची फक्त राखच होते हे सत्य सुप्रियाने सांगितले आहे.

हा मनीषा नाईकचा शेर पाहा,

**खुशाल गातो तुझीच गीते, तुझेच मंदिर लुटून नेतो।**

**भरून घेतो खुली तिजोरी,खरा पुजारी शिल्लक नाही ।।...<u>मनीषा नाईक</u>**

ललिता बाठियांचा शेर बघा---

**ह्या लाकडास शिक्षा, कुठल्या जुन्या गुन्ह्याची ।**

**त्याने चितेवरी का, माझ्यासवे जळावे?।।** ललिता बांठिया

त्यांचाच एक शेर जो आध्यात्मिक विचार मांडतो---

**देह म्हणजे, फक्त असते, क्षुद्र माती ।**

**बाहुले माणूस नियतीच्याच हाती ।।** ललिता बांठिया

आशावाद व सकारात्मकता काही शेरांमधून डोकावते. पाहा --

**बीजासम मातीत मला मी पुरेन म्हणते ।**

**हिरव्यातुन हसतांना तुजला दिसेन म्हणते** ।। ललिता बांठिया

**काही करून मी फुलतेच आहे ।**

**आत्मा तृषार्त जरि वा मनही उपाशी** ।।.....क्रांती

या सर्व स्त्री-गझलकारांमधे गझल-गुण निर्विवाद दिसत आहेत. स्त्रीसुलभ विषयांखेरीज, सामाजिक, राजकीय, जीवनविषयक असे विविध विषय त्यांनी समर्थपणे हाताळले आहेत. योग्य प्रतीकांचा वापरही त्या करतात. केवळ त्या स्त्रिया आहेत, म्हणून त्यांच्या लेखनात उणीवा आहेत असे म्हणायला कुठेही जागा नाही. त्यांचे इतर शेर, नावे न घेता सांगितले तर, हे स्त्री ने लिहिले आहेत किंवा पुरुषाने, हे तुम्ही ओळखूही शकणार नाही. आत्ता मी भाषणाच्या विषयासाठी वरील शेर निवडले आहेत. वरील प्रत्येक कवयित्रीचे उत्तमोत्तम शेर तुम्ही त्यांच्या संग्रहात जरूर वाचा.

गोव्याच्या राधा भावेंचा एक शेर मला सांगावासा वाटतो,जो दुःखाचा अन् गझलेचा संबंध फार हळुवारपणे स्पष्ट करतो,

**दुःखालाही चिमटीमध्ये धरता येते ।**

**आणिक त्याचे फूलपाखरू करता येते ।।---**राधा भावे

तेव्हा स्त्री-गझलकारांना‘बटरफ्लाय पार्क’ (उद्यान) करायला भरपूर वाव आहे; तर त्यांचे दुःख रंगित पंखांनी उडून जाईल..! असो.

मी माझ्या शेरांचा समावेशही कटाक्षाने व जाणीवपूर्वक टाळला आहे. काही स्त्री-गझलकारांनी सातत्याने गझल-लेखन केलेले दिसत नाही. म्हणून त्यांचे शेरही घेतलेले नाहीत. आताच्या ह्या कवयित्री पुढेही अधिक सकस गझल लिहीत राहतील अशी खात्री वाटते. एकूणच, स्त्री-गझलकारांचा अनुभवाचा कॅनव्हास खूप मोठा आहे असे मला वाटते.

(गझल-संमेलन, भीमरावांचे गाव)

# ममता सकपाळ यांची गझल

गझल--         रसास्वाद----

भेट अथवा सांग वाटा परतण्याच्या
शक्यता साऱ्या मिटू दे एकदाच्या!!1.

चमकत्या कळसावरी रोखून नजरा
मोजल्या मी पायऱ्या त्यामंदिराच्या!!2.

डौल त्यांच्या चालण्याचा वेगळा पण
वेगळ्या माझ्या कहाण्या रांगण्याच्या!!3

उंबऱ्यावर पेरले काटे घराने
मोगरा आडून हसतो कुंपणाच्या!!4

ही कथा माझी तुझी नसते कधीही
ह्या व्यथा लाखो करोडो काळजाच्या!!5
-----ममता सिंधुताई सपकाळ

ममता यांची ही एक सुंदर गझल. यातील पहिलाच शेर वाचकाची वाहवा घेतो. तू मला इथेच भेट. भेटणार नसशील तर वाट पाहून परत जाण्याची वाटही मला माहीत नाही! कारण येतांनाच मी मागल्या वाटा पुसून आले आहे. परतीची वाट दाखवायला तरी तुलाच यावं लागेल ना! अशा तऱ्हेने कवयित्री अप्रत्यक्षपणे त्याला येण्यास भाग पाडत आहे. उत्कंठेने वाट पाहणं हा प्रेमाचाच एक पैलू असतो. त्यामुळे या गझलेतील 'ती' आपल्या प्रियकराची वाट पाहत आहे, हा सरळ अर्थ झाला. पण या पहिल्या शेराचा, मतल्याचा, आणखी एक लपलेला अर्थही आहे. हा शेर ईश्वराला/ त्या एका ऊर्जेला उद्देशून आहे असं मानलं तर? तर शेराचं सौंदर्य अधिक वाढतं. त्याच्या

भेटीसाठी व्याकुळता किती आहे हे दुसऱ्या ओळीवरून कळतं. त्यातील ‘एकदाच्या’ या शब्दात ती ताकद आहे. तू एकदा भेटलास की इतर साऱ्या शक्यता आपोआप वितळून जातील. तू आहेस की नाहीस; असलास तर तुला तुझ्या भक्तांची पर्वाच नाही, असे तर नाही ना? आहेस, पण भक्तांमध्ये तू भेदभाव करतोस का?...अशा अजूनही कितीतरी शक्यता एकदाच्या संपतील; पण तू आलास तरच!

दुसरा शेरही दोन अर्थ सुचवितो. चमकत्या कळसावर नजर रोखून, कवयित्री मंदिराच्या पायऱ्या चढते आहे. मंदिराच्या पायऱ्या पुष्कळ असाव्यात व अवघडही असाव्यात हे सुचविले जात आहेत. पण चमकत्या कळसावरून वाटतेय की आतील गाभारा व त्यातील मूर्तीही अत्यंत सुंदर घडलेली असेल. मूर्तीचं रूप व तिचं पावित्र्य,पायऱ्या चढण्याचे सर्व श्रम दूर करेल! माणूस एखाद्या ध्येयाकडे दृष्टी ठेवून त्याच्या पूर्तीकडे खडतर वाटेवरूनही न थांबता वाटचाल करत असतो. थकत असूनही तो कळसावर नजर ठेवून चढ चढून जात असतो. अंतिमतः पूर्ततेचं समाधान त्या मूर्तीप्रमाणेच आनंद देईल याच हेतूनं तो वर जातो; व अपेक्षेप्रमाणे तसं होतंही. एखादा विद्यार्थी डॉक्टर होण्यासाठी असाच खडतर चढ पार लरत असतो; नाही का? तेव्हा साफल्याच्या कळसावरच त्याची नजर असते.

तिसऱ्या शेरात डौलात चालणे, व रांगणे अशी विरोध दाखवणारी क्रियापदे कवयित्री वापरते. जे समृद्ध असतात, ज्यांच्याजवळ सर्व साधने सहज उपलब्ध असतात, त्यांचा मार्ग नेहमीच सुकर असतो. कुठल्याही अडथळयाविना त्यांची वाटचाल चालू असते. मग ती चाल डौलदारच वाटते; त्यांचे कौतुकही होते.! पण वंचितांची वाट एवढी सोपी नसते. ती अडथळयांची शर्यत असते. त्यांच्या रस्त्यात खाचाखोचा असतात. तेव्हा प्रगतीपथावर ते मागेच पडणार! व रांगण्याच्या गतीनेच त्यांची प्रगती साधणार! ही सामाजिक तफावत हा शेर अधोरेखित करतो आहे. गझलेतील शेर अर्थ स्पष्टपणे सांगत नसतो; तो अर्थाकडे फक्त निर्देश करत असतो. हेच गझलेचं सौंदर्य आहे.

चौथ्या शेरात स्त्रीवरील बंधनांवर नेमके बोट ठेवलेले आहे. घरानेच उंबऱ्यावर काटे पेरलेले आहेत; व बाहेर फुललेला मोगरा तिला भुरळ घालत आहे. तिच्या घराबाहेर पडण्यावरच बंदी घातली गेलेली आहे. ती बंदी घरातल्याच माणसांनी घातली आहे, हे उघड आहे.मात्र बाहेरील प्रसन्न मोगरा काही ती माळू शकत नाही! तिच्या आनंदाच्या गोष्टी तिला करता येत नाहीत व मन मारावे लागते, हा अर्थ शेरातून छान व्यक्त होत आहे. उंबरा, काटे, मोगराही सारी प्रतीके कवयित्रीने चपखल वापरली आहेत.शेवटच्या शेरात गझल वाचकाला अधिक उंचीवर घेऊन जाते.सुख कधीच वैश्विक नसतं पण दुःख वैश्विक म्हणजे युनिव्हर्सल असतं, हे एक शाश्वत सत्य कवयित्री दोन ओळीत सांगून जाते! 'या व्यथा लाखो करोडो काळजांच्या असतात, फक्त तुझ्या-माझ्या नव्हेत'!

या गझलेत पाच शेर आहेत. एकाच गझलेतील शेर एकाच वृत्तात असावेत व प्रत्येक शेरातील विषय वेगळे असले तरी चालतील असे नियम कवयित्रीने व्यवस्थित सांभाळले आहेत. तिने मंजुघोषा हे वृत्त वापरले आहे; ज्यात 'नारनाना' हा अग्नि-गट तीनवेळा येतो. एका गुरु अक्षराऐवजी दोन लघु अक्षरे अशी सूट या पाच शेरात केवळ पाच ठिकाणी घेण्यात आली आहे, हे स्तुत्य आहे. काटेकोरपणे पाहायचे झाल्यास हे वृत्त 'मेघगंगा' असे मानता येईल, जे मंजुघोषाचे मात्रारूप आहे. मेघगंगा हे वृत्त माधव ज्यूलियनांच्या 'छंदोरचनेत' नाही; पण 'छंदोमयी कविता-गझल' या माझ्या पुस्तकात ते दिले आहे.

ही माझी आवडती गझल आहे. यात आणखीही काही शेर आहेत व सर्वच चांगले आहेत. कवयित्री ममता सिंधुताई सपकाळ यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

20.9.2018 ---संगीता जोशी 9665095653, sanjoshi729@gmail.com

प्रस्तावना—

## 1. 'कोलाज्' कवितासंग्रह- प्रसाद टिळक

भावनांनी ओतप्रोत झालेलं मन जेव्हा उत्स्फूर्तपणे ओसंडून वाहू लागतं, ते मन म्हणजे कविता!' हे आपण सर्वांनी वाचलंय्. पण प्रसाद टिळक लिहितात,

ते सगळे शब्द उलट सुलट लावून
अर्थ आणि अनर्थ यांची विल्हेवाट लावून
कागदावर काहीतरी उतरतच असतं
त्याला अभिमानानं कविता म्हणायचं असतं....
मनातले मात्र
कल्लोळ मोठे, वाटा लहान
मग थोडं थोडं काहीतरी
कागदावर झिरपतच असतं
त्यालाही कविता म्हणायचं असतं....

शब्दांचं बोट धरून, लहान लहान वाटांवरून आपण 'कोलाज्' च्या कवितांमधून फिरत गेलो की 'अनर्थां' ना टाळून आपण अर्थापर्यंत सहज पोहोचतो. ह्या वाटचालीत आपल्याला बरंच काही सापडतं....आपलंच कधीतरी हरवलेलं....

'कोलाज'! तुकड्या-तुकड्यांमधून साकारणारं एकसंध चित्र! ह्या कविता वाचत असतांनाही मनात 'ती' अशीच एकसंध साकारत गेली. वसंत बापटांच्या 'मानसी' सारखी. कॅमेरा फोकस करतांना आधी धूसर,अस्पष्ट दिसत दिसत हळू हळू स्पष्ट होत जाणारी 'ती'. कवी तिला फक्त 'तू' म्हणतो. त्याच्या मानसीचं तेच नाव आहे.

कवीचं तिच्याशी नातं आहे, तसंच जवळचं नातं निसर्गाशी आहे.एका नात्याचं दुसऱ्या नात्यावर होणारं आरोपण इतकं सहज आहे की त्यातून अभिन्नतेचा प्रत्यय येतो. तिच्या संगतीने ओथंबलेलं आभाळ, तिच्या प्रेमाचा फेसाळता समुद्र, विरहाचं (!) चांदणं, कातर संध्याकाळ ही

तिची सुन्न नाराजगी...अशी निसर्गाची रूपंतिच्याशी एकरूप होऊन जातात. रूढार्थानं या निसर्गकविता नाहीत; पण प्रत्येकाचं मन हे त्या विशाल आकाशाचा 'तुकडा'च असतो ना? तितकीच ही कविता नैसर्गिक आहे.

कवीचं निसर्गप्रेम काही केवळ 'ती' च्यापुरतं मर्यादित नाही. ह्या प्रेमानं त्याचं आयुष्य (क्र. 22) सुद्धा व्यापून टाकलंय्. कवीला धबधब्यासारखं खळाळतं आयुष्य हवंय्; दुःखं सुद्धा डोंगराएवढी हवीयत् आणि मरण? ते सुद्धा सूर्यास्तासारखं विषण्ण! या कवितेत योजलेली उपमानं...विशेषणं भावपोषक आहेत. कवीच्या आयुष्यात त्याला 'ती'नं यायला हवं आहे...हलकेच. पहाट वाऱ्या सारखं.....तिनं थांबावं ते वळवाच्या सरीसारखं...अन् हलकेच निघून जावं तेही ओहोटीसारखं! निसर्गाचे टिपलेले हे विभ्रम कवितेचा पैस विशाल करून टाकतात.

'अडीच अक्षरे' (क्र. 7) ही कविताही वेधक आहे. 'प्रेम के ढाई अक्षर' सर्वांच्याच परिचयाचे आहेत. मात्र कवीनं जन्म, कष्ट, दुःख, लग्न, प्रेम आणि मृत्यू या सर्वांना सुसूत्रतेनं एकत्र बांधलं आहे. वैचारिक खोलीची साक्ष देणाऱ्या कविता म्हणून 'त्रिशंकू' (क्र.34(, 'वाटा' (क्र.40(, 'बाकी' (क्र.16), 'आधार' (क्र.48) यांचा उल्लेख करता येईल. यातील 'आधार' या कवितेत बाळाला बोट धरून चालवणारा आपला 'अहं' आपल्यालाही कोणतातरी अदृश्य आधार आपला अहं जपतोय्, असा कवीने केलेला उल्लेख सहजपणे तत्त्वज्ञानतला स्पर्श करून जातो. मात्र, कवीनं एकेठिकाणी स्वतःच म्हटलंय् की, 'फिलॉसॉफी वगैरे काही नसतंच!'

कवीचं निसर्गाशी आहे तसं शास्त्रीय संगीताशीही अतूट भावनिक नातं आहे. दुसऱ्यांदा 'स्वरयज्ञ')क्र.8) ही कविता वाचल्यानंतर मग मी कवीचा परिचय वाचला. सर्व कविता वाचण्यापूर्वी मुद्दामच वाचला नव्हता. पहिलं वाचन करतांना 'पाटी कोरी' असावी म्हणूनच केवळ. कवीची 'मानसी' आणि रागरागिण्या यांची सुंदर गुंफण वरील कवितेत केलेली दिसते. ती स्वप्नात आलेली असतांना रंगणारा राग दरबारी, भटियारप्रमाणे तिचं येणं; तसंच दुपारची तिची आठवण सारंगाने रंगते, तर संध्याकाळची भेट मारव्यासारखी गहिरी आणि शांऽत! आणि हुरहुर लावणारी. ती जाते तेव्हा आर्त भैरवी असणं अटळच असतं.....

कवीच्या मनातलं स्वरांचं प्रेम जागोजागी प्रकट होतं. 'तुझं जवळ असणं तोडीसारखं'; 'तुझं सान्निध्य म्हणजे रसिक मींड' अशी काही उदाहरणं.

प्रसाद टिळक यांच्या कवितेत निसर्ग आणि संगीत प्रतीकरूपानं येतात. जीवनाचे विविध पैलू—किंवा 'मूड्स्' म्हणणं अधिक योग्य ठरेल—त्या प्रतीकांतून व्यक्त होतात. 'आरसा' ही प्रतिमा (क्र.13) अशीच प्रभावीपणे वापरली आहे.

‘कोलाज्’ हा कवीचा पहिलाच कवितासंग्रह. यातील सर्व कविता मुक्तछंदांत आहेत. कवी संगीतातीलसुरांनी प्रभावित आहेत, पण स्वरांची तालबद्धता व कवितेची वृत्तबद्धता यांपासून त्यानं आपल्या कवितेला दूर ठेवलं आहे. मनाचे हुंकार, मनोद्रेकाचे अन्वय, त्यानं मुक्तपणे कागदावर झिरपू दिले आहेत. मात्र मुक्तछंदाच्या मर्यादा पाळून तो स्वैर होऊ न देण्याची खबरदारीही घेतली आहे.

मग ही कविता कुठेच उणी नाही का?-- तसं म्हणता येणार नाही. पण एखाद्या नवोदित गायकानं पहिला षड्ज लावताक्षणीच त्याच्यातील उणीवा दाखवण्याचा डुढ्ढाचारीपणा करणं हा निव्वळ अनुदारपणा झाला. तो मी करणार नाही. त्यापेक्षा ‘दाद’ देऊन ‘हौसलाअफजाई’ करणंच मला आवडेल.

काव्यप्रेमींना ह्या कविता आवडतील.त्या भावस्पर्शी आहेत; मनस्पर्शी आहेत; आपल्याशी सुसंवाद साधणाऱ्या आहेत. बहुतांश कवितेत खिन्नता,तुटलेपण, उदास ओथंबलेपण असलं तरी, ‘आयुष्य पुन्हा एकदा नव्यानं पेरलं पाहिजे’ (क्र. 41) हा आशावाद दाखवणारी कवीची इच्छाशक्ती वाचकाला दिलासा देऊन जाते.

तानपुऱ्याची खर्जाची तार छेडल्यानंतर एकाग्र मनानं ऐकलं तर त्यातून सुस्पष्ट गंधार ऐकू येतो; तद्वतच ह्या कविता वाचल्यानंतर आर्ततेचा तो गंधार आपल्या मनात दीर्घकाळ रेंगाळत राहतो, हेच या कवितांचं यश आहे.

प्रसाद टिळक यांना शुभेच्छा देऊन आणि सुयश चिंतून थांबते.

---संगीता जोशी ( नोव्हेंबर 2006)

## 2. ‘तू, मी नि ते’

कवी- सुधीर कुबेर

तू, मी नि ते हा सुधीर कुबेर या कवीचा पहिलाच गझल-संग्रह. तो जेव्हा हाती आला तेव्हा त्याच्या आगळया-वेगळया शीर्षकानेच माझी दाद घेतली. माझी ‘वाऽ‘ ऐकून कुबेर लगेच दिलखुलासपणे म्हणाले, ‘नाडकर्णीसरांनीच सुचवलं शीर्षक...’ ज्याचे श्रेय त्याला देऊन टाकण्याची त्यांची ही उदार वृत्ती माझ्या मनामध्ये आपोआपच अधोरेखित झाली.

काव्यसंग्रह वाचतांना मला एक गोष्ट सोयीची वाटते; कुठलेही पान प्रथम उघडून प्रारंभ करता येतो. कुठल्याही क्रमाने हवे तसे वाचत राहता येते. मी प्रथम उघडलेले पान क्रमांक 77 निघाले. त्यावर शेर होता—

मी मला पाहता भासतो कसाकसा

मी असा, मी तसा....मात्र ना असातसा....

या शेरातच मला कवीची ओळख झाली. जसजसे अधिक वाचन झाले तसतसे जाणवत राहिले की हा ‘असातसा’ कवी नाही. सुरेशचंद्र नाडकर्णीसर यांनी प्रस्तावनेत म्हटले आहे त्याप्रमाणे या कवीने गझलेचा ‘व्यासंग’ म्हणून अंगिकार केला आहे. गझलेशी नाती जुळण्याची अनेक कारणे असू शकतात, त्यातील बरीचशी या संग्रहात वाचकाला मिळतात.

गझल हा कवितेचा आत्मनिष्ठ असा काव्यप्रकार आहे; त्यामुळे त्यात वारंवार ‘मी’

भेटणारच. अत्यंत संवेदनशील असा हा ‘मी’ जे अनुभव घेतो, ते तो अत्यंत उत्कटपणे स्वीकारतो. तो जे पाहतो,जे ऐकतो, जे इतर माध्यमातून त्याच्यापर्यंत पोहोचते त्यातले जे ‘विशेष’ ते त्याचे होऊन जाते. असे उत्कट अनुभव त्याचे मन ढवळून टाकतात व त्याचे उठणारे तरंग एक-एक शेर बनून कागदावर उतरतात. हा ‘मी’ म्हणणारा कवी म्हणजे केवळ ती व्यक्ती नसते तर त्यात एक व्यापकता दडलेली असते.

ह्या ‘मी’ च्या परिघात असलेले सर्व ‘तू’ व थोडे लांबच्या परिघात असलेले ‘ते’या सगळयांनी मिळूनच त्या ‘मी’ च्या जीवनाचा गोफ विणला जात असतो. ते ‘ते’च असतात की जे काही देतात, किंवा काहीतरी घेऊनही जातात. कधी ‘ते’ फसवतात, विश्वासघात करतात; कधी

गाणे ऐकवतात तर कधी वेदना देऊन जातात.... या सगळ्याबरोबरच ‘ते’ जगणे ‘शिकवून’ही जातात. असे ‘ते’ सर्व निघून जातात व कवीला एकटेपण जाणवते.

मान्य आहे एकटा मी रोज आता

मी न कोणाचा तरी माझेच सारे...(पृ.31)

कसलीही कटुता मनात न ठेवता सर्वांना ‘आपले’ मानणारे उदार व सहिष्णु हृदय कवीला लाभले आहे त्याचीच ही साक्ष. केवळ एकटेपण नाही, त्याबरोबर पंख छाटले गेल्याची जखमी जाणिव झाली तरी अंबराला पार करण्याची विजिगीषु वृत्ती कवीजवळ आहे. शेर पाहा—

छाटलेले पंख माझे, मी दिले टाकून खाली

मी जटायूच्या गतीने अंबराला पार केले....(पृ. 8)

अंबरापर्यंतचा हा प्रवास करतांना खूप काही द्यावे-घ्यावे लागले....कसे?—

घेतले जे जे मिळाले, शक्य ते सारे दिले मी

घेतले नुसतेच ज्यांनी, त्या कुणावर राग नाही....(पृ. 15)

तसेच---

देऊन सर्व झालो आता गडे रिकामा

मजला मुळी कशाची आता ददात नाही....(पृ. 12)

कुबेरांच्या गझला वाचतांना जाणवत राहते की त्यांनी वृत्तांचा वापर अगदी सहजपणे केला आहे. कृत्रिमता किंवा शब्दांची ओढाताण वा ठाकठोक त्यांना करावी लागत नाही. त्यांच्याशी बोलता बोलता त्याचे कारण कळले की वयाच्या 15-16 व्या वर्षापासून गझल लिहिण्यापूर्वी त्यांनी जी कविता लिहिली ती वृत्तबद्धच! आजवर एकही मुक्तछंद रचना केलेली नाही. जे मनात स्फुरते ते मुळी वृत्तातच असते. शास्त्रीय संगीताचे काही काळ घेतलेले शिक्षणही या दृष्टीने उपकारकच ठरले असावे. त्यामुळे ताल व लयीचे भान सतत जागृत राहते.

याबरोबरच, त्यांनी शब्दांचा ‘रियाझ’ही केला असणार हे जाणवते. हा रियाझ गझल-लेखनासाठी अत्यंत आवश्यक असतो. याचा अर्थ जडजंबाळ शब्द वापरायचे असा नव्हे! उलट तसे शब्द टाळून साधे, सोपे लिहिण्यासाठीच हा रियाझ उपयोगाला येतो. काही उदाहरणे पाहू या---

1. मी गोड मानले सारे जे माझ्या नशिबी आले
देऊन टाकण्या जगता त्याचीच खिरापत केली...( पृ.44)

2. सूर का घायाळ झालेगीत रानोमाळ झाले
आसवांनी रात भिजली चांदणे लडिवाळ झाले...( पृ.38)

3. पुराने उखडली सारीच झाडे
तमाशा पाहती आता लव्हाळी...(पृ.17)

या शेरांमध्ये 'खिरापत' , 'रानोमाळ' , 'लव्हाळी' ही विशिष्ट शब्दयोजनाअत्यंत समर्पक असून त्यायोगे शब्दांमागीलही काही सुचविले जाते. गझलेचे हे सौंदर्यलक्षण या संग्रहात इतरत्रही सापडेल.

कुबेरांच्या गझलेत प्रेम-शृंगार इ.विषयही वाचायला मिळतात. एखादे गीत 'रानोमाळ झाले' तरी मनात लपलेले गीतही सोबतीला आहे.

मी काल ऐकलेले गाणे मनात आहे

तेव्हा वयात होतो अजुनी वयात आहे....(पृ.35)

पृष्ठ 52 वरील गझलेतील शेरांमध्ये संयत शृंगार चांगल्या प्रकारे व्यक्त झाला आहे.

रागवून बोलतो जरी क्षणैक

का खट्याळ हासतेस तू उगाच....

धीट भेट आठवे मज जुनीच

हाय आज लाजतेस तू उगाच...

याबरोबर कधी कवी असेही म्हणतो---

कशाला मला तू पुन्हा भेटसी

अता मी सुखांनी पिकू लागलो!...(पृ.25)

येथे 'सुखांनी पिकू लागलो' हा शब्दप्रयोग मला भावला. 'डोके पिकणे' यावरून 'सुखांनी मन पिकणे'हा प्रयोग केला आहे. काव्याची गरज म्हणून केलेला असा प्रयोग करण्याची कवीला मुभा असतेच.

या गझला वाचतांना जाणवट राहते, ते हे की गझलेला पोषक अशी'गझलवृत्ती' कुबेर यांचे जवळ आहे. सद्यःपरिस्थितीचे जागते भान त्यांना आहे. समाजातील अपप्रवृत्ती त्यांना अस्वस्थ करून जातात. पण हा समाज बदलून नवीन समाजाची निर्मिती, ही कोणा एकट्या दुकट्याला शक्य आहे का?यावर कवी म्हणतो—

भाषणे ऐकून त्यांची

बुद्धही हतबुद्ध आहे....(पृ.76)

आणि त्यांची भाषणे तरी कोणत्या विषयावर?---

तेच वक्ते रोज त्यांची ऐकणे ती भाषणे

एकमेकांना दिलेली नेहमीची दूषणे....(पृ.78)

सत्तेवर असलेले आणि नसलेले, सर्वजण सारखेच! हे सांगतांना कुबेर लिहितात,

नवे चार आम्ही दिले निवडुनी

जुने पाहती त्या गजाआडुनी...(पृ.49)

सत्तासंघर्षात व भ्रष्टाचारात गुंतलेल्यांना देशाबद्दल विचार करायला वेळ आहे कुठे?

वाहते देशात अजुनी दूधगंगा

कोण खाते चोरुनीया साय सांगा...(पृ. 59)

रोज गायी कापती येथे कसाई

कृष्ण कुठल्या गोकुळी रमलाय सांगा...(पृ.59)

देशातल्या अशा परिस्थितीशी झगडणाऱ्यादुःखी बांधवांबद्दल कवीच्या मनात असलेली करुणा कवीने कुठे कुठे व्यक्त केलेली आहे. कविहृदयाचा हा प्रत्यय देणारा शेर---

झुंजतांना जे कुणीही गांजले

आसवे होऊन त्यांची वाहतो...(पृ. 11)

अशा प्रतिकूलतेत जे प्रसिद्धीपराङ्मुख राहून खरे काम करतात त्यांनाही कवी गौरवतो...शब्दात गुंफतो...

वाचाळांचे नाव गाजते

कर्मयोगि का अनाम आहे?...(पृ. 82)

काही आणखी शेर पाहू या—

कवीचा 'मी' इतका सामान्य आहे की 'माझ्यासाठी फास पुरेसा आहे', असे तो म्हणतो. तो 'मी' सर्वांपुढे जरा जास्तच नम्र आहे; तो इतका 'सरळ' आहे की त्याला लोक 'वापरून' घेतात व ते त्याला कालांतराने लक्षात येते व तो स्वतःच्या सरळपणावरच चिडतो!

साधाच फास आणा साध्याच माणसाला

तो क्रूस दूर ठेवा, माझ्यात ख्रिस्त नाही...(पृ. 27)

कशाला तुम्ही उंच होता असे

बघा रोज मीही झुकू लागलो...(पृ. 25)

जो तो मज वापरतो अधुनमधुन

मजवर मी डाफरतो अधुन मधुन...(पृ. 64)

मीच सत्ताधीश झालो, तोच का?

जाहले संस्थान माझे खालसा...(पृ. 57)

कवीचे आत्मक्लेश शब्दांकित होणे ही तर अपरिहार्यच बाब आहे; पण वरील शेरांमधून दिसणारा कुबेरांच्याकविमनाचा प्रामाणिक निर्मळपणा ही त्यांची जमेची बाजू आहे. त्यांच्यातील साध्या माणसाला 'फास'आणणारेही प्रथम त्यांच्या गुणांना 'दाद' देऊनच नंतर काय ते करतील!!

चांगला कवी होण्यासाठी प्रथम 'चांगला माणूस' असणे आवश्यक असते. ही किमान पात्रतेचीपरीक्षा कुबेर नुसते 'पास'च झालेले नाहीत, तर ते श्रेय नामावलीत आहेत!

गझलांमध्ये नेहमी भेटणारा, 'विरोधातून सौंदर्यवृद्धी' हा विशेषालंकारही कवीच्या लेखनात वारंवार दिसतो. जिंकतांना लाभलेली हार, लुटलेले दारिद्र्य, चाकूचा लळा, प्रकाशाचा अंधार, सज्जनांचे ताप....इत्यादि आणखीही उदाहरणे सापडतील.

वृत्तांवरही कुबेर यांची चांगली पकड आहे. देवप्रिया, भूजंगप्रयात, आनंदकंद,वियद्गंगा, व्योमगंगा याशिवाय लज्जिता, स्त्रग्विणि, जलौघवेगा इ. वृत्तेही त्यांनी वापरली आहेत. याखेरीज काही मात्रा वृत्तांचा वापरही केलेला आढळतो.

कुबेर यांनी काही वृत्ते नव्याने बनविलेली सापडली; म्हणजे ती माधवराव पटवर्धनांच्या 'छंदोरचनेत' नाहीत.

जिवास या जडे पिसे तुझे

मनात रूपही वसे तुझे...(पृ. 18)

या वृत्ताचे वजन (रना)5 असे आहे. त्याला **प्रभावरी** हे नाव योग्य वाटते.

हा शेर पाहा—

जिथे तिथे गडे मला भासतेस तू अशी

कळयांतुनी, फुलांतुनी लाजतेस तू अशी....(पृ.21)

प्रमाणिका व सुकामिनी यांच्या संयोगाने हे नवीन वृत्त झाले आहे. याला **प्रकामिनी हे नवे नाव** देता येईल.

एकूणच संग्रहातील कविता (गझला) वाचणाऱ्याला आनंद देतात; काही शेर अधिक प्रभावीपणे मनाला भिडतात व कवीच्या उंचीचीही कल्पना देऊन जातात.

या संग्रहात थोड्याफार त्रुटीही आढळतात. उदा. काफियात सूट घेणे, क्वचित अप्रचलित शब्दांचा वापर किंवा कुठे कुठे दोन ओळींमध्ये 'रब्त' ) परस्पर संबंध) नसल्याने दुर्बोधता

येणे.....इतर त्रुटी केवळबोटांवर मोजण्याइतक्या कमी आहेत. दुर्लक्ष करण्याजोग्या आहेत. काफियातील सूट मात्र टाळावीच. कारण गझल या आकृतीबंधाचा तो आत्माच आहे.

कुबेरांनी एके ठिकाणी म्हटले आहे,

कळते मज सुकली ही शब्दांची वेल अता

तूच गडे गझलेतुन उमल पुन्हा, डंवर पुन्हा...

त्यांची शब्दांची वेल त्यांना सुकलेली वाटत असेल कदाचित पण वास्तवात ती बहरलेली आहे. त्यांच्या गझलांमधून त्यांची मनातली व साहित्यातलीही 'कविता' उमलत रहावी; ही शब्दवेल 'गगनावरी' जावी, असेच माझ्याप्रमाणे कोणालाही वाटेल! )

कुबेरांच्या या पहिल्या संग्रहावरील रसग्रहणात्मक लेख मी 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके' साठी लिहिला होता.(अंक क्रमांक 303; ऑक्टो-नोव्हें-डिसें 2002 मध्ये तो त्या त्रैमासिक अंकात प्रसिद्ध झाला होता.)

----संगीता जोशी

## 3. 'आंतरसल' च्या निमित्ताने दोन शब्द

## (आंतरसल—कवी अनंत नांदुरकर)

मराठी गझलेने साहित्य-प्रांगणात प्रवेश केला, त्याला आता बराच काळ लोटला. मराठी गझल आली, रुजली, तिचे अमृताचे रोपटे झाले; आणि आज तर तिचा वृक्ष होऊन त्याच्या फांद्या फोफावत आहेत.म्हणून तर गझल-वृक्ष हे 'गजलसागर-प्रतिष्ठान' चे बोधचिन्ह व प्रतीक झाले आहे. प्रतिष्ठान तर्फे नव्या होतकरू गझलकाराचे पहिले संग्रह आवर्जून प्रसिद्ध केले जातात; हे त्या वृक्षाच्या फोफावण्याचेच लक्षण आहे.

त्यातीलच, नव्याने प्रसिद्ध होणारा एक संग्रह माझ्या हाती आला आहे.काही तांत्रिक कारणाने पूर्ण संग्रह बघायला मिळाला नाही; पण त्यातील काही गझला वाचूनच मला त्याविषयी थोडेसे सांगावेसे वाटते. 'शितावरूण भाताची परीक्षा' म्हणतात तसेच काहीसे!

'आंतरसल' हे शीर्षकच मला गझल-संग्रहास अत्यंत समर्पक वाटते. संवेदनशील मनाला वेदना झाल्या की त्यातून त्यातून कविता जन्मते. पण तरीही वेदना शमत नसतील व त्यांचा 'सल' (खलिश/ नासूर) उरत असेल, तर गझल जन्माला येते. म्हणजे कविताच पण आणखी गहिरी.

आसवांना काय द्यावे आसवांनी

आसवांना थामबवावे आसवांनी....

नांदुरकर म्हणतात, आसवांना थांबवायला त्यांच्या मागून दुसऱ्या आसवांनीच यायला हवे ना! त्यांच्याशिवाय आसवांना थोपवणारे कुणी नाही, हा अध्याहृत अर्थ नांदुरकर सुचवून जातात.गझलेचा शेर असाच असतो,की जो अर्थाकडे केवळ निर्देश करतो.

आणखी एक चांगला मतला पाहा---

मी न केला जमाव शब्दांचा

काव्य नाही दिखाव शब्दांचा...

याच गझलेतील आणखी दोन शेर पाहू या.

काळजाने कितीक सोसावा

हाय आता तणाव शब्दांचा...

बोल तोलून घे जरा आधी

जीव घेईल घाव शब्दांचा...

नांदुरकरांना गझलेची ‘नस’ सापडली आहे; आणि का नाही सापडणार? गझलसम्राट सुरेश भट यांचे जन्मग्राम अमरावती हेच तर त्यांचेही गाव! त्या सुगंधी मातीचे गुण त्यांच्या शब्दांत आले तर नवल कसले? असे गमतीने म्हणावेसे वाटते.

कवीच्या संवेदनशील मनाचे उद्गार त्यांच्या काही गझलांमध्ये विशेषत्वाने पाहायला मिळतात.आजूबाजूच्या सामाजिक परिस्थितीचे पडसादही त्यात उमटतात. त्यादृष्टीने हे काही शेर---

कर्ज झाले फार, यंदाची दिवाळी

टांगती तल्वार, यंदाची दिवाळी...

आकड्यांचा खेळ झाला आत्महत्त्या

स्वप्न झाले ठार, यंदाची दिवाळी...

अन्न पिकवुन ही कशी पोरे उपाशी

केवढी लाचार यंदाची दिवाळी....

कोणती ठिणगी अता विद्रोह कुठला

दुःख झाले गार, यंदाची दिवाळी...

शेतकऱ्यांचे दुःख मांडणारी ही ‘मुसलसल’गझल आहे. आपल्या सगळयांनाच ती हृदयस्पर्शी वाटेल. यावर वेगळे भाष्य करण्याची काय गरज? वरील शेर मंजुघोषा वृत्ताचे आहेत.

( एखाद्या गझलेचे सर्व शेर एकाच विषयावर असून, अर्थदृष्ट्या मात्र पूर्णपणे स्वतंत्र असतील तर तिला मुसलसल गझल असे म्हणतात.)

समाजातील विषमता या कवीला कशी बोचत राहते ते पुढील शेरातून कळते.

कुणी जन्मतो सूर्य घेउनी मुठी, कुणा

दोन कवडसेही न मिळावे, सांगा हो...

22 मात्रांच्या शुभगंगा या जातिवृत्तातील हा शेर आहे.

प्रेम, विरह इत्यादि विषय हे गझलेचे स्थायी विषय मानले जातात, उर्दू गझलेकडून ती परंपरा मराठीत आली आहे. तरीही अशा गझलांचे प्रमाण मराठीत कमीच आहे. प्रस्तुत संग्रहात ह्या विषयांवर अधूनमधून एखादी गझल आढळते. काही शेर—

ही अशी इतक्यात कोठे धून गेली
सावली माझी कुठे हरवून गेली.....

मैफली माझ्या तशा नाही विराण्या
आठवांचा मोगरा बहरून गेली...

दुसऱ्या एका गझलेत कवी लिहितो,

ऐनवेळीच आली तुझी यादही
ऐनवेळी दिलासा बरा वाटला...

हा ही शेर---

तू नाही तर कशास आता
उगाच मागे वळने असते....

जीवन आणि त्यातील दुःख हा तर गझलेचा मूळ स्वभाव आहे. दुःख गझलेत नटून-सजून येते. नांदुरकार लिहितात,

दुःख माझे जगावेगळे
सांगुनी ना कुणाला कळे...

हासऱ्या चेहऱ्याआड मी
लपवितो आसवांचे तळे...

मी क्षितीजाकडे चाललो
सूर्य बघण्या कसा मावळे...

वीरलक्ष्मीवृत्तातले हे मला आवडलेले शेर आहेत. याखेरीज कवीने मंजुघोषा, मेनका यासारख्या सोप्या वृत्तांबरोबरच स्त्रग्विणी, लज्जिता यासारखी तुलनेने अवघड वृत्तेही वापरलेली आहेत व चांगली निभावलेलीही आहेत. क्वचित कुठेतरी एका मात्रेचा फरक झाला हे तो अभ्यासानेदूर करता येईल. पहिल्याच संग्रहात ही गोष्ट किरकोळ समजायला हवी.

कवीने उर्दू गझलाही लिहिल्या आहेत असे समजले. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन!उर्दू मध्ये वृत्त हाताळणे तुलनेने सोपे असते, असे उर्दू छंदांचे अभ्यासक म्हणतात. तसेच स्वर-काफियाही

चालतो. कवींनी मराठीतही आता त्याचा स्वीकार करायला हरकत नाही, असे मत उर्दू-छंद-अभ्यासक डॉ. राम पंडित व्यक्त करतात.

मात्रावृत्तातील रचनाही ‘आंतरसल’ या संग्रहात आढळल्या. 16 मात्रांच्या छोट्या ‘बहर’ मध्ये ही नांदुरकर सहजतेने लिहितात.

या निमित्ताने कवीला एक दोन सूचनाही कराव्याशा वाटतात. प्रथमतः, शेराच्या दोन ओळीत परस्परसंबंध (यालाच रब्त असे म्हणतात) असणे आवश्यकच आहे. ते लक्षण शेरात दिसले पाहिजे, याकडे लक्ष द्यावे. रब्त नसेल तर शेर निरर्थक होतो.यासाठी ‘गालावरती’ ही गझल तपासावी. दुसरे, मात्राभरणासाठी शब्दांचे उच्चार बदलावे लागू नयेत, हीही काळजी घ्यावी. उदाहरणार्थ, ‘पुन्हा’ चा उच्चार ‘पुन्हा’ असा करावा लागणे.

दुसरा दोष फार मोठा नाही, हे मुद्दाम स्पष्ट करते, पण टाळायला हवा. नांदुरकरांचा काव्यप्रवास आत्ता सुरू झाला हे; आणि ते काव्य त्यांनी म्हटल्याप्रमाणे केवळ ‘शब्दांचा दिखावा’ नाही, याबद्दल त्यांचे अभिनंदन!

शेवटी कवीला शुभेच्छा देऊन माझे ‘दोन शब्द’ संपवते.

---संगीता जोशी.

# 4.आनंद-सुंवारी—कवी अजय नाईक

कविता सुचते म्हणजे काय आणि केव्हा? भावनेचा ओतप्रोत भरलेला पेला ओसंडून वाहू लागला की? का एखाद्या टोचणाऱ्या कणाची बोच मनात सलत राहिली की? नाही; अजय नाईक यांच्या कविता वाचून मला कवितेच्या सृजनाचे वेगळे कारण सापडले. भावसमाधी. या समाधीत ते मनःसमुद्राच्या अज्ञात किनारी बसलेले असतात जिथे शब्दांच्या हळुवार लाटा एकामागून एक त्यांच्या अस्तित्वाशी धडका देत असतात. त्यातूनच त्यांची लेखणी शब्द चाळून आणि गाळून घेते;व त्यांची कविता साकार होते. ही प्रक्रिया त्यांच्या नेणिवेच्या पातळीवर होत असावी असा माझा कयास आहे;आणि तो माझ्यापुरता पूर्ण खरा आहे. पाहा ना...

शिशिरातला शिमगा

जेव्हा फेर धरू लागतो

तेव्हा नकळत कर्णात

ढोल ताशे वाजू लागतात..

अनंताच्या विश्वात घेऊन जाणारे ध्वनी

घेऊन जातात मग प्रणवाच्या समाधीत...

मग मी राहत नाही

व्यापून राहून राहतो

अलौकिक दिव्य नादपरब्रह्म...

ढोल-ताशांचे ध्वनी कवीला समाधी-अवस्थेत घेऊन जातात कारण त्याचा मूळ पिंडच साधकाचा आहे! अजय नाईक संगीतकार आहेत. संगीत हीच एक साधना आहे. ते शब्द, सूर, ताल (रिदम) याचे सच्चे उपासक आहेत, साधक आहेत.

अजयच्या कवितेला चैतन्याची ओढ आहे; सृष्टीतील गूढ प्रकटीकरणाचं आकर्षण आहे. त्यातूनच त्यांना आत्म अनुभूतीची प्रतीती घ्यावीशी वाटते.

कोजागिरीच्या चांदण्याचा गंध असा दरवळावा

आत्म-अनुभव अंतरीचा ठायी ठायी तेवावा...

एक असाच अनुभव ते आत्मआविष्कार या कवितेत मांडतात,

स्वरूप रूपात मिसळले

मग माणूस माणसात मिसळला

कायाही कायाहीन..

निर्गुण-सगुणाचे ठायी

एक स्रोत स्रवला..

..........

एक शाश्वत ज्योत

तेजोलय-तमोलय जडतत्त्व आता

सूर तो सूरची होय

तव असावे घर हे

निमिषात आनंदमय आविष्कार!

स्व-रूप ओळखले तर माणूस माणसात का नाही मिसळणार? तेजोलय तत्त्वाचे जड स्वरूप म्हणजेच सूर! याचाच अर्थ सुरांमध्ये 'तो' आहे, ते चैतन्य आहे. सूर हे 'त्याचे' घर आहे!! अजयने हे नातं इतक्या सुंदर, तरल कल्पनेनं जोडलं आहे की संगीत हीच ईश्वर-साधना हे सत्य वेगळेसांगायलाच नको.

हा **'तो'** अजयच्या कवितेत ठायीठायी व्यापून राहिला आहे. कधी तो कृष्ण असतो, तर कधी राधा! कधी ते चैतन्य गोजिऱ्या रूपात विटेवर असतं तर कधी पंचतत्त्वांच्या साजिऱ्या गाभाऱ्यात असतं. पण कसं?

दूर सोन्याचा कळस

वाटे धूसर धूसर

तहान वाटे गाभाऱ्याची

देव दिसे ऐसपैस...!

अशा ‘ऐसपैस’ देवाचे दर्शन ज्याला होते तो माणुस काय साधा असतो? चार सामान्यांसारखा? नाहीच. तो वेगळा असतो. जास्तीचे सहावे इंद्रिय ‘खरेखुरे मन’ असलेला. अजय तसा माणूस आहे!! वेगळा असला तरी ‘माणसाला’ असते तसे मनही त्याला आहे;सुखद चंद्राची नवरात्र हवी असणारे, प्रियेचे मीलन सौख्य मिळता पाना-फुलात नाचणारे आणि कृष्णमेघांनी चिंब झाल्यावर हर्षणारे!! त्या मनाला उर्मिलेची व्यथा व्याकुळ करते,मीलनाच्या गंधात ते दरवळून जाते आणि अनाम वेदनेने ते बधीर होऊन जाते. वेगवेगळया कवितांमधून हा कवी वाचकाला वेगळा कळून येतो.

निसर्ग व त्याची विविध रूपे ही कवीची व्यक्त होण्याची आणखी काही माध्यमे आहेत.त्यात श्रावणरूप, पाऊस, पावसाच्या सरी ही विशेषत्वाने आहेत. सरी तर सख्याच आहेत. ‘नभ कधी कधी वाऱ्यासंगे जमिनीवर येते’, ते याच कवीसाठी! भावावस्थेला अनुकूल अशी निसर्गरूपे कवीला साथ देतात. कवीची गोमंत भूमी आहेच तशी, जिचा कवीला सार्थ अभिमान आहे!

संगीत हा ज्याचा जिव्हाळयाचा विषय आहे त्याच्या कवितेत मल्हार, श्याम-मल्हार येणारच! आसावरी, तिच्यात नसलेला तीव्र निषाद हवा तेथे दाखवणारच. कृष्णाची मुरली, त्याचा पावा यांचे सूर गुंजणारच. आर्त सुरातला मारवा ‘साडेतीनात’ सजावा, या ओळीतील गर्भितार्थ मात्र वाचकानेच जाणायचा.

अशी ही अजय नाईक यांची कविता. वाचकाला वेगळी अनुभूती देणारी. जो त्यांच्या शोधयात्रेत सामील होईल त्यांना वाटेवरचे खूप काही गवसेल. त्यांच्यासारखी ‘तलम जखम’ ज्यांना झाली असेल त्यालाच कवितेतलं मलम गवसेल!!

अजयची कवितावृत्तबद्ध नाही. संगीत आणि रिदम हे त्यांचे श्वास असले तरीही! तरीही तिला कुठला ‘छंद’ नाही. कारण ती बंधनापलीकडे जाणारी आहे. तिला बंधनापलीकडची ओढ आहे; ती म्हणते,

सळसळत्या चैतन्याला एक सवाल आता

रिपूंच्या कलेवर तो एक मायावी

सजावी कायाही होउनी मोहमयी

परम चैतन्याचा ध्यास हा

तुला मूर्त करील का?

शतकाचा प्रवास हा

संपेल कधीतरी आता....

हा प्रवास संपण्याआधी अनेक श्रावणांची बरसात तुमच्या कचितेच्या वहीत होवो व तुषार आमच्या शिरी पडोत ही शुभेच्छा देऊन, थांबत नाही; तर तुमच्याबरोबर प्रवासात राहते!!

धन्यवाद.

# 5.प्रा. संध्या पाटील यांच्या संग्रहाची प्रस्तावना

प्रा. संध्या पाटील यांच्या संग्रहाची कच्ची प्रत हाती आली, व उलगडलेल्या पानावर जो शेर समोर आला. तो हा शेर....

**स्वतःला स्वतः सावरू लागली ती**

**हवे तेच आता करूलागली ती.....**

ह्या शेरात अनेक सूक्ष्म बाबी शब्दात न येताही प्रकट झाल्या आहेत. आता ती स्वतःला सावरू लागली, याचा अर्थ ती अस्वस्थ होती; क्षुब्ध होती. पण तिला सावरणारं, असं कोणी नव्हतं.ते तिचं तिलाच करायचं होतं. पुढे कळतं की स्वतःला जे वाटेल ते करायलाही तिला कोणीतरी बंदी केली होती. स्वतःच्या अधिकारात, स्वतःच्या मर्जीप्रमाणे तिला वाकविणारं कुणीतरी होतं. दीर्घकाळ ती तशीच गुलामासारखी वागत राहिली. पण नंतर तिच्या जाणिवा जागृत झाल्या; आपलं शोषण केलं जात आहे, हे तिला कळू लागलं. तेव्हा तिनं ठरविलं, की ' नाही; आता मी ह्यातून बाहेर पडणार..... कारण माझं जीवन हे माझं आहे. मला मनापासून जे वाटतं, ते करण्याचा मलाही अधिकार आहे...!' इथे स्पष्ट करावंसं वाटतं की गझलेचा शेर जरी प्रथमपुरुषी भूमिकेतून लिहिलेला असला तरी त्यातील 'मी'/ 'ती'/ 'तो' हा व्यापक असतो.त्यामुळे हीसर्वनामे सर्वसमावेशक असतात.

शेर असा वाचला पाहिजे, की शब्दामागील अर्थापर्यंत आपण पोहोचलं पाहिजे. इंग्रजीत म्हणतात तसं, ओळींच्या मधली कोरी जागाही वाचता आली पाहिजे.

किंवा हा शेर पाहा...

**सारख्या होत्या तुला दोघी तरी का?**

**नाव येथे अमर राधेचेचझाले....**

हा शेर नुसता शब्दशः वाचून सोडून देण्यासारखा नाही. त्या दोघी कोण हे तर आपल्याला माहीतच आहेत. एक तर राधा; जिचा उल्लेख आलाच आहे. आणि दुसरी मीरा! एवढंच कळून घेऊन थांबायला नको. येथे शेर वाचकाला चिंतन करायला सांगतो आहे. मनात विचार करा की, खरंच असं का झालं असेल? राधेचंच नाव अमर झालं. एवढंच नाही तर ते नाव

कृष्णाच्या नावाच्याही आधी येतं! आपण राधाकृष्ण असा गजर करतो, ऐकतो. मीराकृष्ण कधीच ऐकलं वा म्हटलं जात नाही. चिंतनातून उत्तर सापडलं पाहिजे, जे संध्या पाटील यांना सापडलं असावं. म्हणूनच त्यांनी हा शेर लिहिला. जाता जाता ते उत्तर इथं सांगून टाकायलाच हवं.

मीरा ही कृष्णाची भक्त आहे. तिची भक्ती ही एकमेवाद्वितीय अशी आहे. ती भक्तीचं साक्षात रूप मानली जाते. पण भक्तीमध्ये द्वैत अनुस्यूत आहे. भक्त आणि ईश्वर वेगळा असल्याशिवाय भक्ती अशक्य आहे. पण राधा ही कृष्णमय झालेली त्याची सखी आहे; जिला वेगळे अस्तित्वच उरलेले नाही. मीरा म्हणते, कृष्ण माझा आहे(मीराके प्रभु); तर राधा म्हणते, मीच कृष्ण झाले आहे! ईश्वराला जो प्रेमाने जिंकतो,तो त्याच्याशी एकरूप होऊन जातो. द्वैत संपते. हे राधेचे वैशिष्ट्य आहे. मीरा व राधा यांची ही तुलना नाही;ही भक्ती व समर्पण यातील सूक्ष्मरेषा आहे.

या विचारांमुळे मला हा शेर आवडला आहे. येथे हे दाखवून द्यायचे आहे की शेर असा असावा की त्याने वाचकांच्या मनात विचारशृंखला सुरू झाली पाहिजे. त्यासाठी शेर हा आशयघन असावा लागतो.प्रा.संध्या पाटील यांच्या लिखाणात मला असे शेर नक्कीच सापडले आहेत. काही पुढे येतीलच. ( अर्थात् प्रत्येक गझलेतील प्रत्येक शेर तसा असणे हे कुणाही गझलकाराच्या बाबतीत असंभव आहे.)

आपला एखादा विचार दुसऱ्याला थोडक्यात सांगणं ही देखील कला आहे. फापट पसारा आवरून दोन ओळीत भाव प्रभावीपणे मांडणे;व अशा शेरांची मालिका गुंफणे हेच तर गझलचे गमक आहे! ज्यांना हे साधते तेच कवी गझलकार होऊ शकतात. संध्याला ते साधले आहे. काही शेर पाहू या.

वर आलेल्या शेराच्या मालिकेतील आणखी एक शेर....

**असो खानदानी नि सोन्या-रुप्याचा**

**असा पिंजरा ठोकरू लागली ती.....**

स्त्रीची अस्मिता जागृत झाल्याची खूण ह्या शेरात दिसते. ह्या जागृतीपूर्वी तिची अवस्था काय होती?

**पाळली मी बंधने ह्या उंबऱ्याची**

**राहिली मग घ्यायची गगनी भरारी...**

अशावेळी संवेदनशील मन आक्रंदून उठतं. तेव्हा ओळी उतरतात,

**जीवनाने केवढा आक्रोश केला**

**भाकरीसाठीच माझा जन्म गेला....**

कुणाचा जन्म भाकरी कमावण्यासाठी जाईल, तर कुणाचा भाकरी थापण्यासाठी! पण हल्लीच्या संघर्षमय जगात स्त्रीला ह्या दोन्ही जबाबदा-या पेलाव्या लागतात. त्यावेळी तिला देव न आठवला तरच नवल!

**मी तुझा देवा, कुणा पत्ता विचारू?**

**भेटतो जो तो इथे भांबावलेला....**

एक फार जुनं हिंदी गीत आठवलं, ज्याच्या ओळी आहेत,

भगवान तुझे मैं खत लिखता । पर तेरा पता मालूम नहीं ।।

हे गीत संध्या यांनी ऐकलं असण्याची सुतराम शक्यता नाही, इतके ते जुने व अप्राप्य आहे. कवींचे विचार काहीवेळा योगायोगामुळे कसे जुळतात, हे मला दाखवायचं होतं. मात्र अशा योगायोगाच्या संशयाचा फायदा घेऊन कवी जर बेमालूम कॉपी करतील तर ते मात्र निषेधार्ह आहे. साहित्यात अशा अपप्रवृत्ती कुठेकुठे दिसतात, त्या पूर्णपणे नष्ट झाल्या पाहिजेत. आपण केलेली नक्कल (कॉपी अथवा अंधानुकरण) उघडकीला येतेच, हे करणाऱ्याने लक्षात ठेवावे. शेरांच्या बाबतीत ही गोष्ट काहीवेळा जाणवते.

त्या, न भेटलेल्या देवाला, संध्या असाही जाब विचारून टाकतात,

**जसे निर्मिले तू फुला-पाखरांना**

**तशी का निरागस नसावीत नाती?....**

नात्यांचा भरवसा नाही आणि परक्यांपासून तर फक्त धोकाच संभवतो!

अशा अवस्थेतही निश्चयाने मार्गक्रमणा करणे भाग असते. ‘उद्या’ अज्ञात असतो; आणि ‘काल’चे दिवसही फारसे सुखद नसतात; तेव्हा कवयित्री लिहिते;

**तुझ्यापुढे वर्तमान आहे, नकोच मागे वळूस ‘संध्या’**

**नवीन वाटा,नवीन गावे,पुन्हा जुन्या यातना कशाला?....**

असाच दुसरा शेर....

**ठेवू कसा भरोसा येइल दिन उद्याचा**

**आस्वाद या क्षणाचा मी भरभरून घेते.....**

आध्यात्मातील एक पंथ असेही सांगतो, Live Only In This Moment!त्याची इथे आठवण झाल्याशिवाय रहात नाही.

आजच्या जगाबद्दल उपरोध व्यक्त करतांना संध्या लिहितात,

**शिकावी कला एवढी की**

**ख-यालाच खोटे म्हणावे!....**

**इथे सावल्यांचीच भीती**

**सदा ऊन हे पांघरावे...**

आजची सामाजिक किंवा राजकीय परिस्थिती सर्वांनाच उद्विग्न करणारी आहे. अशावेळी कवीचे संवेदनशील मनही अस्वस्थ होणारच.

**थोर झाले भ्रष्ट त्यांनी भ्रष्ट केला देशही**

**लागले ना ढासळू हे उंच पोलादी कडे!....**

किंवा.....

**लावले परतून ज्यांनी भ्याड हल्ले**

**मारले ते नेमके झुंजार त्यांनी....**

असा 26-11 च्या शहीदांबद्दलचा शेरही सापडतो. बऱ्याचशा गझलांतून स्त्री-दुःख, स्त्रीची घुसमट, समाजातील तिचं दुय्यम स्थान, तिचा होणारा कोंडमारा, तिचं भावविश्व चित्रित झालेलं आढळतं. स्त्री-गझलकाराच्या बाबतीत हे स्वाभाविक आहेही. पण कवयित्रीने आपले अनुभवविश्व जाणीवपूर्वक विस्तारले पाहिजे. दीपकळी हा संध्याचा पहिला संग्रह होता; त्यानंतरच्या ह्या दुस-या संग्रहात विकासाच्या खुणा लेखनात दिसत असल्या तरी आणखी पुढे जाणे अपेक्षित आहे. मात्र स्त्री-गझलकार म्हणून त्यांचे नाव या क्षेत्रात रुजले आहे, एवढे नक्की. लेखकाने कधीच समाधानी राहायचे नसते. पिकासोला विचारले गेले होते, की तू काढलेल्यापैकी

तुझे सर्वात उतम चित्र कोणते? तेव्हा तो उत्तरतो, ते मला अजून काढायचे आहे! अशी असावी कलावंताची अतृप्ती! ही अतृप्तीच त्याला शिखरावर घेऊन जाते.

गझलचा मूळ विषय प्रेम हा असतो. मात्र आता गझल ही जास्त बहिर्मुख झाल्यासारखी वाटते. आजूबाजूच्या जीवनाचे पडसाद त्यात अपरिहार्यपणे उमटतात. ते चांगलेच आहे; पण गझलकारांनी गझलचा मूळ स्वभाव लक्षात ठेवूनही रचना कराव्यात,असे सांगावेसे वाटते.

प्रा.संध्या पाटील यांना वृत्ताचे चांगले भान आहे. नावे आणि ल-ग क्रम माहीत नसतांनाही त्यांच्या रचना अचूक वृत्तबध्द आहेत. प्रमीला या छोट्या वृत्ताबरोबरच हिरण्यकेशी या लांब वृत्ताचाही वापर त्या करतात. अंगात लय भिनलेली असेल तर हे सहज जमू शकते, हा धडा नवीन गझल-लेखकांनी त्यांच्याकडून घ्यावा! या संग्रहात कवयित्रीने 15-16 वेगवेगळी वृत्ते वापरली आहेत.आनंदकंद या वृत्तात 13 व देवप्रिया मध्ये 12 गझला आहेत. वृत्तांची नावे प्रत्येक पानावर आहेतच. त्यामुळे नव्यांनाही मार्गदर्शन मिळेल. मागल्या संग्रहातील जास्त गझला मात्रावृत्तात होत्या. पण ह्या संग्रहात एखादा अपवाद वगळता अक्षरवृत्तेच वापरली आहेत. ही गोष्टही अभिनंदनीय आहे.

मला प्रस्तावना लिहिण्याची विनंती करतांना त्यांनी वृत्तेही विचारून घेतली तसेच जरूर तेथे इस्लाह (थोडी सुधारणा) करायला सांगितली. त्याप्रमाणे मी केलेल्या सुधारणा त्यांना आवडल्या वत्यांनी त्या मोठ्या मनाने स्वीकारल्या यातच सारे आले!

शेवटी ह्या प्रस्तावनेच्या निमित्ताने सांगावेसे वाटते की गझल ही ठरवून लिहिण्याची गोष्ट नाही. अंतःप्रेरणेतूनच ती यायला हवी, असे मला वाटते. मी आज कोंडून घेणार;व एक गझल लिहिणार, असे म्हणणे हास्यास्पद आहे. तसे केले तर गझलमधील उत्कटताच हरवून जाईल. मुक्तछंदाचे एकेकाळी पेव फुटले, तसे होऊ नये, म्हणून हे सर्वांसाठी नमूद करत आहे.

महिला-गझलकारांची संख्या वाढत आहे, हा आनंद मी प्रा.संध्या पाटील यांच्या दुस-या संग्रहाच्या निमित्ताने विशेष करून व्यक्त करू इच्छिते.

प्रा.संध्या पाटील यांना पुढील लेखनासाठी शुभेच्छा देऊन थांबते.

## 6. काळजाच्या अंतरंगी

—कवी डॉ. सुबोध निवाणे

**काळजाच्या अंतरंगी** हा संग्रह हाती आला तेव्हा प्रथम जे पान उघडले त्यावर पुढील शेर वाचायला मिळाला.

दे जीवना तुझ्याही त्या वेदना मला रे।

त्याची कवने देतो मी चांदणे तुला रे।।

शेर वाचल्याबरोबर कळले की ह्या कवीजवळ गजलवृत्ती आहे. डॉ. निवाणे म्हणाले होते की त्यांनी कुठल्या वृत्तात लिहिले वगैरे त्यांना काही माहीत नाही. तेव्हा पु.ल. देशपांडेंचे प्रसिध्द वाक्य आठवले. ते म्हणाले होते, गजल हे वृत्त नसून ती एक वृत्ती आहे. डॉ. निवाणे यांच्या गजला वाचल्यावर वाटले की ते गजलच्या आवाक्यातील नवक्षितीजाचा एक तारा आहेत. वृत्त माहीत नसले तर कुठे बिघडते? त्यांना गजलची नस (नाडी) सापडली आहे. ते मेडिकल डॉक्टर असल्यामुळे असेल कदाचित्! वृत्ते माहीत नाहीत असे असले तरी त्यांचे शेर हे अचूक वृत्तात रचलेले आहेत. फक्त वृत्तांची नावे त्यांना माहीत नव्हती, एवढेच. अंगभूत लय हा त्यांच्या शेरांचा गुणधर्म आहे. (गजल कार्यशाळेत मी हे आवर्जून सांगत असते, ठराविक अंतरावर श्वास देऊन शेर लिहिल्यास वृत्त कोणते ते नंतर शोधता येते. म्हणून, वृत्तात लिहिणे कठीण आहे असा बाऊ कवींनी करू नये.)

कवी खूप असतात, पण त्यात गजलकार कवी थोडेच असतात. कारण ताकदीची गजल लिहिण्यासाठी कवी वृत्तीने चिंतनशील असावा लागतो. डॉ. सुबोध निवाणे यांच्या सर्व गजलांमधून त्यांची चिंतन क्षमता दिसून येते. जीवनाबद्दल त्यांचे अनेक तसे शेर आपल्याला सापडतात.

निमालेही होणे पण । जन्मा पुलकण्यासाठी ।।

दरवळणे अन् विरणे । जीवन सरण्यासाठी ।

वर दिलेले दोन शेर कवीच्या रचना-कौशल्याची अधोरेखित करतात. बारकाईने पाहिल्यास कळते की एका ओळीत केवळ बारा मात्रा असलेले हे अत्यंत छोटे वृत्त कवीने वापरले आहे. उर्दूत त्याला तंगज़मीन म्हणतात.

आणखी वहीं शेर पाहा,

आयुष्या उरले दाणे । आहे दळणे जगता जगता ॥

असता जखमा असता दुखणे। हसरे दिसणे जगता जगता ॥

हे दोन शेर असलेला गजले तीव ओळ सोळा मात्रां आहे. आयुष्या उरलेली वर्षे जगतांना जीवना तो तीपणा व रुक्षता, त आलेला व ळाहे सांगतांना वापरलेली दळणा उपमा खूपसमर्पव अशी आहे.

जीवना अंगाने णारे विविध विष वीने सपाईदारपणे हाताळले आहेत.जीवनात भे णारी,बघा ला मिळणारी माणसे वशी असतात? डॉवरु निवाणे एवमुवक्त म्हणतात,

माणसांसारखी वा ली माणसे ।

पदे होउनी वागली माणसे ।

सभ ते म्हणे हे पुजारी जरी ।

वा गुनू गे वपली माणसे ॥

माणसे म्ह ली वी तां हरे आले ! बरं, हे हरेही खरे असतील असे नाही. ह र मुखव पार!! बि रा आरसा इतव माणिव, पण त ही गोंधळ उडतो.

हरा दिसतो मना व नाही ।

पाहतो आहे विवशता दर्पणा ॥

विंवा

हरे ह मागति ते । पाहतो प मी दर्पणा ॥

आरसा सुध्दा माणसांना ओळखू शवत नाही, व र ण तीवजण अनेव हरे घेऊन वावरत असतो. शिवा एव माणूस दुस सारखा नसतो. वीने हेही शेरात वसे पले आहे पाहा,

खां र खुशीने पेलणारे वेगळे ।

हाती घेउनी ना णारे वेगळे ॥

मरणाला उत्सव मानणारी स्थित□ माणसे □□ सहज उ□लून वा□□ल व□□ात. पण त□□□□शा□□ □□ ना□वत वाहून नेणारी माणसेपरा□□□□ अज्ञानी असतात. आपण ज□□ला सुळावर देणार आहोत,त□□ मो□पण □ माणसांना व□□लेले□ नसते. ही अज्ञ माणसे दुस□□ला मारण□□□ धन□□ मानतात; इतव□□ती क्षु□ असतात. मला वरील दोन ओळींमध्□□ एवढा अर्थ सापडला व शेर आवडला.

□□नशील मनाला सामाजिव□ समस□□ी अस्वस्थव□□ नाही, असे व□□ होईल व□?डॉ. निवाणे □□□ हे शेर पाहा□

पो□□ भूव□ आहे, हातात व□□ नाही ।

डोश्च □□ आसवांना हसणे व□□ झाले।।

हाताला व□□ मिळाले नाही तर, पो□□ील भूव□ भागविण□□शा□□ पैसा □□ार तरी वु□□? आज□□ तरुणां□□ दु:ख ऽा दोन ओळीत व□□ने मांडले आहे. गरिबी दूर व□□□□□ अनेव□ □□जना आ□□ □□ आखल□ गेल□ पण त□ तळागाळाप□□ झिरपण□□□र्वी□ मधल□□मधे आ□□ जातात. व□□ आहे □□ला जबाबदार?उ□□ पुढ□□ शेरात आहे.

आजनेत□□ासुनीमजवा□□ारे ।

लोव□□नीबोलली ही लोव□□ाही?।।

बि□□री लोव□□ाही! नेत□□ासून वा□□ा अशी विनवणी लोव□□नात-लोव□□ेत-व□□□□□ द□□□□ वेळ ति□□र □□ी ना!

अनेव□ घो□□ □□ी समाजा□ गळा घो□□□□□ा नेते म्हणा□□ व□? अशा□ सिं□□ घो□□ □□ परिणाम व□□, तो ऽा शेरात वा□□

बांधली धरणे वि□□ पण आजही।

व□□□ आहेत घर□□ घागरी!।।

□□ हा गजले□ स्था□ विष□ आहे.व□□नेअधून मधून□□ी विष□□ला स्थान दिले आहे. पण परिणती व□□□ झाली?

स्वप्ने मनात सजली, मनही तुझ□□ रमले ।

झालेखरे नवहीं, जेजेमनात होते..।।

मग आता त त आ वणीं वरा तरी व?

नावरतो अता मी हिरवळ तुझ स्मृतींी।

ओसाड आ वांनास्वीवरतो आहे ।।

ा गजले मतला (पहिला शेर) असा आहे

गजलात वेदनांनावुरवाळतो आहे।

गीतातआसवांनाशृंगारतो आहे ।।

जीवनातील पराभव वा वैपल हे सुध्दाउत्व णे उपभोगणे हा गजलवर अनेव गुणांपैवी एव गुण मानला जातो. तसाक्ष हा वरील शेर देतो.

गजलेतनिसर्ग ती, पण वर्णन स्व ात न ता बरे वा तीव ाने तींना दिसतो.

सावली, पाखरे ना पुलेही।

वरेडे घर विती वणा ।।

वण हा ऊन-सावली खेळा, रिमझिमणा पावसा, निश्च घनां आणि हिरवगार गालि वर पुलं नक्षी वढणारा सन्न महिना!पणहे वधी वा ला न आलेल एवा ं त व वी तीवम्हणजे हा वर शेर!ही वं नाअर्थात नशिबाने वेलेली आहे. शेर पाहा

ता एव झावा उद्ध्वस्तजाहलो मी ।

तूवादळात हसुनी झुलतो वसा पुल रे।।

नशिबा एव प व े माणूस हेलपा जातो, पण जोरा वादळात पूल झोव बरोबर मजेत झुलत राहतं! ववीनं स्वत:ला निसर्गाशी नवळत जोडून पाहिलं आहे. वधी वधी ववी निसर्गाशीएव ाही वसा होऊन जातो तेही पाहा,

तरंग मी वधी असे, विहंग मी वधी ।

नभात महाल बांधतो वधी वधी ।।

वर लिहिल्याप्रमाणे, गजलवृत्ती हा कवी किती कमालीचा संवेदनशील आहे ते या पुढच्या दोन शेरांवरून स्पष्ट होते,

वादळेका कापली हीअंतरी ?।

भावनांशीका कुणाच्या खेळलो ?॥

कवीच्या मनाची अस्वस्थता वरील शेरात व्यक्त झाली आहे पाहा. आपण कुणाच्या भावनांशी तर नकळतपणे खेळलो नाही ना? मग माझं मन असं वादळांनी का बरे भरून गेले आहे?त्याअर्थी मी कोणाला तरी दुखावलेअसले पाहिजे.

दुसऱ्या शेरात कवी म्हणतो,

सोसती लोक हे हरलेले ।

जिंकणे छळतोआता ॥

हरणाऱ्या लोकांना हार सोसतांना जे भोगावं लागतं, त्याची कल्पना करून कवी एवढा व्यथित होतो की त्यापुढे त्याला जीतही नकोशी वाटते! दुसऱ्याच्या दुःखाची **स्व** ला असलेली अनुभूती व जाणीव आणि त्यासाठी करायचा त्यागाही तर आध्यात्माचीसोपी पायरी आहे. कवी त्याबाबतीत जिंकला आहे, असंच म्हणावं लागेल.

दुसऱ्याएका शेरात डॉक्टर निवाणे म्हणतात,

देवाचेदर्शनराऊळी ।

खोटेसोळा आणे आहे ॥

देव मंदिरातनाही वा मशिदीतही नाही, हे सोळा आणे म्हणजे शंभर टक्के खरे असल्याचा दावा कवी करतो ; देव हा माणसाच्या अंतःकरणात आहे हाही आध्यात्मिक विचार कवी स्पष्टपणे मांडत आहे.

असेएकअटळ सत्य म्हणजेजन्मासवे जन्मणारा मृत्यू! त्याकडेही धीरोदात्तपणे पाहणारी कवीची लेखणी लिहिते,

तूसखाआहे खरा हे मानतो मी ।

सोबतीला तू मृत, पाहतोमी।।

तू सतत माझ बरोबर आहेस, आणि मीही तुला सतत बघतो आहे मून ववी स्थित वृ तीत होते.

जीवन-मरण, दु:ख-वेदना इत दिंवर तिन वरतांना आलेल जगा अनुभवाब ल ववी म्हणतो, वी तरीसुध्दा हे जग वसं आहे हे मला अजून वळलं नाही.

शेव दुनि, तुझा मजथांग हा लागे ना।

सरळ वेव्ह, व वेव्ह आणि वेव्ह गोल तू।।

बुडी घेऊन,जगा तळ शोधता शोधताडॉवरांना सु - व ति - ऐवजी लेखणी सापडली हे बारं झालं. तमुळे रसिवांना ववी **वाळजा अंतरंगी** बुडी घेता आली.

माहीत नाहीत, असे म्हणता म्हणता, डॉ. निवाणे ंनी सुमारे वीस विविध वृ वापरली आहेत. ती बरीी निर्दोष आहेत. स्त्रग्विणी, आनंदवंद, आनंद,मंजुघोषा व देवी वृ अनु १२, ७,७, ६ व ५ गजला लिहिल आहेत. शिवा मेनवा ३, वीरलक्ष्मी ३, तसे भाव, वि लता, भा, भामिनी, सुवमिनी इ. अक्षरवृ वापरलेली दिसतात. शिवा १२ मात्रां शुध्दसती पासून २४ मात्रां अनलज्वाला व २८ मात्रां लवंगलता ही मात्रावृ सहजपणे हाताळली आहेत. वि न ववी र ना शिल दिसून ते.

मरा गजलां हा ववी पहिला संह आहे. विशेष म्हणजे पूर्वी, तंनी लिहिलेल उर्दू गजलां एव संहआधी शित झाला आहे. तब ल तं अभिनंदन वरा ला हवे!

मरा गजला ंगल आहेत. तरीहीव हि सांगावेसे वा ते. ते असे वी, रे शेर ही स्तावना व समारोप स्व पात तात. अर्थात् तंचे शेरा आशाला वु बाध तीअसे नाही. पणविरोधाभास अथवा मत्वृती पूर्ण शेर वमी आढळतात. अर्थात् ला दोष असे म्हणता णार नाही. डॉवरांवडे तिभा आहे; तेव्हा ही उणीव पुढ संहात भ न निघेल हे नव.

डॉ.निवाणेंनी भाषिव शेरां गजलही लिहिलेली आढळते. पर पूर्वी म्हणजे अमीर खुसरोनेहीएवा शेरा एव ओळ उर्दू तर एव ओळ परसीमध अशी गजल लिहिली होती. नंतरही असे

ोग झाले. पण तांना ताही वेळी जाणवांनी पास उलून धरले नाही. वस्तुत् तसे लिहाला हरवत नाही,इतवे

डॉवांनी मला ज र तर सुधारणा(इस्लाह) वरण परवानगीदिली होती. तामुळे मी वही िवाणी तो हवव वापरला आहे ; पण अशा जागा अगदी थोड आहेत, हे सांगतांना मला आनंद होतो.

ा संह रसिव स्वागत वरतील ही अपेक्षा वव व व डॉ. निवाणेंना शुभे देऊन,मी इथे पूर्णविराम देते.

## 7. रसग्रहणात्मक लेख

## ‘ओले पक्षी’ ---कवयित्री ललिता बांठिया

गझल म्हणजे आत्मलक्षी काव्य; गझल म्हणजे उत्कट अनुभवांचा अर्क. गझल म्हणजे आत्मभान; गझल म्हणजे अंतर्मुखता; गझल म्हणजे जीवनविषयक चिंतन; गझल म्हणजे समाजातील ‘असत्’ वृत्तींबद्दल राग; तर गझल म्हणजे एकीकडे प्रेम-विरहासारख्या हळुवार भावभावनांचा आविष्कार! गझल म्हणजे अजूनही बरेच काही. कवितेमधला देखणा हिरा....विविध पैलूंच्या द्वारे मनाचे कवडसे परावर्तित करणारा.

या हिऱ्याचे बरेचसे पैलू मला ललिता बांठिया यांच्या गझलेत प्रतीत झाले. त्यांचा ‘ओले पक्षी’ हा संग्रह हा संग्रह माझ्या हातात आला आणि त्यांची गझल माझ्याशी जवळिकीने हितगूज करू लागली.माझ्या सवयीप्रमाणे पहिल्याच वाचनात मी पुस्तकावर अनेक ठिकाणी पेन्सिल-खुणा केल्या...नंतर सवडीने पुन्हा सर्व गझलावाचल्या; आणि खूप चांगल्या गझला वाचल्याचे समाधान मिळाले. त्यांच्या पहिल्याच गझलेतील पहिली ओळ अशी आहे—

आभाळाचे ओले पक्षी करात माझ्या

मतल्याची दुसरी ओळ बदलून त्यातून सांगावेसे वाटते की---

वस्ती करुनी राहुन गेले उरात माझ्या....

गद्य पुस्तके वाचतांना मी नेहमी प्रस्तावना, मनोगत इ. आधी वाचते. पणकविता-संग्रह वाचतांना मुद्दामच तसे करत नाही. कुठलाही पूर्वग्रह ( Impression)आधीच तयार होऊ नये यासाठी घेतलेली ती काळजी असते.

ललिता बांठिया यांच्या गझलेविषयी लिहायचे ठरविले होतेच; तसा त्यांचा आग्रहही होता. त्यांचा वरचेवर फोन येऊनही मला लेखनास उशीरच झाला.

आपले अनुभव ललिताजी उत्कटपणे व्यक्त करतात. त्यासाठी त्या शब्दांची

अचूक निवड करतात. भाव-अभिव्यक्तीसाठी अचूक प्रतिकांचाही वापर करतात व त्यातून सखोल अर्थ सुचवून जातात.

पाकात पडावी माशी, मी तसा जीवनी बुडतो

गुदमरतो,धडपडतो पण मज नकोच असते सुटका...(पृष्ठ83)

जीवनाबद्दलच्या आसक्तीसाठी 'पाक' , जीवन उपभोगणारा जीव म्हणजे माशी, दुसऱ्या ओळीत शब्दचित्रित झालेली तिची 'फडफड' म्हणजे माणसाची दिसून येणारी लिप्तता ह्या सर्व गोष्टी कवयित्रीने दोन ओळीत समर्थपणे मांडल्या आहेत.नश्वर जगच त्याला पाकासारखे गोड वाटते व त्या गोडीतच किंवा गोडीमुळेच त्याचा अंत होतो.

ढगाआड जाता जरा चंद्र थोडा

जथा काजव्यांचा उभा मिरविण्याला... (पृ.22)

याही शेरात चंद्र हे प्रतीक नेहमीपेक्षा वेगळा अर्थ सुचवून जाते. एखाद्या कर्तृत्ववान व्यक्तीभोवती थोडेकुठे सावट आले तर आजूबाजूच्या व्यक्ती स्वतःला मोठ्या समजायला लागतात व आपली पोळी भाजून घेण्याची एकही संधी सोडत नाहीत. नसलेल्या तेजाने इतरांना दिपवू पाहतात.

गझल ही खरेतर सांकेतिक भाषा आहे. त्यातील प्रतीके वाचकाला शब्दांपलीकडचा अर्थ सुचवून जातात. मग रसिक वाचक आपल्या अनुभवांप्रमाणे किंवा भावांप्रमाणे त्या अर्थाचा मागोवा घेतात. प्रत्येक रसिकाला असा अर्थ शोधण्याची संधी उपलब्ध असते. म्हणूनच प्रत्येकाला गझल....त्यामधील शेर आपलासा वाटतो. हीच तर आहे गझलेची खासियत!

पुढील शेरात काय म्हटले आहे?

मी कधी उच्चार केला भावनांचा?

मी तुला कवितेतुनी सुचवीत गेले....(पृ. 79)

प्रेम हा गझलेचा / कवितेचा अविभाज्य विषय आहे. एका अर्धोन्मीलित कलिकेची प्रेमलज्जा पुढील शेरात किती हळुवारपणे शब्दबद्ध केली आहे, पाहा—

रे वसंता का तुला यायची घाई अशी?

झाड माझे स्वागताला सज्ज अजुनी व्हायचे...(पृ.23)

येथेही वसंत, झाड ही सुंदर प्रतीके आली आहेत. मात्र प्रीती बहरावर येऊनसुद्धा जर तिला

तटस्थतेचा सामना करावा लागला तर?

तू समाधी साधनेतच गुंतलेला

व्यर्थ माझा तुजपुढे शृंगार आहे...(पृ.29)

किंवा

विरक्त तू मी कसे करावे

गारुड तुजवर लावण्याचे!... (पृ. 12)

प्रीतीला पारखे झाल्यानंतर जे एकटेपण येते तेही गझलेशीच हितगूज करते.

सांज दारात माझ्या उभी राहते

एकटी मी किती, फक्त ती जाणते...(पृ. 17)

तसेच त्या एकटेपणात---

नाव तुझे मी क्षणाक्षणावर कोरित असते

मात्र तुला हे सांगायाचे राहुन गेले....(पृ. 25(

अशी स्त्रीसुलभ खंतही शेरातून व्यक्त होते...... पण ललिताजींची गझल तिथेच थांबत नाही. ‘साहिर’ ने म्हटले आहे, ‘जो खो गया मैं उसको भुलाता चला गया..’ त्याचप्रमाणे हे ‘ओले पक्षी’ जीवनाच्या दुसऱ्या आकाशात झेपावतात; चिंतन करतात.

झुलते सदैव दोन्ही टोकातला झुला मी

रे भेटणार केव्हा माझ्यातला मी?....

सुख-दुःख, यश-अपयश, आशा-निराशा अशा द्वंद्वांनी आपले जीवन व्यापून टाकलेले असते.त्या दोन टोकातच झुल्याप्रमाणे फिरत राहिले, तर आपल्याला तो ‘खरा मी’ कधीतरी भेटेल का? जिवनाच्या आध्यात्मिक पैलूला कवयित्रीने सहज स्पर्श केला आहे. आणखी एका शेरात त्या म्हणतात,

एकटा आलास तू जाणार येथुन एकटा

ठेव इथली ना तुला काही बरोबर न्यायची...( पृ. 56 )

तसे पक्के माहीत असले तरीही जीवनात काही गोष्टी त्यांना ‘ठेवा’ असावा तशा हव्याशा वाटतात.

खडतर जीवन असो कितीही

सुहृदांचा सहवास असावा....! (पृ.16)

मात्र अन्याय सोसूनही दुसऱ्यांच्या जीवनाला अर्थ देणारेहीलोक जगात असतात.फुलाचे प्रतीक येथेही वापरले आहे.

चुरडले जरी फुलास

दरवळे इथे सुवास... (पृ. 76)

जगाचे, त्यातील व्यक्तींचे निरीक्षण करता करता कवयित्री आत्मपरीक्षण करण्यासही विसरत नाही.

नित्य शोभादर्शकातुन चेहरा बदले खरा

सत्या नाही एकही, मी मोडते तो चेहरा...( पृ.75)

ह्या ढोंगी जगात कोणीही व्यक्ती खऱ्या, प्रामाणिक चेहऱ्याने जगूच शकत नाही का? प्रत्येक क्षणी नवा चेहरा—मुखवटा—धारण करावा लागतो... आणि म्हणावे लागते, ‘ नाही; ही मी नव्हे..’

वास्तवाच्या जगात स्वप्नांचे ऐने तुटून-फुटून जातात, व काचा डोळयांत खुपत राहतात.

इच्छा अपुऱ्या, स्वप्ने अपुरी

जीवनातही सारी चणचण...( पृ. 68)

अशा चणचणीत आयुष्य काढल्यानंतर, वेळ निघून गेल्यावर ईप्सित मिळाले तरी त्याची किंमत मातीमोल ठरते.

जन्मभर अभाव, त्रास

पायथ्यास आज रास!!....(पृ.76)

ती रास तुडवून पुढे जायचे हे आणखी एक दिव्य असते; पण ते करावेच लागते, कारण आनंद शोधणे हाच तर जीवनाचा उद्देश असतो!

असह्य पीडा 'ललिते' तुजला सतत नाचवी

आनंदाचा गुलाल तरिही माख जरासा....(पृ. 27)

या शेरातील 'तरिही' हा शब्द मोठे काम करतो. त्यातून मनाचा समजूतदारपणा प्रतीत होतो आहे. शिवाय संग्रहात बहुधा हा एकच 'मक्ता' (कवीचे नाव गुंफलेला शेर) मला आढळला. अर्थात् मक्ता असावा किंवा नसावा ही कवीची स्वेच्छा असते.

संग्रहात एखाददुसरा मिस्किल अर्थाचाही शेर आढळतो.

सोडलीस का चोरी आता?

प्रश्नाहुनही उत्तर अवघड!...(पृ. 28)

रोजच्या जिवनातील साधी गोष्टही बाईंनी शेरात चांगली गुंफली आहे. फक्त अक्षरांच्या गर्दीमुळे ओढाताण झालीय्.

वर्तमानपत्रातिल बात

चहासवे ही खमंग साथ!...(पृ. 32)

jएकूणच, ललिता बांठिया यांच्या गझलांमध्ये आवश्यक असे बरेच गुण आढळतात.त्यांनी देवप्रिया, आनंदकंद, मेनका,वियद्गंगा, मृगाक्षी, भुजंगप्रयात इत्यादि अक्षरवृत्ते वापरली आहेत; परन्तु मात्रावृत्त वापरण्याकडे त्यांचा जास्त कल आढळतो. अक्षरवृत्तातही एका गुरुऐवजी दोन लहु अक्षरे वापरण्याचे स्वातंत्र्य सढळपणे घेतले आहे.तसा वापर कमी झाल्यास ते उचित ठरते.

बत्तीस मात्रांच्या लांब वृत्ताबरोबर कवयित्रीने अतिछोटे 'घारि वृत्तही वापरले आहे.

(पृ. 24) या गझलेतील पाचही शेर चांगले असून त्यातून चिंतन स्पष्ट होते. ती गझल---

आर्त हाक । कान झाक ।। 1.

आड वाट ।खूप धाक ।। 2.

स्वप्नएक । जळुन खाक ।।3.

जन्म मरण । फिरत चाक।। 4.

देह फक्त । चिमुट राख ।। 5.

अर्थदृष्ट्या शेर चांगले असल्याने ‘राख’ हा काफिया रसिक सहज चालवून घेतील!

या संग्रहातीलमला सर्वाधिक आवडलेली गझल आहे पृष्ठ आठवरची. संदिग्ध सूचकतेने गझलेचे सौंदर्य वाढते; त्या निकषाने ही गझल सुंदर आहे.

जीव माझा सारखा जाळायची

लाघवी हसुनी मला टाळायची...

मी तिला शपथा कितीदा घातल्या

शब्द माझा ना कधी पाळायची...

दुःख इतुके द्यायची...रडवायची

आसवे गालांवरी वाळायची...

हे त्या गझलेचे काही शेर. आता ती कोण हा प्रश्न वाचकाने सोडवायचा आहे. मी माझ्यापुरता सोडवला आहे.

कवयित्रीने वापरलेले काही शब्द उल्लेखनीय आहेत. गार झळा. अंतस्थ केरकचरा, ऐनेमहाल सजवणे, धीराचे शब्द म्हणजे गलका, दुःखाचा लळा इत्यादि. याशिवाय, सागर व कागदी नाव, मी व आरसा, डाव व फासे, फूल-गंध, इ. रूढ संकेत वापरले आहेत. जागणारी निद्रा,

रस्तोरस्ती भेटणाऱ्या सावल्या इ. प्रतीके नवीनवाटली. क्वचित काफियासाठी दुश्वार, दुसऱ्या उका ठिकाणी शमा हे उर्दू शब्दही आलेत. पण ते क्वचितच असल्याने क्षम्य मानायला हरकत नाही.

कोणत्याही कवीने वा कवयित्रीने आपल्या आवडत्या कवींच्या गझला/कविता वाचतांना त्यातील विचारांचे अनुकरण कटाक्षाने टाळले पाहिजे. एखादेवेळी चुकून 'खयालों का टकराव' होणै शक्य आहे,हे विचारात घेऊन कवीला सूट देणेही आवश्यक आहे. काही वेळा, दुसऱ्याच्या कवितेतील एखादा विचार आपल्याला (कवीला) इतका भावतो की तोच विचार स्वतःच्या कवितेत/शेरात मांडण्याचा मोह आपल्याला आवरता येत नाही. तसे करायलाही हरकत नाही ते मान्यताप्राप्त आहे! इतकेच नाही तर तो 'श्रुतयोजन' नामक साहित्य-अलंकारही आहे. श्रुतयोजन म्हणजे ऐकलेले (वाचलेले) योजणे. पण तसे करतांना कवीने ते प्रामतणिकपणे नमूद केले पाहिजे. हे आवश्याक आहे.

ललिता बांठिया यांच्या पुस्तकात मला तसे फारसे आढळले नाही; परन्तु कोठे कोठे इतरांच्या गझलांची आठवण होते, हेही खरे. कोणताही संग्रह पूर्णपणे दोषरहित व सर्वगुणसंपन्न नसतो. एका गोष्टीचा आनंद झाला की त्यांच्या संग्रहातकोठेही जुन्या उर्दू गझलांमधील विचार उचललेले दिसले नाहीत. ही त्यांच्या निखळ प्रतिभेची खूणच आहे.

संग्रहाच्या शेवटी पंधरा मुक्तकांचा एक स्वतंत्र विभाग आहे. यातही भरपूर काव्यगुण दिसतात.

वय झपाट्यात हे ओसरू लागले

आरशाला अता घाबरू लागले

बाह्य जगणे असे बंद करताच मी

अंतरंगी अशी वावरू लागले....

किंवा ---

उशीर होतो 'खऱ्या घरी' मज परतायाला

खेळ मांडले वाटेवरती तूच कशाला?..

पहिल्या मुक्तकात मांडलेला विचार सलग आहे. मुक्तकात तसेच असायला हवे. परन्तु वरील दुसऱ्या मुक्तकातील ह्या सुंदर दोन ओळी एकट्या पडल्यासारख्या वाटतात. कारण पुढील दोन ओळी (इथे दिल्या नाहीत) वरच्यांशी सलगता दाखवत नाहीत. ते चांगले दोन शेर होऊ शकतील. एका मुक्तकात एकच विचार सलगपणे यायला हवा. काही मुक्तके जमली आहेत.

मनाचे पक्षी जीवनाच्या विशाल आकाशात विहरत राहतात, अनुभवांच्या पावसात चिंब झाल्यावर कवितेच्या वळचणीला येऊन बसतात, आसरा शोधतात. कविता या ओल्या पष्यांना ऊब देते. तसेच आहेत हे 'ओले पक्षी'. काव्यप्रेमी नक्कीच त्यांना घरटी देतील.

## -काहूर—कवी रमण रणदिवे

दिलेच नाही तुला कधीही पत्र गुलाबी प्रेमाचे

कसा कळाला तरी नेमका मनातला मजकूर तुला...

मनातला मजकूर सहजच कुणालाही कळावा, नव्हे आपल्याही मनात हाच मजकूर होताइतका तो आपला वाटावा, अशा ओळी घेऊन येणारी कविता कवी व गझलकार रमण रणदिवे यांच्या ‘काहूर’ या नव्या संग्रहात भेटते. त्यांच्या जीवनाच्या वाटेवर एका कडेला फुलं व दुसऱ्या कडेला सूर आहेत! म्हणूनच ‘भोवताली थांबले क्षण सुखद आता’ अशा शब्दांनीच यासंग्रहाची सुरुवात होते. या गझलेतले पुढचे शेर कवीसाठी फुलांचा गुच्छच जणू घेऊन येतात.लाडात येणारी रातराणी, गात्रात फुलणारा प्राजक्त कवीला सुगंधाची सनदच देऊन जातात! त्यामुळे अवघी कविताच दरवळून जाते.

रणदिवे यांचा हा चौथा कवितासंग्रह. पहिला संग्रह होता ‘ऋतू फुलांचा’. त्यांच्या वाटेवरची फुलं त्यांनी केवळ स्वतःसाठी वेचली नाहीत, तर आपल्या कवितांमधून रसिकांसाठीही त्यांची उधळण केली.हा नवा संग्रह ‘काहूर’. यातही गुलाब, चाफा, जुई,मोगरा, यांच्यासोबत केवडाही आहे, ज्याला सुगंधासोबत काटेही आहेत. तसेच निवडुंगही आहे, जो कोमलतेला ओरबाडून काढतो...पण—

पोखरते वाळवी तरीही, झाड हासते तसाच मी

कधीच नाही कळले माझ्या मनातले काहूर तुला....

अशा तऱ्हेने वाचकाला कळतं, ली मजकूर कळला तरी एखाद्या मनातलं काहूर काही इतरांना सहज समजत नसतं. रणदिवे यांची कविता मात्र आपल्याशी जवळीक साधते.

कळया,फुलं,झाडं, चंद्र,वारा, उन्हं इत्यादि निसर्गप्रतीकं कवितेत गुंफणारा हा कवी गझल, गीतं, अभंग,असे कवितांचे अनेक प्रकार समर्थपणे हाताळतो. रणदिवे यांना संगीताचंही वरदान लाभलेलं आहे.ते उत्तम गातात, संवादिनी वाजवतात, स्वतःच्या गीतांना स्वतः चालीही लावतात.

रणदिवे यांचं शब्दांवर फार प्रेम आहे.सुंदर सुंदर शब्दांनी ते आपली कविता सजवतात. अनोखे जोडशब्द तयार करून किंवा विशेषणांसह ते शब्दांची मोहकता वाढवतात.

वयात आलेला चंद्र । भर दुपारी अनवाणी चालत निघाला ।।

त्याची सावली । बिलगली उन्हाच्या तळहाताला ।।

असे आणखी मला आवडलेले शब्द म्हणजे मेंदीतल्या जखमा, जरतारी दुःख, तारकांची झुंबरं, समंजस विरह, खानदानी अक्षरं, हसरा ऋतू, शालीन सूर...!

असं असलं तरी कवीला आपले शब्द थिटे का वाटावेत?'शब्द माझे थिटे' या शीर्षकाची कविताखरोखरच एवढी आशयघन आहे, की तुमचे शब्द मुळीच थिटे नाहीत; अलंकारिक अर्थानं तुम्ही तसं म्हणालात तरी! असं कवीला सांगावंसं वाटतं. येशूचा दुःखद अंत आणि मेरीची आसवं याचं उत्कट चित्रण करणारी ही कविता मुळातून वाचायलाच हवी. या कवितेचं वृत्त आहे वागीश्वरी. या वृत्ताची ओळख आपल्याला कुसुमाग्रजांच्या 'पृथ्वीचे प्रेमगीत या कवितेतून झालेलीच आहे. हेच वृत्त रणदिवे यांनी आपल्या टा उदात्त कवितेला वापरावं हा एक प्रासादिक योगायोग!

आज माणसांनी पशूची पातळी गाठली आहे ही गोष्ट कविमनाला इतकी अस्वस्थ करते, की ती कवीकडून पुनःपुन्हा व्यक्त केली जाते.

काळही करतो प्रशंसा आदराने

माणसांपेक्षा इमानी श्वापदांची

नाव मी घेणार नाही ईश्वराचे

ओढ माझ्या अंतराला माणसाची ।।

ईश्वराचं नाव घेत नसला तरी कवी त्याला मनातल्या मनात मानतो. कसा?—ते या गीतात बघा—

अपराध सर्व माझे त्यानेच माफ केले

त्यानेच दुर्गुणांचे काळीज साफ केले

काळोख अंतरीचा भ्याला नव्या प्रकाशा

प्रत्येक आसवाची कळते प्रभूस भाषा....

'गुरुमहिमा' आणि 'आई' या विषयांवरच्या कविताही विचारांचा वेगळेपणा अधोरेखित करतात. रणदिवे यांनी या संग्रहात 'मंजुघोषा', 'मेनका' , 'वियद्गंगा'. 'आनंदकंद' आदि अक्षरवृत्ते वापरली आहेत; पण जास्त भर मात्रावृत्तांवर दिसतो. संगीताची व त्यामुळे लयीची उत्तम जाण असल्यामुळे रणदिवेंच्या रचना त्यादृष्टीनेनिर्दोष आहेत.

पाचोळा गोळा करण्याचा हळूहळू मी सराव केला

वसंताकडे केविलवाणे, हात पसरणे जमले नाही...

पण कवीला हात पसरण्याची गरजच काय?

तो कळ्यात उमलत होता, तो फुलात बहरत होता

तो घरंदाज कवितेच्या उद्यानी विहरत होता

त्यासाठी त्याच्यावरती कवितेची जडली माया

तो आशयघन शब्दांच्या अणतरात उतरत होता.....

(प्रसिद्धी –'सप्तरंग' रविवार-सकाळ-पुरवणी, दि 22 डिसेंबर 2013.).....संगीता जोशी

प्रस्तावना—'मिलाफ उर्दू—मराठी शायरीचा'-लेखिका-अंजली ठकार

'नजराणा शायरीचा' हे उर्दू शेरांचे मराठी अर्थ देणारेमाझे पुस्तक प्रसिद्ध झाले; आणि ते आवडल्याची अनेक पत्रे येऊ लागली. फोनही आले. (तेव्हा सर्रास मोबाईल नसत.) 'शेरांचे अर्थ दिल्यामुळे सुवर्णाने भरलेली अलीबाबाची हुहाच आपल्यासमोर उघडली गेल्यासारखं वाटलं'. असं एका वाचकानं कळवलं होतं.कोणतीही कलाकृती सरिकमान्य होणं हा त्या कलाकृतीचा भाग्ययोग असतो. त्याचबरोबर ती सादर करणाऱ्या कलाकारालाही समाधान लाभतं. त्या समाधानातच 'नजराणा...' ची दुसरी आवृत्ती निघत असल्याची बातमी आली व आनंदात भर पडली.याच दरम्यान मला एक फोन आला अजली ठकार यांचा. इतर अनेकांप्रमाणे

‘नजराणा...’ हे पुस्तक फार आवडल्याचं त्यांनी पुनःपुन्हा सांगितलंच; पण त्यांनी वेगळ्याप्रकारे ‘दाद’दिली असल्याचं सांगितलं. त्यांनी प्रत्येक उर्दू शेराचं मराठी पद्यमय रूपांतर केलं होतं! अशा ‘सक्रिय’ मी व माझ्या प्रकाशिका सौ.अंजली घाटपांडे सानंद चकित झालो. त्यानंतर लगेच ते हस्तलिखित माझ्या हाती पडलं. तेच आज पुस्तकरूपाने रसिक वाचकांपुढे येत आहे.

समयोचित वापलेले उर्दू शेर उपस्थितांची उत्स्फूर्त दाद मिळवून जातात; हा अनुभव नेहमीच येतो. अगदी एखाद्या ट्रकवर लिहिलेला ,

मुद्दई लाख बुरा चाहे तो क्या होता है

वही होता है जो मंजूरे-खुदा होता है...

यासारखा शेरही सर्रास मुखोद्गत होतो. मद्दई शब्दाचा अर्थ अंदाजाने गवसलेला असतो.

उर्दू शेरांची लोकप्रियता वादातीत आहे. मग असेच, याच अर्थाचे शेर मराठीतही असायला काय हरकत आहे? असं सौ. ठकार यांना वाटलं आणि लगेच त्यांनी कृती केली.

मला अंझली ठकार यांचा प्रयत्न नक्कीच स्तुत्य वाटतो. हल्लीचं युग हे धावतं युग आहे. या युगात माहिती तंत्रज्ञानाचा जसा विस्फोट झाला आहे, तसा कलाक्षेत्राचाही सर्वांगाने विस्तार होत आहे. रसिक मनानं कलाक्षेत्रातील सर्व शाखा-उपशाखांची नुसती ओळख करून घ्यायची म्हटलं तरी एक आयुष्य पुरं पडणार नाही. म्हणूनच ‘संक्षिप्त तेच सुंदर’ ( Small is beautiful) हा मंत्र किंवा हे तत्त्व सर्वमान्य होऊ पाहात आहे. शेर अथवा द्विपदी लोकप्रिय होते, रसिकांना आकर्षून घेते याचं हेच कारण असावं.रसिक मनाला स्पर्श करण्याचं अद्भुत सामर्थ्य दोन ओळींच्या शेरात असतं. दोनच ओळींची मर्यादा असल्यामुळे पाल्हाळाला जागाच नसते. त्यामुळे कवीची प्रतिभा कसाला लागते. कवीला जे सांगायचं त्यात नेमकेपणा हवा असतो; अनावश्यक शब्द तर अजिबात नको असतात.काही वेळा तर जे सांगायचं ते फक्त सुचवायचं असतं, पुढची जबाबदारी वाचकाची. शिवाय ही दोन ओळींची कविताच असल्याने काव्यानंद तर ओतप्रोत असलाच पाहिजे! अशी द्विपदी लिहिणं ही सोपी गोष्ट नाही. उर्दू-हिंदीत, गुजराथीतही हा प्रकार चांगला प्रस्थापित झाला आहेच.मराठीतही दोन, तीन, चार ओळींचे काव्यप्रकार रुजू लागले आहेत. सौ. ठकार यांना हा प्रकार भावला आणि त्यांना त्यातून प्रेरणाही मिळाली.

सौ. अंजली ठकार यांनी रसानुवादित केलेले शेर वाचून मला असं वाटलं की रसिकांना हे मराठी शेर खचित आवडतील. त्यांचा हा आगळावेगळा प्रयत्न नक्कीच पसंतीची पावती मिळवेल. सौ. ठकार यांच्या हातून हे काम पूर्णत्वास गेलं, याला पहिलं कारण म्हणजे त्यांना काव्याची चांगली जाण आहे. उर्दू शेराचं व्यवस्थित अर्थविश्लेषण समजावून घेऊन त्याचं नेमकं बलस्थान त्या अचूक जाणून घेतात. शिवाय अभिव्यक्तीची अनावर ऊर्मी त्यांच्याजवळ आहे. त्यामुळेच हे पुस्तक सिद्ध होत आहे.त्यांनी अनुवादित केलेले अनेक शेर चांगल्या प्रकारे उतरले आहेत. असे, की ते पूर्ण 'मराठी' वाटतात. त्यावर उर्दू भाषेचं सावट नाही.

उदाहरण द्यायचं तर—

याहून अधिक काय आहे प्रेमाचं भाबडेपण बरं?

तू दिलंस वचन आणि मी सरळ मानलं खरं!

किंवा—

झिरपतो आहे सुंदर प्रकाश पिंजऱ्याच्या गजागजातून

जरा बोलूया की या मोहक हवेत विहरण्याविषयी पंख फुलारून..

असतील पाडली पुष्कळ झाडं वादळांनो तुम्ही कितीदा

फुलास बिलगल्या फुलपाखरा पाडून दाखवा बरं एकदा...

अशी अनेक उदाहरणे देता येतील. मीर, इक्बाल, गालिब, यांच्यासारख्या सुप्रसिद्ध कवींच्या सर्वज्ञात ओळीही ठकार यांनी मराठीत आणल्या आहेत.

उलटलेच सर्व उपाय,औषधं ठरली निरुपयोगी

हृदयरोगानं हा अखेर दगावलाच की प्रेमरोगी...

असं थोडंच आहे की सर्वांना मिळेल सारखंच उत्तर?

चला आपणही जाऊ या ईश्वराचे शोधार्थ पर्वतावर!

आराधना करतांनाही स्वाभिमान असा जपतो आम्ही
माघारी फिरतो उलटे, जर मशिदीचं दार उघडलं नाही...

साहिर लुधियानवी यांच्या एका शेराचा हा अनुवाद पाहा---

हे ईश्वरा तुझ्या या धरतीवर
धरतीच्या तुकड्यासाठी का होते युद्धभूमी?
हरएक जेत्याच्या कपड्यांवर
मानवी रक्ताची का होते रंगपंचमी?

मूळच्या शेरात रंगपंचमीचा निर्देश नाही. पण रूपांतरणात 'रंगपंचमी' खुलून दिसते आहे. त्याचप्रमाणे एका ठिकाणी 'हर शख्स अपनी जात के कमरे में बंद है' याचं भाषांतर 'स्वजातीच्या खोल्यांत' असं शब्दास शब्द भाषांतर ठकार यांनी केलं नाही. तर 'स्वजातीच्या पिंजऱ्यात' असा उचित बदल केला आहे. शेराचं मराठीपण सांभाळण्याचा ठकार यांचा उद्देश असा स्पष्ट होतो.

हे शेरही पाहावेत—

एकदमच असा चुपचाप का झालास दोस्ता?
ऐकवीन वाटलं काय तुला मी माझी रडकथा?

जीवन काय आहे? पंचमहाभुतांचं एकत्रित असणं!
मृत्यू काय आहे? पंचमहाभुतांचं विस्कटून जाणं!!

यांसारखे शेर चांगले वाटतात. काही हलके-फुलके शेरही ठीक जमले आहेत. उदाहरणार्थ—

नाही माझं मागणं देवा दुजं कोणतंची
राहू दे 'ती' लाखो वर्षे चौदा वर्षांची...

देवच जाणै काय होईल परिणाम याचा अंती

मी तर इतका उतावळा, अन् किती तापट 'ती'...

कूचा (प्रेयसी राहते ती गल्ली) ही संकल्पना मराठीच्या दृष्टीने तरी परकीच आहे. सौ. ठकार यांनी 'कूचा' साठी 'आळी'शब्द वापरला आहे.

वाटतच नाही जावंसं आळी तुझी सोडून

असेल तुझीच इच्छा तर जाईनही निघून...

दुःख नुसतं सूचित करणारे हे शेरही रसिकांना आवडतील...

तळमळत रात्रभर होतो, परस्परां सांगत, मी आणि दीपज्योती

की पाहू उद्याचा सूर्योदय, जगलो वाचलोच जर या विरहराती!...

'मीर' च्या उशाशी बसून बोलायचं तर बोला हलकेच

झोप लागलीय् बापड्याला रडता रडता एवढ्यातच...

मी उद्धृत केलेल्यांखेरीज अशा चांगल्या जमलेल्या द्विपदींची उदाहरणं आणखीही सापडतील. पण पूर्णपणे फसलेल्या द्विपदीही आढळतात. मात्र सुदैवानं अशी उदाहरणं थोडी आहेत.

मूळ उर्दू शेर आणि ठकार यांची भाषांतरित द्विपदी यात एक महत्त्वाचा फक आहे. प्रत्येक उर्दू शेर हा ठराविक वृत्तात आहे; विशिष्ट मीटरमध्ये आहे.मराठी द्विपदी मात्र कुठळयाच वृत्तात नाहीत. या द्विपदी बोली लयीत म्हणावव्यात तर तशी लयही अचूक नाही. ठेका धरून म्हणतांना, वाचतांना वाचकाला ही त्रुटी नक्कीच जाणवते. ही तांत्रिक त्रुटी आहे म्हणून सोडून देता येईल; पण उर्दू शेरांशी या द्विपदींची तशी तुलना होऊ शकत नाही. आशयाला त्यामुळे फारशी बाधा आलेली नसली तरी ही त्रुटी नजरेआड करता येत नाही. काही ठिकाणी शब्दक्रम थोडासा बदलून वरचनेबाबत अधिक काळजी घेऊन लय साधता आली असती. उदाहरणार्थ,

हसतमुख राहुन नासिर दुःख टाक पिऊन

सोसण्यातही नियतीनं आनंद ठेवलाय् लपवून...

म्हणूनच या सर्व रचना 'गद्य मुक्तछंदात' आहेत असे म्हणावे लागेल.

उसळती मदिरा , उत्फुल्ल पुष्पअसे काही चांगले शब्दप्रयोग ठकार यांनी केले आहेत. 'मंझिल' साठीध्येय हा शब्दही उपयोगी ठरला आहे.पण 'डोंबल', 'बंडल' अशा शब्दांनी द्विपदीचे काव्यगुण उणावतात, हे लक्षात घ्यायलाच हवं.

मद्यलय, साकी या संकल्पना मराठी काव्यात व समाजात परक्याच ठरतात. त्यामुळे अशा अर्थाच्या शेरांचे मराठीकरण करतांना कसरत होणारच. ती वाचकांनी समजून घ्यावी.

हे धर्मोपदेशका, पिऊदे मला मशिदीतच मद्य

वा दाखव मला स्थान जेथे ईश्वर नसेल आद्य...

या शेरातील, ईश्वराच्या सर्वव्यापकतेची कल्पना आपल्या नामदेव-विसोबा खेचरयांच्या कथेशी सरळ नातं सांगत आहे. ती कथा थोडक्यात अशी—विसोबा खेचर शंकराच्या पिंडीवर पाय ठेऊन झोपलेले असतात. ते पाहून नामदेवांना आश्चर्य वाटतंच व रागही येतो. 'जिथे पिंडी नसेल अशा जागी माझे पाय तूच उचलून ठेव.' असं विसोबा म्हणतात. नामदेव त्यांचे पाय उचलून दुसऱ्या जागी ठेवतात. तर त्याच ठिकाणी पायाखाली पिंडी उत्पन्न होते. देव सर्वत्रच आहे हे उमजून नामदेवांचे 'मीच खरा भक्त' या गर्वाचे हरण होते.

किरकोळ दोष दुर्लक्षित केल्यास सौ. ठकार यांचा प्रयत्न सर्वांना आवडेल असाच आहे. त्यांची चिकाटी वाखाणण्याजोगी आहे. अशाप्रकारे केलेलं हे त्यांचं पहिलंच काम नाही, हे विशेष! यापूर्वी त्यांनी 'समओवी ज्ञानेश्वरी' ची रचाना केली असून तो ग्रंथ 1990 साली प्रसिद्ध झाला आहे. एवढेच नव्हे तर 'समओवी अमृतानुभव' व 'समओवी चांगदेवपासष्टी' हे ग्रंथही 1993 मध्ये प्रकाशित झालेले आहेत. अशा महान ग्रंथांचे रसानुवाद केल्यानंतर त्यांना उर्दू शेरोशायरीनेही तितकंच आकर्षित करावं हे उर्दू काव्याचं मोठं श्रेय आहे! सौ. ठकार यांना प्रतिभा लाभली आसे हे निःसंशय! उत्तम गाणं आत्मसात होण्यासाठी 'काळजाला सुरांची जखम' व्हावी लागते सं म्हणतात. त्याप्रमाणे उत्तम काव्यनिर्मिती साठी 'शब्दांकडून घायाळ' व्हावं लागतं. तो 'दर्द' ठकार यांना उर्दू शेरोशायरीतून मिळाला; आणि मग निर्मितीखेरीज पर्यायच नव्हता! सौ. ठकार यांनी स्वतःच्या प्रतिभेतून स्वतंत्र द्विपदी लिहाव्यात असे मी सुचवू इच्छिते.

शेवटी, कुठलंही पान उघडून, वाचून आनंद घ्यावा असं हे पुस्तक सर्वांच्याच दृष्टीनं लक्षवेधी ठरेल; सूत्रसंचालन करणाऱ्यांना ते उपयुक्त वाटेल; आपल्या व्यक्तिमत्त्वाची वेगळी छाप पाडण्यासाठी यातील द्विपदी अनेकांना मुखोद्गत कराव्याशा वाटतील.

एकीनं सुगंधी फुलांची ओंजळ भरून आणली आनि दुसरीनं ती फुलं स्वतःच्या ओंजळीत घेऊन त्यांचा गजरा गुंफून रसिकांच्या हवाली केला, अशा या दोन 'अंजली'. एक लेखिका व दुसरी प्रकाशिका. अंजली ठकार व अंजली घाटपांडे. या दोघींना मनःपूर्वक शुभेच्छा देऊन मी माझे 'दोन शब्द' संपवते.

( आज या दोन्ही 'अंजली' आपल्यात नाहीत, याचे दुःख होते.)

ऑक्टोबर 2000

परीक्षण—संवेद—) काव्यसंग्रह)--कवयित्री-रश्मी घोलप

झाडावरून फूल खाली पडलं

नकळत मी ओंजळीत झेललं

फूल हळूच हातांना म्हणालं

‘ तुला नाही ना खरंच दुखलं? ’

या हळुवार ओळी आहेत ओतूर येथील मेडिकल डॉ. रश्मी घोलप या कवयित्रीच्या. ‘संवेद’ या कवितासंग्रहातील या चार ओळी. पण चारोळी नव्हे. या ओळींमध्ये स्पष्ट झालेला संवेदनशील आविष्कार या संग्रहातील कवितांमध्ये जागोजागी आढळतो. त्यांची कविता ही प्रथम त्यांची सखी आहे. कधी रुसणारी, कधी दडून बसणारी, पण पुन्हा प्रेमाने भेटणारी. ती कविता कधी अल्लडपणे रुणझुणत, तर कधी थैमानघालत येते असे त्या लिहितात. त्यांच्या कवितेत आई, मुले, जोडीदार यांना जसे स्थान आहे, तसेच सातपुड्याला, वाळवंटाला, मावळत्या सुर्याला, मेघाला...यांनाही स्थान आहे. कवयित्री अंगणात झाड लावते, त्याची वाढ डोळ्यांनी नव्हे, हृदयाने बघते.... झाडाबरोबर तीही फुलून येते... हे फुलणेच कवितेत छान बहरले आहे.

वाळवंटाच्या वर्णनाबरोबरच तेथील उपेक्षित जीवन व सहरी ऐषारामी जीवन यातला विरोधाभास कवयित्री टिपते. कुठे डाळ-बाटी तर कुठे तूप साखर! यातील तफावत तिला बेचैन करते. ती बेचैनी मग कवितेत उतरते..

वाळूच्या टेकड्या । वाळूचेच रस्ते

निसटते क्षण । वाळवंटी ।।

अशा ओवीबद्ध रचनेतून, भुळभुळत हातातून निसटून जाणारा काळकवयित्रीने अधोरेखित केला आहे. यावरून तिच्या चिंतनशीलतेची एक झलक आपल्याला दिसते. ‘मैत्री’ व ‘आत्तापर्यंत’ या दोन कविता त्यामुळे वाचनीय झाल्या आहेत. कवियित्री व्यवसायाने डॉक्टर आहेत त्या दृष्टीनेही काही वेगळ्या कविता संग्रहात दिसतात का ते मी शोधत होते; आणि अशी कविता सापडली पृष्ठ बासष्टवर. कवितेतील ‘ती’ प्रथम त्यांच्याकडे आली; तेव्हाच तिला जणू अखेरचा निरोप द्यायचा होता.....तिला ‘एड्स’ झाला होता...अखेर तिने आपले जीवन संपवून टाकले....कवयित्रीला अतिव दुःखात लोटून... कवितेचा आशय खरोखर हृदयस्पर्शी आहे.

अनुभवाच्या अभिव्यक्तीचे सामर्थ्य हीच कवीची खरी ताकद असते; ती क्षमता कवयित्रीकडे निश्तच आहे. मात्र कविता छंदोबद्ध असली तर ती अधिक लक्षात राहते, भावते; असे माझे मत आहे. कवयित्रीने मुक्तछंदच अधिक वापरले आहेत. असा कवितेतपरिणामकारकता नसते असे नाही; परन्तु मुक्तछंद व गद्य यातील सूक्ष्मरेषा कवीला कसोशीने सांबाळावी लागते हे लक्षात घेतले म्हणजे पुरे असते. पण ती कसरतच असते.

कविवर्य शंकर वैद्य यांची प्रस्तावना व कै. शांता शेळके यांचे आशीर्वादयुक्त प्रोत्साहन या संग्रहाला लाभले आहे ही कवितेची जमेची बाजू आहे.

दोन विरोधी चित्रे रेखाटलेले मुखपृष्ठ बरेच काही सांगून जाते. एकूण संग्रह वाचावासा वाटेल असाच आहे.

--संगीता जोशी

(प्रसिद्धी---लोकमत- मंथन पुरवणी—दि. 20 जुलै 2003)

Siddharth Bhagat-File--1

शब्दसिद्धा नदीच्या काठी.....

मला आठवतंय, गोव्याला गझल कार्यशाळा होती. मी सकाळी साधारण साडेदहापासून दुपारी एक पर्यंतमराठी गझल, तिचा इतिहास, माधव ज्यूलियन, नंतर सुरेश भटांची गझल असे विवेचन करीत; गझलेची वृत्ते, काफिया, रदीफ इ. तांत्रिक माहिती थोडक्यात सांगून पहिले सत्र संपविले. बाहेर भोजनासाठी व्यवस्था होती. तिथे जाता जाता मधेच थांबून कोणी कोणी बोलत होते, शंका विचारत होते. तेवढ्यात कोणीतरी आले व ओळख करून दिली, 'हे सिद्धार्थ भगत; गझलकार आहेत.'

मी म्हणाले, 'अरे, मी तर यांना शोधत होते; मी वाचल्या आहेत त्यांच्या गझला, आणि मी तर त्यांची 'फॅन' आहे!!'

त्यांच्या गझलांतून मी त्यांना ओळखतच होते, प्रत्यक्ष भेट त्या दिवशी गोव्याला झाली. त्यांनी मला पुस्तक भेट दिले, 'युद्धयात्रा'. ते तर माझ्याकडे होतेच. पण त्यांनी दिले व म्हणाले, 'असू द्या'...

अशी त्यांची गझल माझ्या मनात 'घर' करून बसली! पुढे त्यांचा निघालेला प्रत्येक गझलसंग्रह माझ्या घरी आला व मी त्या गझलेकडे अधिकाधिक ओढली गेले. त्यांच्या गझलेतच तशी ताकद आहे.

या गझलेमधे ही अशी कोणती ताकद आहे?असा मी विचार करते तेव्हा माझ्या मनात उत्तर येतं,ते त्यांच्याच एका मिनि-संग्रहाचं शीर्षक आहे!'अस्वस्थ मनाच्या नोंदी'!अस्वस्थ मनाच्या प्रांजळ नोंदी जीकविता ठेवते ती कविता चुंबकासारखी असणारच. कारण कवि-हृदयाची स्पंदनं रसिकहृदयाशी भिडण्यात कोठेही अडचण, अडथळा नाहीच.

मन अस्वस्थ का? असा पुढचा प्रश्न वाचकाच्या मनात नक्कीच येतो. यावेळी माझ्या मनात एक दृष्टांत आला. यापूर्वीही मी तो भाषणात सांगितला आहे, लेखात उल्लेख केला आहे, कारण तो कविता निर्मितीच्या प्रक्रियेशी अत्यंत मिळता जुळता व समर्पक आहे. तो इथे देत आहे.

त्यासाठी थोडे विज्ञानाकडे वळावे लागेल. अपृष्ठवंशीय प्राण्यांच्या वर्गीकरणात एक वर्ग असतो, ‘मॉलुस्का’. यांनाच मृदुकाय प्राणी असे म्हणतात. त्यांचे अंग मऊ, लुसलुशीत असते कारण त्यात हाडे किंवा तत्सम कुठला कठीण पदार्थ नसतोच. संरक्षणासाठी त्यांना बाहेरून कवच असते. ‘शिंपला’ हा पाण्यात राहणारा प्राणी (जलचर) या वर्गात मोडतो. व्यापारदृष्ट्या हा प्राणी फार महत्त्वाचा असतो. कारण दागिन्यांसाठी लागणाऱ्या खऱ्या मोत्यांची पैदास यांच्यामुळेच होते. ते कसे घडते? तर मुळात मृदुकाय असलेला हा प्राणी बाहेरून जर एखादा कण शिंपल्यात आला तर त्याच्या टोचणीमुळे तो अस्वस्थ होतो. तो टोचणारा कण वाळूचा असेल किंवा आणखी कसलाही असेल, तो बाहेर काढून टाकण्याची कुठलीही व्यवस्था,यंत्रणा शरीरात नसल्यामुळे निसर्गाने त्याची एक सोय केलेली आहे. ती म्हणजे अशा टोचणाऱ्या कणाभोवती त्याच्या शरीरातून एक स्राव पाझरतो; व तो या कणाभोवती जमतो. कणाला पूर्ण आच्छादून टाकतो. त्यामुळे टोचण्याची संवेदना कमी होऊन त्या प्राण्याचे दुःख कमी होते. तो पाझरणारा द्राव कालांतराने घट्ट होतो, प्राणी पाण्यात (समुद्र,नदी)असल्याने तो घोळवला जाऊन चकचकीतही होतो; हाच आपला मोती होय.

विस्ताराने हे सांगण्याचे कारण इतकेच की, कविता-निर्मितीची प्रक्रिया वरील क्रियेशी तंतोतंत जुळते, असे मला वाटते.कवीचे मन संवेदनशील म्हणजे मृदू असते. बाहेरचे, कोणाचेहीएखादे दुःख पाहिले की ते मन अस्वस्थ होते. त्यासंबंधीचे विचार त्याच्या मनात सतत घोळत राहतात. बेचैनी येते. टोचणी लागते. त्या भावनेभोवतीशब्द जमा होतात व उत्स्फूर्तपणेनकळत कविता बांधली जाते. केवळ दुःखच का? हृदयाशी भिडणारी कोणतीही उत्कट भावना कवितेच्या जन्माला कारणीभूत होते. (साधारणपणे कोणत्याही जन्माशी वेदनाच संलग्न असतात.) त्या निर्मितीनंतर बऱ्याचवेळा एकप्रकारचा ‘रिलीफ’ मिळाल्याचा अनुभव कवींना येत असतोच. अशी कविता मोत्यासारखीच मौल्यवान नाही काय?

प्रा. भगत यांच्या गझलांची निर्मिती अशाच प्रक्रियेतून झाली आहे, यात मला शंका वाटत नाही. त्यांच्या संग्रहांची नुसती शीर्षके पाहिली तरी त्यातून एकेक विचार प्रकट होतो. युद्धयात्रा, अस्वस्थ मनाच्या नोंदी, यापुढे माझी लढाई, पुन्हा एकदा बुद्ध हसावा म्हणून, वर्तुळकंसातील अवतरणे,....कळ कोवळी उठू दे.....

ही त्यांची पुस्तके वाचतांना कळते हा कवी आतून अस्वस्थ आहे. कोणताही कवी तसा असतोच. मन अस्वस्थ का होते? जेव्हा ते इतरांचीही वेदना सहन करू शकत नाही, तेव्हाच! त्या वेदना पाहून त्यांच्या ‘कोमल’ मनात उठणारी कळही कोवळीच असणार, यात काय नवल?

बाहेरचा गोंगाट हा येऊन माझ्या अंतरी

घेऊन जातो आतली काही क्षणाने शांतता....

बाहेरचा हा गोंगाट कुठल्या उत्सवाचा नाहीवा आनंदाच्या जल्लोषाचा नाही; कारण 'आतली शांतता' तशा गोंगाटाने विचलित होणार नाही. उलट जल्लोषात सामील होऊन आनंदाचेच तरंग उठले असते. म्हणून कळते, हा गोंगाट समाजात उठणारा आक्रोश आहे.समाजाच्या या आक्रोशाचं कारण सहज ध्यानात येण्यासारखं आहे; समाजात असणाऱ्या दऱ्या! त्या गरिबी-श्रीमंतीच्या असतील, जाती-जातींच्या असतील, प्रस्थापित-उपेक्षितांच्या असतील....किंवा आणखी दुसऱ्याही.समाज एकसंध नाही, समतल नाही; त्यात खाचखळगे, खड्डे, ठेचा देणारे दगड-गोटे आहेत. या समाजव्यवस्थेची एक चीड कवीच्या मनात भरलेली आहे, व ते अगदी स्वाभाविक आहे.

हासूनतुच्छतेनेवाडामलाम्हणाला

'तत्काळ झोपड्या ह्या पाडा' मला म्हणाला....

असाच आणखी एक शेर---

झोपड्या दूर आक्रोशती

शांतता राखती बंगले......

समाजात वाडे,त्यांचे दिंडी-दरवाजे अजून बंद आहेत!झोपड्यांचे अस्तित्वही त्या वाड्यांना खुपते आहे!वर्षानुवर्षेही दरीबुजत नाही, बुजवली जात नाही,हे दुःख आहे. कवीने वाडा आणि झोपडी या सुंदर प्रतिकांचा वापरयेथे केला आहे.दुसऱ्या शेरातझोपडी व बंगल्यांचा उल्लेख आहे. बंगल्यातील श्रीमंतांना झोपड्यांचा आक्रोश ऐकूही येत नाही, हे केवळ 'दूर' हा शब्द वापरून कवीने प्रभावीपणे सुचविले आहे. बंगल्यांमधे 'शांतता आहे' असे न म्हणता, शांतता 'राखती' असे म्हटले आहे. यावरून कवी स्पष्ट करतो की, आक्रोश ऐकू येत नाही, असं नाहीए; पण 'बंगलेवाले' 'काणाडोळा' करत आहेत!छोट्या वृत्तातील (छोटी बहर) साधे व मर्यादित शब्द केवढा अर्थ सामावून आले आहेत! हे कवीचे कसब आहे.

गझल ही प्रतिकांची भाषा असते; शेर नेहमीच सरळ अर्थ सांगणारा असतो, असे नाही. प्रतिकांच्या आडून तो खूप काही सांगून जातो. लक्ष्यार्थ , व्यंग्यार्थ हे रसिक वाचकाने

शोधायचे असतात. असे शेर हे गझलेचे सौंदर्य असते. भगत यांच्या संग्रहांत असे भरपूर शेर आढळतात.

आपापले उभारी तंबू स्वतंत्र जो तो

बांधून ठेवणाराआणूकुठून धागा....

जातींमधल्या पोटजाती किंवा चळवळीतील वेगवेगळे गटही जर एकत्र नांदत नसतील तर समाजविखुरण्यापलीकडे दुसरे काय होणार?एकात्मतेला मिळालेला हा शाप आहे. वैयक्तिक स्वार्थ,किंवा अवाजवी महत्त्वाकांक्षा यामुळे गट फुटतात, आणि चळवळीचाच तोटा होतो. समजूत कोणाचीच पटत नाही, आणि असे तंबू थोड्याशा विपरीत वाऱ्यानेही मग उडून जातात. कवीला याचे दुःख आहे, की समान ध्येयानेही असे लोक एकत्र रहात नसतील तर आणखी कोणत्या धाग्याने यांना बांधायचे?

अशा सांधता न येणाऱ्या समाजाचा फायदा राजकीय लोक अचूक करून घेतात. फोडा आणि झोडा, ह्या नीतीची (अनीतीची?) ओळख व शिकवण ब्रिटिशांनीदिली खरी पण आपण आता त्या कलेत चांगलेच ‘माहिर’ झालो आहोत!

कुठलाच गाव आता असणार शांत नाही

निवडून काल आले चिवडून जात वैरी....

जातींवर आधारित निवडून येणाऱ्या पुढाऱ्यांची वृत्ती संकुचित असणार, हे उघडच असते. त्यातून मग भेदाभेदाचेच राजकारण होणार, गावात तट पडणार व अशांतता राहणार याची कवीला चिंता वाटते, तीच शेरातून व्यक्त झाली आहे. कारण गावात असं वातावरण असेल तर देशाचे काय होईल हा विचार त्याला अस्वस्थ करीत आहे. निवडून येणारे कसे वागतात,ते सर्वांनाच ठाऊक आहे.

देशोधडीस लागो हा देश काय पर्वा

ज्याला जमेल त्याने तैसा लुटून खावा...

किंवा---

देश सारा मालमत्ता मानून त्यांनी

चालुनी येताच संधी लाटला होता....

राजकीय पुढाऱ्यांबद्दल बोलावे तेवढे थोडेच आहे! कवीच्या मनात त्यांच्या वर्तनाबद्दल सल दिसून येतो; व तो व्यक्त होत राहतो.

दुष्काळ जेव्हा बाळसे चौफेर हा लागे धरू

वाढावया लागे किती त्यांची कशी पोटे पहा...

सलग दुष्काळासारख्या कितीतरी समस्या शेतकऱ्यांसमोर उभ्या असतांना त्याची झळही पुढाऱ्यांना व प्रस्थापितांना पोहोचत नाही. जे अन्न पिकवितात, त्यांच्यावरच उपाशी राहून आत्महत्त्येची वेळ यावी,हे लाजिरवाणे आहे. दुष्काळ असूनही 'यांची' पोटे नुसती सुटलेलीच नाही, तर वाढतही जातात हा विरोधाभास कवीने अधोरेखित केला आहे. आणखी एक शेर---

जरी हे उपाशी दिसे गाव सारे

तरी घास त्यांचे तुपाशीच आहे.....

शेतकऱ्यांविषयी कवीचे मन अत्यंत संवेदनशील आहे. वरील दोन्ही शेरातील 'ते' म्हणजे कोण? तेच ते प्रस्थापित, श्रीमंत,किंवास्वतःला उच्च मानणारे. मा. सुरेश भट यांनी 'त्यांची व्याख्या एका ओळीत केली आहे; 'ज्यांची सुखे दुसऱ्यांच्या दुःखावर आधारित असतात' ते हे प्रतिष्ठित लोक.

मातीत राबूनही ज्यांच्या उपाशी पिढ्या

मेलेत जे कैकदा आता मरावे कसे....

कापूस तूर ज्वारी येण्या वयात आधी

हाही लुटून नेला हंगाम पावसाने.....

तापल्या तव्यावरी हात फार भाजले

मात्र दूरडीत का एकही न भाकरी?...

शेतकऱ्यावर येणारी, कधी अस्मानी तर कधी सुल्तानी संकटे कवीचे मन ढवळून टाकतात.

आजूबाजूच्या अशा परिस्थितीतही कवीच्या मनात हळुवार भावनांना स्थान आहे. शेतकऱ्यांबद्दल उपेक्षितांबद्दल, गावाबद्दल-देशाबद्दलही त्याचे प्रेम दिसते; तसेच गुलाबी प्रेमाच्या छटाअधून मधून फ्लॅश होऊन जातात...

वार्ता तुझी जराही घेऊन वात येता

येते फुलून माझ्या दारात रातराणी....

तिची वार्ता सुगंध पसरवून जाते; पण विरहात ती नसतेतेव्हा?

धरती सुनी, नभही सुने, तुजवीण गे मनमोहिनी

स्मरणात तू, नयनात तू, हृदयात तू दिनयामिनी....

अशी प्रेमव्याकूळ अवस्थाही कवीच्या लेखणीतून लयबद्ध शब्दात अलगद उतरते. दिनयामिनी हा शब्द इथे शोभून दिसतो आहे.

ही मनमोहिनी प्रसन्न करून घ्यायची असेल तर काहीही करायला प्रेमी तयार आहे.

याचकास एकदा भीक हीच घाल तू

अंथरेन जीव मी त्यावरून चाल तू....

मागताक्षणी तुला अर्पिले कधीच जे

या क्षणी करायचे ते मला बहाल तू....

दोन प्रेमी एकत्र येतात, पण कालांतराने विसंवादही हळूच त्यांच्या नात्यात शिरतो.

ते गाणे नव्हते उरात रुतले केव्हाच माझ्या कधी

ताराही जुळल्या परी कसनुसा आवाज बेसूर हा.....

असा अपेक्षाभंगाचा बेसूर आवाज शब्दात बद्ध होतो. हा शेर ज्या गझलेतला आहे, तिचं वैशिष्ट्य म्हणजे ही गझल ‘शार्दूलविक्रीडित’ या वृत्तातील आहे. एकूणच, सिद्धार्थ भगत यांचे वृत्तांवर विलक्षण प्रभुत्व आहे.गझलांसाठी वापरली जाणारी आवर्तनी वृत्ते तर ते लीलया वापरतातच; पण शार्दूलविक्रीडित सारखी अनावर्तनी वृत्तेही ते सहज हाताळतात. शिवाय तशा रचनेत कुठेही शब्दांची ओढाताणही दिसत नाही.

प्रेम, प्रेयसी, विरह अशाविषयांवरीलअनुभव व्यक्तकरणारे शेर भगत यांच्या लेखणीतून क्वचितच उतरतात. कारण त्यांनी स्वतःभोवती कुंपण घातलेले नाही; त्यांची दृष्टी बाहेर वळलेली आहे. दुःख, व्यथा याद्वारे ते इतरांशी अधिक जवळीकीने जोडले गेले आहेत.

युगवेदनाच माझ्या जर बोलते मुखाने

पडसाद व्योमव्यापी उठतील जाणतो मी....

येथे उर्दू शायर साहिर लुधियानवीची आठवण होते.तो प्रेयसीला म्हणतो,‘और भी तो गम है मुझे इक तेरे गम के सिवा...’असं साहिरनंही एके ठिकाणी म्हटलं आहे.फैज अहमद ‘फैज’ यांचाही अशा अर्थाचा शेर आहे. प्रेम या विषयांखेरीज लिहिण्यासारखं भगत यांच्याकडे खूप काही आहे, हे त्यांचे संग्रह वाचून कोणालाही सहज पटेल. युगवेदना व व्योमव्यापी हे दोन शब्द मला फार महत्त्वाचे वाटतात. यात काळाची व्यापकता व पडसादांची असीमता चित्रित करण्यात तर कवी यशस्वी झाला आहेच; त्याच बरोबर त्याचा आत्मविश्वासही व्यक्त होत आहे. ‘जाणतो मी!’ यातून तो दिसतो.

स्वतःच्या कर्तृत्वावरही कवीचा असाच विश्वास मला पुढील शेरात दिसून आला---

चंद्राला आकार दिला अन्

मी त्याला वाटोळा केला!....

अशा प्रकारची नवीन कल्पना शेराचे सौंदर्य वाढवत असते.

*****

'यापुढे माझी लढाई' हा सिद्धार्थ भगत यांचा तिसरा संग्रह 2009 साली आला.त्यात त्यांची गझल 'रुंदावलेली' तर आहेचवतिची'खोली'ही अधिक वाढलेली दिसते. त्यांच्या विचारांचा आयाम अधिक विस्तारलेला दिसतो.

क्षितिजास अंगण आणखी नभ हेच छप्पर मानतो

दुनियेस या अवघ्या अता अपुलेच मी घर मानतो....

कवीची दृष्टी व्यापक झाल्यावर त्याला आजूबाजूचे जग, त्यातील माणसे चिंताजनकरीत्या बदललेली दिसतात. केवळ दिसतात, असे नव्हे तर ते वास्तव आहे हे त्याला जाणवते.

समृद्ध सारी कालची ओसाड झाली जंगले

अन् जंगली आता मला माणूस जो तो वाटतो....

आता जंगलच गावात किंवा शहरात आलं आहे, असं भयावह निरीक्षण कवी नोंदवितांना दिसतो. त्यामुळेच---

सारखा अस्वस्थ होतो मी कशानेही अता

अन् कधी लाभेल माझ्या चैन जीवाला इथे.....

इथे , न रेखाटताहीसामाजिक चित्र कवीनेअध्याहृतपणे उभे केले आहे!

सामाजिक विषमता हे कवीच्या अस्वस्थतेचं महत्त्वाचं कारण आहे.

सारखा लढतो जरी रोज एक नवा लढा

मी किती पचवायचे हे पराजय सांग ना!

'युद्धयात्रा' करूनही पराजय पदरी पडल्यावर कवीनेलढाई स्वतःच्या बळावर पुकारण्याचे ठरविले. त्याला कारणही तसेच आहे. सर्वांनी वेगवेगळे तंबू ठोकले ही मुख्य परिस्थिती; त्यातच न्यायाची आशाही दुरावलेली!

न्यायदेवीला उद्देशून कवी विचारत आहे. न्यायदेवी असा उल्लेख शेरात आलेला नाही; पण संदर्भावरून वाचकाने ते समजून घ्यायचे आहे.

अन्याय होतो केवढा अन् तू मिटावी लोचने?

गे माय माझे! सांग तू दारी तुझ्या देरी किती!.....

न्यायदेवतेच्या डोळ्यांवर असलेली पट्टी कवीला खुपते आहे. 'अगं, माझे आई!' असं हताशपणे तो तिला संबोधित करत आहे. 'भगवान के घर 'देर' है पर अंधेर नहीं है' हे माहीत आहे पण किती देर? किती उशीर? असा उद्विग्न सवाल कवीने केला आहे.

नियोजने ही बदला तफावतींची सगळी

तिथे विमाने उडती, इथे खटारा मजला....

कुठे कुठे तो शिरला, कुठे मुळी ना फिरला

दिसे पुन्हा गोंधळला उजेडवारा मजला....

राजकीय व सामाजिक वास्तव या दोन शेरात स्पष्टपणे शब्दबद्ध झाले आहे. 'नियोजने' या शब्दावरून सरकारकडे केलेला निर्देश स्पष्ट होत आहे.कुठल्याही योजनेत उपेक्षित व शोषितांसाठी, ग्रामीण भागासाठी काटकसरीने पुरवठा व शहरी, प्रस्थापित यांच्यासाठीसुखसोयींच्या योजना असे चित्र नेहमीच दिसते. त्यावर कवीने बोट ठेवले आहे. विमान व खटारा या प्रतीकांचा चपखल वापर येथे केला आहे. उजेड आणि वारा ह्या तर निसर्गाच्या देणग्या!म्हणजे मूलभूत सुविधाही ज्या वर्गाच्या वाट्याला येत नाहीत त्या लोकांनी काय करायचं? या सुविधाही पक्षपात करून सगेसोयऱ्यांना दिल्या जातात; बाकीचे वंचितच राहतात. उजेड व वाऱ्याला तर फक्त समानतेचं तत्त्व माहीत आहे. पण त्यांनाहीसोयी प्रमाणे वळविल्यामुळे तेही गोंधळले आहेत! गझलेत दोन ओळीत, प्रतिकांच्या साहाय्याने सखोल अर्थ सामावण्याची किती शक्ती असते, हे कवीनं समर्थपणे दाखवून दिलं आहे.

अशा आढळणाऱ्या तफावतीबद्दल कवी सरळ सरळ प्रश्नकरतो आहे---

मला प्रश्न हा ऐसा कधीचा सतावतो

तुझे ताट सोन्याचे नि माझे कथील का...

कुणी राहिले मागे जगाच्या कितीतरी

पुढे लोक गेलेले जरा थांबतील का?....

इथे मला सुरेश भट यांच्या एका शेराची आठवण होते—

ते लोक होते वेगळे घाईत जे गेले पुढे

मी मात्र थांबुन पाहतो- मागे कितीजण राहिले!—)सुरेश भट)

पुढे गेलेल्या लोकांना जाऊदेऊन, काही जण नक्कीच मागे राहिलेल्या लोकांसाठी थांबतात, ही दिलासा देणारी हकीगत आहे!

अशा पुढे जाणाऱ्यांना भगत म्हणतात,

तुला व्हायचे तर सुखे कृष्ण हो ना

नको मात्र माझा करू तू सुदामा!

तू राजा होण्यास माझी काही हरकत नाही; पण मला रंक करू नकोस!कृष्ण- सुदामा च्या प्रतिकांतून 'तफावत' स्पष्ट होत आहे. मला अशा अर्थाचं एक हिंदी चित्रपट- गीत( चित्रपट-आरती)आठवलं.

बने हो एक खाक से तो दूर क्या करीब क्या

लहू का रंग एक है, अमीर क्या गरीब क्या....

गरीब है वो इसलिये कि तुम अमीर हो गये

कि एक बादशाह हुआ, तो सौ फकीर हो गये

खता है ये समाज की भला-बुरा नसीब क्या.....(मजरूह सुल्तानपुरी)

अगदी तीच भावना सिद्धार्थ भगत व्यक्त करत आहेत. ही दरी अस्तित्वात आहे हा समाजाचा दोष आहे. तो दूर करण्याचा प्रयत्नही समाजानेच केला पाहिजे.

पण समाज ही जबाबदारी स्वीकारतांना दिसत नाही व समस्या होत्या तशाच राहतात.

उजाड एकेक झाड झाले, कुठे विसाव्यासही न जागा

उन्हात होतो, उन्हात राहू, उन्हात काढू हयात आम्ही.....

अशा उन्हात, उपेक्षित तडफडत असतांना त्यांना पाण्यासाठीही बंदी करणारे जे होते, त्यांना 'माणूस' म्हणवून घेण्याचा तरी अधिकार आहे का? (हिरण्यकेशी या वृत्तातल्या ओळीपाच-पाच अक्षरांचे तुकडे तोडून वाचतांना खरंच आनंद मिळतो!)

काय नाही जाहले देशात या

पेटले होतेच पाण्याचे तळे....

असाच दुसरा शेर--

घनगर्द पिंपळाची जपतो उरात छाया

नयनी परंतु माझ्या जळते महाड आहे.....

असे होणे, ही समाजाला लांछनास्पद गोष्ट आहे! सगळयांच्यारक्ताचा रंग जिथे लाल आणि फक्त लालच आहे, तिथे हे भेद कशासाठी?

या भेदाचे शल्य भगत यांना टोचते, टोचत राहते व त्यांच्या कवितेत आक्रोश उमटतो. मात्र त्यांनी तो फार संयतपणे, तरीही प्रभावीपणे व्यक्त केला आहे.

उजाड एकेक झाड....हा शेर याही अर्थाने सुंदर आहे, की त्याची भाषा ओघवती आहे. उर्दूत ज्याला 'रवानी' म्हणतात तो गुण यात आहे.

ज्यांना ही शल्ये टोचत नाहीत त्यांची गणना कवी जिवंत माणसांतही करीत नाही,

उठला न ओरखडा कधी हृदयावरी जर त्यांचिया

असुनी जिवंत तयांस मी नुसते कलेवर मानतो!

संवेदना हेच तर चेतनेचं लक्षण आहे. संवेदनाहीन असेल तो माणूस नसून प्रेतच की!

भेदाभेदाची ही परिस्थती केव्हातरी संपेल अशी आशा कवीच्या मनात जागतेय् ही चांगली गोष्ट आहे.

काळरात्र ही सरेल आज वा उद्या

मात्र तेवतीच ठेव तोवरी शमा....

चळवळीची मशाल, उद्दिष्ट साध्य होईपर्यंत धगधगतीच ठेवली पाहिजे. पण कवीला कुठेतरी लोकांकडूनढिलाई झालेली दिसते; व तो म्हणतो---

सारेच लोक आता संतापहीन झाले

मी ठेवली तरीही माझी वळून मुष्टी!

कवीच्या या अवस्थेत त्याला सावरणारी कोणती तरी शक्ती हवी की नको? सुदैवाने त्याला तशीप्रेमाची शक्ती मिळाली आहे.

ही उन्हाळी हवा, गारवा तू

दुःखबेजार मी अन्दवातू....

भर्कटे नित्य माझेच तारू

शीड सांभाळ हे नाखवा तू....

मधून मधून शेरातून येणारी हळुवार भावनांची अशी झुळूक वाचकालाही शांतवून जाते.

प्रेमाची साथ कवीच्या हृदयात वात्सल्यही जागृत करून जाते. भगत लिहितात,

हे पेटलेले भोवती मी रान जेव्हा पाहतो

ओठांवरी माझ्या तरी येतात अंगाईगिते....

या शेरात पुढल्या पिढीविषयीची चिंता व्यक्त होत आहे.बालकांना या पेटलेल्या रानाची झळही लागू द्यायची नाही; त्यांना शांत झोप आलीच पाहिजे. कारण न जाणो, उद्या कोणत्या वास्तवाला त्यांना सामोरं जावं लागेल! ही काळजी कवीनं अव्यक्त ठेवून व्यक्त केली आहे.

त्यासाठी हेतुतः ‘अंगाईगीते’ शब्द वापरला आहे. मात्रापूर्तीसाठी अंगाईगीते मध्ये ऱ्हस्व ‘गि’ करावा लागला ,तरी हरकत नसते.

वरील भीती भगत यांच्या मनात दडून राहण्याचं कारण? कारण पुढच्या शेरात आहे---

दवा नि दारू सुरूच आहे, निदान झाले परी न काही

खचून गेल्यापरीस बोले, सचिंत होऊन लोकशाही....

......आणि हाही शेर ---(वाचन सुलभ व्हावे यासाठी मी स्वल्पविराम वापरले आहेत.)

ह्या युगाने नवे, प्रश्न केले उभेअन् समस्या नव्या, निर्मिल्या केवढ्या

मांडली पाहिजे, मी नव्याने अता, सर्व फेटाळतांना जुनी उत्तरे.....

नव्या समस्यांना दिलेली जुनी उत्तरे फेटाळून नवी उत्तरे कवीला शोधायची आहेत!हे जबाबदारीचे काम त्यांना नव्या पिढीसाठी अंगावर घ्यायचे आहे; नव्हे त्यांनी घेतले आहे!

हे वरील दोन शेर रचनेच्या दृष्टीनेही वाखाणण्यासारखे आहेत. यातील पहिला शेर (दवा नि दारू....) हा हिरण्यकेशी या वृत्तात आहे, जे वीस अक्षरांचे मोठे वृत्त आहे. आणि दुसरा शेर (ह्या युगाने...) हा असाच चोवीस अक्षरांच्या स्वैरिणीक्रीडन या वृत्तात बांधला आहे. अर्थात पूर्ण गझलाच त्या त्या वृत्तात आहेत. वृत्तांवर प्रभुत्व असल्यामुळेच हे जमले आहे, हे मुद्दाम नोंदवावेसे वाटते.

समस्या निर्माण करणारा हा समाज, म्हणजे अर्थात समाजातील लोक यांच्याबद्दल कवीच्या मनात काय भावना आहेत हेही लक्षात घेण्याजोगे आहे. त्यासाठी पुढचा शेर---

वार केल्यावीण व्हावे लोक हे घायाळ सारे

शस्त्र ऐसे दे मला तू, मी अहिंसेला म्हणालो...

त्या लोकांबद्दल मनात राग तर नक्कीच आहे; पण वार न करता त्यांना घायाळ करायचं आहे; आणि तसं ‘शस्त्र’कवी अहिंसेकडे मागतो आहे! वा, वा! इतका सुंदर शेर, इतर कुठे क्वचितच वाचायला मिळेल!यातून कवीच्या मनाची विशालता प्रतीत होत आहे. खूप काही सोसलं पण कोणाबद्दलही मनात सूड-भावना नाही; वार करून, कशाचा बदलाही घ्यायचा नाही, फक्त

घायाळ करून जाणीव मात्र करून द्यायची; हा खूप उदात्त विचार आहे! इथेच दिसते कवीच्या मनाची मृदुता!!

याच गझलेत,कवी एका शेरात कोणाला निमंत्रण देत आहे? पाहू या—

गाठली साठी तरीही आपुल्या झाल्या न भेटी

ये कधी वस्तीत माझ्या आडवाटेला, म्हणालो....

हा शेर कुणा जुन्या प्रियेसाठी नाही; देशाला मिळालेल्या स्वातंत्र्याला उद्देशून हा शेर आहे, अशी माझी खात्री आहे. स्वातंत्र्य मिळून साठ वर्षे होऊन गेलीत ( ही गझल लिहिली,तेव्हाचा काळ) पण या वस्तीत काय सुधारणा झाली? एव्हाना अशी वस्ती उरायलाच नको होती; ती मुख्य गावात, शहरात सामावून जायला हवी होती. पण ते घडलं नाही हे दुर्दैव आहे!

'युद्धयात्रा' या संग्रहात जसे शेतकरी बांधवांसंबंधी शेर आढळतात, तसे याही संग्रहात आहेत.

कापसाची रास ज्याच्या अंगणी

वस्त्र त्याच्या फाटके अंगात का?....

लोळतो राशीतल्या धान्यात जो

भाकरी त्याच्या नसे ताटात का?.....

वास नाही ज्यास मातीचा मुळी

सूत्र शेतीचे अशा हातात का?....

किती अर्थपूर्ण असे हे शेर आहेत! शेवटचा शेर तर आपल्या देशातल्या अनावस्थेवर नेमके बोट ठेवत आहे. ज्याला शेतीचा 'गंध' नाही असा आपला कृषिमंत्री असू शकतो. जो ग्रॅज्युएटही नाही तो आपला शिक्षणमंत्री असू शकतो! ही जरा अतिशयोक्ती असेल; पण याच्या जवळपासची परिस्थिती होऊन गेली आहे.

विचार आचार भिन्नतेने भ्रमिष्ट झाला समाज सारा

बघू नये ते बघून माझ्या समस्त देहात जाळ होतो.....

विचार, उच्चार व आचरण (कृती) यात एकवाक्यता असायलाच पाहिजे असं अध्यात्मही सांगतं. किंबहुना तेच सत्य असतं. दांभिकांना ते कसं जमणार?मग सत्याची चाड असणाऱ्या कवीला ते खटकणारच. म्हणून विचार, उच्चार (बोलणे) व कृती यात तफावत पाहिली की कवीच्या अंगाची लाही लाही होत आहे.

(हुंडा न घेन्याची शपथ घेणारे लोक आपली वेळ आली की दुसऱ्या स्वरूपात वधूपक्षाला लुटतात, हा अनुभव आपण घेत असतो. यालाच म्हणायचं दांभिकता.)

अशा व्यक्तींसाठी कवीचा हा एक शेर आहे...

लाख लावू द्या तयांना चेहऱ्यावरती मुखोटे

मी परी हे जाणतो की कोण व्यक्ती कोण वल्ली!....

****

Siddharth Bhagat- File 2

2012 मध्ये प्राचार्य सिद्धार्थ भगत यांचा चौथा गझलसंग्रह प्रसिद्ध झाला; त्याचे शीर्षक होते,“--आणि पुन्हा एकदा बुद्ध हसावा म्हणून! ”

मी आधी म्हटलेच आहे, की या कवीच्या संग्रहांची शीर्षके वेगळीच असतात! इतर शीर्षकांच्या बाबतीत जसे झाले तसेच याही वेळी झाले. मी विचार करत राहिले, हे शीर्षक देण्यामागे काय विचार असावा?बुद्धाचे हास्य किंवा स्मित याभोवती काहीसे गूढ वलय आपल्याला नेहमीच जाणवते.बुद्धाची मूर्ती आपण पाहतो तेव्हा तेव्हा बऱ्याचदा ती गंभीर अशीच पाहतो. ती नेहमी चिंतनात मग्न अशी दिसते; दिसते म्हणजे असते. ते स्वाभाविकच आहे.दुःखाचे दर्शनतरुण वयात घेतल्यामुळेच राजकुमार सिद्धार्थ विरक्त झाला व त्याने राजप्रासाद सोडून दिला! दुःख का? याचीच चिंता व ते कसे दूर करता येईल अशा चिंतनात असणारी त्याची मूर्ती विचारमग्न घडविली जाते. कारण अवघ्या मानव जातीचीच ते काळजी वाहत होते. असे गौतम बुद्ध क्वचितच हसले असतील! मात्र काही ठिकाणी त्यांच्या मूर्तीच्या चेहऱ्यावर अतिमंद स्मित दिसते, व ते फार फार विलोभनीय असते.

आणखी एक संदर्भ मला नंतर आठवला. भारताने जेव्हा पहिली अणुचाचणी पोखरण मध्ये केली, त्याचा ‘कोड-वर्ड’)चाचणी यशस्वी झाली,असा संदेश देणारे शब्द) “बुद्ध हसला” हाच होता. मग पुन्हा एकदा बुद्ध हसावा असे कवीला वाटते, यामागे माझे विचार सांगते. बुद्धांची त्रिसूत्री आपण सर्व जाणतोच. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता, ही ती त्रिसूत्री. जर भारतात ही त्रिसूत्री खऱ्या अर्थानेप्रस्थापित झाली तर बुद्धांच्या चेहऱ्यावरनक्कीच ते सुंदर स्मित पाहायला मिळेल. त्यासाठी ही त्रिसूत्री प्रस्थापित व्हावी असे कवीला म्हणायचे असेल.

दुसरे असे की गौतम बुद्ध हे शांततेचे पुरस्कर्ते होते.अणूचा वापर फक्त शांततेसाठीच हे भारताचे ब्रीद, डॉ. भाभा व पं. नेहरूंपासून चालत आलेले आहे. जगाला हा शांततेचा संदेश देण्याचाही उद्देश चाचणीमागे असावा, असे म्हणता येते. कारण आपली क्षमता दाखविल्याशिवाय दरारा राहणार नसतोच. म्हणून अशा चाचण्या, त्यांच्या आडून शांतता राखण्याचा संदेश देणे हाच असतो. हाही अर्थ कवीच्या मनात असावा. माझे शीर्षकाबाबतचे कुतूहल इथे येऊन थांबले; याऊपर कवीच काय ते सांगू शकतील.

या संग्रहातील पहिल्या गझलेतील पहिलाच शेर मला प्रथम उद्‌धृत करावासा वाटतो.

झाला असह्य आता येथील कोंडमारा

आहे अजून माझ्या श्वासांवरी पहारा...

त्रिसूत्री मधील पहिलंच तत्त्व, स्वातंत्र्य त्यालाच छेद गेलेला आहे, असं कवीला यात म्हणायचं आहे. माणसाला श्वास घेण्याचीही मोकळीक नसणं याचा अर्थ तोच होतो ना? इथल्या 'सूर्यतेजाचे' कोणी कितीही गोडवे गावोत, पण अहो, या तेजामुळे हजारो तारे दिपून गेले,त्यांचे काय? तेही स्वयंप्रकाशी होते, पण निष्प्रभ ठरले! स्वातंत्र्यसूर्य आला खरा पण काहींना त्याने अंधारातच ठेवलं, ही कवीची खंत आहे.याच गझलेत हा पुढील शेर—

हे सूर्यतेज कोणा वाटेल और काही

जातोदिपूनयेथे एकूणएक तारा....

म्हणूनच या 'स्वातंत्र्याला' काही अर्थ नाही असं कवीला वाटतं. हे शेर परतंत्रता व गुलामी कडेच निर्देश करत आहेत. पुढील कवितेत कवी लिहितो--

घेतली दीक्षा अम्ही अन् बुद्धगामी जाहलो

काळरात्रीतूनतेव्हावाटलेकीजागलो....

----समाजाच्या रेट्यामुळे आम्ही परिवर्तनदेखील स्वीकारलं पण आमच्या सद्यस्थितीत काहीच फरक पडला नाही,असं कवीनं स्पष्टपणे म्हटलं आहे. पुढील कडव्यात कवी म्हणत आहे,

वाहिले ओझे किती अन् साहिली दुःखे किती

संकटांची साथ होती वादळेही भोवती

केवढा अंधार होता भोवताली माजला

वाटले कोणीतरी की सूर्यही हा झाकला

तू दिला आवाज आम्हा आणि आम्ही धावलो

घेतली दीक्षा अम्ही....

या संग्रहात फक्त गझला नसून काही कविताही आहेत, त्यातील एका कवितेतील हे वरील एक कडवे आहे. देवप्रिया वृत्त कवीने वापरले आहे. काही मुक्तके, चारोळया सुद्धा अधून मधून आढळतात. पण सगळया कविता वृत्तबद्ध आहेत. अपवाद म्हणून 2-3 कविता मुक्तछंदात आहेत.

आणखी एका कवितेत वरील भाव कवीने व्यक्त केला आहे.

हेएकदाविचारू ऑगष्टपंधराला

गावात का न माझ्या स्वातंत्र्यसूर्य आला..

अंधार माजलेला चोहीकडे कधीचा

अन् काजळून गेला हा सूर्य ही नभीचा

गद्दार ते निघाले ज्यांच्या कमान हाती

अन् टाकल्या तयांनी ह्या फुंखरून वाती

मी काय जाब देऊ येईल त्या उद्याला....

ही चौसष्टावी कविता आनंदकंद या वृत्तात लिहिली आहे. कवीच्या रोमात वृत्ते भिनलेली आहेत, म्हणूनच त्यांची कविता बांधेसूद आकार घेऊनच लयीच्या अंगाने नाचत नाचत कागदावर सहजतेने उतरत असते! जणू कविता- मोहिनीच!!

गझल ही प्रथमतः एक कविताच असते; गझलकार हा प्रथम एक उत्तम कवी असावा लागतो, असे म्हणतात. ते प्रा.सिद्धार्थ भगत यांनी पूर्णतः सिद्ध केलं आहे.

हे एका गझलेचे काही शेर...

कोणतीही नको यापुढे सूचना

या, करू या चला वादळी गर्जना...

कोंडमारा किती रोज होतो इथे

श्वास घेणे जणू केवढी साधना...

हे कुणाशीतरी बोलले पाहिजे

व्यक्त केलीच मी पाहिजे भावना....

बुद्ध माझ्यासवे राहतो हिंडतो

मी न केली कधी वेगळी वंदना....

तीन-तीन अक्षरांचा गट करून ही गझल छान ठेक्यात वाचली तर किती आनंद मिळतो , तो घेऊन पाहावा. ही रचना स्त्रग्विणी वृत्तात आहे.

पहिल्याच शेरातला कोंडमारा इथेही आला आहे. आणि कोंडमारा किती? तर श्वास घेणे ही सुद्धा एक 'साधना' ठरावी! एखादा साधू जेव्हा कठोर साधना करतो तेव्हा आपल्या डोळयांपुढे कसं चित्र येतं? आपण ऐकलेलं असतं तसं! साधू एका पायावर उभा आहे; अन्न पाण्यावाचून तसाच आहे, उपाशी! म्हणून कृश झालेला, वाढलेल्या दाढी-मिशा... असा तो साधक! पण इथे साधं जगण्याला सुद्धा त्या तपश्चर्येइतके कष्ट पडताहेत असं कवीला सुचवायचं आहे. म्हणून मला ही ओळ फार अर्थपूर्ण वाटते. साध्या नैसर्गिक गोष्टीसाठी केवढी तपश्चर्या! कवीच्या मनातील समाजाबद्दलचं दुःख पुन्हा अधोरेखित झालं आहे!

अशाविषम वातावरणात जे जगतात, त्याला काय 'जीवन' म्हणायचे का? हा कवीचा प्रश्न अप्रस्तुत बिलकुल नाही!

यास आयुष्य कोणी म्हणो

लागतेरोजप्यावेजहर...

याबद्दल कवी कोणालाहीउघड दोषी ठरवत नाहीए; तो म्हणतो,

सामावतील सारे या अंतरात माझ्या

याहून मात्र मोठी माझी कुटीर नाही....

कवीच्या अंतःकरणात सर्वजणच सामावू शकतील! झोपडी मात्र खूप लहान पडेल! मनाची, विचारांचीविशालता येथे स्पष्ट होत आहे. त्याच बरोबर झोपडीचा उल्लेख आल्यामुळे विरोधाभासातून गझलेचं सौंदर्य वाढतं व समाजाची हलाखीची परिस्थितीही अधोरेखित केली जाते.

सतत दुसऱ्यासाठी काहीतरी करण्याचा विचार कवीच्या मनाच्या पृष्ठभागावर असतो. एवढेच नाही तर समाजात असे जे कोणी आहेत की जे इतरांसाठी स्वतःचं सुरक्षित जीवन सोडून देऊन संकटात उडी घेतात, त्या निःस्वार्थी महात्म्यांच्या साठी हा कवीआपल्या जीवनावर उदार झालेला बघायला मिळतो!

आयुष्य नावे त्यांचिया मीआपुलेकेलेबघा

कोणातरी साठी कधी ज्यांनी किनारा सोडला....

कवीसारखेच ‘अस्वस्थ’ लोक त्याला भेटले, सर्वांनी मिळून संघर्ष केला तरीही फारसे यश आले नाहीच. तेव्हा कवी लिहितो आहे,

मी पराभवांची त्या नोंद ठेविली नाही

मात्र सारखा आलो, झुंज देत काळाशी...

बरोबरच्या कुणीतरी नमते घेण्याचा सल्ला असेल पण कवी आपल्या भूमिकेवर ठाम आहे.

झुकणे मला न कोठे जमले कधीच नाही

मज उद्धटास ऐशा अदबी नकोस सांगू.....!

जेव्हा एखादा नेता मोठ्या समाजासाठी कुठल्यातरीवाजवी मुद्द्यावर अडून बसला असेल, तर तो एका कुणाच्या सांगण्यावरून आपलायोग्य मुद्दा सोडून का देईल?नेत्याने असे झुकणे

हे चळवळीतील समाजाशी केलेली प्रतारणाही ठरू शकते. म्हणूनच कवी याबाबत स्वतः ‘उद्धट’ असल्याचे म्हणवून घेत आहे. कारण त्याची तहान ही ‘आजची’ नाही....

युगायुगाची तहान माझीशमेलआताइथेकशाने

तृषार्त जीवास हाय माझ्या जिथे मिळाले मृगजळ नाही!!

हा साधा शेर वाटतो, पण यात मोठी विदारकता भरलेली आहे. यातील मी म्हणजे उपेक्षित समाज! जो तृषार्त आहे ; आणि कोणत्या कोटीचा तृषार्त? पराकोटीचा! ज्या तहानल्या जीवाला पाणी तर काय, पाण्याचा ‘आभास’ ही दिसला नाही! मृगजळही दिसले नाही. ते दिसते तर निदान आशा तरी पल्लवित झाली असती. त्या आशेवर पुढची काही वाटचाल करता आली असती. पण त्यापासूनही समाज वंचित राहिला! ही आपल्या राष्ट्राची व लोकशाहीचीच शोकांतिका आहे. इथे फक्त भेदभावच दिसतो. यावर उपरोधाने भाष्य करतांना भगत म्हणतात,

वाटलेज्यानेकुणी हे, थोर डोकेबाज तो

वाढले कोणास लाडू, आणि कोणाला चुरा!....

लाडू वाढून संपले की खाली राहतो तो बुंदीचा चुराच फक्त ज्यांना मिळतो, त्यांनी या पंक्तिप्रपंच्याविरुद्ध आवाज उठविला , तरत्यात त्यांचं काय चुकलं? पुढेही कवीला काही म्हणायचं आहे....

फक्त माझ्या गावचा हा प्रश्न नाही

आजसारा देशमाझा त्रस्त आहे.....

माझियाचर्येवरीजाऊ नको तू

जाहलो आतून मी उद्ध्वस्त आहे....

अशा स्थितीला जे कारण झाले आहेत त्या गद्दारांशी कवीचे कधीच पटणार नाही, हे सत्य आहे.

गर्दीतहीमीराहतोह्याएकटा

माझे न कोणाशी अता काही जुळे...

होऊनदेशाचे खुनी, मारेकरी

आपापली उद्धारली त्यांनी कुळे...

या शेरांचा मतितार्थ थेट वाचकांपर्यंत पोहोचतोच आहे; त्यावर आणखी काय बोलणार? देशप्रेम कवीच्या शब्दांतून, अनेक शेरांमधून सतत जाणवत राहातं.

या संग्रहातही प्रेमभावनेचा आविष्कार करणारे उत्कट शेर अधून मधून सापडलेआणि वाचक म्हणून मी खूप आनंदले.

माझ्या मनीचा चंद्र तू, मी काय सांगू वेगळे

अंधारगावीमाझियाघेऊन येकोजागिरी...!

मनातील प्रियेला कवी उत्कट साद घालतोय; तीच त्याचा 'चंद्र' आहे, जी मनाचं अंधारगाव उजळून टाकणार आहे! त्यातही तो तिला कोजागिरी घेऊन यायला सांगत आहे! अश्विन पौर्णिमेला येणाऱ्याकोजागिरीचं चांदणं हे सर्वात प्रफुल्लित व टिपूर असतं;माहीत आहे ना?

....आणि बहुधा तिनं अनुकूल प्रतिसाद दिला आहे...

तुलापाहूनएकांती महाली माझिया तेव्हा

खुशीने चंद्र रात्रीला , उशाशी राहिला होता!....

अशी चांदणरात्र संपली की आठवणी छळतातच ना!

एवढाही लोभ जीवा लावणेनाहीबरे

काळजाला जाळणारी जीवघेणी याद तू....

संघर्षाचे, युद्धयात्रेचे वाचकाचे मनढवळून टाकणाऱ्या आशयाचे व शेर म्हणून चांगले असे शेर वाचूनसुन्न (चांगल्या अर्थे) झाल्यानंतर हे रोमँटिक शेर वाचूनमनाला निश्चितच एक दिलासा मिळतो. वाटतं, कवीच्या पदरात नुसतेच निखारे नकोत, थोडं चांदणंही पडावं!

मात्र आपल्या गझला कशा आहेत, किती परिणामकारक आहेत, वाचकाच्या हृदयाचा कसा ठाव घेतात, आपल्या शब्दात काय ताकद आहे,याची कवीला पूर्ण जाणीव आहे.ते म्हणतात,

वणव्यासम ह्या फुलती गझला

मज थंड अशीतव दादनको....

किंवा,

वेगळी नाही कहाणी यापरी माझी अशी

शांततेने गझल माझी एकदा आस्वाद तू..!

कवीच्या आत्मविश्वासाबद्दल आधी एकदा मी लिहिलेच आहे; तोच प्रचंड आत्मविश्वास इथेही दिसतो आहे. लेखनामागची स्वतःची भूमिकाही एका शेरातूनच त्यांनी मांडली आहे.....

हेकुणाला पटो वा कुणा ना पटो

व्यक्तकेलेमलाजे जसेवाटले...

यातील प्रांजळपणा वाचकाला भावून जातो, नाही का? शिवाय व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कारही यातून स्पष्ट होतो.

प्रा. भगत यांनी लिहिलेले मतले (गझलेचा पहिला शेर) खूपच प्रभावशाली असतात, असे दिसून येते. काही मतले इथे देण्याचामोह मला आवरता येत नाही.

लागलीकैसी कळेना या हवेला धाप आहे

जीव कासावीस माझा होत आपोआप आहे!....

उजाडझालीतगर्द राने कुठेचआताहिरवळ नाही

लुटून त्यांनी सुगंध नेला फुलात कोण्या परिमळ नाही.....

जगणे महागले अन् मरणे कठीणझाले

तग सारखा मलाही धरणे कठीण झाले....

याच गझलेचा पुढचा शेरही दमदार आहे...

नजरेसमोरमाझ्यादरियाअथांगआहे

फुटक्या पुढ्यात नावा, तरणे कठीण झाले.....

समाजासाठी करण्याच्या खूप गोष्टी समोर आहेत; खूप म्हणजे समोर समुद्र असावा तितक्या अफाट! थोडक्यात, समस्या अफाट आहेत. पण साधनसामुग्री तोकडी, व आहे तीही सदोष!! सामान्य माणूस हताश होणारच ना! फुटक्या नावा हे भ्रष्टाचारी पुढाऱ्यांचं प्रतीक आहे असं मला वाटतं.

अशा गंभीर शेरांबरोबर एखादाशेर विनोदाची झालर असलेल्या 'नटखट' पेहरावातही समोर येतो...

नेहमीचाप्रश्नत्यांचा, 'प्रकृती आहे कशी?'

मी अता ठोकून देतो ' कालच्या पेक्षा बरी!'.....

एक स्मितहास्य नकळत तुमच्याही ओठांवर उमटलं ना?यापाशीच थोडं थांबू; मग पदावलीतलावर्तुळकंससोडवायचाआहे, त्याची तयारी करू.

*****

'वर्तुळकंसातील अवतरणे.'प्रा. सिद्धार्थभगत यांचा हा 2013ला प्रसिद्ध झालेला पाचवा संग्रह. मी माध्यमिक शाळेत गणित शिकवत होते, त्यामुळे माझ्या मनात पदावलीतील वर्तुळकंस प्रथम सोडवायचा असतो हा विचार माझ्या नमात आला. त्यातील अवतरणे म्हणजे 'कोट्स्' (Quotes) असा अर्थ मला सुचला. पण गझलेत शब्दांचं, मात्रांचं 'गणित' असलं,तरीगझल म्हणजे गणित नव्हे. गझलेत, मी मनालाच वर्तुळकंस समजले; आणि मनात अध्याहृत राहिलेले विचार, भाव जेव्हा लेखणीतून प्रकट होतात म्हणजेचअवतरतात ती ही अवतरणे!कथेत, कादंबरीत पात्रांच्या तोंडी असलेले संवाद लिहितांना आरंभी आणि शेवटी

'अवतरण चिन्हे' दिली जातात, कारण तिकडेवाचकाचं लक्ष वेधण्याचा उद्देश असतो. किंवा आत्ता मीही बऱ्याच ठिकाणीही चिन्हे वापरली आहेत. त्या त्या शब्दांकडे लक्ष जावं, हाच त्यामागे लिहिणाऱ्याचा उद्देश असतो.

या शीर्षकामागील कवीचा हेतू काय असेल, तो असो; पण या संग्रहातील गझलांकडे रसिकांनी विशेषत्वाने लक्ष द्यावं अशा उच्च दर्जाच्यात्या आहेत! हा फक्त गझलांचा संग्रह असून यात एकूण नव्वद गझला आहेत. कवीची प्रतिभा बहरून आल्याच्या खुणा या संग्रहात पाहायला मिळतात.

मी इतक्यांदा झडलो की अता

कौतुक नाही बहराचेमला.....

असं भगत यांनी एका शेरात म्हटलेलं असलं तरी ते रसिकाच्या उदंड कौतुकासपात्र आहेत. 'इतक्यांदा झडलो'याचा अर्थ तितक्या वेळा आधी 'बहरलो होतो'हे अध्याहृतच आहे, हे लक्षात घ्यायला हवे. बहरशेराशेरातून दृगोचर होत आहे.. बहर फुले आणतो, पण काट्यांकडेही ऋतू दुर्लक्ष करत नाही! पुढचे दोन शेर एकाच गझलेतील आहेत---

मी न फांदी ओढली खाली तरी

पुष्पभारानेचवेली वाकल्या.....

वाटकाटेरीचमाझीएवढी

की वहाणाही पहा रक्ताळल्या.....

गझलेत आत्मचिंतन असतेच. कारण गझल हा मुळात आत्मनिष्ठ काव्यप्रकार आहे. कवीच्या हळुवार , नाजुक-साजुकभावभावनांचं चित्रण हा तिचा मूळ विषय होता. पण समाज व व्यक्ती हे वेगळे तर होऊ शकत नाही ना! स्वतःचे अनुभव, ते दुःखाचे असोत, सुखाचे,आपुलकीचे वा प्रेमाचे असोत तेदेणारा अखेरीस समाजच असतो. म्हणूनच गझल फार काळ समाजापासून दूर राहू शकली नाही.त्यामुळेच नंतर गझलेमध्ये सामाजिक विषय प्रामुख्याने येऊ लागले.

नंदलाल पाठक या कवीनंहा बदल एका शेरात व्यक्त केला आहे.

अनसुनी कैसे गजल करती जमानेकी पुकार

चोट है डंके की अब, पहले थी शहनाई गजल....

सध्याचं जग ( म्हणजे जमाना किंवासमाज ) काहीतरी म्हणत होतं, माझं म्हणणं ऐक आणि तू सर्वांना ओरडून सांग जाहीरपणे सांग, असं जणू ते गझलेला आर्जवं करून सांगत होतं. मग जी गझल फक्त हळुवार भावनांचीच अभिव्यक्ती होती, मंजुळ सनईप्रमाणे गात होती,तीच गझल समाजात चाललेल्या सर्व बऱ्या-वाईट गोष्टींना सामावू लागली व त्यावर भाष्य करू कागली. अर्थात, तिचा परीघ विस्तारल्याचंच हे लक्षण आहे. समाजातील गोष्टींचा थेट परिणाम माणसाच्या जीवनावर होतो व त्याबद्दल प्रतिसाद, प्रतिक्रियादेणं हा त्याचा हक्कच आहे! जसा तो लेखांतून दिला जातो, तसा कवितेतूनही द्यायला काय हरकत आहे?

----आणि आता गझलेला कुठलेही विषय वर्ज्य नाहीत; आता समाजातील कुठल्याही म्हणजे खटकणाऱ्या गोष्टीसुद्धा गझल बिनधास्त पणे जाहीर ( ओरडूनही) सांगते, घोषित करते!डंके की चोटपर! दवंडी पिटावी तशी!

प्रा. सिद्धार्थ भगत यांच्या गझला दोन्ही प्रकारच्या आहेत. आत्मनिष्ठ व सामाजिकही! असे दोन प्रकार वेगळे करणं फार अवघड आहे. कारण सामाजिक शेरातही कवीचं चिंतनचप्रकट होत असतं.

खरे तर फार पूर्वीच्या उर्दू गझलेकडे पाहिलं तर प्रेम व प्रेमाशी संलग्न इतर भावभावना हेच गझलेचे अधिकतर विषय होते. प्रेम, विरह, प्रतारणा, उपेक्षा इ. विषय गझलेत येत. उर्दू गझल समाजनिष्ठतेकडेवळण्यास बराच काळ गेला. त्यामानाने मराठी गझलमध्ये सुरेश भट यांनी सामाजिक शेर खूपच लवकर गझलेत आणले. ( मराठी गझलेची सुरुवात झाली, त्यामानाने लवकर असे म्हणायचे आहे.)प्रतीकांची भाषासुद्धा त्यांनीच मराठी गझलेत आणली व रुजवली.

प्रा. भगत यांनी भट यांची दिंडी फार समर्थपणे पुढे नेली आहे. भगत गझलांपूर्वीकविता लिहीत होतेच; अगदी मुक्तछंदही त्यांनी समर्थपणे हाताळला आहे. पण आता

त्यांना गझलेचा आत्माच गवसला आहे, नव्हे, त्यांनीया रचनेवर प्रभुत्वच मिळविलेलं आहे. रसिकांसाठी व अभ्यासकांसाठीही त्यांची गझल एक दीपस्तंभ ठरावी यात नवल नाही!

‘ वर्तुळकंसातील अवतरणे’ यातील शेर मी निवडू लागले, तर माझी तारांबळ होऊ लागली, इतके चांगले शेर मला मिळत होते. कोणते घ्यावेत , कोणते सोडावेत असा संभ्रम होत होता! पण इथे मर्यादा सांभाळण्याशिवाय पर्याय नाही!!

प्राचार्य भगत हे एके काळी,कै.डॉ. द.भि. कुलकर्णी यांचेविद्यार्थी होते. त्याची खूण मला एका शेरात दिसली, तो हा शेर—

चालूकसेबसेआहेतश्वासहे

मृत्यूस मी दिले आयुष्य पस्तुरी....

दभिंच्या एका पुस्तकाचे शीर्षक आहे‘पस्तुरी’! त्यावेळी हा शब्द मला अगदी नवीन होता. मी सरांनाच अर्थ विचारला तेव्हा यांनी सांगितले,‘एखादी गोष्ट मापून घेतांना बरोबर मापाने वस्तू दिली की चिमूटभर जास्तीची वस्तू देण्याची पद्धत होती; ती जास्तीची वस्तू म्हणजे पस्तुरी!’ त्यांनी गवळयाचंही उदाहरण दिलं. दुधाची पिशवी वापरात येण्याआधी गवळी दूध आणून घालायचा. समजा एक लिटर घालून झालं की मापातलं थोडं दूध आणखी घालायचा, ती पस्तुरी!

मृत्यूला मी आयुष्य पस्तुरी म्हणून दिले ही भगत यांची कल्पना अगदी वेगळी, नवीन व दाद देण्याजोगी आहे. आधी सर्वकाही दिले व मग ही पस्तुरी, पूर्ण आयुष्यच! कवीचं अभिनंदन करावंसं वाटतं. यातील आणखी दोन शेर....

हा गंध कोणत्या आहे ऋतूतला

कीदर्वळूनयेदेहातकस्तुरी....

लाभो सुखातही दुःखे मला अशी

ज्यानेजगायचीवाढेलमाधुरी....

देहात कस्तुरी दर्वळण्याची ही कल्पना अभिनव अशीच आहे.गझलेच्या सौंदर्याचं एक लक्षण आहे नवता. याचा अर्थनाविन्य असा नसून,‘ओरिजिनॅलिटी’ हा अर्थ आहे.वरील दुसऱ्या

शेरात कवी दुःख मागतो आहे! कवी हे दुःख मागणारे असणारच ; कारण तो त्यांच्या प्रेरणेचा स्रोत असतो! कुंतीने कृष्णाची सतत आठवण रहावी यासाठी दुःख मागितलं होतं. पण आज, 'जीवन' हे विविध चवींनी युक्त असं 'जेवण' असावं असं मागण्यात काही चूक नाही.

कळया साऱ्या गळाल्या अन् फुलांनी टाकल्या माना

तरी बागेतली माती कधीकोमेजलीनाही....

फुलांना , कळयांना जन्म देणारी माती कधीही कोमेजत नाही. आधीचा बहर कोमेजतो पण नवे सृजन होत राहते. कलावंत, गायक, लेखक 'काळाच्या मातीत' मिसळले तरी प्रत्येक कलेला नवे धुमारे फुटत असतातच ना!

किंबहुना, ही कळया–फुलं मातीत मिसळतात त्यामुळेच माती सृजनशील बनलेली असते, असं उर्दू कविश्रेष्ठ गालिब म्हणतो.गुणवान माणसं मातीत चिरविश्रांती घेतात; त्यांचा कणकण तिच्याशी एकरूप होतो, ती समृद्ध होते, म्हणूनच तिच्यातून पुन्हा गुणीजन जन्म घेत असतात! त्यासाठी लागणारं शरीरपंचतत्त्वांपासूनच बनत असतं ना!गालिबचा शेर असा आहे---

सब कहाँ? कुछ लाल-ओ-गुल में नुमायाँ हो गईं

खाक मेंक्या सूरतेंहोंगी किपिनहाँ हो गईं....

ही जी रंगीबेरंगी फुलं दिसताहेत, ही मातीमधे दडलेल्या गुणांमुळेच तर जमिनीवर उगवली आहेत. कारण या मातीत, आधी कितीतरी असे चेहरे, अशी गुणवान व्यक्तिमत्वे (मृत्यूनंतर) दफन केली गेली असतील की त्यामुळेच ही संपन्न झालेली माती आज असे सृजन करत आहे! फुलांच्या माध्यमातून प्रकट झालेले फक्त काहीच गुणदिसत आहेत; पण अप्रकट असे कितीतरी अजूनमातीतच राहिले आहेत!( तेही कधी ना कधी प्रकटतीलच.)

भगत यांचा वरील शेर ह्या उर्दू शेराच्या आसपास जातो, अशी माझी धारणा आहे.

प्रा. सिद्धार्थ भगत यांच्या गझलांत वाचकाने नोंद घ्यावी अशी बरीच ठिकाणे गवसत असतात. त्या गोष्टी छोट्या छोट्या का असेनात पण असतात!

सकाळीसकाळीमी धुक्यातून चाललो

जणू शुभ्रसायीच्याढगातूनचाललो....

हा शेर एका सकाळचं वर्णन करत आहे ; वर्णनपर शेर गझलांमधे अभावानेच आढळतात, हे एक वेगळेपण ; व येथे ‘ जणू’ शब्द वापरल्यामुळे उत्प्रेक्षा अलंकार झाला आहे, हे दुसरं वैशिष्ट्य! हाच अलंकार लेवून आलेला हा ही शेर...

तसा मी कोसळाया लागलो आहे

जसाउन्मळावावृक्ष म्हातारा....

वरील शेर रचनेच्या दृष्टीने वेगळे वाटतात ; तर हा पुढील शेर आशयाच्या दृष्टीने कसा वेगळा आहे पाहा...

नसलो जरी मनाने कमजोर मी तरीही

मज फूल कागदीही चुरगाळता न आले....

मन कमजोर तर नाही ; मग कठोर आहे का? छेः! ते तर कमालीचं हळुवार आहे!! कागदीफुलंही ज्याला चुरगाळता येत नाहीत, ते मन किती संवेदनशील असलं पाहिजे, कल्पना करा.कागदीफुलांचा इथेकेलेलावापर वाचकाला केवढा भावून जातो!!

मनाच्याहळुवारपणाचाप्रत्यय इथेही घ्यायचा आहे? वाचा---

लागू नये पानाफुलांच्या बोल हत्त्येचा कुणा

मी स्वागताचेसोहळे या कारणेनाकारतो!...

गुच्छ(बुके) तयार करण्यासाठी कोणीतरी पाने-फुले तोडील; त्यालाही फुलांच्या हत्त्येचं पाप लागू नये, म्हणून स्वागत-सत्कार असे समारंभच कवी टाळतो! किती दूरवरचा विचार कवी करत आहे, हे प्रतीत होतय. शिवाय हा निर्णय त्याने त्याच्यापुरता घेतला आहे. इतरांनी

त्यांना योग्य वाटेल ते त्यांनी करावं!दिखावा करण्यासाठी माणूस निरपराध जिवांशीही कसा खेळत असतो, त्यांना पणाला लावत असतो, हेही या शेरातून स्पष्ट होतं.

फुलांची प्रतीकं घेऊन येणारे आणखीही चांगले शेर मला इथे उद्धृत करायचे आहेत.

कोणत्याही मी फुलांना हात नाही लावला
आसवे ढाळीतहोत्या मात्रवेलीआजही....

दुसऱ्या ओळीतून कळतं की आपल्या फुलांना 'त्याचा' स्पर्शगंध मिळायला हवा होता, असं वेलींना वाटत होतं; पण तसं घडलं नाही. कवीनं केवळ वेल असा एकवचनी उल्लेख केलेला नाही. यावरून या शेरात वेलींच्या आसवांमागेअस्वीकृत प्रेम लपलेलं मला जाणवत आहे. किती वेलींच्या किती फुलांना कवी स्वीकारणार, हाही पेच आहे!

बागा दर्वळाया लागल्या साऱ्या इथे जरी
पुष्पातूनएकेका मलायेगंधघामाचा...

वरील शेरात फुलांना घामाचा येतो, की सुंदर कल्पना वापरून भगत यांनी कष्टकऱ्यांचा सन्मान केला आहे! बाग फुलापानांनी बहरते, पाहणाऱ्याला आनंद देते, यामागे खरं श्रेय, खरे कष्ट माळयाचेच असतात, हे कितीजणांच्या लक्षात येतं?

----आणि आता हा शेर---

तमोवृक्षासहीआता उजेडाचीफुलेआली
तुझे काळीज त्यासाठी किती रक्ताळले होते!....

इथे‘उजेडाची फुले’ फुलली आहेत!पुन्हा त्यामागे, कवीने केलेला झगडा, संघर्ष वरीलप्रमाणेचलपलेला आहे. वृक्षही साधा नाही; तमोवृक्ष आहे. नकारात्मक गोष्टीपासून प्रयत्नपूर्वक सकारात्मक परिणाम मिळवणं हे अतिकष्टदायक असतंच. त्यासाठी काळजाला जखमा करून घ्याव्या लागतात!

फुलांची पखरण कवीच्या अशा आणखीही विविध शेरात दिसते! गझल ही प्रतिकांची भाषा कवीने त्यांना हवी तशी लीलया वळवली आहे!

शेरांत, कवितांमध्ये सूर्य-चंद्राची सतत ये-जा असते. पण प्रा. भगत यांनी काजव्यांनाही आपल्या ओळींमध्येस्थान दिलेलं आहे.

नाचून काजव्यांनी आनंद व्यक्त केला

पूर्वे कडेचजेव्हाअंधारहोतआहे.....

उगवतीलाच अंधार म्हणजे सूर्य येतच नाहीए.काजव्यांचं अस्तित्व संपवणाराच जर असा अडकून राहिला तरकाजव्यांची चंगळच!मात्र पूर्वेचा संदर्भ काही वेगळं सांगतो आहे का? प्राचीन काळापासून पौर्वात्य संस्कृती (विशेषतः भारतीय) ही अग्रेसर ठरली आहे. पाश्चात्यांना तिचं आकर्षणही वाटत आलेलं आहे. पण काळाच्या ओघात उलटंच घडलं! आज आपल्या कडे पाश्चिमात्य वारे वाहत आहेत. त्यामुळे पूर्वेकडे बौद्धिक अंधारच पसरला आहे, असं कवीने म्हटलंय ते योग्यच आहे. प्रतिकांचा भरपूर वापर कवी समर्थपणे करत आहे.

अंधारला कधीच इथेसूर्य केवढा

अन् दावतो प्रकाश अता काजवा मला....

सूर्य आणि काजव्याची जोडी त्याच वरील अर्थाने आली आहे. संदर्भ वेगळा घेता येतो. एवढे मोठे मोठे सूर्यासारखे नेते होऊन गेले, की त्यांनी समाजाला उजेडाची वाट दाखविली! कालांतराने ते काळाच्या पडद्याआड गेले. आता काजवे वाटाड्याचे काम करू लागले,हा विनोदच नाही का? सूर्य नसतांना काजव्यांना चेव येणारच!

थोर नेते जाऊन काळ लोटतो, तेव्हा हळूहळू जनता त्यांना विसरू लागते. त्यांची शिकवण, त्यांची तत्त्वेतर आधीच विसरलेली असतात, हे दुर्दैव. पिढीसुद्धा बदललेली असते. मग नेत्यांचे उरतात फक्त फोटो! कार्यकर्त्यांच्या मनात त्यांचे स्थान उरलेले असो वा नसो पण---

अंतरंगी कुणाच्या असो वा नसो

स्टेज, मंचावरी मात्रसर्वत्रतू....

कार्यक्रमाच्यावेळीतुमचा फोटो लावायला मात्र आम्ही विसरत नाही बरं का! असे जणू उपकारच केल्यासारखे लोक वागत असतात. हा दांभिकपणा कवीला अजिबात सोसत नाही. त्याच्या अस्वस्थतेमागील अनेक कारणांपैकी हे एक कारण आहे.

अशा दांभिक माणसांबद्दल कवी काय म्हणतो पाहू या.

अभाव चोहीकडेच आहेसजीवतेचाइथे, तरीही

कलेवरांच्या कलाकलाने जगावया मी तयार नाही...

अलीकडे माणसांमध्ये काही करण्याची ऊर्मी शिल्लकच राहिली नाही. मनात काही उच्च ध्येये नाहीत, कुठे एखादा बदलाचा ( क्रांती हा मोठा शब्द मुद्दामच टाळला) स्फुल्लिंगही मनात धगधगत नाही ; फक्त मूल्यांची राख समाज चिवडत बसला आहे व त्यात प्रगती अन्विकास शोधतो आहे. अशा जिवंत माणसांना 'जिवंत' म्हणायचं का? ही तर कलेवरं! प्रेतं!! त्यांच्या मर्जीने, कलाकलानेचालायला कवी तयार नाही.इथेही दोन ओळीत खूप अर्थ सामावलेला आहे.

कवी 'त्यांच्यासारखा' मृतवत्नाही; मग कसा आहे? ते तो नम्रपणे सांगतो आहे...

आहेलहानसामीमाणूसमात्रसाधा

डोळ्यात स्वप्न ज्याच्या थोडे विराट आहे!...

तो स्वतःला लहानसा, साधा तर म्हणतोच आहे ; पण स्वप्नाला नुसतं विराट न म्हणता 'थोडे विराट' म्हणत आहे! कवीला म्हणायचंआहे, बिचकून जाऊ नका स्वप्न 'थोडं विराट' आहे.इतरांना झेपावं म्हणून तो काळजी घेत आहे.

मी वेगळाच माझा रस्ता तयार केला

याउंचपर्वतांची भेदूनरांगआता....

हे स्वतःचं 'जिवंत'वेगळेपण तर जपायलाच हवं. कारण---

मौन धारण केले कसे इथे सगळयांनी

कसा अचानक झाला लढा दिवंगत आहे....

माणसे शिथिल झाली, पण निसर्ग मात्र आक्रमक व कठोर झाला आहे.

चालले नक्षत्र हेही पावसाळी कोरडे

आणि ओसंडून वाहे आसवांचे हे तळे....

निसर्गाचं ठीक आहे; पण हे संकट ( पुढील शेर )का ओढवलं याचं उत्तर कोण देईल?

पृथ्वी पडेना ही पुरी राहावया लोकां अता

रस्त्यांवरी आली घरे अन् लुप्त झाली अंगणे....

सामाजिक समस्यांपैकी सर्व समस्यांचं मूळ असणारी समस्या म्हणजे लोकसंख्या! माणसाचे वाढलेले आयुर्मान! पृथ्वी अपुरी पडत आहे तर आता जायचे तरी कुठे?

या व अशा आणखी सामाजिक समस्यांवर व व्यवस्थेवर प्रा. भगत सतत भाष्य करतात.

विचारीतआहेतदाहीदिशा

मुली होत जातील का नाहिशा?...

खुले आमह्याभूणहत्त्यासुरू

जणू जोंधळयाच्या खुडाव्या पिशा....

याच विषयावरील हा शेर---

गर्भातकेलीहत्त्यामुलींची

व्हावेच त्यांनी माता कशाला?.....

मुलींबद्दलकाळजी करण्यासारखी परिस्थिती तर आहेच; पण आजकालच्यामुली पाहून मनात काय येते?

पडे मनास प्रश्न हाबघून मुक्तमोकळया

खरेच काय जायच्याइथेच बायका सती?....

सतीप्रथाबंद व्हायलाच हवी होती; पण आज स्त्रीमुक्तीनं दुसरंच टोक गाठलं आहे, असं तर नाही ना? तपासून पाहायला हवं.हा शेर नेमकं तेच सुचवत आहे. रचनेच्या दृष्टीनंहीहा शेर ‘दादलेवा’आहे.

देश व नेते याबद्दल तर कवीने भरभरून लिहिले आहे.

बराच काळ लोटला स्वतंत्र जाहलो अम्ही

तरी अजून आमचीकितीम्हणूनदुर्गती....

इथे आमची म्हणजे एका विशिष्ट वर्गाचीच नाही तर सरसकट सर्वांचीच दुर्गती अजून संपत नाही, असा अर्थ सयुक्तिक वाटतो.

माणसाचं व्यक्तिमत्त्व घडत असतांना अनेक घटकांचे त्याच्यावर संस्कार होत असतात. ही प्रक्रियाविशिष्ट वयापुरतीच मर्यादित असते, असे मला वाटत नाही.संस्कारांनी, अनुभवांनीते सतत बदलत राहत असते..... आणि हे तर जिवंतपणाचे लक्षण आहे. जीवनाला बाहत्या पाण्याची उपमा दिली जाते ती यामुळेच!कालप्रवाहाबरोबर जीवन अधिक खोल व नदीपात्राप्रमाणे अधिक रुंद होत जाते. व्यक्तिमत्त्व विकास थांबला असे केव्हाही होत नसते. हा शेर पाहा..

मी कोरडा होतोकोण काळी

पणवाहतोकाठोकाठ आता....

हा शेर मला फार महत्त्वाचा वाटतो. आजकाल यंत्रवत् झालेल्या आयुष्याला अंतःकरणात ओलावा असणं फार गरजेचं झालं आहे. हल्ली कॉम्प्यूटर-जगात इमोशनल कोशंट )EQ) बद्दल बरंच बोललं जातं. नोकरीवर ठेवतांना ईक्यू तपासला जातो. कमी असेल तर वाढविण्याचा प्रयत्न केला जातो, असं म्हणतात. कारण भावभावनांनीच आयुष्य समृद्ध होत असते. तर्कबुद्धी आवश्यक आहेच; पण ती तर्कटीपणापासून दूरच असावी.

वरील शेरात भावनेच्या खुणा स्पष्ट दिसत आहेत. प्रेम जेव्हा जीवनात प्रवेश करतं, तेव्हाच मनात प्रेमाची कारंजी उसळू लागतात; व हौद काठोकाठभरून वाहू लागतो.

प्रीतीच्या नव्या प्रदेशात प्रत्येक गोष्ट रोमांचकारी ठरते. अशी सूक्ष्म स्पंदने टिपणारे हे काही शेर---

जादू कटाक्षाची तुझ्या माझ्यावरी झाली अशी

कीसांडलेअंगावरीमाझ्यादुपारीचांदणे....

हा एक सहजसुंदर शेर---

तुझ्याशी बोलतो तेव्हा मला हा भास का होतो

जणूहाताळतो आहे ,गुलाबीरेशमी तागे!....

शेर वाचूनही आपल्या समोर मृदु-मुलायम रेशमी कापडाचा तागा उलगडल्यासारखा वाटतो, ना?

कटाक्ष व फक्त शब्दांची देवघेव एवढ्यावरच प्रेम समाधान मानतं, तर मग---

ओझरतास्पर्श तुझा आठवता

वाढत जाते लयवाटेमजला....

ओढ वाढत राहते, तेव्हा ध्यानी, मनी व स्वप्नी फक्त प्रेममूर्तीच दिसत रहाते.

झोपडी केलीस माझी तू हवेली आजही

येउनी स्वप्नात माझ्या तूच गेली आजही....

स्वप्नातच काय ती प्रत्यक्षातही आली पणप्रेमाचे लज्जा-विभ्रम दाखवतच राहिली तर?

नको नको उगाच तू करायचे किती

हळू हळू असेचमी सरायचेकिती....

विचार ठेव तू करून एवढा जरा

करावयास प्रेम घाबरायचे किती....

बहुतेकदा‘ती’ घाबरतच रहाते व त्याला वाटत रहातं; त्याची अवस्था या नायकासारखी होते....

‘इन्तेहा हो गई इन्तजारकी। आई ना कुछ खबर मेरे यारकी!!

प्रतीक्षेत सहनशक्ती संपून जाते आणि रात्रही!

प्रतीक्षा संपली तेव्हा उन्हाचे दूत आले अन्

सुगंधी फूल चाफ्याचे उशाशी वाळलेहोते.....

'उन्हाचे दूत'या शब्दांवरूनकुसुमाग्रजांची सुप्रसिद्ध कविता मनाला चाळवून गेली...त्यातील रात्र मीलनाची होती...

काढ सखे गळयातील

तुझे चांदण्याचे हात

क्षितिजाच्या पलीकडे

उभे दिवसाचे दूत....कुसुमाग्रज

उन्हाचे / दिवसाचे दूत माणसाला भानावर आणत असतात ; कर्तव्याची जाणीव देत असतात.

याहीबाबत प्रा. भगत लिहून जातात---

आहे जरी बाकी सुटी आतानिघालेपाहिजे

कोणा हव्या ताटातुटी आता निघाले पाहिजे....

असं एकाकी निघावं लागतं, तेव्हा चढत गेलेलं ऊन अधिकच भाजून काढतं! (कारण, मनात बरोबर आणलेला चंद्र 'परत फीर' अशी साद घालत असावा काय?)

या तीव्र उन्हाने मजला जाळत नेले

मी चंद्र दुपारी भर न्याहाळत होतो....

या गझलेचा मतला व एक शेर पाहा---

रस्त्यावरतीकेवळठेचाळत होतो

अन् मी नसलेले घर धुंडाळत होतो....

आता मज नाही सुखही बाधत केव्हा

दुःखास तुझ्याखातर सांभाळत होतो....

तुला ते दुःख समजूनये, त्याची झळही लागू नये यासाठी मी त्याला ‘सांभाळून’ , (लपवून)ठेवलं होतं;दागिने सांभाळतात तसं! तुझ्याखातर या शब्दाने केवढा अर्थ सामावून घेण्याची किमया केली आहे! कवीच्या शब्दयोजनेची ही खुबी आहे.

आपल्या अर्धांगिनी साठी ( पर्यायाने स्त्रीजाती बद्दल) कवीनं लिहिलेले पुढील हे दोन शेर मला अत्यंत आवडले आहेत.

मानतो जरी न स्वामिनी

तूगुलाम वानबंदिनी...

माझिया तनामधील तू

एकमेव रक्तवाहिनी!!....

यापूर्वी अशी उपमा, असं रक्तवाहिनीचं रूपक वाचलं आहे तुम्ही कधी कुठे? नसणारच! त्यातही एकमेव रक्तवाहिनी! तुला जर काही झालं,तर मग संपलोच मी! यात प्रेमाची, एकपणाची खात्री कवी आपल्या प्रियेला देत आहे.याहून जास्त तिलाही काही नको असणार!

ज्याप्रमाणे सामाजिक, राजकीय विषयावरील शेरामध्ये कवीची पोटतिडीक दिसते त्याचप्रमाणे, प्रेम विषयक शेरामध्येहीहृदयाची ‘कळ’ जाणवते! विषय कोणताही असला तरी सिद्धार्थ भगत आपल्या लेखणीचे सामर्थ्य सहजतेने दाखवून जातात.

त्यांना विविधव कठीण काफिये निवडायलाही आवडतात. एक उदाहरण—

नका व्यर्थ घेऊपरामर्ष आता

सुरू एकट्याचाच संघर्ष आता.....

जगाचे भले ते कराया निघाले

स्वतःचाच साधून उत्कर्ष आता....

किती धीर द्यावा स्वतःलाच सांगा

बघू वाट आम्हीकितीवर्षआता...

पुन्हा आपण राजकीय व सामाजिक शेरांखडे वळलो आहोत ; कारण याच विषयांचे बाहुल्य प्रा. भगत यांच्या सर्व संग्रहातून आपले लक्ष गुंतवून ठेवत आहे.नकळत वाचकांच्या भावनांना त्याद्वारे वाट मिळत आहे. हे समाधान मोठे आहे. ‘अरे! आपल्याला हेच म्हणायचं होतं’ हे रसिकाला, वाचकाला वाटणं हेच तर कवितेचं, विशेषतः गझलेचं यश असतं.

माझी समीक्षा तोवर थांबवताच येणार नाही ; जोवर मला उत्तम शेर मिळतचराहत आहेत!

मी युक्तिवादमाझा कोणापुढेकरावा

जेव्हा अजून आला नाही स्वतःच वादी...

साधे शब्द व दोन ओळीतील रब्त (संबंध) यासाठी माझ्या कार्यशाळेत मी हा शेर नेहमी उद्‌धृत करत असते.

मीदान देतगेलोआतावरीमतांचे

अन् शुभ्र होत गेली त्यांची अजून खादी....

मतं मिळत राहिली की पुढाऱ्यांना वाटतं, आपले भ्रष्टाचाराचे डाग मतदारांना कळतच नाहीत, दिसतही नाहीत. शुभ्र खादी ‘व्हाईट कॉलर’ ची आठवण करून देत आहे. पण मला पुढील शेरांमधील वृत्ती (विचारसरणी ) सामंजस्याची वाटते. सती हे अगदी छोटे वृत्त वापरले आहे.

जुने स्मरू या । नवे करू या ।।

युगायुगाची । व्यथा हरू या ।।

पुन्हा बुडू अन् । पुन्हा तरू या ।।

अभिन्नतेने । जगू मरू या ।।

मागचे सर्व सोडून मागे पुन्हा एकमेकांस भेटू नव्याने अता

रागलोभासवे द्वेष आपापल्या अंतरातील सारे जळाया हवे....

स्वैरिणीक्रीडन या लांबलचक वृत्तातील या ओळी खूप काही सांगून जातात. इथेच थांबायला हवे.

Siddharth Bhagat-File-3

हृदयात उठणारी ‘कळ’ म्हणजे हृदयरोगाचं लक्षण! तीजीवघेणी असू शकते; म्हणूनच भीतीदायक ठरते.पण इथे प्रा. सिद्धार्थ भगत म्हणत आहेत, **‘कळ कोवळी उठू दे!’**

कळ ‘कोवळी’ केव्हा म्हणता येईल? मला समुद्रलाटेची आठवण झाली. एखादी प्रचंड, उद्ध्वस्त करणारी, त्सुनामीसारखीलाट असू शकते तर दुसरी एखादी अल्लड लाट सरपटत येऊन फक्त पावलांना गुदगुल्या करणारीबालिका-लाट असते, जी हवीहवीशी वाटते. हंऽऽ!ही लाट ‘कोवळी’ म्हणता येईल. मग कोवळी कळ कशी असेल? अशी कळ किंवा मनात उठणारे असे तरंग की जे मनाला तोपर्यंत धडका देत राहतात, जोपर्यंतदार खुलं होऊन नवी कविता प्रवेश करत नाही, नव्या कवितेचा जन्म होत नाही!

सिद्धार्थ भगत यांच्या मनात उठलेली कोवळी कळ ‘सॉलिडच’ असली पाहिजे, कारण त्याचं फलित आहे एक गझल,तीही तब्बल बावन्न शेरांची!तिला सामावण्याकरता एक मिनि-पुस्तकच त्यांनी छापून टाकलं.हे 2016 चंत्यांचं लेटेस्ट पुस्तक. कदाचित् बावन्न शेरांची गझल हे ‘रेकॉर्ड’ ठरावं!बाकीच्या त्यांच्या संग्रहाप्रमाणेच यातील शेरही वाचनीय व चिंतनीय आहेत. माणसांमाणसांमधील नात्यांपासून पर्यावरणापर्यंत विविध विषयांवरील शेर यात वाचायला मिळतात. इतिहास, मधुमास, उपहास, बिनधास असे काफिये असून ‘येत नाही’ही रदीफ घेतलेली आहे.

मज काळजी किती ह्या कवळयाफुला-कळयांची

फुलता कधीचज्यांना बिनधास येतनाही!....

ही कोवळी कळया-फुलं म्हणजे आपल्या पुढची पिढी!आपल्या देशातील सगळेच स्रोत आता कमी पडत आहेत. स्रोत आटत आहेत असं कदाचित्नाही; पण त्यावर अवलंबून असणाऱ्यांची संख्या वेगाने वाढत आहे.म्हणूनच प्रामाणिक प्रयत्न, उद्या केले गेले तरी ते स्रोत कमीच पडणार आहेत!बिनधास फुलायला पुरेसं खत-पाणी, पुरेशी अप्रदूषित हवा हा तरी नैसर्गिक पुरवठा या 'फुलांना' हवाच ना! दुसरे मानवनिर्मित स्रोतही हवेत.शिक्षणाच्या संधी, हातांना काम, पुरेसं अर्थसाहाय्य, नोकऱ्यांची उपलब्धता, डोक्यावर छप्पर, आरोग्यसुविधा... ही यादी खूप लांब आहे! हे सर्व पुढच्या पिढ्यांना मिळणार आहे का?त्यांच्यापुढे आपण फक्त प्रश्नचिन्हंच उभी केली आहेत! समस्यांचा वारसा दिला आहे. पण कोणाही आई-बापांना या पिढ्यांची काळजी वाटतच राहते, जी या शेरात व्यक्त झाली आहे.

चुकते कुठे कुणाचे मजनेमकेकळेना

यश आजकाल माझ्या लढण्यास येत नाही....

आपल्या व याहून मागल्या पिढ्यांचंच काही चुकलंवआताही चुकत तर नाही ना? अशी रास्त शंका हा शेर मनात उभी करून जात आहे. जागण्यासाठीच जो अविरत लढा द्यावा लागत आहे, त्याला यश येणार तरी कधी? अपयशाबद्दल चिंतन करावेच लागेल, व मार्ग बदलावे लागतील, नवे शोधावे लागतील! कवीच्या मनातील हा सर्व विचार या शेरात डोकावून जातो.

बुडवून ठेवतोअन्वरघालतोय पाणी

पण ओल मात्र काही खडकास येत नाही....

प्रयत्नात कसूर केलेली नाही, असं हा शेर सांगत आहे. पण खडकाचा गुणधर्मच असा आहे की त्यावर किंचितसाही मऊ थर नाही; त्यामुळे तिथं काहीच रुजू शकत नाही. एखाद्या गोष्टीचा / व्यक्तीचा, जो मूळ स्वभावचनाही, तिथंलाख प्रयत्नही फोलच ठरणार, हे एक वैश्विक सत्य यात लक्षात आणून दिले गेले आहे.

जगासंबंधी आणखी एक तात्त्विक चिंतन या शेरात वाचू या—

परदुःखपाहुनीजेहसतातततुच्छतेने

जग आसवे अशांची पुसण्यास येत नाही....

'जशास तसे' वागणे ही जगाची रीतच आहे!या ओळीत'तुच्छता' या शब्दाला महत्त्व आहे. नुसतं हसणं निराळं ; तुच्छतेने हसणं ही त्याहीपेक्षा नीच पातळी आहे. पुन्हा एकदाकवीची शब्दयोजना किती समर्पक असते, हा गुण यातून स्पष्ट होतो.

जगाबद्दल लिहायचे म्हणजे जगातील माणसांबद्दल लिहायचे असते......आणि जग म्हणजे तरी काय? माणसांची गर्दी! या गर्दीबद्दलचे दोन शेर दोन वेगळया विषयांवरचे आहेत...

जमते अलोट गर्दीअसतो जिथे तमाशा

अन् कीर्तनास कोणीहरदास येत नाही...

'तमाशा' चा उल्लेख करून, तमाशा या कलेलाहीन लेखण्याचा कवीचा उद्देश नाही. इथे फक्त तमाशा व कीर्तन याची किंचित तुलना करण्याचा प्रयत्न आहे. ( वरून कीर्तन, आतून तमाशा;असा वाक्पचारही आपल्याकडे रूढ आहे. तिथेही तुलना व फरक, हाच संदर्भ आहे.)मला स्पष्ट करायचं आहे की, तमाशाचा उद्देश केवळ मनोरंजन एवढाच असतो; त्यापेक्षा जास्त काही नाही. मात्र कीर्तनाचा उद्देश मनोरंजनाबरोबरसमाज-प्रबोधन हा मुख्य हेतू असतो. आदर्श कथा सांगून त्यातून मूल्यांचं महत्त्व लोकांना पटवणं ; ती त्यांनी अंमलात आणावी,यासाठी त्यांना उद्युक्त करणं हे साध्य असतं, व कीर्तन साधन.

या शेरात म्हटलंय,तमाशाला अलोट गर्दी होते, पण कीर्तनाला गर्दी नाही म्हणूनच हरदासही (कीर्तनकार) नाही.कारण हल्ली लोकांना मूल्यं पायदळी तुडविण्यातच मजा वाटते. दुसऱ्यांशी कसं वागावं इ. चांगल्या गोष्टी मूल्यं शिकवत असतात. पण आज त्यात लोकांना स्वारस्य नाही. कारण जग फार स्व-केंद्री झालं आहे.हरदासही येत नाही, कारण एकतर लोक नाहीत; दुसरं असं की इतरांना शिकवावं असा लायक हरदासही या जगात अभावानेच असेल! चांगल्या सवयी, चांगल्या गोष्टी, सद्गुण इ. अंगी बाणवण्यासाठी, उच्चतेकडे जाण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतात. मात्र वाईट सवयी लगेच लागतात. पाणी वर चढवायचे तर पंपाची (बाह्य

ऊर्जेची)गरज पडते; पण ते उंचीवरून नीच पातळीकडे कुठल्याही प्रयत्नांवाचूनवेगाने धावू लागते. हे सर्व भाव मला या शेरात दिसतात.

‘गर्दी’चादुसरा शेर---

भवतालमाणसांचीजहरीबघूनगर्दी

चिमणी चुकून दाणा टिपण्यास येत नाही.....

हा शेर पर्यावरणासंबंधी आहे ; पण माणसांच्या वृत्तीवरही तो भाष्य करत आहे. माणसांची व त्याचबरोबर त्यांच्याघरांची गर्दी ; घरांसाठी झालेल्या वृक्षतोडीचा ( न करताही ) आलेला उल्लेख ही या शेराची सौंदर्यस्थळे आहेत.दूरदूरपर्यंत चिमणीला वृक्षाअभावी घरटे करता येत नाही, मग ती दाणे टिपायला कुठून येणार?माणसांच्या गर्दीला ‘जहरी’ हे लावलेलं विशेषण अत्यंत अर्थपूर्ण आहे.एकतर माणसांनी स्वतःच्या सोयीकरिता म्हणून निर्माण केलेल्या वाहनांतून कार्बन मोनॉक्साईडसारखा विषारी वायूसतत वातावरणात सोडला जातो;म्हणून ही गर्दी जहरी. दुसरं, की माणसांना स्वतःपलीकडे कशाचा विचारच शिवत नाही, अशा स्वार्थी वृत्तीलाच ‘जहरी’म्हटलं तर काय चुकलं? जे परोपकारी नाही ते शेवटी जहरीच म्हणावं लागेल! अशा रीतीने हा शेर समजावून घ्यावा लागेल.

याच स्वार्थाचे दुसरे रूप म्हणजे आपले नेते! त्यांना डोळयासमोर ठेवून हा पुढील शेर वाचू या---

धरणामधेच सारेमुरतेम्हणूनआता

अमुच्या कुठेच पाणी मुलखास येत नाही...

धरणामधे पाण्याचा साठा नाही, असं नाही ; पण पाणी तिथेच मुरतं आहे. मग ते पुढील प्रदेशास कसं मिळणार? हामार्मिक शेर दोन ओळीतच इथल्या व्यवस्थेबद्दल खूप काही सांगून जातो!

मिटला अजून माथ्यावरचा कलंक नाही

बदलून टाकता हा इतिहासयेतनाही....

वैयक्तिक किंवा सामाजिक चळवळींना आलेलं अपयश ; किंवा भेदाभेदामुळे लागलेले जातीचे, स्तराचे कलंक हे समाजाला विशोभित करणारे काळे डाग आहेत. हे जोपर्यंत नष्ट होत नाहीत तोपर्यंत समाज प्रगत झाला, असे कसे म्हणता येईल?घडून गेला तो इतिहास ; तो बदलणे कोणाच्याच हातात नाही. पण भविष्यकाळ तरी सोनेरी करू या. सगळे कलंक एकीने धुवून टाकू या.

आता एक प्रीतीचा शेर---

तुज टाळतो कधी अन् कवटाळतो कधी मी

पण चैनमात्रकाहीहृदयासयेतनाही.....

कवीसमाजाच्या दुःखाच्या बाबतीत बहिर्मुखी आहे पण चिंतन करतांना तो अंतर्मुख होतो. कधीतो तिला टाळतो, कारण समाज दुःखी असतांना‘स्व’ मध्ये गुरफटून राहणं हा त्याला अपाथ वाटतो; तर कधी प्रीतीमध्ये सारं विसरता येईल का? या विचारानं तो तिला बाहूत घेतो!पण बेचैनी दूर होत नाहीच. ही कवीची व्यथा आहे. कारण सर्व उपेक्षित समाजाची दुःखं त्यानं आपलीशी केली आहेत. त्यांच्याहून जवळचं असं त्याला कोणीच नाही! कवी हा आधी एक चांगला माणूस असावा लागतो, असं ‘भटसाहेब’ म्हणायचे ; त्यांना म्हणावंसं वाटतं, ‘ घ्या हा तो चांगला माणूस!’

गगनी जरी उडाले अपुले कसे म्हणावे

परतून पाखरू जे घरट्यास येतनाही.....

पाखरू उडतं, गगनात भराऱ्या मारतं, याचा आनंद तर जन्मदात्यांस होतोच ; कारण ते पिलाची क्षमता बघतात ; त्याच्या पंखात आलेली ताकद बघतात; त्याने स्वबळावरचघेतलेली झेप व प्रगती बघतात! आनंदाची कारणं ही असतात. पण आता ते परतून

घरट्याकडे आलंच नाही, तर त्याला आपलं कसं म्हणायचं? ही दुःखाची किनारही त्या आनंदाला असते.

परदेशी जाऊन तिकडेच स्थायिक होणाऱ्या ( किंवा इथे राहूनही मातापित्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या)मुलांना डोळयांसमोर ठेवून हा शेर वाचा म्हणजे काळजात उठणारी कळ कळून येईल.

कवीला या शेरात कोणती कळ अभिप्रेत आहे? पाहू या ---

कळ कोवळी उठू दे हृदयात रोज माझ्या

जर का नवीन काही सृजनास येत नाही....

जोपर्यंत दुःखाची कोवळी कळ मनाला घुसळून टाकतनाही, तोपर्यंत कवितेचं नवनीत मनाच्या पृष्ठभागी येत नाही! कळांपाठोपाठ सृजन हेच कवितेच्या जन्माचं रहस्य असतं.

मला खूप आवडलेला हा शेर---

अजुनी बरेच काही बघलागतेकरावे

नुसती करून आशा मधुमास येत नाही....

आशा ठेवून, नुसतं रितं बसून का इप्सित साध्य होत असतं? पूर्तता करण्यासाठी जिवाचं रान करावं लागतं. धावावं लागतं. एका संस्कृत श्लोकात आशेचा गुणधर्म विरोध-अलंकारातून छान व्यक्त केला आहे.

आशानाममनुष्याणाम्काचिदाश्चर्यशृंखला ।

यया बद्धाः प्रधावन्ति, मुक्ताः तिष्ठन्ति पङ्गुवत् ।।

आशा हा एक आश्चर्यकारक, मजेदार साखळदंड आहे! जे लोक या शृंखलेनं 'बांधलेले' असतात ते धावत असतात (प्रधावन्ति म्हटले आहे, म्हणजे विशेषत्वाने धावतात ) ; आणि जे तिचे(आशेचे) कैदी नसतात, मुक्त असतात, ते मात्र अपंग असल्यासारखे एकाजागी खिळलेले असतात! ज्यांना आशा नाहीच, ते कशासाठी धावणार?

भगत सांगत आहेत, मधुमास आणायचा असेल, काही चांगल्याची आशा बाळगायची असेल, तर धावावे लागते,मित्रांनो!

अशी ही बावन्न शेरांची गझल! नवनवे अर्थ उलगडणारी!!

मला हेच सांगायचे आहे; एकूणच, सर्व संग्रह अभ्यासता, समजून येते की प्रा. सिद्धार्थ भगत यांची गझल हे उत्तम काव्य आहे. त्यांची गझलकुणाहीसारखी नाही, ती स्वयंभू आहे. एक 'माइल-स्टोन' आहे. गझलेची अनेक वृत्ते त्यांनी सहजतेने हाताळली आहेत. एवढेच नव्हे, तर अनेक वृत्ते स्वतः निर्माण केली आहेत! वृत्तदोष कुठे सापडणारच नाही, इतकी वृत्ते त्यांच्या अंगवळणी पडलेली आहेत. हा झाला केवळ तांत्रिक भाग. वृत्तात लिहिता आले की गझल आली, असे नसते. पात्र सोन्याचे आहे पण त्यात अमृत-पेय नसेल,तर नुसत्या पात्राचा काय उपयोग? असे माधव ज्यूलियन यांनी म्हटलेच आहे!गझलेच्या शेरात प्रामुख्याने हवा तो आशय. त्यात हवा काव्यगुण. रचनेला हवी लय आणि शब्दलालित्य. हे गुण भगत यांच्या गझलेत आनंददायक रीतीने आहेत! त्यांचे शेर आशयघन असतात. चिंतन करायला लावतात. ते चिंतन चित्ताला प्रसन्नता आणते. शक्य तेथे त्यांचे शेर अलंकृत आहेत. प्रचलित म्हणींचा वापर त्यांनी काही काहीशेरात केलेला दिसतो. 'वेस ओस सांजवेळी ओस आसमंत सारा' असा अनुप्रासही क्वचित भेटून जातो.वर अनेक ठिकाणी मी शेरांचे सौंदर्य उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहेच; पण वाचकांनाआणखीही तशी स्थळे सापडतील याची मला खात्री आहे.

वृत्तांची खूप विविधता मला दिसली. 70-80 वेगवेगळी वृत्ते भगत यांनी वापरली आहेत. नवनिर्मित वृत्तेही दुहेरी अंकाच्या आकड्यात आहेत!इथे एक सांगणे अप्रस्तुत होणार नाही, की गेल्यावर्षी 'छंदोमयी रचना-गझल' हे माझे जे पुस्तक प्रकाशित झाले, त्यात भगत यांच्या शेरांची भरपूर उदाहरणे मी घातली आहेत! त्यांच्या नवनिर्मित वृत्तांचाही त्यात समावेश आहे. पण त्याशिवायही आणखी त्यांची नवनिर्मित वृत्ते मला आढळली आहेत. त्यांनी वापरलेल्या वृत्तांची इथे यादी देणे केवळ अशक्य आहे!

नवीन वृत्ते निर्माण करतांना पद्मगट, अग्न्यावर्तनी, भृंगावर्तनी, हरावर्तनी इत्यादि गटांचे विविधतेने मिश्रण केले जाते. ते करतांना मात्र काहीवेळा गझलेच्या लयतत्त्वाला बाधा

येते.तशी बाधा येत नाही ना, ही काळजी घेणे जरूर असते. प्रा. भगत यांनीही ही सूचना लक्षात घ्यावी.

प्रा. भगत यांचे मतले लक्षवेधी असतात, हा मुद्दा वर आलाच आहे; पण त्यांनी वापरलेले काफियेही लक्षवेधी आहेत. काहीवेळा नवीनच आहेत. फक्त काही उदाहरणे देते---

1. भैरवी, नवी, यादवी...2. रुग्णाईत, पटाईत, तिऱ्हाईत.... 3. खंडणी, मागणी, टोचणी...

4. आतडे, लाकडे, कातडे... 5. खेद, उमेद, वेद, स्वेद....6. सत्ता, पत्ता, भत्ता....7. किल्ली, चिल्ली, दिल्ली... 8. साखळी, कर्दळी. बाभळी...9. पोच, खोच, चोच.... 10. बांडगूळ, ठिसूळ, बेंगरूळ...

ही यादी नवीन गझलकारांना उपयुक्त ठरेल. काफिये आयते घेतले तरी ते कसे निभावले जातात, याला महत्त्व असते. काफियाच्या अनुषंगाने शेरात स्वतःचे विचार मांडणे हे कसब असते व ते कवीच्या प्रतिभेवरच अवलंबून असते. ती कारागिरीनसते. कार्यशाळेत भट यांचे शेर उदाहरणादाखल घेऊन त्यातील काफियांनुसार शेर रचायला मी सांगत असे.त्यावेळी प्रशिक्षणार्थी त्यांच्या कुवतीनुसार विविध विचार शेरांतून मांडत व काही शेर चांगलेही असत.

प्रा. सिद्धार्थ भगत यांचे मला अभिनंदन करायचे आहे. एक उत्तम गझलकार मराठी साहित्याला त्यांच्या रूपाने मिळाला आहे.पाठ्यपुस्तकातून ते विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले आहेतच.तसाच हा ‘सामाजिक कवी’ आणखी व्यापक समाजापर्यंत पोहोचेल यात मला अजिबात शंका वाटत नाही.उद्या त्यांच्या काव्यावर डॉक्टरेट साठी लोक पुढे येतील हेही मी आज पाहातआहे.

त्यांच्या लेखणीतूनअशा सकस व अधिकाधिक प्रगल्भ गझला यापुढेही निर्माण होवोत व रसिक वाचकांना आनंद देवोत,या शुभेच्छेसह----

-----संगीता जोशी

दिवाळी, 22 ऑक्टोबर 2017.

शायरीतील दिवाळी

दसऱ्यारखाच, किंबहुना त्याहूनही,....दिवाळी सण मोठा । नाही आनंदा तोटा ।। अशी बालभारती मधली दसरा-दिवाळी आपण लहानपणापासून वाचली, पाठ केली. रंगित भुईनळ्यांसोबत थुई थुई नाचण्याचं ते वय आपण आनंदात उपभोगलं. फटाक्यांमधला उत्साह संपून मग चकली-चिवड्याची चमचमीत दिवाळीही आपण रुचीनं साजरी केली. पण बारा महिने चकल्या-कडबोळी दुकानात तयार मिळू लागल्या आणि मग दिवाळीची चवही कमी झाली! घराघरातले तळणीचे आणि बेसन भाजण्याचे खमंग वास नाहीसे झाले, तशी दिवाळीची रुचीही कमी झाली. तेव्हा आता चोखंदळ रसिक रुचीकडून 'अभिरुची' कडे वळला. म्हणूनच दिवाळी अंकांचं महत्त्व व संख्या वाढतच राहिली. चकलीपेक्षाही आवडीने रसिक वाचक या शब्दांच्या दिवाळीकडे आकर्षिले गेले व आवडीने वाचत आहेत. टीव्ही च्या लोकप्रियतेवरही त्यांनी मात केली, हे स्वागतार्हच म्हणायचं.

दिवाळी हा दिव्यांचा सण! आजही आपण परंपरा जपतो. एलईडी च्या जमान्यातही दारात पणती लावतोच. छोटी पणती बिचारी भोवती नसलेला अंधार दूर करते. त्या ज्योतीत एक मांगल्य असतं. खरं तर ती आपल्या मनातला अंधार दूर करत असते. मग वाटू लागतं की पणती असो, की ज्योत, ही केवळ प्रतीकं असतात. त्यातून दुसराच गहन अर्थ प्रकट होत असतो.

उर्दू शायरीची हीच एक मोठी खासियत असते की प्रतीकं वापरून शायर अलंकारिकरीत्या आपले भाव प्रकट करत असतो. ही एक गजल पाहू या...दिवाळीत दिवे आणि अंधार यांच्याबद्दल बोलणं औचित्याचंच ठरेल, नाही का?

चिरागे-तूर जलाओ बडा अंधेरा है

जरा नकाब उठाओ बडा अंधेरा है....

अंधार दूर करण्यासाठी दीप पेटवा! असा सरळ अर्थ आहे. पण हा चिराग कुठला बुवा? चिरागे तूर! म्हणजे नेमकं काय? यासाठी थोडं त्यांच्या 'पुराणात' शिरायला हवं. तूर हा एक पवित्र पर्वत आहे. आपण कैलास ला मानतो तसं इस्लामधर्मी तूर ला मानतात. प्रेषित मोझेस याने तूर वर 'तपःश्चर्या' केली आणि परमेश्वरानं त्याला दृष्टांत दिला. त्याला तिथे तेजोमय प्रकाश दिसला. ते ईश्वराचं प्रकाशरूप पाहून त्याला दिव्य ज्ञान प्राप्त झालं व अज्ञानाचा अंधःकार दूर झाला. ईश्वरानेच जणू ज्ञान व अज्ञान यांच्या मधला पडदा दूर सारला! तेजरूपी देवाचं दर्शन झालं, म्हणजेच ईश्वर व भक्त यांच्यामधला पडदा दूर झाला असंही म्हणता येतं.

गातांना गायक 'व्हेरिएशन' करत असतो, हे आपण मैफलीत ऐकतच असतो. जेव्हा श्रोते गैरमुस्लिम असतात, तेव्हा गायक मेहदी हसन चिरागे-तूर ऐवजी चिरागे-हुस्न असाही बदल करतात. सौंदर्यवतीला उद्देशून शायर, सागर सिद्दिकी म्हणतात, तुझ्या चेहऱ्यावरचा नकाब जरा दूर केलास आणि सौंदर्याचा दीप प्रकाशमान झाला तर या मैफलीतला अंधार पळून जाईल व इथे चैतन्य पसरेल! पहिली ओळ दोन्ही प्रकारे म्हटली तरी दुसरी ओळ पहिलीच्या अर्थाला चपखल जोडली जाते.

पुढचा शेर असा आहे,

मुझे खुद अपनी निगाहों पे ऐतमाद नहीं

मेरे करीबनआओ,बडाअंधेराहै....

सागर म्हणतात, खूप अंधार आहे इथं. प्रिये, तू माझ्या जवळ येऊ नकोस; दूरच रहा. कारण माझा माझ्यावरच विश्वास नाही; मी काही भलतं सलतं वागलो तर! म्हणून दूर रहा , तेच बरं.

अभी तो सुबह के माथेका रंग काला है

अभी फरेब न खाओ,बडाअंधेराहै....

सकाळ झाली असं आपल्याला वाटतंय; पण पाहा, तिचं मस्तक अद्याप काळंच आहे. ‘उजाडलं; पण सूर्य कुठे आहे?’ अशीच ही अवस्था! पुन्हा इथे प्रतीकांचा अर्थ समजावून घेऊ या. सुबह म्हणजे अंधार दूर होणं. हा अंधार कशाचाही असू शकतो. देशाला स्वातंत्र्य मिळालं पण अजून जनतेच्या मूलभूत गरजा भागत नाहीत; अजून देशातील एकोणीस कोटी लोक उपाशी पोटी झोपतात! तेवढेच अर्धपोटी असतात. याला काय स्वातंत्र्य म्हणायचं? हा अंधार जोपर्यंत दूर होत नाही तोपर्यंत, सकाळ झालीय असा समज करून घेऊ नका; धोका खाऊ नका.

कुठल्याहीअभावाला अंधार म्हणता येईल. वंचितांना जगण्यास पुरेशी साधनं न मिळणं हे तर झालंच; पण माणसांतली माणुसकी संपणं;(उर्दू शायरीतील) प्रेयसीने प्रेमिकाची उपेक्षा करणं; इतकंच नाही तर भौतिक गोष्टींकडे आकर्षित होऊन जीवनाचा आध्यात्मिक उद्देश विसरणं ह्यासर्व परिस्थिती अंधाराच्या यादीत बसू शकतात. शिवाय ही यादी न संपणारी आहे.अंधार ही वेगळी अशी काही गोष्ट नाहीच; प्रकाशाचा अभावहीच अंधाराचीशास्त्रीय व्याख्या आहे.

शहर के अंधेरे को इक चिराग काफी है

सौ चिराग जलते हैं इक चिराग जलने से....अज्ञात

एक दिवा प्रज्वलित झाला की, पाहता पाहता त्यावरून अनेक दिवे उजळतात व अंधाराचं अस्तित्व संपून जातं. इथेही शेराचागर्भितार्थ विचारात घेतला तर शेर अधिक सुंदर वाटतो. चिराग म्हणजे बुद्धी. चिराग म्हणजे देशभक्ती. चिराग म्हणजे शास्त्रज्ञाची संशोधक वृत्ती.एक आईनस्टाईन अनेकांना प्रेरणा देतो. एका भगतसिंगामुळे अनेक देशभक्त निर्माण होतात.एका सावित्री फुलेंमुळेस्त्री-शिक्षणाचा वृक्ष तयार होतो..म्हणजेच अनेक दीप प्रज्वलित होतात.

काही वेळा दिवा विझून जातो. का विझला असेल दिवा? बहुतेकदा उत्तर येतं हवेचा झोत आला असेल… फक्त एवढंच? शेर पाहा…

उन चिरागों में तेल हि कम था

क्यों गिला हम फिर हवा से करे?....जावेद अख्तर

पाहिलंत ना? दोष स्वतः दिव्याचाच असतो.पण बऱ्याच वेळा हवेबद्दल तक्रार केलीजाते. आपलं काही चुकलं, आपल्याला अपयश आलं की इतर कोणामुळे तरी तसं झालं ; किंवा परिस्थितीच तशी होती असं

म्हणण्याची लोकांची सवय असते. त्यावर नेमकं बोट ठेवलंय जावेद अख्तर यांनी!

असा वेगळा विचार मांडलेला असला तर ते शेराचं सौंदर्य मानलं जातं. आपल्या मनात नकळत ‘वाऽ‘ असा उद्गार उमटून जातो.

अनेकदा दिवा हवेपुढे तग धरू शकत नाही, हेही तितकंच खरं. (शेरांमधील हे दिवे इलेक्ट्रिकचे नाहीत, बरं का! )

हथेलियों ने बचाया बहुत चिरागों को

मगर हवा भी अजब जाविए बदलती है…..अज्ञात

दिवा विझू नये, म्हणून त्याला वाचविण्यासाठी आपण तळहातांचं कमळ त्याच्याभोवती धरतो. पण कवीनं तसं करूनही दिवा वाचवणं त्याला कठीण गेलं. कारण हवा तिच्या वाहण्याचा कोन (Angle) सारखाच बदलत होती!

गरिबांना , वंचितांनाउभं करण्यासाठी सरकार खूप प्रयत्न करत असतं; पण एका समस्येचं निराकरण करत असतांनाच दुसरी, त्यानंतर तिसरी…अशा समस्या उभ्या राहात असतात. अशा

त-हेनेवंचितांचं पूर्ण उत्थापनअद्याप होऊच शकलेलं नाही. यालाच समांतर असा अर्थ वरील शेर निर्देशित करतो.

अशी अर्थपूर्ण उर्दू शायरी वाचली की रसिक मनाला भुरळ पडते, व शायरीची ओढ लागते, यात काय आश्चर्य?बऱ्याच लोकांनाशायरीची गोडी लागली ती जुन्या हिंदी चित्रपट-गीतांमुळे , हे स्वानुभवातून सांगते आहे.खरोखर त्या 'जुन्या' गाण्यांना वाङ्मयीन मूल्य असे. तीही प्रसंगानुसार लिहिली जात, पण जास्त करूनआधी लिहिलेल्या गीतांनाच संगीतकार चाल देत असत. आधी चाल तयार करायची व नंतर त्यावर कवीनं शब्द लिहायचे असा प्रकार नव्हता.प्रसंगानुरूप लिहून घेऊन नंतर चाल बांधणं याला हरकत नसते. पण'ड डा डा डा' असं चालीवर लिहून घेणं यात कवीला कमी लेखलं जातं असं माझं मत आहे. ' दिवे असलेली' ही काही जुनी गाणीसर्वांनाच आवडत असतील…

दिव्यामुळे अंधार उजळतो हे खरंच, पण तो दिव्याची पाठ सोडतो का? पुढील ओळी पाहा.

ये कैसा न्याय तेरा, दीपक तले अंधेरा

किसीको दी निगाह,राह छीन ली

किसीको राह दी, निगाह छीन ली

ये कैसा न्याय तेरा?

दृष्टिहीनांना तर कायमचा अंधार मिळालेला असतो. त्यांना मार्ग मिळाला तरी वाटचाल करणं किती कठीण! व एखाद्या डोळसाला मात्र समस्येतून मार्गच दिसत नाही. अशी परिस्थिती म्हणजे दिव्याखाली अंधारच नाही तर काय?

हमने न हाए जाना, सुख चैन क्या, खुशीक्या

है रात उम्रभर की, अंधों की जिंदगी क्या

दिल पूछता है मेरा, है कौन ये लुटेरा.....

जीवनभर रात्र देणाऱ्या ईश्वरालाच कवी विचारतो, 'सांग बरं, यात लुटेरा कोण आहे?'

'छोटी बहन' (1959) यातील शैलेंद्र च्या शब्दांना चाल देणारे संगीतकार होते, जयकिशन डाह्याभाई पंकल व शंकरसिंग रघुवंशी! अनोळखी नावं वाटताहेत? हेच ते आपले शंकर-जयकिशन!

अंधःकाराला दिवा हा आपला शत्रू वाटत असावा, हे नैसर्गिक आहे. पण दिव्याला सुद्धा शत्रू आहेच. बिचाऱ्या दिव्याचं ज्याच्यापुढे काही चालत नाही असा शत्रू! पिसाट वादळ किंवा घोंगावणारं तुफान!

भरत व्यास सांगताहेत त्याची कथा---

निर्बल से लडाई बलवान की, ये कहानी है दिये की और तूफान की.....

कहीं दूर था तूफान, दिये से था बलवान

सारे जग को मसलने मचल रहा

झाड हो या पहाड, दे दूं पल में उखाड

सोच सोच के जमीं पे था उछल रहा

एक नन्हासा दिया; उसने हमला किया

अब देखो लीला विधी के विधान की....ये कहानी है दिये की और तूफान की.....

या छोट्या दिव्यालाच का, साऱ्या जगालाच कुस्करून तुडविण्याच्या इराद्याने ते वादळ थैमान घालत आलं. दिव्याशी लढाई सुरू तर झाली, पण नियतीच्या मनात वेगळंच होतं. दिव्याने अर्थात् ज्योतीने धीर सोडला नाही. ती वादळाशी सामना करीत राहिली. प्राणपणानं झुंज देत राहिली.

फिर ऐसी घडी आई, घनघोर घटा छाई

अब दियेका भी दिल लगा कॉपने

बडे जोरसे तूफान, आया भरता उडान

इक छोटेसे दियेका बल मॉपने

तब दिया दुखियारा, वो बेचारा बेसहारा

चला दॉव पे लगाने बाजी प्रान की!!.....ये कहानी है दिये की और तूफान की….

मन्ना डे यांनी ही झुंज आपल्या स्वरातून छान प्रकट केली आहे. संगीत होतं गुणी संगीतकार वसंत देसाई यांचं. 1956 मध्ये आलेला चित्रपट, 'तूफान और दिया', तुफान चालला.

तुफानापुढे नमतं न घेणाऱ्या दिव्याचा अखेर विजय झाला आणि होतोच! हवी असते फक्त जिद्द; मनाची कणखरता; व स्वतःवरचा असीम विश्वास! हा दिवा आपल्याला बरंच काही शिकवून जातो.

आपल्या मनातही एक दीपक असतो. जो आपल्याला वाट दाखवत असतो. तो दीप दिसत नाही पण या दीपकाची शक्ती अफाट असते. आपल्याला सुखी करणारं किंवा दुःखात जाळणारं हे मन, स्वतः मात्र अदृश्य असतं. मनाचं 'मानसशास्त्र' भलेही पुढे गेलेलं असू देत, पण मेंदूवर एका जागी बोट ठेवून 'हे मन' असं दाखविता येत नाही. अजून तरी शास्त्रज्ञ त्याबद्दल अनभिज्ञ आहेत! अशा या मनाला ही नायिका काय सांगते पाहू या….

मेरे मन के दिये, मेरे मन के दिये

यूं ही घुट घुट के जल तू मेरे लाडले,

ओ मेरे लाडले…..

खाक हो जाए हम प्यार के नाम पर

प्यार की राह में रौशनी तो रहे.....

मेरे मन के दिये....

आग के फूल आँचल में डाले हुए

कब से चलता है वो आसमां देख ले....

मेरे मन के दिये....

माझ्या मना, तुझ्या मधे प्रीतीची ज्योत पेटलेली आहे ना? मग तुला असंच घुसमटत, जळत राहावं लागणार! (पूर्वीच्या जमान्यात, तारुण्यातलंप्रेम करणं हा जणू अपराधच होता. त्या व्यक्तीजवळ प्रेम व्यक्त करणं हे महाकर्मकठीण होतं, व समजा सर्व जुळून आलंच तर घरातील ज्येष्ठांकडून संमती मिळणं तर त्यापुढची बात! आजकालसारखं‘बिनधास’ वातावरण नव्हतं. त्यामुळे नायिका हे सर्व जाणूनच मनाला थोपवू पाहात आहे.) पुढे ती म्हणते,

जळत राहिलं तर त्यात वाईट काय आहे? समजा तुझं प्रेम सफल नाही झालं, तरी तुझ्या जळण्याने प्रीतीच्या वाटेवर प्रकाश तरी पडेल. ती वाट उजळली तर, त्या वाटेवरून जाणाऱ्या प्रत्येकाला सफलतेचा मार्ग सापडेल!

आणि, मना, दुसरं सांगू का तुला? त्या आकाशाकडे जरा पाहा बरं! त्याच्या पोकळीत कितीतरी तारे, अनेक सूर्य सामावलेले आहेत. ती तर सगळी तेजाची किंवा आगीची फुलं आहेत. सगळेच आगीचे गोल! त्या सर्वांना पदरात बांधून हे आकाशशांतपणे युगानुयुगे वाटचाल करत आहे. तुझी दुःखं, तुझं जळणं तर त्यापुढे काहीच नाही!.....म्हणून आयुष्यभर तक्रार न करता असाच जळत रहा.....

'परख' या एका साध्या, सुंदर चित्रपटासाठी शैलेंद्र यांनी लिहिलेल्या गीताला संगीत दिलं होतं सलील चौधरींनी. लता नं ते गायलं होतं आणि साधना या अभिनेत्रीने पडद्यावर ते सादर केलं होतं. या सिनेमात साधना मेक-अप शिवाय वावरली आहे. तशीही ती खूप गोड दिसली आहे. या गाण्याचं आणखी एक वैशिष्ट्य सांगता येईल. यात पार्श्वसंगीतात फक्त कोरस वापरला आहे. त्या काळात हा पहिलाच असा प्रयोग होता.

मनाचा दीप नेहमी उदास व मंद जळतो, असं कसं असेल? खूपदा तो प्रकाश घेऊन येतो व आयुष्य उजळून टाकतो. जीवन त्या आनंदाच्या कारंजात भिजून जातं.

दिलका दिया जला के गया, ये कौन मेरी तनहाई में

सोये नग्में जाग उठे, होंटोंकी शहनाईमें....

प्रेमाच्या दीपाचीच ही किमया आहे....मजरूह सुलतानपुरी पुढे लिहितात,

एक ही नजर में बिखर गई मैं तो

आइने को देखा संवरगई मैंतो

तन पे उजाला फैल गया, पहली ही अंगडाई में ....

एकाच दृष्टिक्षेपात तो प्रेमदीप प्रज्वलित करून गेला, पण ही सगळं स्वास्थ्य हरवून बसली.

आरशात पाहून उगीचच स्वतःला सावरू लागली! तिच्या सगळया विभ्रमांवर जणू तेज पसरलं.... 'आकाशदीप' या फिल्म साठी ह्या गीतावर चित्रगुप्त यांनी स्वरसाज चढवला होता.

असा एकदा पेटलेला दिवा सतत तेवत ठवण्याचं आपलं कामच असतं. नौशाद यांनी 'सन ऑफ इंडिया'(1962) चित्रपटासाठी शकीलचं एक गीत केलं होतं.....भैरवी रागात...

दिया ना बुझे री आज हमारा.....

चले री पवन सननन् सनन

थरथर काँपे जियरा.....

आंस का जगमग रूप निखारे,

प्रीत में खोए नैन हमारे

ढूंढेपी का द्वारा....

दीपक-ज्योती डगमग डोले

हमरा करजवा खाए झकोले

राम! न हो अंधियारा....

या नृत्यगीतातली नायिका तिच्या मनात पेटलेला प्रेमदीप सांभाळत प्रियकराच्या घराचा शोध घेतेय्. ज्योत थरथरतेय; जीवही घाबरा होतोय्; एकदम अंधार तर होणार नाही ना, अशी भीती वाटतेय्....काही झालं तरी प्रेमाला मुकावं लागू नये एवढंच तिला हवंय्. त्यासाठी शेवटी ती रामाला प्रार्थना करतेय.

आपण दिवाळीत सर्व प्रकारच्या दिव्यांचं पूजन करतो. त्यांना प्रकाश देणयाची मनोमन विनंती करतो. पण आपण आकाशकंदील का लावतो? असा विचार केलाय् कधी?मला तरी वाटतं की आकाशातल्या त्या वैश्विक दिव्याची आठवण ठेवण्यासाठी, व त्याच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी! तो 'दिवा' नसेल तर हे जग तरी राहील का? त्या संदर्भाचं हे एक सुंदर गीत......

जगतभर की रौशनी के लिये, करोडों की जिंदगी के लिये

सूरज रे, जलते रहना...सूरज रे...जलते रहना!

जगत कल्याण के खातिर तू जन्मा है

तू जग के वास्ते हर दुख उठा रे

भले ही अंग तेरा भस्म हो जाए

तू जल जल के यहां किरनें लुटा रे

लिखा है ये ही तेरे भाग में, कि तेरा जीवन रहे आग में.......सूरज रे.....

करोडों लोग पृथ्वी के भटकते हैं

करोडों आँगनों में है अंधेरा

अरे जबतक न हो घरघर में उजियारा

समझ ले है अधूरा काम तेरा

जगत उध्दार में अभी देर है,अभी तो दुनिया में अंधेर है.....सूरज रे....

.........जलते रहना!! हे गीत एक उच्च-उदात्त संदेश देत आहे, तिकडे लक्ष गेलं पाहिजे. आपलं अस्तित्व दुसऱ्यांसाठी असायला हवं. स्वतः जळून आजूबाजूच्या सर्वांच्या जीवनात उजेड निर्माण करणं, यातच आपला आनंद आहे. दिवाळीचा सण तरी यापेक्षा निराळं काही सांगतो का?हाच संदेश देतो ....

ज्योत से ज्योत जगाते चलो, प्रेम की गंगा बहाते चलो...

राह में आए जो दीन दुखी, सबको गले से लगाते चलो....

('संत ज्ञानेश्वर'—1964—भरत व्यास—लक्ष्मीकांत प्यारेलाल—लता )

'सूरज रे जलते रहना' हेगीत 1963 च्या 'हरिश्चंद्र तारामती' साठी रामचंद्र नारायण द्विवेदी, उपनाव कवि प्रदीप यांनी लिहिलं व लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांनी संगीतबद्ध केलं.

पूर्वीची चित्रपट-गीतं ही शायरीचे उत्तम नमुने असत, हे नक्कीच मानायला हवं.

शनिवार, 15.9.2018

---संगीता जोशी, 96650 95653

Sanjoshi729@gmail.com

वैशाली सावंत यांची गझल

प्रस्तावना

---संगीता जोशी

वैशाली सावंत---'सारं काही मनातलं—

पावसाळ्यात मुलं एक गंमतशीर खेळ खेळतात. कागदी नावांचा. पावसामुळे तयार झालेल्या वाहत्या ओहोळांमध्ये नावा सोडून आनंद लुटत असतात. हा खेळ केवळ वयाशी सुसंगत असतो. कविता करणं हेही बऱ्याच जणांच्या बाबतीत किशोरावस्था किंवा तारुण्याच्या नव्हाळीपुरतं मर्यादित असतं. वय वाढलं की कविता हातातून व मनातून नकळत निसटून जाते.

हा कवितासंग्रह हाती आला तेव्हा मी कवयित्रीला भेटलेली नव्हते. पण शीर्षकाने मला आकर्षून घेतलं आणि मी तिला भेटायचं ठरवलं. मला तिला जाणून घ्यायचं होतं. कवयित्री ही एक तरुण प्राध्यापिका आहे व ती कॉलेजमध्ये इंग्रजी विषय शिकविते हे मला तिला भेटल्यावर कळलं. तारुण्याच्या नव्हाळीनंतरही कवितेला तिनं निसटू दिलं नव्हतं.

एका कवीनं म्हटलं आहे, 'मन मनास उमगत नाही.' अशा त्या मनाला समजून घेऊन ते शब्दात पकडणं हे साधं सुधं काम नाही. पण त्याच्या पृष्ठभागावर उमटणाऱ्या तरंगांशी शब्दांनी खेळणं मात्र कवींना जमू शकतं. कवयित्रीला ते साधलं आहे हे तिच्या या पहिल्याच काव्यसंग्रहावरून दिसून येतं.

ती म्हणते,

बागडणारे फुलपंखी दिवस उडून जातात,

अन् आपण पोहोचतो, अलगद.....

एका वेगळ्या विश्वात

इंद्रधनुष्याचे कवडसे पोहचत नाहीत जिथे

अन् प्रवासही करता येत नाही कागदाच्या होडीतून..

पाय टेकून चालावं लागतं जमिनीवर...

पावलांखाली काटे असलेली खडतर वाट असली तरी तिच्या भाववेलीवर शब्द्फुले असल्यामुळे तिला वादळाची व तुफानाची भीती वाटत नाही.

शब्दांचे किनारे धुंडाळत ती वल्हवत जाते, तुफानाशी झुंजते आणि विजयाचे उन्माद अंगभर मिरवत परतते..कुणाला पत्ताही नसतो या सफरीचा. ही मनाची, मनातली सफर ती एकटीच करते, तेव्हा तिला कविता भेटलेली असते.

शब्द येतात आतून आतून
चपखल बसतात अंतर बेतून...

शब्दामागोमाग लपलेली कविता दिसते..पाहून खुद्कन हसते...अशी तिची सखी कविता!...

कवयित्रीच्या कवितेत कधी कधी बालपण नदीच्या वाहत्या पाण्याबरोबर वाहात येतं तर कधी उडत्या पाखराप्रमाणे उडत येतं..कधी पावसाच्या बरसण्यासोबत प्रियाचं बरसणं आठवून तारुण्यातील विरहव्याकुळता येते... आणि ती म्हणते,

तू अश्रू बनून रहा ना माझ्या डोळयात
शपथ सांगते कधी रडणार नाही आयुष्यात...

डोळयात अश्रू होऊन राहण्याची 'त्याला' विनंती करणारी प्रेयसी क्वचितच कुठे सापडेल!

प्रेमाच्या इच्छित परिणतीनंतर कवयित्रीच्या मनाचा समंजसपणाही कवितेतूनच व्यक्त होतो...

जीवनाच्या सारीपटावर कसे भेटलो दोघे आपण
फुटून फुटूनही एक होती अशा सागराच्या लाटा आपण..

पाऊस हा तिच्या आवडीचा ऋतू आहे. अनेक कवितांतून तो रिमझिमतो, भुरभुरतो, बरसतो...आणि भिजवतो.. तिलाच नव्हे तर वाचकालाही.

क्वचित जीवनावर भाष्य करणाऱ्या काही ओळी, एखादी कविताही वाचायला मिळते.

या संग्रहातील बहुतेक सर्व कविता मुक्तछंदात आहेत. त्यातही कुठे कुठे अनुप्रास साधून वृत्तबध्दतेचा 'फील' आणला आहे. आयुष्य आणि शब्दऋतू या दोन कवितांत ही लय चांगली साधली आहे.

संवेदनांचं झाड , थोडंसं जरी हलवलं
टपटपतात फुलं टपोरी
मनाच्या अंगणात माझ्या...
एकेक फूल वेचते
अलगद दोऱ्यात टोचते

तेव्हा कुठे अशी कविता सुचते...

नात्यांचा प्रसन्न दरवळही तिची कविता सुगंधी करतो. नात्याला नाव देणं तिला मान्य नाही.

कवयित्री प्रतिमांचा वापर करून भावना व्यक्त करते. व्यक्त होतेही आणि अव्यक्तही रहाते. पाऊस, थंडी, संगम, झाड, इंद्रधनू इ. निसर्गातील गोष्टींची तसेच कुंकू, नंदादीप , अंगण अशी सांस्कृतिक प्रतीकं ती वापरतांना दिसते. आयुष्याकडे बघण्याचा तिचा सकारात्मक दृष्टिकोन 'आठवणी पावसातल्या' या कवितेतून स्पष्ट जाणवतो. चिंब भिजविणाऱ्या आठवणींच्या धारा मनाला लख्ख करतात, साठलेला गाळ धुऊन जातो नि मोकळं वाटतं....

संकटांमुळे जगण्यात मौज वाटणारी ही मनस्वी कवयित्री आहे. ती स्वप्नवेडी आहे पण तिची स्वप्नं पहाटतात नि ती भानावर येते! तिचं मीपण आभाळतं आणि तिच्या व्यापकतेचा आयाम विस्तारतो. दुःखावर हसणारं कलंदरी जिगर तिला लाभलं आहे. गुलाबाच्या सरी तिला समृध्द करत राह्तात. कारण त्याचे काटेही हसत सोसण्याची तिची तयारी आहे.

कवितेतल्या तिला मी प्रत्यक्ष भेटीत अधिक जाणून घेऊ शकले.

हा वैशाली सावंत चा पहिलाच संग्रह. अजून खूप काही शिकायचं आहे. इतरांच्या कवितांचं भरपूर वाचन व्हायचं आहे, अभ्यास व्हायचा आहे. लेखनासाठीही रियाझ आवश्यक असतो, जसा मंचीय कलांना जरूर असतो. दुसरं संतकवींपासून आधुनिक कवींपर्यंत जमेल तेव्हढ्या कविता वाचून वृत्तांची ओळख करून घेतली पाहिजे. वृत्तबध्द कविता वाचकाच्या लक्षात राहण्याची निदान शक्यता तरी असते! म्हणून तसा प्रयत्न अवश्य करावा.

शुभेच्छा देतांना एवढंच सांगेन,....आगे बढो...

(अल्लामा इक्बाल यांच्या शेरात किंचित बदल करून... )

सितारोंसे आगे जहॉं और भी हैं

अभी सामने इम्तिहॉं और भी हैं.....

Divakar Choukekar

## प्रस्तावनाः तुझ्यासारखी तू

नको तू विचारूकुणासारखीतू

नसे अन्य कोणी, तुझ्यासारखी तू...

कवी दिवाकर चौकेकर यांनी हे कोणालाही उद्देशून म्हटलेलं असू दे; पण मला वाटतं ते गझलेला उद्देशून म्हटलं असेल असं मानलं तरी हरकत नाही. सर्वांच्या प्रमाणेच आधी कविता करत असणारा हा कवी, गझलेशी ओळख झाल्यावर तिच्याप्रेमात पडला यात आश्चर्य वाटायला नको. गझलेचं छंदोबद्ध सौष्ठव व इतर गुण आज अनेकांना आकर्षून घेत आहेत. चौकेकर यांचा हा पहिलाच गझलसंग्रह आहे. 'मी या क्षेत्रात विद्यार्थी आहे; माणूस जन्मभर विद्यार्थीच असतो,यावर माझा विश्वास आहे' अशी नम्र भूमिका त्यांनी आधीच मनोगतात मांडली आहे, हा सच्चेपणा कोणालाही भावेल असाच आहे. नाहीतर बऱ्याच वेळा आम्ही 'बन चुके' आहोत असा काहीसा उद्दाम भाव बोलण्यात नाही पण वागण्यात बघायला मिळतो. त्यामुळे दिवाकरांच्या प्रांजळपणाला मी सर्वप्रथम दाद देते.

रोज भेटते स्वप्नामध्ये सजणी माझी

गूज सांगते कानामध्ये सजणी माझी...

अशा मतल्याने एका गझलेची सुरुवात झाली आहे. तेव्हा कवीच्या ह्या सजणीशी आपली ओळख होते. पहिल्या ओळीत प्रस्तावना आणि दुसऱ्या ओळीत समारोप अशा पद्धतीचा हा शेर वाचकाच्या ओठात एक निःशब्द स्मित उमलवून जातो.

मीच बावळा ठरतो अन् ती चतुर शहाणी

जेव्हा धरते शब्दामध्ये सजणीमाझी.....

असा पुढील शेर कवीच्या निरागस प्रांजळपणाचा पुनःप्रत्यय अनुभव आपल्याला देतो.

अनलज्वाला या मात्रावृत्तात ही गझल बांधलेली आहे. या संग्रहातील सुमारे दहा गझला याच वृत्तात आहेत. अशा गझलेतील आणखी एक शेर उद्धृत करते जो मला आवडला आहे;

पिंजऱ्यास त्या सोन्याच्या तो असेल भुलला

थांबविली का त्याने फडफड अता, समजले....

यातील एक शेर कवीची सामाजिक दुःखाशी जोडलेली नाळ दाखवून देतो.

नको काळजी, पडेल यंदा खूप चांगला

कानांवरती पडली गडगड अता समजले....

'तुझ्यासारखी तूऽ' या गझलसंग्रहात जास्त गझला किंवा अनेक शेर हे 'तू' म्हणजे कवीची 'ती' ला उद्देशून आहेत हे ओघानेच आले. तरीही अनेक ठिकाणी समाजिक आशयाचे, सामाजिक भान असलेले शेर आढळतात; ज्यामुळे कवीची चौफेर अवलोकनाची जाणीव होते. हा 'तिच्यासाठीचा' एक शेर—

पान तरूचे पाण्यावरती जसे तरंगत वहात होते

तसेच सखये, मन माझेही तुझ्याभोवती रहात होते....

वाहत्या पाण्याबरोबर पान वाहत जावं, त्याला त्याची स्वतःची गती असूच नये, तसं कवीचं मन सतत तिच्याच सोबत रहात होतं ही तरंगत्या पानाची उपमा किती चपखल आहे असे सहजच वाटून जाते. बत्तीस मात्रांच्या वनहरिणी वृत्तातील ही गझल असून आणखी काही गझलांत कवीने हे वृत्त वापरले आहे.

मला काहीतरी येथे करोनी जायचे आहे

जरासे ऊन सोनेरीइथेपेरायचे आहे....

प्रेयसीचे प्रेम मिळविणे ही आयुष्यातील एक 'अचीव्हमेंट' आहेच, पण तेवढं एकच ध्येय असू शकत नाही. स्वतःच्या जीवनाची इतिकर्तव्यता समाजासाठी काहीतरी केल्याशिवाय होत नाही, हेही तितकेच खरे. जरासं सोनेरी ऊन कुणाच्या अंधकारमय जीवनात पेरता आलं तर मिळणारं समाधान व आनंद काही वेगळाच!

तुम्ही झाकून ठेवावा, घरी तो कोंबडा आता

'दिवाकर' रोज नेमाने, इथे उगवायचे आहे....

कोबडा आरवल्यावर सूर्याच्या आगमनाची जाणीव होते असा संकेत आहे. कवीचे नावच दिवाकर आहे, ते सार्थ करणारा हा आश्वासक शेर आहे. दिवाकर नेमाने उगवेल व अनेकांच्या जीवनात प्रकाश घेऊन येईल त्यामुळे 'निश्चिंत असा' हे कवीला सुचवायचे आहे. पुन्हा हे समाज-भान या शेवटच्या शेरात (मक्ता) स्पष्ट झाले आहे. हीवियद् गंगा वृत्तातील रचना आहे.

सखे, काय सांगू कुणासारखी तू

टपोऱ्या सुगंधी फुलासारखी तू...

असा हा दरवळणारा शीर्षक-शेर ज्या गझलेत आहे, तिला 'बेमतला' गझल असे म्हणतात. मतला नसलेली गझल. हा प्रकार सर्रास नसला तरी उर्दूतही क्वचित आढळतो. तो स्वीकारलाही गेलेला आहे. नाहिद अख्तर या गायिकेने गायलेली एक गझल मला या क्षणी आठवली तीसुद्धा बेमतला गझल आहे. पहिला शेर असा—

सिर्फ अश्क-ओ-तबस्सुम में उलझे रहे

हम ने देखा नहीं जिन्दगी कीतरफ....

उर्दू शायर एहसान 'दानिश' यांची ही गझल आहे.

चौकेकरांच्या वरील गझलेतील एक शेर असा आहे—

कशाला हव्या त्या दिशा रोखणाऱ्या

नभी विहरणाऱ्या खगासारखी तू...

हा शेर मला महत्त्वाचा वाटतो. कारण यात कवीची स्त्रियांबद्दलच्या खुल्या विचारसरणीची

झलक पाहायला मिळते. नभात भरारी मारायला स्त्रीला मोकळीक असावी हा उदार दृष्टिकोन स्वागतार्हच ठरतो. कवीला समाजातील आक्षेपार्ह गोष्टींची जाणीव असावी, कळकळ असावी व त्यावर त्याने भाष्य करावे हे गझलकाराचे लक्षणच आहे!

कशास रोज रोजचे असे इथे मरायचे

असेच दुःख पोळते इथे किती सहायचे....

दुःख हा गझलेचा स्थायी विषय आहे; तर दिवाकर त्यापासून कसे दूर राहू शकतील? आपला उद्वेग ते असा व्यक्त करतात---

करू नकोस याचना उगीच या जगापुढे

भिकारड्या जगास या तुलाच खूप द्यायचे...

दुःखाने माणूस हतबुद्ध होतो; पण त्याही अवस्थेत 'तूच जगाला खूप काही देणं लागतोस' हा कृतज्ञतेचा विचार कवी विसरत नाही हे उच्च विचारसरणीचे लक्षण नजरेआड करून चालणार नाही. ही गझल 'कलिंदनंदिनी' या वृत्तात आहे.

'दिवाकर' हया कवि-उपनामाचा (तखल्लुस) वापर कुठेकुठे कवीने केला आहे व तो योग्य ठिकाणीच केला आहे. असा एक मक्ता पाहा—

उजेड दारी घेउन येई जरी 'दिवाकर'

प्राजक्ताचा पसरे दरवळ तू आल्यावर....

मी दिवाकर (सूर्य) आहे, मी प्रकाश आणतोच; पण प्राजक्ताचा दरवळ मात्र फक्त तुझ्यामुळेच येतो.

अशा ह्या 'तिच्या' गझला. पण या संग्रहात इतरही बरंच काही समावलं आहे. भूजंगप्रयात, राधा, कलिंदनंदिनी, मेनका इ. प्रचलित वृत्ते कवीने वापरली आहेतच ; पण लज्जिता, पिनाकी, सूर्य, वीरलक्ष्मी इ. तुलनेने कमी वापरल्या जाणाऱ्या वृत्तातही रचना केल्या आहेत. कवीची भाषा साधी,सोपी व वाचकाला सहज कळणारी अशी आहे. यालाच 'प्रसाद' हा काव्यगुण म्हणतात.

या संग्रहात त्रुटी नाहीतच का? आहेत; कारण कोणत्याही कवितासंग्रहात त्या असतात. अत्यंत निर्दोष असं जगातकहीच नसतं, असं म्हणतात.

दिवाकर चौकेकरांचा हा पहिलाच गझलसंग्रह आहे; आणि अशा वेळी फक्त 'आगे बढो' इतकंच म्हणायचं असतं. चांगलं ते नोंदवायचं व सुधारणेसाठी प्रोत्साहित करायचं हे धोरण असायला हवं.तेच मी केलं आहे. शुभेच्छा देऊन थांबते.

9665095653, sanjoshi729@gmail.com ---संगीता जोशी, पुणे.

अजय नाईक – आनंद सुनवारी

कविता सुचते म्हणजे काय आणि केव्हा? भावनेचा ओतप्रोत भरलेला पेला ओसंडून वाहू लागला की? का एखाद्या टोचणाऱ्या कणाची बोच मनात सलत राहिली की? नाही; अजय नाईक यांच्या कविता वाचून मला कवितेच्या सृजनाचे वेगळे कारण सापडले. भावसमाधी. या समाधीत ते मनःसमुद्राच्या अज्ञात किनारी बसलेले असतात जिथे शब्दांच्या हळुवार लाटा एकामागून एक त्यांच्या अस्तित्वाशी धडका देत असतात. त्यातूनच त्यांची लेखणी शब्द चाळून आणि गाळून घेते;व त्यांची कविता साकार होते. ही प्रक्रिया त्यांच्या नेणिवेच्या पातळीवर होत असावी असा माझा कयास आहे;आणि तो माझ्यापुरता पूर्ण खरा आहे. पाहा ना...

शिशिरातला शिमगा

जेव्हा फेर धरू लागतो

तेव्हा नकळत कर्णात

ढोल ताशे वाजू लागतात..

अनंताच्या विश्वात घेऊन जाणारे ध्वनी

घेऊन जातात मग प्रणवाच्या समाधीत...

मग मी राहत नाही

व्यापून राहून राहतो

अलौकिक दिव्य नादपरब्रह्म...

ढोल-ताशांचे ध्वनी कवीला समाधी-अवस्थेत घेऊन जातात कारण त्याचा मूळ पिंडच साधकाचा आहे! अजय नाईक संगीतकार आहेत. संगीत हीच एक साधना आहे. ते शब्द, सूर, ताल (रिदम) याचे सच्चे उपासक आहेत, साधक आहेत.

अजयच्या कवितेला चैतन्याची ओढ आहे; सृष्टीतील गूढ प्रकटीकरणाचं आकर्षण आहे. त्यातूनच त्यांना आत्म अनुभूतीची प्रतीती घ्यावीशी वाटते.

कोजागिरीच्या चांदण्याचा गंध असा दरवळावा

आत्म-अनुभव अंतरीचा ठायी ठायी तेवावा...

एक असाच अनुभव ते आत्मआविष्कार या कवितेत मांडतात,

स्वरूप रूपात मिसळले

मग माणूस माणसात मिसळला

कायाही कायाहीन..

निर्गुण-सगुणाचे ठायी

एक स्रोत स्रवला..

..........

एक शाश्वत ज्योत

तेजोलय-तमोलय जडतत्त्व आता

सूर तो सूरची होय

तव असावे घर हे

निमिषात आनंदमय आविष्कार!

स्व-रूप ओळखले तर माणूस माणसात का नाही मिसळणार? तेजोलय तत्त्वाचे जड स्वरूप म्हणजेच सूर! याचाच अर्थ सुरांमध्ये 'तो' आहे, ते चैतन्य आहे. सूर हे 'त्याचे' घर आहे!! अजयने हे नातं इतक्या सुंदर, तरल कल्पनेनं जोडलं आहे की संगीत हीच ईश्वर-साधना हे सत्य वेगळेसांगायलाच नको.

हा **'तो'** अजयच्या कवितेत ठायीठायी व्यापून राहिला आहे. कधी तो कृष्ण असतो, तर कधी राधा! कधी ते चैतन्य गोजिऱ्या रूपात विटेवर असतं तर कधी पंचतत्त्वांच्या साजिऱ्या गाभाऱ्यात असतं. पण कसं?

दूर सोन्याचा कळस

वाटे धूसर धूसर

तहान वाटे गाभाऱ्याची

देव दिसे ऐसपैस...!

अशा ‘ऐसपैस’ देवाचे दर्शन ज्याला होते तो माणुस काय साधा असतो? चार सामान्यांसारखा? नाहीच. तो वेगळा असतो. जास्तीचे सहावे इंद्रिय ‘खरेखुरे मन’ असलेला. अजय तसा माणूस आहे!! वेगळा असला तरी ‘माणसाला’ असते तसे मनही त्याला आहे;सुखद चंद्राची नवरात्र हवी असणारे, प्रियेचे मीलन सौख्य मिळता पाना-फुलात नाचणारे आणि कृष्णमेघांनी चिंब झाल्यावर हर्षणारे!! त्या मनाला उर्मिलेची व्यथा व्याकुळ करते,मीलनाच्या गंधात ते दरवळून जाते आणि अनाम वेदनेने ते बधीर होऊन जाते. वेगवेगळया कवितांमधून हा कवी वाचकाला वेगळा कळून येतो.

निसर्ग व त्याची विविध रूपे ही कवीची व्यक्त होण्याची आणखी काही माध्यमे आहेत.त्यात श्रावणरूप, पाऊस, पावसाच्या सरी ही विशेषत्वाने आहेत. सरी तर सख्याच आहेत. ‘नभ कधी कधी वाऱ्यासंगे जमिनीवर येते’, ते याच कवीसाठी! भावावस्थेला अनुकूल अशी निसर्गरूपे कवीला साथ देतात. कवीची गोमंत भूमी आहेच तशी, जिचा कवीला सार्थ अभिमान आहे!

संगीत हा ज्याचा जिव्हाळयाचा विषय आहे त्याच्या कवितेत मल्हार, श्याम-मल्हार येणारच! आसावरी, तिच्यात नसलेला तीव्र निषाद हवा तेथे दाखवणारच. कृष्णाची मुरली, त्याचा पावा यांचे सूर गुंजणारच. आर्त सुरातला मारवा ‘साडेतीनात’ सजावा, या ओळीतील गर्भितार्थ मात्र वाचकानेच जाणायचा.

अशी ही अजय नाईक यांची कविता. वाचकाला वेगळी अनुभूती देणारी. जो त्यांच्या शोधयात्रेत सामील होईल त्यांना वाटेवरचे खूप काही गवसेल. त्यांच्यासारखी ‘तलम जखम’ ज्यांना झाली असेल त्यालाच कवितेतलं मलम गवसेल!!

अजयची कवितावृत्तबद्ध नाही. संगीत आणि रिदम हे त्यांचे श्वास असले तरीही! तरीही तिला कुठला ‘छंद’ नाही. कारण ती बंधनापलीकडे जाणारी आहे. तिला बंधनापलीकडची ओढ आहे; ती म्हणते,

सळसळत्या चैतन्याला एक सवाल आता

रिपूंच्या कलेवर तो एक मायावी

सजावी कायाही होउनी मोहमयी

परम चैतन्याचा ध्यास हा

तुला मूर्त करील का?

शतकाचा प्रवास हा

संपेल कधीतरी आता....

हा प्रवास संपण्याआधी अनेक श्रावणांची बरसात तुमच्या कचितेच्या वहीत होवो व तुषार आमच्या शिरी पडोत ही शुभेच्छा देऊन, थांबत नाही; तर तुमच्याबरोबर प्रवासात राहते!!

धन्यवाद.

# Prastavana---Poems by Prof. Meenal Yeole (Pages5)

एक साहित्यिक सकाळ. फक्त भगिनींची. त्यामुळे सिल्कच्या भारी भारी साड्यांची सळसळ, परफ्यूमचे विविध सुगंध, फुलदाणीत ताजी फुले ठेवण्याची लगबग, पाहुण्यांच्या आगमनाची उत्सुकता हे सगळं काही वातावरणाला भारून टाकत होतं. साऱ्याचा दुरून आनंद घेत मी नुसती बसले असले तरी डोळे मात्र कुणाला तरी शोधत होते. चेहरा ओळखीचा नव्हता, पण शब्दांची ओळख झाली होती.

'सोसण्याची फुलं होतात नि वेदनेचं गाणं होतं, हे सत्य ऋतूंनी शिकवलेलं असतं आपल्याला. शिशिरातल्या आर्त व्याकूळ आठवणींचं अर्घ्य द्यावं वसंताच्या पायाशी. तनामनावरचे उपेक्षांचे ओरखडे आतल्या आत दडवून ठेवत सामोरं जावं ऋतुराज वसंताच्या स्वागताला. मग निळयाशार आभाळावर आपण अपार प्रेम करू लागतो. ज्ञानेंद्रियांना रसरंगगंधाची भाषा कळू लागते. आपल्या आत कधीचीच दबा धरून बसलेली अहंकाराची डसरी नागीण दूर कुंपणापल्याड सरपटत निघून जाते.'---मीनल येवले.

भाषेचं हे लालित्य मीनल यांनी 'व्हॉट्स अप' वर मला मेसेज केलं होतं. भाषेची भुरळ पडून मी लिहिलं होतं, वाह! क्या बात है!!

मीनलच्याशब्दांना माझ्यालेखी आज चेहरा मिळणार होता....

....आणि त्या साहित्य-मैफिलीत मी मीनल येवलेंना अचूक शोधलं. अगदी गळाभेटच झाली. अंतर नव्हतंच. पुस्तकांची देवाणघेवाण झाली. नंतर फोनभेटीसुरू झाल्या. त्यांचं 'आंदण' हातात पडलं. त्यातून परिचय घट्ट झाला. या शब्दवेडीनं मलाही तिच्या शब्दांच्या प्रेमात पाडलं.

आज हे कवितांचं हस्तलिखित माझ्या हाती देऊन तिनं चार शब्द माझ्याकडून मागितले, तर मी नाही तरी कसं म्हणणार?

कविता म्हणजे

उरात उठली कळ

सुखदुःखाच्या हिंदोळयाची

जीवाला पोहोचली झळ....

असं तिनं आधीच म्हणून ठेवलं होतं, ‘परीघ’ मधल्या एका कवितेत. ती झळ माझ्या मनाला पोहोचली यात काय नवल? मैत्रीचं नातं असतंच ना तसं? मीनलच्या देखण्या दुःखात मी बुडून गेले.

दुःख देखणे असे की

ओल शोधून रुजत गेले

मंतरलेल्या जीवनलयीत

कविता होऊन सजत गेले....

मायेची, प्रेमाची ओल देऊन दुःखाला जपलं देखील तिनं! त्याचे(दुःखाचे अन् तिचेही) श्वास मोकळे झाले; आणि?....

उरीपोटी जपता त्याला

झाले मोकळे श्वास

अनाहूतपणे अंगणी माझ्या

आनंदऋतूंचे मास....

दुःखाची कदर केल्यावर आनंद अनाहूतपणे येतोच, हे एक आध्यात्मिक सत्य मीनल नकळत सांगून गेलीय्. असंच एक सत्य याही ओळींमध्ये---

बाहेरचे मिटवता, आत उघडले काही

अंतरातले काहूर, झाकतांना उतू येई

सुख भरली घागर, उगा मन खंतावले

काळजाच्या गाभाऱ्याशी ऊन्ह उतरणी आले....

या अष्टाक्षरी कवितेच्यासुरवातीला‘ऊन्ह’ अंगणातल्या तुळशीवृंदावनापाशी उतरून आलं ;शेवटी काळजाच्या गाभाऱ्याशीत्याची ‘तिरीप’ येऊन पोहोचली आहे.खेड्यातील एका ग्रामीण स्त्रीच्या मनात, ‘घर’ अनुभवतांना ज्या संमिश्र भावनांचं काहूर उठतं, त्यानं काळजाचा गाभारा अनामिक हुरहुरीनं भरून गेलेला प्रतीत होत आहे.

मीनलच्या कवितांमधील सौंदर्य तिनं शब्दांमध्ये दडवून ठेवलेल्या लक्ष्यार्थामधे असतं. तिला कवितेतील शब्दांआडूनबरंच काही सांगायचं असतं. ते रसिकानं आपापल्या अनुभवानुसार व वकुबाप्रमाणे जाणून घ्यायचं असतं. सरळ साध्या कवितेप्रमाणे तिच्या बहुतेक कविता नुसत्या उलगडत जात नाहीत. अर्धोन्मीलित कळीची एकेक पाकळी रसिकानं हलक्या हातानं थोडी थोडी दूर करत आतल्यागाभ्यापर्यंत पोहोचावं, तसं तिच्या कवितांत शिरावं लागतं; भ्रमरासारखं.

हिरव्या ऋतूंचे , हिरवे आवळ

घातली तू गळ, सोबतीची....

नभाच्या डोहात रुते चंद्रकोर

मन निळे मोर, संयमाचे....

ऋतू हिरवे आहेत, याचा अर्थ प्रेमाचा पाऊस बरसून गेला आहे..त्यानं पहिल्यांदाच प्रेम व्यक्त केलंय...सोबतीची इच्छा प्रदर्शित केलीय्... त्याचं नभाइतकं अथांग व डोहासारखं खोल, गहिरं प्रेम तिला जाणवतंय्...त्याच्या तशा सूचक प्रेमामुळे तिची नजर मुग्धपणे खाली वळलीय, म्हणूनच तिच्या पापण्यांची चंद्रकोर झाली आहे...ती रुतलीय् याचा अर्थ ती वर पाहून त्याच्या नजरेला नजरही देऊ शकत नाहीए......त्याच्या गोड प्रश्नानं तिचा मनमोर खरंतर नाचू पाहतोय् पण तिनं संयमानं त्याला थोपवलं आहे!!या चार ओळींनी वाचकाच्या मनात एक सुंदर चित्र उभं केलं आहे, यात शंकाच नाही.

निसर्गात ऋतूंचं चक्र असतं, तसंच जीवनातही! असे मनमोही ऋतू सरतांना काय होतं?

ऋतू सरतांना , ओलावले काठ

आठवांचे घट, हिंदोळती....

दिठीच्या पात्यात प्रीतीचे पाश तर आवळले गेले, पण तिच्या मनात हे रान, हे काहूर कुणी व का उठवलं? या मधल्या जागा रसिक वाचकानं भरून घ्यायच्या आहेत..तरच, आठवांचे घट का हिंदोळतात याचा अंदाज लागेल...

एक वेगळा अनुभव शब्दबद्ध करतांना कवयित्री लिहितेय्....की तू माझी पाऊलवाट दरवळत ठेवलीस; माझा आत्मविश्वास हिरवळीसारखा ताजातवाना ठेवलास त्यामुळे.......

अवतीभोवती सतत भिरभिरायचं एक फुलपाखरू

गुणगुणत असायचं ऊर्जेची गाणी

आनंदानं भरून निघायची पोकळी उदासवाणी....

आणि नंतर........ध्यास, स्वप्न, उमेद नाही हिरावू शकलं कुणी

खाचखळगे,वाटा,वळणे जुनीच तर आहेत,

वाटतं, जणू काही पंख छाटले आहेत....

सर्व जुनंच तर आहे असं वाटत असतांनाच, काहीतरी कमी झालंय्...नुसतीच तडफड...नुसतीच फडफड....

पण पुन्हा काही उत्फुल्ल क्षणही अचानक गवसतात, त्यांनाही कवयित्री न्याय देते.

अंतर्बाह्य फुलून आलेलो आपण

निसटून गेलेले क्षण

कितीतरी वर्षांनी

पुन्हा एकदा धरू लागलो

घट्ट चिमटीत...!!

‘पुन्हा एकदा’ या वरील कवितेत स्मरणरंजनाची सुंदर नक्षी काढतांना मीनल यांनीशब्दांची लोभस पखरण केली आहे. ‘अंगारफुलांचा सजग पहारा’ , मख्मली काटेसावर, तेजाळ रानवाटा, केशररंग; तसेच भूतकाळात उडून गेलेल्या कापूसभिंगऱ्या.... अशी खास विशेषणे लावून संयुक्त शब्द तयार करणे यात त्यांचा हातखंडा आहे!सर्वच कवितांमध्ये असे शब्दवैभव दिसते, जे वाचकाला आनंदचकित करून सोडते.

स्त्री हा स्त्रीच्या जिव्हाळयाचा विषय असतोच; मीनलनेही त्याबद्दल लिहिलंय्,

पाण्यात राहून माशाशी वैर

तुला कधीच जमायचं नाही...

कुणावर काढशील राग?....कुणाकुणावर संतापशील?

आपल्या स्वप्नांचे मनोरे किती असावेत झगमगीत?

कुठवर घ्यायचीय झेप तुझ्या पंखांना?...

इतक्यात कशी डळमळलीस?...

एकाएकी उतरवताच येणार नाही तुलामानेवरचं जोखड

पण बाई, सहभागी करशील इतरांना

तर थोडक्यावरनिभायचं नाही

पाण्यात राहून.....

ह्या फक्त काही ओळी आहेत. बाकीच्या रिकाम्या जागा...तुमच्या आमच्या साठी आहेत.. एकत्र कुटुंबात स्त्रीची होणारी कुचंबणा या मुक्त कवितेत शब्दबद्ध झाली आहे. ‘स्व’ शी संवाद साधतांना सगळयांचंच दुःख मीनल लिहून गेलीय्.

पुरुषाचंहीआयुष्य असंच चाळीस ओळीत, घडी करून नीटनेटकं मांडण्यात ती यशस्वी झाली आहे. पत्नी बाळंतपणाच्या वेणा सोसते आहे...त्या पाहून तो हादरून जातोच, पण बाप होण्याच्या जाणिवेनं मोहरूनही जातो..मग बाळासाठी तोही रात्र जागून काढायला शिकतो..त्याच्या विकासानं सुखावतो...आपली चप्पल त्याला येते हे पाहून अंतर्मुख होतो...हा बदल फार स्वागतार्ह वाटतो.

लेकीची पाठवणी करतांना तोही डोळे टिपतो... आणि पत्नीला नातवंडात रमतांना पाहून कृतार्थ होतो...ही कविता एक संसारचित्र रेखाटून जाते..वाचकाचंही मन सुखावतं..

संसाराच्या रहाटगाडग्यातून बाहेर पडावं असा विचार थकल्या भागल्यावर साऱ्यांच्याच मनात येतो; तो विचार मीनलनं आधीच केलाय. 'मन एव मनुष्याणाम् कारणम् बंधमोक्षयोः' हे तत्त्व तिनं एका छोट्या कवितेत छान मांडलं आहे.देवद्वार छंदातील ही रचना आवडावी अशीच आहे.

शरीर पावन । मन व्यभिचारी ।हिंडे दारोदारी । आसक्तीच्या ।।

देहाचा पिंजरा । मनाचे पाखरू । लागे भिरभरू । मुक्तांगणी ।।

उलगडू कसा । मना, तुझा खेळ । निवृत्तीची वेळ । अंगणाशी ।।....

येतोय् ना'गागर में सागर' चा प्रत्यय?

देवद्वार छंदात आणखी एक रचना आहे. 'देह झाले झाड'. त्यातही पैलतीराची ओढ दिसत आहे.

मनपाखरांना । क्षितिजाची ओढ । देह झाले झाड । चैतन्याचे ।।

'उगवायचा थांबत नसतो कधी सूर्य' असं म्हणत काळाच्या गतीची आठवण कवयित्री करून देत आहे.

काळ लिहीलंच एका पानावर तुझे माझे नाव

चालत जाऊ सोबतच त्याच्या , लागेपर्यंत गाव.....

असू दे तुझ्यासोबत तुला हवं असेल ते काही

माझ्यासोबत तर कायमच असेल कवितेची ही वही....

काळासोबत ऋतू बदलत असले तरी कवयित्रीसाठी'सारे ऋतू सुखाचे' आहेत ही गोष्ट वाचकालाही सुखदायी आहे. ही कविता 'आनंदकंद' वृत्तात पूर्णतः आणायची असेल तर एकाच ओळीत अगदी किरकोळ बदल करावा लागेल. मीनल छंदोबद्ध कविता लिहू शकते, हा

विश्वास मला वरील काही कवितांनी दिला. 'कधी अचानक' हीकविता अशीच, एका ओळीत 24 मात्रांच्या 'अनलज्वाला' या जातिवृत्तात आहे.

कविते, 'तू भेटली नसतीस तर'...

घुटमळत राहिलं असतं जगणं

कमठ व्यवहाराच्या आखीव रिंगणात......

ओथंबलेलं आभाळ कुणी पचवलं असतं उरात?

वळवाच्या पावसाला कुणी घेतलं असतं घरात?....

कुरवाळता आली तुझ्यामुळेच वेदनांची तीक्ष्ण धार

साध्या माझ्या वस्त्राला लाभली तुझी वेलबुट्टी किनार.!.....

यामुक्त कवितेतील ह्या काही ओळी. कवितेची वही सतत जवळ असण्याचा उल्लेख वर आलाच आहे ; कवितेचं जीवनातील स्थान इथं लक्षात येतंय्. तिच्यामुळे वेदनांची धार 'कुरवाळता येते!' हे किती लक्षणीय आहे; नाही?

पण हीच कविता कधी रुसून बसली तर?

ती रुसते, कारण तिला 'संमेलनाचा गजबजाट' आवडत नाही! मग ती येते कधी?

पावसाचा सांगावा घेऊन

काळयाकुट्ट मेघोदरातून लखलखावी कडाडकड वीज

तसं भिनून येतं नसानसातून

कधी कधी एखादं काव्यबीज

जन्मसोहळयाचा कृतार्थ अनुभव

नि त्या क्षणापुरतं केवढं तरी समाधान...!

निर्मितीचा हा क्षण कवयित्रीने अलगद टिपला आहे!

या संग्रहात एखादीच सामाजिक आशयाची कविता दिसते. पण यापूर्वीच्या संग्रहात तिची सामाजिक जाणीव अधोरेखित झालीच आहे. संख्या हा गुणवत्तेचा अंतिम निकष कधीच नसतो! निदान कवितांच्या बाबतीत तरी!

दुष्काळानं हताश झालेल्यांची अवस्था कवयित्रीच्या संवेदनशील मनाला किती त्रासदायक होते, हे यात ती सांगते. तीही व्याकूळ होऊन शेवटच्या कडव्यात म्हणते.

गुदमरली झाडे वेली, करपून गेलं काळीज

ओक्याबोक्या झाल्या वाटा, मिटल्या हिरव्या खुणा

कुणावरती रुसला असेल जिवलग पाऊसराणा?.....

मीनलच्या कवितामनाला आनंद देतात. अचानक पावसाची जोरदार सरयावी, आपण झाडाखाली उभं रहावं, तरी पानांवरून गळणाऱ्या मोठ्या थेबांनी आपण भिजून जावं तसं वाटतं तिचा संग्रह वाचतांना. त्या झाडावरून ओघळणारी फुलं असावीत, तसे तिच्या शब्दांचे झुपके आपल्या माथ्यावर ओघळतात.समोर असलेल्या तिरप्या विजेच्या तारेवरून पावसाचे थेंब एकामागून एक सरकावेत, ते आपण सहजच बघत रहावेत,तशा तिच्या कविता आपले लक्ष खिळवून ठेवतात.

फांदीला फुटणारे तेजाचे बिंब, निर्मोही मनाला आलेली चैतन्याची फुलं, चिरवेदनेची ललाट रेषा, रोजचा जगण्याचा उत्सव,गतीचे चाळ,विस्मरणाची गर्दव्याकुळ नक्षी,मोत्यांचं कणीस, चांदणवेळचा प्राजक्त, कडुनिंबाच्या फांदीवर गच्च मधाचे पोळे,...असे कितीतरी भन्नाट शब्दसमूह आपल्याभोवती फेर धरतात, आणि आपण अचंबित होऊन जातो. मात्र काही वेळा, शब्दांच्या या ‘मेरि गो राउंड’च्या वर्तुळाकार फेऱ्यांमध्ये कवितेचं केंद्र कुठेतरी हरवून जातं. ‘तहान’ ही कविता मला तशी वाटली. याबाबत कवयित्रीनं सावध टहायला हवं, असं सुचवावंसं वाटतं.

'ओलेत्या पहाटे'या कवितेत वाऱ्याच्या ओठी 'मारवा' असं कवयित्रीने म्हटले आहे पण त्यात एक विसंगती आहे. शास्त्रीय संगीतातील मारवा हा अत्यंत हृदयस्पर्शी राग आहे; मात्र त्याची गाण्याची वेळ संध्येचा पहिला प्रहर अशी आहे. म्हणून त्याला पहाटेला जोडू नये. रागांची ओळख सगळ्यांनाच असावी अशी अपेक्षा नाही, पण जे जाणवलं ते नोंदवलं इतकंच.

'मृत्यू' जितका गूढ तितकाच आकर्षकही असतो. त्यावरील कविताही छान उतरली आहे. जीवनाच्या फांदीवरून तो खुडून नेतो...हेच 'अंतिम सत्य' आहे.

मीनल येवले या एक चांगल्या कवयित्री आहेत; त्यांच्या हातून यापुढेही भरघोस आणि अधिक सकस लिखाण होवो अशा मी शुभेच्छा देते. मला खात्री आहे की साहित्य-देवतेच्या –अंभृणीच्या- पायांवर नवनवीन दागिने अर्पण करतील. पूर्णविराम.

18. सप्टेंबर 2017

# गझलकथा

सुप्रिया व दिलिप यांच्या लग्नाचा 25 वा वाढदिवस मुलांनी धूमधडाक्यात साजरा केला आणि आलेले पाहुणे बरेचसे परतले. आता बंगल्यावर उरले होते जवळचे नातेवाईक, परगावहून सहकुटुंब आलेले मित्र आणि असेच काही. सर्व सीनियर्स निवांत बसून गप्पा मारत होते. यंगस्टर्स वरच्या मजल्यावर आपापल्या मोबाईल, आय-पॉड इत्यादि घेऊन बसले होते, त्यामुळे तिकडे शांतता होती.

‘काय चाललंय या मुलांचं? आजिबात आवाज नाही!’ कोणीतरी म्हणालं. त्या प्रश्नाला कोणीतरी उत्तरही दिलं, ‘अहो, मोबाईल असल्यावर त्यांना कोणाशी बोलण्यात इंटरेस्ट असतो का? बसले असतील सगळे मान खाली घालून!’

‘ए, बरं ते जाऊ दे. सुप्रिया, अग दिलीप कुठाय्? आता तरी दोघं शांतपणे इथं बसा...’ देवी, दिलिपची बहीण म्हणाली. तेवढ्यात दिलिप आलाच. त्याच्या पाठोपाठ कुसुम ट्रे घेऊन आली. त्यात कॉफीचे मग्ज होते.

‘आता सगळे मस्त कॉफी घ्या बरं.’ दिलिप.

‘तू ही व्यवस्था करायला गेला होतास वाटतं!’सुप्रिया.

‘सुप्रिया,’तिची मैत्रीण रूपा म्हणाली, ‘तू अजून नवऱ्याला अरे-तुरे म्हणतेस, ते मला आवडतं बाई. आमचं लग्न ‘अरेंज्ड’ नं; मी नाही तसं म्हणू शकत.’

‘ म्हणजे? सुप्रियाचं लव्ह मॅरेज आहे?’ कोणीतरी ‘अज्ञानी’ व्यक्तीनं ‘चिडवणारा’ प्रश्न केला!

‘अरे हां! आज पंचविसावा वाढदिवस झाला ना, आता या दोघांनी सांगायचं, कसं कुठे प्रेम जमलं? कोणीपहिल्यांदा ते व्यक्त केलं? आणि कसं? ए, दिलिप! सुरवात कर ना मजा येईल...पुन्हा एकदा... डाऊन द मेमरी लेन....’ एक मित्र म्हणाला.

हळूहळू गप्पांना असा रंग चढू लागला.

‘आता पन्नशी उलटली...आता काय त्याबद्दल बोलणार? हो ना ,सुप्रिया? दिलिप म्हणाला.

‘बरं. आम्ही प्रश्न विचारतो; तुम्ही फक्त उत्तरं द्या.आठवतील तशी.’

‘ मला माहीत आहे, सुप्रियानं दिलिपसाठी गाणं म्हटलं होतं,एकदा मित्रमैत्रिणी जमले असतांना.’ कुठलं गं?’ कोणाला आठवेना. ‘कुठलीतरी गझल होती.’

सुप्रियाच नंतर म्हणाली, ‘मला आधी दिलिपनं आडून आडून विचारलं होतं. मी गाणं म्हटलं होतं, ते...हे.... ‘तुझे क्या सुनाऊं मैं दिलरुबा....’असं म्हणत सुप्रियानं हळूच दिलिपकडे जुन्या ‘प्रेमाच्या नजरेनं’ पाहिलं.

दिलिप त्या नजरेचा मागोवा घेत म्हणाला, ‘ ही असली की मी नुसता गुणगुणायचो, ‘तुमसे बढकर दुनियामें न देखा कोई और, जुबांपर आज दिलकी बात आ गई.... काय नं, आम्हाला दोघांनाही जुनी गाणी आवडायची. मग असे गाण्यांमधूनच आमचे भाव एकमेकांपर्यंत पोहोचवले आम्ही.’

‘अरे वा! सुरुवात तर सुरेल झाली तुमची. म्हणजे तेव्हाही आणि आत्ताच्या गप्पांनासुद्धा. ए, सुप्रिया, म्हण ना आत्ता, ती गझल; तुझे क्या सुनाऊं...’.

राजेश एकदम पुढे आला, ‘कोण म्हणलं ती गझल आहे असं? ते गीत छानच आहे.रफीचं. पण ती गझल नाहीए. तू म्हण सुप्रिया.’

‘ नसू दे गझल नसली तर. पण आम्हाला ते गाणं आवडतं. माझ्या जन्माच्याही आधीचं असेल ते.’

सुप्रियानं आढेवेढे न घेता ते गाणं म्हटलं. तिनं सुरुवात केल्यानंतर, आश्चर्य म्हणजे वरच्या मजल्यावरची सर्व तरुण, नवतरुण मंडळी मोबाईल बंद ठेवून खाली आली. त्यांना अशी गप्पांची मैफल नवीन वाटत होती. मग गणी म्हणायचा आग्रह सुरू झाला. ज्याला जसं येईल तसं ,पण सगळयांनी गाणी म्हणायचीच; असा ठराव झाला. सघळेच जॉइन झाले. संकोच संपला व मैफल गाण्यांनी रंगू लागली. काहींचे आवाज बेताचे होते, काहीना नीट शब्द येत नव्हते. पण रंग भरत चालला होता. एकीनं सुरुवात केली,

यूं ही कोई मिल गया था सरे-राह चलते चलते

वहीं थम के रह गई है मेरी रात ढलते ढलते....

---चालता चालता वाटेत कुणीतरी भेटलं...सहजच घडलं हे. पण त्या भेटीचा प्रभाव एवढा जबरदस्त झाला की रात्र होती तिथेच थांबली! माझ्यासाठी काळच जणूकाही थांबला. ती

अल्पकाळची भेट माझं आयुष्यच बदलून गेली; असं कवी म्हणत आहे. पाकीजा चित्रपटातील ही गझल कैफी आजमी यांनी लिहिली आहे.

राकेश म्हणला, 'हंऽ; ही गझलच आहे'.

' राकेश मघाशी तू म्हणालास तुझे क्या सुनाऊं मैं दिलरुबा ही गझल नाही. आणि आता ही गझल आहे. हा फरक का?'

' ते तर मला लेक्चरच द्यावं लागेल; पण ती ही जागा अन् वेळ नाही. इतकंच सांगतो, गझलेमधे दोन दोन ओळींचे स्वतंत्र शेर असतात, त्यात काफिया असतोच.'

पाकीजा च्या त्या गझलेतले आणखी शेर ऐकलेत ना तुम्ही?

जो कही गयी न मुझसे वो जमाना कह रहा है

कि फसाना बन गई है मेरी बात टलते टलते...

शबे-इन्तजार आखिर कभी होगी मुख्तसर भी

ये चिराग बुझ रहे हैं मेरे साथ जलते जलते....

यात चलते, ढलते..टलते जलते या समउच्चारी शब्दांना काफिया म्हणतात. आपण शाळेत यमक शिकलो आहोत ना, तोच काफिया असं थोडक्यात समजू या.

'पाकीजा हा सिनेमा कधी आला होता?'

' 1972 असं म्हणताच तरुण मंडळी खांदे उडवून म्हणाली, की आम्ही तर तेव्हा जन्मलोच नव्हतो!'

मोठ्यांच्या गप्पा सुरू होत्या. त्यांना किस्से माहीत होते. सिनेमा पुण्याच्या त्यावेळच्या 'हिंदविजय' टॉकीज मधे लागला होता. आणि शो चालू असतांनाच मीनाकुमारीचं निधन झाल्याची स्लाईड आली. सर्वांना 'शॉक' बसला. एकजण म्हणाला 'मी त्यावेळी कॉलेजमधे होतो'.

तरुणांचा प्रतिनिधी वाटणारा यश म्हणाला ‘आम्हाला तर जुनी आवडतात. मी खूप ऐकतो जुनी गाणी.’

‘ अरे आम्ही तर त्या गाण्यांबरोबरच वाढलो!!’ एक प्रौढ गृहस्थ म्हणाले. आम्हाला असं आठवतं, ‘झूमती है नजर’ हे गाणं नवं होतं तेव्हा मी चौथी-पाचवीत असेन. सिनेमाचि जाहिरात ढकलगाडीवर केली जायची; फोनोवर ती रेकॉर्डही वाजत जायची.’ पुढे ‘ये देश है वीर जवानों का’ हे म्हणजे आमच्या कॉलेजच्या जमान्यातलं गाणं.ही गाणी लागली की आम्ही त्या वयाचेच होऊन जातो.’

AgniPushpa—Mrs Kumkar

Sometimes we think, what is 'life' all about?Is it just to educate ourselves for earning our bread and then butter? Is it revolving with the cycle of day and night doing different duties that only we have shoulderedknowingly and willingly? When we get fade up ofour monotonous and humdrum life, then the thought surfaces our mind; after all what is the life all about. We then try to turn our mind towards spiritual books.

We then come across the simpleanswer that we are bestowed this body only to serve others and that we have to return our destinationfulfilling this purpose of life. On the contrary, we engage ourselves in mundane, worldly achievements and forget the real aim.

When I read the book 'Agnipushpa' written by Mrs. Meenakshi Kumkar, I thought that she has really foundthenoble way to make her life meaningful. She has offered herself to the service of the society; and she wished nothing in return! 'Nishkaam Seva' as it is stated in BhagvadGeeta. Though it was a part of her duty as a social worker in Command Hospitalshe did not carry it out with a dry mind. She blended her senses into the circumstances of the patients, in their sufferings

and tried for what her best she could put in, to comfort them and to relieve them of their pains.

Her humanitarian approach towards all the patients motivated her to establish an institution like “PRAYAAS” through which she could connect herself to different such social institutions, as Manavya, Care India,Shrivatsa and many others.

In her book, AGNIPUSHPA, she has included some 23 unique medical cases she has successfully handled, after reading which we remain stunned and get absorbed in the thoughts. There are cases ofpatients suffering from AIDS,TB, Cancer, and also unfortunate children of prostitutes who were denied admission to ‘Child Welfare Centre’. Mrs Kumkar had to argue with the judge in charge, but she did not accept retreat and fought for those innocent children. She also helped adolescent Shubha, who was pregnant before marriage and the baby was then adopted by a couplewith the help of Shrivatsa. One of the the injured Soldiers was admitted and his leg was amputated. Mrs Kumkar engaged a nurse in his service. When they both found themselves to be fit as the life partners, she arranged their marriage ceremony, too!

She has inspired medical students to render holistic treatment to the patients who would come to them when they would start their own practice. Her students



humbly admit that Mrs. Kumkar has given them a new sight of the profession.

Mrs. Kumkar does not fail to mention the support of her superiorsMajor Genaral Dr. Madhuri Kanitkar, Colonel Kushwah,Dr. Reena Tilak…andmany others, asher coworkers together with other social workers. She has taken initiative in creating children-park, arranging blood-donation-camps, immunization-camps for children. Many times she has done counselingtobring social awareness in uneducated or ignorant people.

In thirty five years of her service she has achieved love and trust of the people who happened to meet her for different purposes. Actually she has earned it by giving her whole life in doing social work. In society, we see many well-offladies feel proud in showing that they like doing social work. But many of them, leaving a few exceptions, do it just as a fashion or a status symbol. This book Agnipushpa is an eye-opener for them.

I think this book triggers though-process in sensitive minds, and will help the readers to live the life in more meaningful way.Serving poor, downtrodden and needy people is the real satisfaction and bliss that we are in search of.I congratulate Mrs.Kumkar for penning her experiences and throwinglight onthe unseen part of society.

----Sangeeta Joshi

(Poet, Marathi n Urdu Gazal-writer)

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात . ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात. म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.

www.esahity.com

esahity@gmail.com